# १

# समाजशास्त्रीय सिद्धांतांचा ऐतिहासिक संदर्भ

१) सेंट सायमन यांचे फ्रेच राज्यक्रांती आणि पुनर्जागरण याबद्दलचे आदर्श मापदंड
२) ऑगस्ट कॉम्ट  - त्रिस्तरीय नियमांचा सिद्धात आणि सकारात्मकता
३) हर्बर्ट स्पेन्सर - रचनात्मक आदर्श रचना

**प्रकरणाची रचना**


१.० उद्देश
१.१ प्रस्तावना
१.२ पुनर्जागरण आणि फ्रेंच राज्यक्रांती
 १.२.१ पुनर्जागरण
१.३ सेंट सायमन यांचे आदर्श
१.४ ऑगस्ट कॉम्ट
१.५ हर्बट स्पेन्सर
१.६ सारांश
१.७ प्रश्न
१.८ संदर्भ


## १.० उद्देश

१) समाजशास्त्रीय सिद्धाताच्या ऐतिहासिक संदर्भाची प्रस्तावना.

२) पुनर्जागरण जळवळ आणि फ्रेंच राज्यक्रांती यांचा अभ्यास आणि या दोन्ही चळवळींचा समाजशास्त्रीय सिद्धांतावर झालेला परिणाम.

३) सेंट सायमन यांच्या विचारांचे आकलन.

४) ऑगस्ट कॉम्ट यांच्या सकारात्मकतेचा सिद्धांत आणि त्रिस्तरीय नियमाच्या सिद्धांताची ओळख.

५) हर्बर्ट स्पेन्सर यांची रचनात्मक आदर्श (व्यक्तिसंघात समानता) ही नवी सिद्धांताची संकल्पना आणि उत्क्रांतीवादी सिद्धांताची ओळख.

## १.१ प्रस्तावना

अगदी अनादि कालापासून मानवी क्रियाशीलता आणि मानवी समूहाचे सामाजिक जीवन या बद्दलचा वैचारिक सिद्धांताचा का व कशासाठी हे समजून घेण्यासाठीचा प्रयास हा निरंतर अभ्यासाचा विषय राहिला आहे. अगदी पूर्वापार काळापासून ॲसेरियन्स, इजिप्शीयन आणि चायनीज लोकांनी मानवी जीवनाचा अभ्यास केल्याचे दाखले मिळतात. समाजशास्त्रात मानवीकृती समजून घेण्याचे

प्रयत्न झाले आहेत. समाजशास्त्र हे एक शास्त्र आहे. ज्यात मानवीसंबंधाचा अभ्यास शास्त्रशुद्ध प्रकारानी कसा करावा याबद्दलची उत्कंठा आणि काळजी दिसून येते.

सामाजिक घटक व्यवस्था ह्या पासूनच विचार व सिद्धांताचा उगम झालेला आहे. जे लोक ठराविक काळात, ठरावीक जागी आणि विशिष्ट परिस्थितीत राहतात अश्या लोकातूनच विचार येतात. सामाजिक विचारवंतानी सामाजिक सिद्धांताचा अभ्यास किंवा विचार ज्या बौद्धिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत हा विचार केला त्या परिस्थितीचा अभ्यास करण्याची आपल्याला गरज आहे.

समाजशास्त्रीय सिद्धांताचा विचार केव्हापासून सुरू झाला हे आपण निश्चितपणे सांगू शकणार नाही. सामाजिक जीवनाबद्दलचे विकसित सिद्धांत सतत चालू होते आणि ही विकासाची प्रक्रिया सतत चालू राहील. प्रत्येक युगात सामाजिक आणि राजकीय संदर्भात नवीन विचार येतच राहतात. या प्रकरणात पुनर्जागरण आणि फ्रेंचक्रांती संदर्भात आद्यकालीन सामाजिक सिद्धांताबद्दलचे लिखाण यावर लक्ष केंद्रीत करणार आहोत.

प्रस्तुत प्रकरणात आपण आद्य विचारवंत हेन्री सेंट सायमन, आगस्ट कॉम्टे आणि हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या सिद्धांताचा आपण परामर्श घेणार आहोत.

## १.२ पुनर्जागरण आणि फ्रेंच राज्यक्रांती

समाजशास्त्रातील सिद्धांताच्या इतिहासाची सुसंगत मांडणी करणे कठीण आहे. कारण हे सिद्धांत म्हणजे बौद्धिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीतून विकसित झालेले फळ आहे. या विभागात आपणास पुनर्जागरण चळवळीचा आणि फ्रेंच राज्यक्रांतीचा डहापोह करायचा आहे.

### १.२.१ पुनर्जागरण:

अनेक अभ्यासकांच्या मते पुनर्जागरण विकसित होण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे कारण समाजशास्त्राचा शास्त्रीय विकास त्यानंतरच्या काळातच झाल्याचे प्रतीत होते. पुनर्जागरणाचा हा काळ उल्लेखनीय अशा तत्त्वज्ञानातील बौद्धिक विकासाचा आणि बदलाचा काळ आहे. या काळात समाजजीवनाशी निगडीत अशा मूल्यांची आणि विचारांची उलथापालथ झाली. जुनी मूल्ये त्याज्य ठरवून त्यांची जागा नव्या मूल्यांनी घेतली. ह्या पुनर्जागरणाचे अग्रणी फ्रेंच तत्त्ववेत्ते म्हणून चार्लस मॉन्टेस्क्यू (१६८९-१७५५) व जीन जॅकस् रुसो (१७१२-१७७८) यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. या काळातल्या विचारवंतांवर १७ व्या शतकातील तत्त्वज्ञान आणि विज्ञानाच्या विचारांचा पगडा होता. १७ व्या शतकातील तत्त्वज्ञान हे रेने डेस्कार्ट, थॉमस हॉल्स आणि जॉन लॉक्स यांच्या विचारांशी निगडीत होते. भव्य आणि संक्षिप्त अशा विचारांच्या पद्धती ज्या तार्किक दृष्ट्या सुसंगत आहेत, अशा पद्धती निर्माण करण्यावर भर होता. पुनर्जागरणाशी संबंधित असे नंतरचे विचारवंत यांनी खऱ्या भौतिक जगातील विचार घेऊन त्याचा चिकित्सक अभ्यास केला. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की अनुभवाधिष्ठित संशोधनाचा तर्कशास्त्र विचारांशी सांगड घातली. विज्ञान हाच त्यांच्या समोरचा आदर्श होता आणि आपण पाहात आहोत की सामाजिक विषयातही वैज्ञानिक प्रयोग होत आहेत. पुनर्जागरणातील विचारवंताना वास्तव जगातून निदान थोडे तरी विचार घ्यावेत असे वाटले. हे विचार सामाजिक क्षेत्रात उपयोगाचे होतील विशेषत: समीक्षात्मक चिकित्सा होईल तेव्हा तरी या विचारांचा उपयोग होईल असे त्यांना वाटले.

पुर्नजागरणाचा मुख्य उद्देश हा होता की लोकांना अनुभवाधिष्ठित आणि तार्किक पद्धतीने विश्वाचे आकलन व्हावे आणि त्यावर त्यांनी ताबा मिळवावा. भौतिक जगावर निसर्गानियमांचे प्रभूत्व असते तसेच कदाचित सामाजिक जगावरही असेल. त्यामुळे तत्त्ववेत्यांनी तार्किक विचारसरणी आणि संशोधनाच्या आधारे सामाजिक विचारांचा शोध घेतला. एकदा का तत्त्वज्ञानांना समजले की जग कसे चालते मग पुनर्जागरणाचे विचारवंत चांगल्या आणि तर्कशुद्ध जगाची निर्मिती करु शकतील.

पुनर्जागरणाच्या विचारवंतानी, तत्त्वज्ञानी लोकांनी तर्कशुद्ध विचारांवर भर देऊन परंपरेच्या आधिपत्याखाली असलेल्या विश्वासांना नाकारण्याचा त्यांचा विचार होता. जेव्हा या विचारवंतानी अश्या मूल्यांच्या संस्थांचा अभ्यास केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की हे विचार तर्कसंगत तर नाहीतच पण मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहेत आणि मानवी विकासात आणि वाढीत अडचणी निर्माण करणारे आहेत. आता या अविचारी पद्धतीवर मात करणे हे पुनर्जागरण विचारवंताचे लक्ष्य होते, ध्येय होते.

या जनजाग्रणाच्या विचारांना फ्रेंच क्रांतिकारी कॅथलिक क्रांतिकारी विरोधा तत्त्वज्ञान चळवळ चालवणाऱ्या विचारवंताकडून कडवा विरोध झाला. त्यांचे प्रतिनिधित्व लूई द बोनाल्ड (१७५३-१८२१) यांनी केले. द बोनाल्ड हे या क्रांतीकारी बदलांनी अस्वस्थ झाले आणि त्यांना मध्ययुगीन शांती आणि सुसंवादाकडे परत जावे असे वाटत होते. त्यांच्या मते देव हाच समाजाचा निर्माता होता. पुनर्जागरण तत्त्ववेत्यांची तर्कशुद्ध विचारांची पद्धत जी त्यांना खूप महत्त्वाची वाटत असे ती द बोनाल्डना पारंपरिक धार्मिक विश्वासांपेक्षा, विचारांपेक्षा खालच्या दर्जाची वाटत होती. त्यांचा असा विश्वास होता की देवाने समाज निर्माण केला आहे तेव्हा या पवित्र निर्मितीला बदलण्याचा प्रयत्न करु नये. पारंपारिक संस्थांना जशा पितृसत्ताक पद्धती, कॅथलिक चर्च, राजेशाही आणि एक पती पत्नी पद्धत या सर्वांना जो कोणी कमी लेखेल त्या सर्वांना द बोनाल्ड यांनी नाकारले.

द बोनाल्ड यांनी अती तीव्र आणि कडव्या पारंपारिक प्रतिक्रियांचे समर्थन केले. धर्मनिष्ठ परंपरावादी लोकांनी पुनर्जागरणवादी तर्कनिष्ठ विचारांना अनुभवहीन किंवा भोळे विचार म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. परंपरा, कल्पनाशक्ती, भावनात्मक विचार आणि धर्म हेच सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे आणि उपयोग घटक आहेत असा त्यांचा विश्वास होता. त्यांना या नव्या क्रांतीला विरोध केला आणि जुन्या अस्तित्वात असलेल्या पद्धतीचा स्वीकार करावा असे सुचवले. फ्रेंच क्रांती आणि औद्योगिक क्रांतीला प्रचंड विरोध करुन समाजविघातक ठरवले.

पुनर्जागरण विचारांनी जे तत्त्वज्ञानी प्रभावीपणे आणि सक्रियरित्या प्रभावित झाले त्यात एक कार्लमार्क्स होता. (जरी त्याने त्याचे पहिले सैद्धांतिक विचार जर्मनीत आकाराला आणले होते ) आणि फ्रेंच अभिजात समाजशास्त्रीय तत्त्ववेत्ते होते. परंपरावादी कर्मठ लोकांनी सामाजिक स्तरावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा परिणाम पुष्कळ समाजशास्त्रीय तत्त्ववेत्यांवर झाला. आणि तोच मुख्य विषय म्हणून कायम झाला. आपण असे पाहतो की सर्वसाधारणपणे समाजशास्त्र आणि विशेषत: फ्रेंच समाजशास्त्र हे पुनर्जागरण आणि विरोधी (परंपरावादी) पुनर्जागरण या दोन्हीचे मिश्रण आहे.

**फ्रेंच राज्यक्रांती:**

फ्रेंच राज्यक्रांतीची करणे हा विषय न संपणारा वादग्रस्त आणि विवाद्य आहे. फ्रेंचक्रांतीने संपूर्ण युरोपला एका गंभीर संकटात लोटले. क्रांतीचा केंद्रबिंदू पॅरीस होता पण त्याचे दूरगामी

परिणाम आणि त्याचे आघात सर्वदूर जाणाऱ्या लहरीप्रमाणे सगळ्यांवर झाले.

१७८९ मध्ये फ्रान्सच्या बाहेरच्या लोकांवरही या क्रांतीचे परिणाम झाले. राजकारणापलीकडल्या विषयांवरही झाले. राज्यक्रांतीच्या कार्यकर्त्यांना पुनर्जागरणाचा जो विश्वास आहे की मनुष्याची सार्वत्रिक अमुर्तता सारखीच आहे हे त्यांना मान्य होते. त्यांचा असा विश्वास होता की ते सगळीकडच्या माणसांचे प्रतिनिधित्व करतात आणि जागतिक अत्याचाराचा विरोध करतात. त्यांची सर्वात उदात्त अशी चळवळ म्हणजे मानवी हक्कांची घोषणा होती.

युरोपमध्ये १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात नेहमीच्या राजकारणाच्या पलीकडे काही सुप्त शक्ती कार्यरत होत्या. युरोप नियंत्रणाच्या बाहेर, अधिकाराच्या बाहेर जात होता. काळजीचं आणि उत्सुकतेचं एक कारण म्हणजे यंत्र व्यवस्था, यंत्राची निर्माणकारी आणि संहारक अशा दोन शक्ती दिसून येत होत्या. दुसरी सामाजिक होते, जनतेमध्ये जागरुकता वाढली होती व महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजापासून बाहेर असलेल्या लोकांनी एकत्र येऊन त्यांचे भवितव्य त्यांच्या हाती घेतील याची प्रचीति येत होती. तिसरे कारण बौद्धिक होते, सतत वृद्धिंगत होणारी साहित्य आणि तत्त्वज्ञानातली आतर्किकता जी माणसाच्या व्यवहारात दिसून येत होती, त्याबद्दलची काळजी वाढत होती.

फ्रेंच राज्यक्रांतीने समाजरचनेत बदल झाला आणि नव्या विचारसरणीचा उदय झाला. या विचारधारेत, जुन्यातून घेण्यासारखे काही नसल्यामुळे आधुनिक अश्या राष्ट्रीयतेच्या तत्त्वाचा उगम झाला. मग संपूर्ण पश्चिम युरोपभर हे तत्त्व प्रसरण पावत गेले. याचा आजपर्यंत अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत आहे. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे १७९२ ते १८१५ ची दोन युरोपिय युद्धे पेटली आणि फ्रेंच क्रातीने क्रांतिकारी विचार आणि राष्ट्रीयवादाचा प्रसार केला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे आधुनिक काळातल्या अनुभवाधिष्ठित क्रांतिकारी सिद्धांताची समाजाला प्राप्ती झाली. फ्रेच राज्यक्रांतीचे निरनिराळे अर्थ लावले गेले त्यात राजकीय परिस्थितीतले लोक आणि लेखकांचे ऐतिहासिक वेगवेगळे दृष्टिकोण होते.

पुनर्जागरण चळवळ आणि फ्रेंच राज्यक्रांती यांचे संबंध अतिशय गुंतागुंतीचे होते. जरी पुनर्जागरणाने संशयास्पद बुद्धिवाद पसरवला तरी क्रांतीच्या वेळी अतीतीव्र अशा राजकीय समस्याची जी उकल केली गेली त्याचा मात्र त्यात अंतर्भाव नव्हता.

**आपली प्रगती तपासा:**

१) या विभागात पुनर्जागरणांचा आणि फ्रेंच राज्यक्रांतीचा सामाजिक सिद्धांतावरचा परिणाम यांच्याशी तुमचा परिचय होईल.

## १.३ सेंट सायमन यांचे आदर्श किंवा तत्त्वज्ञान

क्लॉड हेन्री सेंट सायमन (१७६०-१८२५) यांचा जन्म एका जुन्या उमराव घराण्यात १७६० साली झाला. अमेरिकन क्रांतीत त्याचा सहभाग होता. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांना लिहिले की ज्या वेळस त्यांच्या विचारांना दृढता येईल, पक्वता येईल तेव्हा ते मानवजातीला उपकारक असे काही कार्य हाती घेतील. फ्रेंच राज्यक्रांतीचा उठाव झाल्याबरोबर त्यानी आपल्या उमराव पदाचा त्याग केला. राज्यक्रांतीच्या काळात तो मुख्यतः देशातील जमीन मालमत्तेचे आर्थिक व्यवहार बघत होता. या राज्यक्रांतीतला तो एक सट्टाबाज होता व त्या काळात तो ऐषोआरामात राहात असे. त्याच्या उच्च राहाणीमानातली फाजिल खर्च व विसंगत आर्थिक गुंतवणीमुळे त्याचे त्याच्या व्यवहारातील भागीदाराबरोबर जोरदार भांडण झाले. त्यानंतर तो वैज्ञानिक अभ्यास स्व-बळावर करु लागला आणि त्याने स्वतःला वैज्ञानिकात आणि कलावंतात गुंतवून घेतले. त्याने त्यानंतर एकोल पॉलिटेकनिक म्हणजे एका तांत्रिक विद्यालयासमोर घर घेतले आणि तो प्रख्यात पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांना आणि गणितज्ञांना मेजवानीस आमंत्रण देऊ लागला. त्यानंतर त्याने एकोल द मेडिसिन म्हणजे मेडिकल कॉलजच्या समोर घर घेतले तिथे त्याने शरीरविज्ञान शास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंड आणि जर्मनीला जाऊन आपले शिक्षण पूर्ण केले.

सेंट सायमन यांचे उर्वरित जीवन लिखाण करण्यात व्यतीत झाले आणि ते वाढत्या गरीब परिस्थितीत राहू लागले. १८०३ ते १८१३ च्या दरम्यान जीवनात वैचारिक आणि बौद्धिक प्रगल्भता आणि सामाजिक जडण घडण नव्यान करणे हाच त्यांचा प्रमुख विचार होता. १८०५ मधे ते आर्थिक हलाखीत सापडले. काही काळ त्यांनी तारण ठेवणाऱ्या दुकानात काम केले. पुष्कळ वर्षे त्यांनी अती दारिद्र्यात काढली आणि ते गंभीर आजारी झाले. नेपोलियनचे पतन झाल्यावर त्यांचे भाग्य उजळले. त्यांनी ऑगस्टीन थेरीस याला आपला चिटणीस (सेक्रेटरी) म्हणून कामावर ठेवले जो भविष्यातला इतिहासतज्ञ होता आणि त्याच्यानंतर १८१७ मध्ये ऑगस्ट कोम्ते त्यांचा सेक्रेटरी झाला. या तरुण माणसांनी सायमनच्या विचारांना थोडी सुसंगती आणली.

जेव्हा फ्रेंच राजेशाहीचा अंमल प्रस्थापित झाला तेव्हा सायमन यांनी औद्योगिक आणि व्यापारी मध्यम वर्गाकडे आपले लक्ष वळवले आणि नियतकालिकेद्वारे आणि पत्रकांद्वारे त्यांना उद्देशून समाजाच्या नवनिर्माणाचा प्रचार केला. त्यानी विज्ञान, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्रावर लिखाण केले. भांडवलदार आणि उदारमतवादी लोकांनी विशेषतः आर्थिक दृष्ट्या अमीर उमराव असलेल्या लोकांनी सायमनना पाठिंबा दिला कारण त्यांनी उद्योगाची प्राथमिकता आणि सरकारचा हस्तक्षेप नसावा यावर भर दिला होता. तरीही त्यांच्या नितकालिकाच्या तिसऱ्या अंकात त्यांनी घटनात्मक राज्यसत्ता आणि संपत्तीच्या पवित्रतेवर सौम्य टीका केली. त्यांच्या पाठिराख्यांनी त्यांची साथ सोडली. त्यानंतर त्यांच्यावर विध्वंस केल्याचा खटला भरण्यात आला. पण त्यातून त्यांची सुटका झाली. या खटल्यामुळे त्यांना हवी असलेली ज्याची त्यांना गरज होती ती प्रसिद्धी त्यांना मिळाली.

सेंट सायमन आणि कोम्टे यांनी नियतकालिके छापण्याचे काम चालूच ठेवले. उदयाला येणाऱ्या भविष्यकालीन औद्योगिक समाजाचा शोध चालू ठेवला आणि औद्योगिक वर्गाला आग्रहाने त्याबद्दल सांगणे चालू ठेवले. विशेषतः मध्यमवर्गाच्या नेत्यांना बजावून ठेवणे चालू राहिले की त्यांनी औद्योगिक समाज अस्तित्वात आणला पाहिजे, आणि त्यांनी धार्मिक सरंजमशाही नष्ट केली पाहिजे.

सेंट सायमन यांच्या विचारांना कुणाचाच पाठिंबा न मिळाल्याने एका कठीण प्रसंगी ते अचानक

खचले आणि १८२३ मध्ये त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. परन्तु त्यातून ते वाचले मग त्यांनी दोन वर्षे काम केले. औद्योगिक समाजातली धर्माची भूमिका आणि परिणाम कसा झाला या विषयावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले आणि कामगार वर्गाच्या परिस्थितीची चिंता करत राहिले. त्यांचे ऑगस्ट काम्ट यांच्याशी भांडण झाले. १८२५ मध्ये  सेंट सायमन यांचा मृत्यू झाला.

सेंट सायमन यांचे मत असे होते की समाज रचनेचा अभ्यास करुन त्या रचनेचे जे काही नियम आहेत ते स्पष्ट करणे शक्य आहे. सेंट सायमन यांनी सामाजिक संघटनांचा शास्त्रशुद्ध अभ्यासाची गरज या विषयावर लिखाण केले. एक संघटना ही संज्ञा पद्धतशीर रचनेबद्दलची आहे. त्यांनी असे ही सांगितले की समाज हा प्राणी जीवनासारखा आहे. म्हणजे अवयवासहीत समाजाची निर्मिती झाली आणि त्यांचे संवर्धनही झाले. त्यामुळे समाजाची वाढ आणि त्यातले बदल आणि सामाजिक स्थैर्याच्या मागे कोणत्या शक्ती कार्यरत आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यांचा असा विश्वास होता की समाज रचनेचे हे नियम स्पष्टीकरण करण्यासाठी आहेत. त्यात समाज संघटना आणि सामाजिक स्थैर्य यांचा अंतर्भाव आहे.

सेंट सायमन यांचा एक दृष्टिकोण असा होता की विज्ञानवादी ज्ञानाच्या उपयोगामुळे ऐतिहासिक घटनांचा विकास होत गेला. विकासाच्या प्रत्येक टप्प्यामागे सुसंबद्ध अशी विचारसरणी होती. विकास आणि प्रगती या एकमेकाविरुद्ध झगडा देणाऱ्या शक्ती आहेत. तेव्हा एखादी सामाजिक रचना निर्माण होते ती रचना पूर्णावस्थेपर्यंत पोचते आणि मग त्याच्या ऱ्हासाला सुरुवात होते. उदाहरणार्थ सरंजामशाही घ्या. सरंजामशाही १० शतकात पूर्णावस्थेला पोचली. आणि त्यानंतरच्या राज्यक्रांतीच्या उत्तरार्धापर्यंत तिचा ऱ्हास होत गेला आणि त्यामधून एका नव्या समाजरचनेचा उदय झाला. नवी समाजरचना संपूर्णतया सकारात्मक तत्त्वावर बांधली जाईल.

सेंट सायमन ह्यांच्या मते युरोपियन समाजाचे जे ऐतिहासिक स्थित्यंतर झाले त्या मागे जुन्या व्यवस्थेमध्ये परिपक्व झालेल्या शक्ती होत्या. शास्त्रीय विचारांचा विकास, औद्योगिक आणि वाणिज्य मध्यमवर्ग, प्रोटस्टंट नीतिमूल्ये आणि समीक्षात्मक तत्त्वज्ञानाची चळवळ या सगळ्या पुनर्जागरणातल्या परिणामामुळे कॅथलिक चर्च आणि मध्ययुगीन समाजातली एकता यांचे अवमूल्यन झाले. विचारवंतांनी समानतेचं तत्त्व आणि नैसर्गिक हक्कांचे जोरदार समर्थन केल्यामुळे जुना समाज नष्ट झाला. परंन्तु हीच तत्त्वे नव्या समाजरचनाकारांना मार्गदर्शन करण्यात कमी पडली. नव्या समाजाचाा पाया एकसंघ विचारसरणी आणि बौद्धिक तत्त्वांवरच, वसलेला होता.

सेंट सायमन यांच्या मतानुसार मानवी ज्ञान आणि मानवी जग यांच्या विकासाचे तीन टप्पे आहेत. मध्ययुगीन धर्माकारण ते १८ व्या शतकातली भौतिक अवस्था आणि शेवटची तिसरी अवस्था म्हणजे हे शास्त्रीय युग नव्या आधुनिक समाजात धार्मिक परंपरावादाची जागा शास्त्रीय ज्ञानाने घेतली. शास्त्रज्ञ आणि उद्योगपती यांनी पाद्री आणि अमीर उमरावांची जागा घेतली. नवीन शिक्षित उच्चवर्णीय समाज विज्ञानाच्या आधारे, शास्त्रीय ज्ञानाच्या आधारे संपूर्ण नैसर्गिक आणि मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणील. सायमन यांनी शास्त्रज्ञांना अध्यात्मवादी सुशिक्षित (अभिजात वर्ग) आणि उद्योगपतींना ऐहिक उच्चवर्गीय असे संबोधले आहे.

सैद्धांतिक दृष्टीने सायमन यांनी समाजाचे पुनर्जीवन होताना तो आंतरराष्ट्रीय समाज व्हावा असे दूरदृष्टीने पाहिले होते. त्यामुळे यांत्रिक प्रगती आणि औद्योगिकीकरणाला त्यांचा पाठिंबा होता. त्यांना असा विश्वास वाटत होता की जगातले सगळे समाज एकत्र येतील आणि एक वैश्विक समाज निर्माण होईल. त्यांना असे वाटले की बहुजनसमाजाला शास्त्रीय ज्ञानाचा परिचय कलाकार आणि त्यांच्या कृतीतून व्हावा.

बुद्धीप्रमाण्यवादाने जग बदलेल असा सेंट सायमन यांना गाढ विश्वास वाटत होता. त्यांच्या युगातील नव्या मुल्यांकडे आगामी संघटनात्मक पुर्णत्व आणण्याच्या शक्यता असणारी मूल्ये अशा दृष्टीने सायमन पाहत होते.

सेंट सायमन यांचा महत्त्वाचा आणि चिरस्थायी प्रभाव त्याच्या शिष्यांवर आणि एके काळी त्यांचा स्वीय सहाय्यक असलेल्या ऑगस्ट काम्ट यांच्यावर पडला. काम्ट यांनी सायमनच्या आदर्शांना तत्त्वांना यशस्वीरित्या बदलवले आणि समाजशास्त्र नावाचा नवा विचार प्रवाह निर्माण केला.

**आपली प्रगती तपासा:**

सेंट सायमन यांचा विचारांचा मानवी समाजावर आणि ऑगस्ट कॉम्ट यांच्यावर किती प्रभाव पडला हे तुम्हाला जाणून घेणे आवश्यक आहे. कसे ते सांगा ?

## १.४ ऑगस्ट कॉम्ट

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुनर्जागरण काळात प्रगतीच्या विचारवंताची जी परंपरा होती त्यातूनच ऑगस्ट कॉम्ट यांचा उगम झाला. कॉम्ट हे बोनाल्ड आणि द मैस्त्र यांच्या परंपरेतले विचारवंत होते. अठराव्या शतकात मुख्यत्वे प्रचलित असलेली व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनाची जी पद्धत होती त्याचे ते प्रखर विरोधक होते. त्यांच्या काळातील समाजाच्या घडणीच्या मोडतोडीमुळे ते घाबरून गेले आणि नव्या नैतिक समाजाच्या पुनर्रचनेचे त्यांनी आवाहन केले. तथापि नंतरच्या कार्यकर्त्यांनी कॉम्ट यांचे हे कार्य पुनर्जागरणाच्या परंपरेतले नव्हते असे विधान केले.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतरचा काळ हा कॉम्ट यांचा काळ होता. लोकांचे आर्थिक आणि सांस्कृतिक दारिद्र्य व त्यांच्या काळातील गोंधळलेले वातावरण यामुळे ते अस्वस्थ आणि दुःखी होते. त्यांची मुख्य आणि आयुष्यभराची चिंता ही होती की या गोंधळलेल्या समाजाला शिस्त कशी लावावी आणि समाजाची संपूर्ण पुनर्रचना कशी मार्गी लावावी, कशी योग्य पुनर्रचना करावी. फ्रेंच राज्यक्रांती म्हणजे मानवी इतिहासाला मिळालेले एक महत्त्वाचे वळण होते. वैज्ञानिक ज्ञानाच्या आणि औद्योगिकरणाच्या नव्या पद्धतींसाठी जुनी व्यवस्था पुर्णपणे अयोग्य होती. गुंतागुंतीच्या या औद्योगिक समाजाला नव्या राज्यकारभाराची आवश्यकता होती.

कॉम्ट हे त्यांच्याकाळातले सगळ्यात थोर श्रेष्ठ असे विचारवंत होते. त्यांच्या काळातील अनेक प्रश्न त्यांना भंडावत असत, त्याची उकल करण्याच्या विचारात ते सतत गुंतलेले असत. कॉम्ट यांचे संपूर्ण काम म्हणजे मानवी विचारांच्या इतिहासातला एक महत्त्वाचा संयोग होता. या संयोगात नीतिमत्ता, राजकीय तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान, एपिस्टमालॉजी आणि इतिहास या सर्व शाखांचे सुसूत्रीकरण होते.

ऑगस्ट कॉम्ट यांचा जन्म फ्रॉन्सच्या दक्षिण भागातील मॉंटपेलियर या गावी १९ जानेवारी

१७९८ साली झाला. त्यांचे वडील हे कळकळीचे कॅथलिक होते आणि ते धोरणी राज्यसत्तावादी असून एक सामान्य सरकारी अधिकारी होते. ते क्रांतीचा तिरस्कार करत होते. आणि कॅथलिक पंथाच्या लोकांचा छळ करणाऱ्यांना ते कमी लेखत असत. १८१४ च्या ऑगस्ट मध्ये कॉम्टनी एकोल पालिटेक्नक्निक या संस्थेत प्रवेश घेतला पण १८१६ मध्ये त्यांच्या एकूण वागणूकीमुळे त्यांना ती संस्था सोडावी लागली आणि ते माँटपेलियरला परत गेले. नंतर ते पॅरिसला आले आणि शिकवण्या करुन आपला उदरनिर्वाह करु लागले. ते गणित विषय शिकवत असत आणि आपले भवितव्य काय असेल याची त्यांना कल्पना नव्हती म्हणून ते उदास होते. १८१९ च्या उन्हाळात हेन्री सेंट सायमन यांच्याशी त्यांची ओळख झाली. सेंट सायमन त्यावेळी इंडस्ट्री नावाच्या नियतकालिकाचे संपादक होते. सेंट सायमन हे सृजनशील आणि कल्पकबुद्धीचे होते आणि कॉम्ट यांच्या आयुष्यावर आणि लिखाणावर खूप महत्त्वाचा कायम टिकणारा असा प्रभाव होता. सेंट सायमन हे साठ वर्षांचे होते. या बुद्धिमान तरुण माणसाकडे जो पद्धतशीर काम करणारा होता – आकर्षित झाले. कॉम्ट त्यांचे स्वीय सहाय्यक झाले आणि ते त्यांचे उत्तम सहकारी होते. काही वेळेसाठी ते दोघे अगदी जवळचे संयुक्त सहकारी म्हणून काम करत होते. या सहकार्याचा कुणाला जास्त फायदा झाला याची चर्चा त्या काळातील विद्वान करत होते. तथापि हे सगळ्यांनाच मान्य होते की कॉम्टवर त्याच्या गुरूचा जास्त प्रभाव पडला आहे. सेंट सायमन यांच्या सहकार्यामुळे, त्यांच्या प्रतिभाशाली सहवासामुळे कॉम्टच्या मनात जे विचार होते, ज्या कल्पना होत्या त्यांना पुर्णत्व मिळाले. त्यांच्या विचारांना तात्त्विक स्वरुप मिळाले. सेंट सायमन यांच्या घनिष्ठ संबधांमध्ये असताना १८१९ ते १८२४ मध्ये कॉम्टनी जे लिखाण केले ते लिखाण म्हणजे त्यांच्या पुढील सगळ्या विचारांचा तो गाभा होता हे मान्य करावे लागते.

१८२४ मध्ये कॉम्टचा त्यांच्या गुरुशी असलेला संबंध संपला. त्यांच्या वितुष्टाची कारणे बौद्धिक, वैचारिक आणि भौतिकही होती. उदारमतवादी वृत्तपत्रकारात आणि अभिजात अशा शास्त्रज्ञांमध्ये कॉम्टचे नाव प्रस्थापित होऊ लागले, त्यांना प्रसिद्धी मिळू लागली. प्रमुख शैक्षणिक विद्वानांकडून उत्तेजन देणारी आणि प्रशंसा करणारी पत्रे मिळू लागली. तरीही ते एकटेच विचारवंत बाजूला राहिले. त्यांना कुठलेही पद नव्हते, कार्यालय नव्हते की कुठलीही पगारी नोकरी नव्हती.

१८३० ते १८४२ मध्ये कॉम्ट यांनी त्यांचा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. ''कूर द फिलासाफी पॉझीटिव्ह'' ते शैक्षणिक जगाच्या काठावर राहिले. १८४४ मध्ये ते कलादिले द वॉक्स ला भेटले. ही एक उच्चवर्णीय महिला होती. जिला तिच्या नवऱ्याने कॉम्टच्या एका शिष्याच्या घरी सोडले होते. तिच्यावर त्यांचे मनस्वी प्रेम जडले. तिला क्षयरोगाने गाठले होते आणि त्यांचं प्रेमप्रकरण सुरु झाल्यावर एका वर्षाने तिचा मृत्यू झाला. कॉम्टनी उर्वरित आयुष्य तिच्या आठवणीत काढले. नंतरचे पुस्तक ''सिस्टीम द पॉलितिक पॉझीटिव्ह'' १८५१ ते १८५४ च्या दरम्यान लिहिले. मानवधर्मावर त्यांनी लिहले आणि या मानवधर्माचे ते उच्च धर्मोपदेशक होते. पुष्कळशा अनुयायांना हे मान्य नव्हते की वैश्विक प्रेम हे आजच्या काळातील सगळ्या समस्या सोडवेल, पण कॉम्टना असा विश्वास वाटत होता. कॉम्ट यांनी खूप प्रवास केला आणि शेवटचा आजार येईपर्यंत ते लिहत राहिले. १८५९ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

कॉम्ट यांचे लिखाण काही अंशाने पुनर्जागरण आणि फ्रेचक्रांती विरुद्ध असे प्रतिक्रियात्मक लिखाण होते. यातून जे अराजक आणि बेबंदशाहाचे सर्वव्यापी परिणाम झाले त्यामुळे ते अत्यंत अस्वस्थ झाले. या चळवळीतून उगम पावलेल्या विचारवंतावर त्यांनी टीका केली. कॉम्ट यांनी पॉझीटिव्ह फिलासॉफी - सकारात्मक तत्त्वज्ञान ही संकल्पना विकसित केली. पुनर्जागरणाच्या

नकारात्मक आणि संहारक तत्त्वज्ञानाशी ही संकल्पना लढा देईल असे त्याना वाटत होते. फ्रेंच राज्यक्रांती च्या विरोधातले कॅथलिक (विशेषतः द. बोनाल्ड आणि दमेस्त्र) यांच्यावर त्यांचे ममत्व, प्रेम होते आणि या दोघांचा त्यांच्यावर प्रभाव होता.

कॉम्ट यांनी सामाजिक भौतिकशास्त्र १८२२ मध्ये विकसित केले. त्याला समाजशास्त्र हे नाव दिले. फ्रेंच समाजामध्ये जे अराजक आणि बेबंदशाही माजली होती आणि त्यानी नकारात्मक तत्त्वज्ञान निर्माण केले होते. त्याला ही नवी संकल्पना लढा देईल असे त्यांना वाटत होते. सामाजिक भौतिकशास्त्र ही संज्ञाच हे स्पष्ट करते की मूलगामी शास्त्राच्यानुसारच हे समाजशास्त्र घडवायचे होते. ह नवीन शास्त्र (समाजशास्त्र) कॉम्टच्या दृष्टीतले, तेच शेवटी मुख्य आणि प्रभावी शास्त्र झाले. हे नवे समाजाचे शास्त्र समाजाची स्थिर स्थिती (अस्तित्वात असलेली समाज रचना) आणि समाज परिवर्तन (सामाजिक बदल) याबद्दल गंभीर विचार करते. दोन्ही समाज जीवनाच्या नियमांचा शोध घेतात. कॉम्ट यांना असे वाटत होते की समाज परिवर्तन हे समाजस्थिर स्थिती पेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. त्यांनी काही क्रांतीकारी बदलाचा आग्रह धरला नाही कारण समाजात नैसर्गिक उत्क्रांती होईल असे त्यांना वाटत होते.

**त्रिस्तरीय नियम:**

कॉम्ट यांच्या मते वैयक्तिक मन, मानवी क्रियाशीलता आणि समाज यांना लागोपाठच्या ऐतिहासिक उत्क्रांतीच्या टप्प्यांतून जावे लागते. समाजशास्त्र हे खरे विज्ञान असल्यामुळे, हे विज्ञान सामाजिक नियमांच्या शोधात असते त्यामुळे हे नियम समाजाला लागू केल्यास समाजाचा भूतकाळ समजू शकतो आणि भविष्याबद्दलची काही भाकिते करू शकतो. कॉम्ट असे समजतात की समाज उत्क्रांतीचे त्रिस्तरीय नियम आहेत. प्राचीन किंवा प्राथमिक धार्मिकता यापासून विकसित तत्त्वज्ञानात्मक आदर्श ते आधूनिक वैज्ञानिक प्रवृत्ती असा हा तीन स्तरांचा प्रवास आहे.

**धर्मशास्त्रीय टप्पा:**

या टप्प्याचे विशिष्ट लक्षण म्हणजे वृत्ती आणि कल्पनाशक्ती, माणसाच्या जो निसर्गाचा, कारण परंपरेचा आणि वस्तूंच्या शेवटाचा जो अभ्यास आहे, जो शोध आहे त्यावर या दोन्ही गोष्टींचा प्रभाव आहे. स्पष्टीकरणे ही भूते आणि अतीद्रिय शक्तीच्या गोष्टींच्या मिथच्या - द्वारे केली जात होती. या टप्प्यामध्ये कॉम्टनी विकसित होत गेलेल्या तीन स्तरांची चर्चा केली आहे.

१) **अधंश्रद्धेच्या मूर्त कल्पना–** जेव्हा निसर्गातील सर्व काही आपल्या सारखेच असते तेव्हा ते पवित्र असते.

२) **अनेक देवदेवता असलेले मत** - माणसांच्या कल्पनाशक्तीतून अनेक देवदेवता निर्माण होतात.

३) **एकेश्वरवार** - जेव्हा देव एकच असतो तो माणसामध्ये बुद्धिप्रामाण्यवादाचा उगम झाल्यामुळे होतो आणि कल्पना शक्तीला विरोध करतो.

धर्मशास्त्रीय टप्प्यात समाज संघटना चे स्वरुप प्रामुख्याने लष्करी पद्धतीचे असते. लष्कराच्या प्रभावी शक्तीने सामाजिक स्थिरता येते आणि विजय हा सामान्य असतो. जेव्हा समाज एकेश्वरवादाकडे घेऊन जाणाऱ्या तत्त्वज्ञानात्मक प्रवृत्ती अनुभवायला लागतो तेव्हा समाज गंभीर विचारांच्या दुसऱ्या टप्प्यावर येतो आणि हे विचार संक्रमणशील असतात.

### २) अध्यात्मवादी टप्पा:

या टप्प्यामध्ये तत्त्वसार, आदर्श आणि मूर्तकल्पना याचा स्पष्टीकरणाचा शोध घेतो. थोडक्यात अंतिम सत्याच्या विचारांचा शोध घेतो. विविध संस्थातील बदल ह्या टप्प्याशी निगडीत झाले आहेत. मुख्यत: लष्करी बचावाचा विकास आणि सुस्थापित कायदा यामुळे सहकाराच्या पायाभूत गरजा निश्चित होतात. या टप्प्यावर लष्करी अधिकारी धर्मोपदेश आणि वकीलांचा प्रभाव होता. या टप्प्यांत अमूर्त शक्तींचा आभास निर्माण होतो वा गृहीत धरल्या जातात. हे एक जोड निर्माण करतात. म्हणजे एकमेकाला ते संलग्न असतात आणि ते संक्रमणशील असते. हा अध्यात्म वादाचा टप्पा सन १३०० च्या सुमारास सुरुवात झाला आणि अल्पकालीन ठरला.

### ४) सकारात्मक किंवा वैज्ञानिक टप्पा:

१९ व्या शतकाच्या शेवटी सकारात्मक टप्प्याची सुरुवात होते आणि या टप्प्यात निरीक्षणाने कल्पनाशक्तीवर मात केली होती. सगळ्या सैद्धांतिक संकल्पना सकारात्मक झाल्या. या टप्प्यावर उद्योगपती आणि शास्त्रज्ञांचा प्रभाव होता. माणसाच्या मनाने एकमेक अशा पूर्ण शक्तींचा निष्फळ शोध घेणे थांबवले. भोवतालच्या घटनांवर वैज्ञानिक तत्त्वाचा आधिपत्य स्थापण्यावर भर दिला.

या वैचारिक प्रगतीच्या तीन टप्प्याशी संबंधित असे समाजाचे तीन टप्पे आहेत. धर्मशास्त्रीय आणि अध्यात्मवादी टप्प्यावर लष्करी मूल्यांचा प्रभाव होता. तथापि पहिल्या धर्मशास्त्रीय विभागात विजय हा भाव महत्त्वाच होता तर दुसऱ्या अद्यात्मवादी विभागात संरक्षक भाव महत्त्वाचे होते. सकारात्मक टप्प्यातून औद्योगिक समाजाचा उदय झाला. अशा प्रकारे कॉम्ट यांनी समाजाचे दोन विभाग मान्य केले. धर्मशास्त्रीय-लष्करी समाज या समाजाचा आता ऱ्हास होतो आहे आणि वैज्ञानिक औद्योगिक समाज उदयाला येतो आहे. पहिला समाज हा धर्मशास्त्रीय विचारांनी आणि लष्करी कृतीने प्रभावित झाला होता. धर्मगुरुंना वैचारिक आणि अध्यात्मिक अधिकार देण्यात आले तर लष्कराकडे भौतिक किंवा व्यावहारिक कार्य सोपविले गेले होते. औद्योगिक समाजात धर्मगुरुंची जागा शास्त्रज्ञांनी घेतली, त्यांच्याकडे नैतिक आणि वैचारिक सत्ता होती. वैचारिक किंवा बौद्धिक विचारांच प्राबल्य वाढल्यामुळे समाजाच्या सगळ्या कार्यकलापावर अधोगपतींचा प्रभाव दिसू लागला.

कॉम्ट यांचा विश्वास होता की नवी वैज्ञानिक औद्योगिक समाजपद्धती पुढे सगळी मानवी समाजपद्धती होईल. या यशस्वी संक्रमण काळाच्या शृंखलेत सकारात्मक किंवा वैज्ञानिक टप्पा म्हणजे अंतिम टप्पा ठरेल आणि प्रत्येक टप्पा हा पूर्वीच्या टप्प्यापेक्षा उत्तम असेल. नवी व्यवस्था जुन्याचा नाश होतो आणि उत्क्रांतिबरोबर प्रगती आणि मानवी मनाची मुक्तता होते. अशाप्रकारे कॉम्टचा प्रगतीचा सिद्धान्त समजला जातो. त्यात उत्क्रांती म्हणजे वैयक्तिक मनाचा विकास, मानवी मनाचा विकास, मानवी समाजाचा विकास या अंतिम सकारात्मक समाजात होईल असे समजले जाते. कॉम्ट असे म्हणतात की मानवी इतिहास हा सर्वसामान्य माणसांचा इतिहास आहे कारण मानवी मनाची प्रगती म्हणजे संपूर्ण समाजाच्या इतिहासाची एकता होय.

### सकारात्मक विज्ञान आणि सकारात्मक तत्त्वज्ञान:

कॉम्ट यांच्या मतानुसार सकारात्मक विज्ञान हे अपूर्वघटनेच्या भाष्याचे जे नियम आहेत आणि जे सत्याशी निगडित आहेत अशा गोष्टींचा शोध एवढ्यापुरते मर्यादित आहेत.

**१) सह अस्तित्वाचे नियम** - विश्वात सापडलेल्या मुलद्रव्यांचे एकमेकावर अवलंबून असणे

ज्यात अपूर्व घटनांच्या अभ्यासाचा समावेश आहे. अश्या प्रकारची वैश्विक भाष्ये (उदा. ग्रहमाला, मानवी जिवाणू शास्त्र आणि समाजरचना इत्यादि.)

**२) अनुक्रमाचे, वारश्यांचे नियम** - इतिहासातील पक्के बदल किंवा तथ्ये किंवा सत्य जे ऐहिक किंवा भौतिक गोष्टींशी संबंधित असतात त्याबद्दलची भाष्ये. प्रत्येक वस्तुला स्थायी आणि परिवर्तनशील बाजू असते. दोन्ही गोष्टींची आवश्यकता असून ते एकमेकावर अवलंबून असतात.

सकारात्मक विज्ञानाचे नियम सांगताना कॉम्ट यांनी या शास्त्राच्या मर्यादा सांगण्याचीही काळजी घेतली आहे. सकारात्मक विज्ञानाला ते सर्वसमावेशक आहे आणि हेच निश्चित आणि खरे आहे असा दावा त्यांनी केला नाही. त्यांच्या विज्ञानाच्या संकल्पनेचे विविध पैलू आणि नवे समाजशास्त्र याकडे आता वळू या.

**अ) विज्ञानातील भावना आणि कल्पना** - कॉम्ट यांनी भावनांचे आणि कल्पनांचे महत्त्व सांगितले आहे. तरीही सकारात्मक विज्ञानात निरीक्षणापेक्षा हे दोन्ही भावना आणि कल्पना गौण ठरतात. निरक्षण हे निश्चित जास्त महत्त्वाचे आहे.

**ब) विज्ञानात गृहीतकाची भूमिका** - कॉम्ट म्हणतात की प्रत्येक सिद्धांत हा निरीक्षण केलेल्या सत्यावर अवलंबून आहे. आणि त्याचवेळी हे ही खरे आहे की सत्याचे निरीक्षण कुठल्या एका सिद्धांताच्या मार्गदर्शनाशिवाय होऊ शकत नाही.

**क) भाकिते किंवा भविष्ये यांचे स्वरुप** - कॉम्ट यांनी भाकिते, भविष्ये किंवा पुर्वज्ञान याबद्दल विचार मांडले आहेत. त्यांच्या मते तात्त्विक व विज्ञानाधिष्ठित पुर्वज्ञान किंवा भाकिते यावर भर देऊन केलेले काम हेच भौतिक जगात व सामाजिक संस्थांशी व्यवहार करताना अती उपयोगी पडणार आहे. विज्ञानातून पूर्वज्ञानाची दृष्टी येते आणि पूर्वज्ञानाच्या दृष्टीतून कृती येते.

**विज्ञानाचा पदानुक्रम -**

कॉम्ट यांच्या विचारानुसार प्रथापित झालेल्या विज्ञानानी हे दाखवले आहे की फक्त मानवी विचारच तीन टप्प्यांतून गेले नाहीत तर तो विशिष्ट विषयही तशाच टप्प्यांतून विकसित झाला आहे. त्यामुळे विज्ञानाचे पद्धतशीर भाग करता येतील.

१) ऐतिहासिक घटनांचा क्रम आणि उदय व विकास

२) एकमेकावर आधारभूत क्रमांची मांडणी.

३) क्रमशः कमी होत असलेले सर्वसामान्यत्व आणि वाढत जाणारी विषयाची क्लिष्टता.

कॉम्ट यांनी विज्ञानाची मांडणी अशी केली आहे, गणित, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवविज्ञानशास्त्र, समाजशास्त्र.

गणित हे सगळ्या शास्त्रातले पहिले व सर्व सामान्य सास्त्र आहे आणि त्यांच्या मते समाजशास्त्र हे जास्त गुंतागुंतीचे शास्त्र आहे.

समाज शास्त्र हे समाजातील विविध व विशिष्ट विषयांची मांडणी करणारे नवीन शास्त्र आहे. समाजशास्त्राची मुख्य विचारधारा म्हणजे समाजरचना. समाज हा एकमेकांत गुंतलेल्या घटकांचा

समूह आहे. व्यक्तीला त्याच्या समाजाचा ज्याचा तो सदस्य आहे. संदर्भातच समजून घेणे शक्य आहे. कॉम्ट म्हणतात,''समाज व्यवस्थेत होणाऱ्या निरनिराळ्या क्रियाप्रतिक्रियांचे निरीक्षण अंतर्भूत आहे.'' मग समाज म्हणजे समाजाचे निरनिराळे स्वरुप आणि निरनिराळे प्रकार यांचा वैज्ञानिक अभ्यास होय.

समाजशास्त्राने अन्य शास्त्राप्रमाणे निरीक्षणाच्या आणि प्रयोगाच्या निरनिराळ्या पद्धती उपयोगात आणल्या पाहिजेत. समाजशास्त्राने तुलनात्मक पद्धती आणि ऐतिहासिक पद्धती याचा उपयोग केला पाहिजे. कारण समाज जीवनाचे स्वरुप वैशिष्टपूर्ण आहे.

सामाजिक स्थिरता आणि सामाजिक गतिमानता - सामाजिक प्रगती आणि मानवी विकास यांचा अभ्यास करताना दोन घटक काम करतात असे कॉम्ट यांना दिसून आले. ते घटक म्हणजे सामाजिक स्थिरता आणि सामाजिक गतिमानता, सामाजिक स्थिरतेचा अभ्यास म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षणी समाजाच्या अस्तित्वाच्या नियमांचा अभ्यास होय. ज्याचा ''सामाजिक पद्धतीचा सिद्धांत याच्या द्वारे त्या अभ्यासाचे विश्लेषण केले जाऊ शकते. कॉम्ट म्हणतात, ''समाज पद्धतीच्या निरनिराळ्या क्रियांचे आणि प्रतिक्रियांचे नियम यांचा अभ्यास हा समाजाच्या स्थिरता अभ्यासात अंतर्भूत आहे. विशिष्ट प्रसंगातून, मूलभूत अशा घटनांमधून ज्या नेहमीच हळू हळू बदलत असतात.''

सामाजिक गतिमानतेचा अभ्यास हा सततच्या सामाजिक घटनांच्या कालमानातून जाणारा अभ्यास आहे आणि याचा अभ्यास ''सामाजिक प्रगतीचा सिद्धान्त'' याच्या द्वारे होऊ शकतो. त्यांच्या पूर्ण लिखाणातून कॉम्टयांनी पाहिले की त्यांच्या काळात समाजाता पद्धत किंवा व्यवस्था किंवा रचना याबद्दल सामाजिक आणि राजकीय घडामोडीत द्वंद्वात्मक असा ताण असतो. एक शुद्ध आणि खरे विज्ञान म्हणून समाजशास्त्राने असे नियम शोधून काढले आहेत. जे पद्धत किंवा रचना आणि प्रगतीचा मेळ घालू शकतील. त्यांच्या ''पॉझीटिव्ह फिलॉसोफी व्हॅलूम नं ॥ मध्ये ते म्हणतात ''सिद्धांताच्या दोन दृष्टिकोनात फरक आहे. त्याचा संबंध पद्धत किंवा रचना आणि प्रगती या दुहेरी वैचारिक पातळीतून येतो. रचनेमध्ये सामाजिक अस्तित्वाचे नियम आणि प्रगती मध्ये कायम सुसंवाद असतो आणि त्यामुळे सामाजिक विकास होतो. ''पद्धत किंवा रचना याचा विचारवंतानी अभ्यास केला आणि त्याना समजले की समाजाच्या अस्तित्वासाठी कुठले दोन घटक आवश्यक आहेत. प्रगतीचा अभ्यास करुन सामाजिक कार्याचे महत्त्व त्यांना चांगले समजू शकले. या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत.

समाज शास्त्रात कुठल्याही प्रकारच्या मानवी अस्तित्वासाठी सार्वत्रिक दृष्ट्या आवश्यक असलेली जी सामाजिक तथ्ये आहेत त्याचा परस्पर संबंध स्पष्ट करणे हे स्थिरतेच्या अभ्यासात अंतर्भूत आहे. म्हणजे कुटुंबातील संबंध, श्रमविभागणी, संपत्ती, राज्यशस्न, धर्म, नैतिकता वगैरे मधले संबंध हे स्थिरतेत अंतर्भूत आहेत. गतिमानतेमध्ये इतिहासाच्या एकत्रित कार्यपद्धतीत जे समाज आता अस्तित्वात आहेत आणि त्यात बदल होत आहेत अशा समाजाच्या निरनिराळ्या पैलू मधला संबंध यांचा अभ्यास करणे आणि त्याचा मागोवा घेणे हे गतिमानतेत अंतर्भूत आहे. जगातील वास्तवात अस्तित्वात असणाऱ्या निरनिराळ्या समाजांचा हा अभ्यास आहे. त्यामुळे स्थिरतेचा अभ्यास हा विश्लेषणात्मक आहे तर गतिमानता म्हणजे मुख्यतः अनुभवजन्य आहे. गतिमानताने स्थिरतेचे विश्लेषण हे वास्तवातील समाजाच्या अभ्यासासाठी उपयोगात आणले आहे.

शेवटी यातून निष्कर्ष असा निघतो की कॉम्ट चे प्रयत्न हे समाजाच्या सकारात्मक शास्त्राच्या बांधणीसाठी होते. त्यांचे हे शास्त्र नवीन युगात येणाऱ्या संकटकालीन परिस्थितीला तोंड देणे आणि

त्याच्या मदतीने वैचारिक सिद्धांताची पायाशुद्ध नवीन रचना स्थापन करणे जी समाजाच्या पुर्नरचनेत आणि नव्या सामाजिक अभियंत्यांचा म्हणजे इंजिनियर्सचा उदय करण्यास मदत करेल.

बरीच वर्षे कॉम्टकडे एक विक्षिप्त माणूस म्हणून दुर्लक्ष केले गेले. त्यांच्या जवळ काही चांगल्या कल्पना आहेत हे सगळ्यांना मान्य होते. पण आज समाजशास्त्राचा इतिहास हा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो म्हणून या विषयाचा केंद्रबिंदू म्हणून आज कॉम्ट यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक सिद्धांताचे अधिकाधिक ऐतिहासिक तज्ज्ञ हे मान्य करतात की त्यांच्या लिखाणाचा, सामाजिक शास्त्रांचे जे गुरु आहेत त्यांच्यावर प्रचंड प्रभाव पडला आहे. नवीन शास्त्राचे हे नवे दालन त्यांनी उघडून दिले. त्यांनी केलेली शास्त्राची व्याख्या स्वीकारली गेली आहे. त्यांची शिस्तशीर पद्धत, त्यांचे निरीक्षण, त्यांची तुलना, त्यांचे प्रयोग आणि त्यांचे ऐतिहासिक विश्लेषण म्हणजे समाजशास्त्रीय पद्धतीचे आधारस्तंभ आहेत.

कॉम्टच्या सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भात त्यांचे मूल्यमापन व्हावे कारण त्यातूनच त्यांचे विचार तयार झाले होते. त्यांच्या नंतरच्या उरखीम सारख्या समाजशास्त्रज्ञावर पडलेला प्रभाव, प्रत्यक्ष दिसतो. जरी त्यांनी काही चुका केल्या असल्या तरी ऑगस्ट कॉम्ट यांनी समाजशास्त्राच्या विज्ञानाच्या उगमासाठी आणि विकासासाठी एक भरभक्कम पार्श्वभूमि तयार केली.

**आपली प्रगती तपासा:**

ऑगस्ट कॉम्ट यांच्या त्रिस्तरीय नियमांचा आणि सकारात्मकता याचा परिचय तुम्हाला झाला पाहिजे.

## १.५ हर्बर्ट स्पेन्सर

हर्बर्ट स्पेन्सर यांचे कार्य ऑगस्ट कॉम्ट यांच्यासारखेच होते. कारण ज्ञानाची एकत्रित योजना जी स्पष्ट अश्या तत्त्वज्ञानात्मक बैठकीवर आधारलेली असेल आणि इतर सगळ्या विज्ञानाचा समावेश करुन घेणारी योजना प्राप्त करुन घेऊन तो लोकांसमोर मांडण्याचा त्यांचा हेतू कॉम्ट यांच्यासारखाच होता. त्यांचे पहिले पुस्तक ‘फर्स्ट प्रिन्सिपल्स’ हे होते आणि या पुस्तकात त्यांच्या सगळ्या कार्याची जी तत्त्वज्ञानात्मक बैठक होती त्याचे वर्णन या पुस्तकात आहे. प्रिन्सिपल्स् ऑफ सोशियालॉजी आणि प्रिन्सिपल्स ऑफ ऐथिक्स हे त्यांचे अन्य मोठे ग्रंथ होते. स्टडी ऑफ सोशियालॉजी नावाचे एक वेगळे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले. त्यात नैतिक आणि राजकीय सिद्धांत, शिक्षणावर, राजकीय पक्षांचे बदलणारे स्वरुप, कलेचे उद्दिष्ट, संगीताचा उगम, मृत्यू, व्यायामशाळा वैगरे विषयावर स्पेन्सर यांनी आपले विचार मांडले आहेत. काही लोक असा वाद घालतात की स्पेन्सर यांनी कॉम्ट यांचेच विचार घेतले आहेत पण इतर लोक हे विधान नाकारतात.

**जैविक समानता आणि उत्क्रांतीचा सिद्धान्त** - स्पेन्सर यांनी जैविक समानता म्हणजे समाजाची रचना ही शारिरीक रचनेशी समान आहे या सिद्धांताचे विस्तृत असे विवरण केले आहे. त्यांच्या मते समाज आणि शारिरीक रचना यातले साम्य म्हणजे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताची पहिली पायरी आहे.

जैविक समानता या विचारांची पुनर्रचना स्पेन्सर यांनी केली कारण समाज रचनेचे आणि शरीर रचनेचे हे एक महत्त्वाचे लक्षण आहे की त्यांची शारिरीक आकारात जशी वाढ होते तशी त्यांच्या रचनेतही वाढ होते. जसे लहानसा प्राण्यात गर्भात काही थोडे भाग फरक करण्याजोगे असतात. पण जेव्हा त्यांचा आकार मोठा व्हायला लागतो. तेव्हा त्यांची संख्या वाढते आणि त्यांचे स्वरुपही वेगळे असते. असेच समाजाच्या बाबतीतही होत असते. प्रथमतः समूहामधल्या घटकात असलेली भिन्नता ही फारशी लक्षात येणारी नसते पण जेव्हा लोकसंख्या वाढते तेव्हा त्यातले विभाग आणि उपविभाग खूप जास्त होतात आणि हे विभाजन निश्चितपणे दिसून येते. यापुढे जसे वैयक्तिक किंवा व्यक्तीची शरीररचना त्यातला फरक हा परिपूर्णता आल्यावर थांबतो, तेथे परिपक्वता आलेली असते आणि विनाशाकडे वाटचाल सुरु होते. अगदी हाच क्रम समाजरचनेच्या बाबतीतही होत असतो. अशाप्रकारे समाजरचना शारिरीक रचनेशी समान असते. कारण शरीर रचनेप्रमाणे परस्परावर अवलंबून असलेले विभाग समाज रचनाही तयार करत असतात. दोन्ही म्हणजे शरीर रचना आणि समाजरचना या दोघांची वाढ होत असते. त्यांचे विभाग एकमेकांशी संबंधित असतात आणि त्यांचे कार्य हे एकमेकाला पूरक असतात. जसा जसा त्यांचा आकार वाढत जातो तस तशी त्यांची रचना गुंतागुंतीची होते आणि त्यांचे भाग उपविभाग वेगवेगळे होतात. जसे शरीररचनेची प्रक्रिया असते तशीच समाजरचनेचीही असते.

स्पेन्सर यांनी असे प्रस्थापित केले की जैविक शरीर रचनेत आणि समाजाच्या रचनेत समानता आहे पण त्याचबरोबर त्यातली भिन्नताही त्यांनी अधोरेखित केली आहे. स्पेन्सर ह्यांच्या मते जसे प्राण्यांचे अवयव एकसंध संपूर्ण असे एकरुपात असतात, समाजाचे समाजही एकरूप असतो. पण वेगवेगळ्या गोष्टींनी बनलेला असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास प्राणीजन्य जीवनशक्ती ही एकसंघ पूर्णावस्थेत असते तर समाज रचना ही वेगवेगळ्या आणि विखुरलेल्या गोष्टींची असते.

दुसरे असे की शारिरीक रचनेत जाणीव (consciousness) ही एका लहानशा जागी केंद्रित झालेली असते तर समाज रचनेत ही जाणीव विखुरलेल्या स्थितीत आढळून येते. आणि या विखुरलेल्या भागात आनंद आणि दुःख भोगण्याची शक्ती असते.

आपण असे बघतो की स्पेन्सर यांनी शरीररचना आणि समाज रचने मधील साम्य आणि विरोध प्रस्थापित केले. नंतरच्या त्यांच्या लिखाणातून त्यांनी असा दावा केला की समानता ही समाजशास्त्राची सुसंगत अशी रचना दाखवून देण्यासाठी उपयोगात आणली गेली. खरी वस्तुस्थिती अशी होती की त्यांच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताची बांधणी करण्यासाठी त्यानी समानतेच्या उपयोग केला होता.

स्पेन्सर यांनी असाही मुद्दा उपस्थित केला की मानवी समाजाची उत्क्रांती ही इतर उत्क्रांतीवादी घटनांसारखीच आहे. त्यांनी हे प्रतिपादन केले की जैविक आणि सामाजिक उत्क्रांती या बरोबरीने जाणाऱ्या आहेत. सगळ्या सार्वत्रिक घटना या विकासाच्या किंवा उत्क्रांतीच्या नैसर्गिक नियमानुसार घडतात. स्पेन्सर यांनी स्पष्ट केले की साध्यापासून गुंतागुंतीपर्यंतची प्रक्रिया ही एकानंतर एक अशी क्रमिक भेदाच्या क्रियेतून होत असते. हे असे विश्वाच्या प्राथमिक परिवर्तनाच्या वेळीही झाले होते. प्रत्येक जैविक रचनेच्या बाबतीत हे दिसून येते. हे असे मानववंशाच्या उत्क्रांतीतही घडून आले. हे असे सुधारित व्यक्तिमत्त्वाच्या विचार करण्याच्या प्रक्रियेतही दिसून येते आणि मानवीवंशातही तसेच समाजाच्या उत्क्रांतीतही दिसून येते. आणि हे मानवी कार्यशीलतेतून निर्माण होणाऱ्या मूर्त आणि अमूर्त स्वरुपाच्या उत्पादनातून दिसून येते.

**स्पेन्सरच्या सिद्धांतात दोन निरनिराळे पण परस्पर संबंधित असे दोन प्रवाह वाहतात:**

**१) सध्या समाजापासून ते संमिश्र समाजाच्या वेगवेगळ्या स्तरापर्यंत होणारी प्रक्रिया:**

समाजाच्या उत्क्रांतीच्या संबंधांत स्पेन्सर यानी चार प्रकार मानले आहेत.साधा समाज, संमिश्र, दुहेरी संमिश्र तिहेरी संमिश्र त्यांच्या रचना आणि कार्याच्या गुंतागुंतीच्या पद्धतीवरुन त्यांचे भिन्नत्व दिसून येते. तिथे एकजिनसी पासून बहुजिनसी होण्याची प्रवृत्ती दिसून येते आणि एक संघ स्थितीतून ते बहुविश्व स्थितीत जाण्याची प्रवृत्ती ही दिसून येते. साध्या समाजात असलेले कुटुंब घटक संमिश्र समाजाला जन्म देतात. संमिश्र समाजात अनेक एकत्र कुटुंबातून अनेक कुळे अनेक वंश निर्माण होतात आणि ते दुहेरी सममिश्र समाज बनवतात असे दुहेरी संमिश्र समाजात असे अनेक एकत्रित कुळे किंवा वंश असतात किंवा जनजाती समूह यानी तिहेरी संमिश्र समाज निर्माण होतो. आणि ते एका देशात संघटित होतात. या प्रक्रियेत (उत्क्रांतीच्या समाज रचनेतील भिन्नता वाढत जाते आणि ही समाज रचना जिच्यात वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती असते आणि त्यामुळे चांगली एकात्मता निर्माण होते आणि वातावरणाशी जुळवून घेतले जाते.

**२) लष्करी समाजातून औद्योगिक समाजात झालेला बदल:**

ही वर्गीकरणाची पद्धत समाजातील अंतर्गत नियमावर आधारलेली आहे. या वैध्विक उत्क्रांतीच्या पद्धतीत लष्करी समाजापासून ते औद्योगिक समाजापर्यंत, पहिल्या लष्करी समाजात सहकार बंधनकारक होता तर औद्योगिक समाजात सहकार ऐच्छिक होता. लष्करी समाजाची महत्त्वाची लक्षणे होती ती केंद्रिय शासन यंत्रणा, कठोर अशी स्तरीकरण पद्धत, आर्थिक स्वायत्तता आणि सामाजिक संघटनांवर शासनाचे वर्चस्व. औद्योगिक समाजाची महत्त्वाची लक्षणे होती ती मुक्त अर्थव्यापार, आर्थिक स्वायत्ततेचा अभाव स्वतंत्र ऐच्छिक संघटना, त्या मानाने खुली स्तरीकरणाची पद्धत आणि शासनाचे विकेंद्रीकरण.

स्पेन्सर यांचा विश्वास होता की समाजाचा विकास पूर्वी ठरवलेल्या टप्प्यातून अपरिवर्तित होणारा नसून तो त्यांच्या सामाजिक आणि नैसर्गिक पर्यावरणातून प्रत्यक्ष प्रतिसादातून विकास होतो. स्पेन्सर हे सोशल डार्विनिझमचे कट्टर पुरस्कर्ते होते. स्पेन्सर यांचा सामाजिक डार्विनिझम दोन तत्त्वाभोवती केंद्रित झाला होता.

**१) जो अति योग्य त्याचेच अस्तित्व राहणारचे तत्त्व:**

स्पेन्सरच्या मते संघर्ष आणि अस्तित्वाची नैसर्गिक प्रक्रियेची जी संकल्पना आहे ती जैविक शुद्धीकरणाच्या प्रक्रियेप्रमाणे काम करते. त्यांच्या मतानुसार निसर्गाला एक ईश्वरदत्त देणगी मिळाली आहे ज्या योगे अयोग्य घटक त्याज्य होतात आणि योग्य घटकांसाठी जागा मिळते. अशक्त घटकांचा नाश होऊन सशक्त घटक निर्माण होणे हा एक निसर्गाचा नियम आहे. समाजातून अयोग्य व्यक्तींचे दूरीकरण किंवा निघून जाणे जे नैसर्गिक निवड प्रक्रियेतून होते ते मानव वंशाला जैविक दृष्ट्या उपकारक आहे आणि त्यामुळे राज्याने त्यांची स्थिती सुधारण्यासाठी काहीही करु नये, गरीबासाठी काही करु नये कारण त्यांची योग्यता कमी आहे असे स्पेन्सरना वाटते.

**२) हस्तक्षेप न करण्याचे तत्त्व:**

सामाजिक डार्विनिझम च्या उपसिद्धांतानुसार स्पेन्सर यांनी वैयक्तिकता किंवा व्यक्तीमहत्ता आणि त्यात हस्तक्षेप करु नये असे विचार मांडले. त्यांच्या मते राज्यशासनाने शिक्षण, आरोग्य व

स्वच्छतापालन, टपाल सेवा, आर्थिक बँक व्यवहार,गृहव्यवस्था किंवा दारिद्र्य निर्मूलनासाठी काहीही करण्याची भूमिका घेऊ नये. त्याऐवजी पैशाचा उपयोग सांडपाणी व्यवस्था यंत्र, घर बांधण्याचे काम करणारे कामगार यांच्या मदतीसाठी खर्च करावे., स्पेन्सर असा ही दावा करतात की निसर्ग हा माणसापेक्षा जास्त बुद्धिमान आहे. त्यांच्या मते एकदा का निसर्गाच्या नियमात हस्तक्षेप केला की त्याचा अंत कसा होईल हे समजण्यासारखे नाही.

स्पेन्सर यांच्या जीवनकालातच त्यांना महत्त्व मिळाले व मान्यताही मिळाली. ही भावना त्यांना आनंद देणारी होती. त्यांचे लेखन, त्यांचे निबंध उच्चवर्गीय राजकीय उदारमतवादी लोकांत आणि हस्तक्षेप विरोधी विचारवंतामध्ये चर्चेचा विषय ठरले होते. त्यांच्या उत्क्रांतीवादाच्या तत्त्वांनी विचारवंताच्या मनातील गोंधळाला चांगले उत्तर दिले होते.

स्पेन्सर यांच्या सिद्धांतांनी नव्या उत्कांतीवादाच्या नैसर्गिक नियमांच्या जो शोध होता त्याचे समाधान केले. त्यांचा पहिल्या महायुद्धापर्यंत जास्त प्रभाव होता. युद्धानंतर मात्र सामाजिक वर्तुळामध्ये त्यांचा प्रभाव कमी कमी होत गेला. स्पेन्सर यांचा प्रभाव ज्यांच्यावर पडला त्यात डरखीम यांचे नाव महत्त्वाचे होते.

**आपली प्रगती तपासा:**

तुमचा स्पेन्सर याचे कार्य जैविक समानता आणि सामाजिक उत्क्रांतीवादाचा परिचय झालेला आहे.

___

___

___

___

## १.६ सारांश

समाज जीवनाच्या सिद्धांतांचे विकसन ही प्रक्रिया पूर्वीपासून चालू होती आणि आता ही चालू आहे. समाज शास्त्राच्या सैद्धांतिक प्रक्रियेवर पुनर्जागरण आणि फ्रेंच क्रांतीचा खूप प्रभाव आहे.

आद्य सिद्धांतवादी विचारवंतात सेंट हेन्री सायमन (१७६०-१८२५) यांची गणना होते. ते म्हणतात की समाजाच्या रचनेचा आणि त्याचे नियम अभ्यास करणे शक्य आहे. ते म्हणतात की वाढत्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग झाल्यामुळे समाजाची ऐतिहाकि वाढ झाली आहे. प्रत्येक टप्प्याच्या विकासात बुद्धिवाद होता. वैचारिक आणि आदर्शवादी दृष्टीनेसमाजाचे परिवर्तन एका आंतरराष्ट्रीय समाजात होईल असे त्यांना वाटत होते. तार्किक विचारांच्या जोरावर जगात बदल घडवून आणता येतील यावर त्यांच्या गाढ विश्वास होता. त्यांचे अगोदरचे विद्यार्थी आणि नंतरचे सहकारी ऑगस्ट कॉम्ट यांच्यावर त्यांचा प्रभाव शेवटपर्यंत टिकला.

ऑगस्ट कॉम्ट हे त्यांच्या काळातील श्रेष्ठ विचारवंतांपैकी प्रथम श्रेणीचे विचारवंत होते. सेंट हेन्री सायमन यांच्या गाढ संबंधामुळे आणि अत्यंत जवळच्या सहवासामुळे कॉम्ट यांनी आपले जे विचार बनवले त्यावर सायमन यांचा प्रभाव होता. त्यांनी सकारात्मकतेचा सिद्धांत आणि त्रिस्तरीय नियमांचा सिद्धांत मांडला. समाजाचे सकारात्मक विज्ञान विकसित करण्यासाठी त्यांनी खूप श्रम

घेतले. समाजशास्त्रीय विचारवंतावर त्यांचा प्रचंड प्रभाव पडला होता.

हर्बट स्पेन्सर यांचे कार्य व विचार ऑगस्ट कॉम्ट यांच्याशी मिळते जुळते आहेत. त्यांचे म्हणणे असे होते की मानवी समाजाची उत्क्रांती ही इतर उत्क्रांतीच्या घटनांसारखी आहे. जैविक शरीर रचनेत आणि समाज रचनेत समानता आहे आणि उत्क्रांती वादाचा त्यांनी पुरस्कार केला. उत्क्रांतीवादाची नैसर्गिक नियम या नव्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणाचा जो शोध होता, त्याचे हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी, त्यांचे समाधान केले.

## १.७ प्रश्न

१) पुनर्जागरण आणि फ्रेंच राज्यक्रांतीचा समाजशास्त्रीय सिद्धांतावर कसा प्रभाव पडला याचे स्पष्टीकरण द्या.

२) हेन्री सेंट सायमन यांच्या कार्याचा व विचारांचा ऑगस्ट कॉम्ट यांच्यावर झालेला प्रभाव या विषयावर एक छोटा निबंध लिहा.

३) समाजशास्त्रीय सिद्धांताला ऑगस्ट कॉम्ट यांचे योगदान यावर चर्चा करा.

४) हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या जैविक समानता आणि उत्क्रांतीवाद याबद्दलच्या विचारांचे सविस्तर विवरण द्या.

## १.८ संदर्भ

१) अ‍ॅब्राहम एफ आणि मार्गन जे. १९८५ सोशियालॉजिकल थौर, मॅक्मिलन इंडिया लिमिटेड.

२) फ्लेचर आर. २०००, द मेकिंग ऑफ सोशियालॉजी व्हॅलून । , जयपूर आणि दिल्ली, रावत पब्लिकेशन.

३) डेव्हिस एन. १९९६, युरोप अ हिस्ट्री, ऑक्सफर्ड ओयूपी.

४) डेलन्सी, टी २००५, कॉटेंपररी सोशल थियरी पियरसन.

५) रेट्झर जॉर्ज १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी, न्यूयार्क, द मॅकग्रा हिल कंपनीज.

♦ ♦ ♦

# २

# कार्ल मार्क्स
# द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिक वाद

**प्रकरणाची रचना**

२.० उद्देश

२.१ प्रस्तावना

२.२ कार्ल मार्क्स चरित्र रुपरेषा

२.३ हेगलचा मार्क्सवर झालेला परिणाम

२.४ हेन्री-सेंट सायमनचा मार्क्सवर झालेला परिणाम

२.५ स्वाध्यायासाठी प्रश्न

२.६ द्वद्वात्मक आणि इतिहासिक भौतिकवाद

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.९ संदर्भ

## २.० उद्देश

- कार्ल मार्क्सच्या जीवनाचा संक्षिप्त अभ्यास
- क्रांतिकारी चळवळीशी मार्क्सचा परिचय, विरोध आणि त्यांच्या विचारातली गुंतागुंत याची तपासणी.

## २.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात दुसऱ्या कुठल्याही विचारवंताने मनुष्यजातीवर कार्लमाक्स इतका नेमका आणि बलशाली प्रभाव टाकला नसेल. तो ना प्रसिद्ध लेखक होता ना तो वक्ता होता. कार्ल माक्स हा एक समाजशास्त्रज्ञ एक राजकीय तत्त्वचिंतक आणि क्रांतिकारी चळवळीत गुंतलेला होता.

## २.२ कार्ल मार्क्स चरित्र रुपरेषा

५ मे १८१८ या दिवशी ट्रीओर या रेव्हीश गावी कार्ल मार्क्सचा जन्म झाला. त्याचे आईवडील ज्यू होते. त्याचे वडील एक यशस्वी वकील होते तर त्याची आई एक कुटुंबवत्सल गृहिणी होती.

ट्रीओरमध्ये मार्क्सच्या शिक्षणाची सुरुवात झाली. त्याची बालपणाच्या मित्रमंडळीत जेनी (जी नंतर त्याची पत्नी झाली) आणि एडगर व्हान वेस्ट फालन होते. मार्क्सच्या वडिलांनी ज्ञानवंत लेखकांशी ग्रीक महाकाव्याशी त्याचा परिचय करून दिला. पितापुत्रात बौद्धिक बांधिलकी निर्माण

झाली आणि त्याचे शेजारी लुडविग वेस्ट फालन हे त्याच्याकडे आकर्षित झाले. वेस्ट फालन यांनी होमर, शेक्सपियर आणि स्वच्छंदतावादी लेखक वाचण्यासाठी त्याला प्रोत्साहन दिले. वेस्ट फालन यानी सेंट सायमन यांच्या सामाजिक तत्त्वांशी ओळख करून दिली. त्या दोघात आपुलकीचे बंध निर्माण झाले आणि वेस्ट फालन हे मार्क्सचे गुरु झाले.

एप्रिल १९४३ मध्ये त्याची प्रिय बालमैत्रिण जेनी वेस्ट फालनशी मार्क्सने विवाह केला. नंतर त्याच वर्षी त्याच्या पत्नीबरोबर मोकळे वातावरण असलेल्या पॅरिसला गेला.

१८४३-४४ मध्ये मार्क्स हेगलला आणि त्याच्या विचारांना समजून घेण्याचा, त्याच्या विचाराशी टक्कर देण्याचा प्रयत्न करीत होता. तो निरनिराळ्या सुधारक आणि सामाजिक सिद्धांत विषयक जर्मनीत जेवढे मिळे तेवढे साहित्य वाचत होता. त्याच्या बौद्धिक प्रशिक्षणाने इथे एक नवे वळण घेतले. फ्रेंच समाजवाद आणि इंग्रजी अर्थव्यवस्था या दोन्ही विचारांशी, या दोन्ही तत्त्वाशी त्यांची गाठ पडली या दोन्ही विचारांचा त्याने सखोल अभ्यास केला. त्याच्या बौद्धिक रुचीला जी एक विशिष्ट दिशा मिळाली होती त्याच्या सहाय्याने त्याने हेगलचे तत्त्वज्ञान, समाजवाद आणि राजकीय अर्थव्यवस्था यांचे संमिश्रण करुन स्वतःची नवी बौद्धिक पूर्वाभिमुखता तयार केली.

## २.३ मार्क्सवरचा हेगलचा प्रभाव

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जर्मनीच्या बौद्धिक विचारांवर हेगलचा पगडा होता. सुशिक्षित जर्मन लोक एकत्र जमून हेगलच्या तत्त्वज्ञानाच्या चौकटीतून इतिहास, राज्यशास्त्र आणि संस्कृतीची चर्चा करत असत.बर्लिन युनिव्हरसिटीत हेगलचे तत्त्वज्ञान आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या तत्त्वज्ञानाचे त्याच्या शिष्यात विभाजन झाले, या दोन्ही विषयावर मार्क्सचे शिक्षण झाले. या शिक्षणाने मार्क्सच्या विचारांना दिशा मिळाली. जुन्या हेगेलियन्सनी आपल्या गुरुच्या विचारांना स्वीकारलं तर नव्या हेगेलियन्सनी हेगलच्या तत्त्वज्ञानातल्या अनेक पैलूवर टीका केली. नव्या हेगेलियन्सन मधे लुडविग फोरबॉक होते. फोरबँकने हेगलच्या विचारांचे नव्याने संशोधन केले. मार्क्सवर हेगलच्या तत्त्वज्ञानाचाही प्रभाव होता आणि फोरबँकच्या नव्या संशोधनाही प्रभाव होता. द्वंद्वात्मकता हे हेगलच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र होते. मार्क्सने हेगलचे द्वंद्वात्मकतेचे सूत्र स्वीकारले. हेगलने हे सूत्र फक्त विचारांवरच केंद्रित केले होते. मार्क्सने असा विचार केला की हे द्वंद्वात्मकतेचे सूत्र हे जीवनाच्या भौतिक गोष्टीवरही लागू पडते. उदा. अर्थव्यवस्था.

मार्क्सने हेगलची द्वंद्वात्मकता घेतली आणि फोरबॅकचा भौतिकवाद घेतला आणि नवा द्वंद्वात्मक भौतिकवाद विकसित केला. ज्याचा जौर भौतिक जगातल्या द्वंद्वात्मक संबंधावर होता.

लुडविग फोरबँक हा हेगल आणि मार्क्समधला महत्त्वाचा पूल होता. हेगलने वैयक्तिक आदर्शवादावर आणि कल्पनांवर जो अतिरिक्त जोर दिला. त्यावर फोरबॅकने टीका केली. फोरबॅकचे म्हणणे होते की समाजाचे विश्लेषण भौतिक वास्तवापासून सुरू व्हायला हवे.

फोरबाखच्या टीकेचे मुख्य लक्ष हेगलच्या धर्म या संकल्पनेवर आहे. त्यांच्या इसेन्स ऑफ ख्रिश्चियानीही (१८४१) या ग्रंथात ज्या गोष्टींची माणूस पूजा करतो त्या बद्दलचे त्याचे अनुभव म्हणजे धार्मिक विश्वास होय असे धार्मिक विश्वासाचे विश्लेषण केले आहे. माणूस स्वत:पेक्षा ठेव फार वरचा समजतो आणि देवाला परिपूर्ण पवित्र आणि सर्वसाक्षी समजतो आणि स्वतःला अपूर्ण, शक्तीविहीन आणि पापी समजतो. हेगलचं तत्त्वज्ञान वापरुन धर्माला तो अलगीकरण सिद्धांत असे

समजतो. फोरबाख म्हणतो कि धर्म हा सामाजिक संबंधातून निर्माण झाला आहे आणि सामाजिक तत्त्वाप्रमाणेच त्याचे विश्लेषण केले पाहिजे.

फोरबाखच्या म्हणण्यानुसार धर्म माणसाला स्वतःपासून दूर ठेवतो म्हणजे धर्माच्या रुपाने माणूस स्वतःवरच सत्ता गाजवतो, स्वतःवरच शासन चालवून घेतो, अचेतन निर्मिती. या सगळ्या विचारधारेत संपूर्ण बदल केला पाहिजे. दुसऱ्या कुणी परात्य प्राण्याबरोबर काम करण्यापेक्षा माणसाने सहाध्यायी माणसाबरोबर काम केले पाहिजे. त्यामुळे माणूस मुक्त होईल आणि या मुक्तीमुळे आजूबाजूच्या सगळ्या गोष्टीवर त्याचे नियंत्रण राहिल. फोरबाखच्या मतानुसार भौतिक तत्त्वज्ञानाच्या मदतीने धार्मिक विचारांचा पराभव करता येईल आणि माणसं आपली नियती स्वतःच घडवतील, धर्म घडवणार नाही. फोरबारवचं धर्माचं विश्लेषण, देवाधिष्ठित जग आणि असमाधानी सामाजिक परिस्थिती, या सगळ्यांनी माणसाला आपणच निर्माण केलेल्या धार्मिक अस्तित्वात सांत्वना शोधणे भाग पाडले. या फोरबाखच्या विश्लेषणाचा मार्क्सवर फार प्रभाव पडला.

## २.४ हेन्री-सेंट सायमनचा मार्क्सवर पडलेला प्रभाव

इतिहास आणि समाज या विषयावरची स्वतःची मते बनविण्यासाठी मार्क्सने समकालीन फ्रेंच सामाजिक विचारांचा उपयोग केला. मानवी अस्तित्वाचा मूलभूत दृष्टिकोण म्हणजे उपजीविकेच्या साधनाचे उत्पादन करणे हे होय, अशी सेंट सायमनची मुख्य धारणा होती, या मुख्य धारणेचा कार्लमार्क्सने स्वीकार केला. आणि ही उपजीविकेची मूलभत साधने म्हणजे अन्न आणि निवारा होय. मानवी समाज म्हणजे वर्गावर्गातल्या युद्धांचा इतिहास होय हे सायमनचे मत ही त्याने विचारात घेतले.

वर्गयुद्धाची किंवा वर्गकलहाची धारणा, आजच्या नवीन औद्योगिक जगातले कामगारांचे महत्त्व इतिहास समजून घेण्यासाठी असलेले संपत्ती संबंधांचे महत्त्व हे सगळे मूलभूत विचार मार्क्सने हेन्री सायमन वाचून, घेतलेले आहेत.

शेवटी असे म्हणता येईल की मार्क्सचे विचार म्हणजे फ्रेंच आणि जर्मन या विचारधारांचा संगम होय. हेगलचे जर्मन आदर्शवादाचे पुनर्जागरण आणि नव्या हेगेलियन्स शिष्यांची टीकात्मक परंपरा आणि फ्रेंच सामाजिक विचार विशेषतः सेंट सायमन आणि ब्रिटीश राजकीय अर्थव्यवस्था या चार ही विचारांचा संगम कार्ल मार्क्सच्या विचारात झालेला दिसतो.

**आपली प्रगती तपासा:**

१) कार्ल मार्क्सच्या चरित्राची रुपरेषा द्या.

___

___

___

२) कार्ल मार्क्सच्या आयुष्यावर आणि लिखाणावर कुणाचा प्रभाव पडला ? त्याची चर्चा करा.

___

___

___

## २.५ द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवाद

हेगलची विचारधारा असे मानते की सगळे विषय आणि सगळे भौतिक पदार्थ म्हणजेच अन्वय नेहमी आणि अपरिहार्यपणे आपला विरोधान्वय तयार करत असतात. या अन्वय आणि विरोधान्वयातल्या विसंगतीमुळे एक नवाच समन्वय तयार होतो. पण इथेच शेवट होत नाही कारण हे समन्वय बदलत राहतात. आणि त्यातून नवे अन्वय (thesis) निर्माण होतात, परत त्याला विरोधान्वय (anti thesis) तयार होतात आणि ही प्रक्रिया चालू राहते, आणि अशा अंतरविरोधाना काबूत आणण्याचे मानवी प्रयत्न होत राहतात.

उत्पादन प्रक्रियेच्या पद्धतीचे विश्लेषण करण्यासाठी मार्क्सने द्वंद्वात्मक योजनेचा अवलंब केला. भौतिक जग आणि समाजातील लोक, हे लोक आपल्या गरजा निर्माण करण्यासाठी भौतिक जग निर्माण करतात. ही प्रक्रिया चालू असताना ते त्यांच्या गरजा बदलतात आणि नव्या गरजा निर्माण करतात. त्यामुळे त्यांचे भौतिक जगाशी असलेले संबंध बदलतात. म्हणजे आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण झालेले असते तेच आता आपल्यावर दबाव आणते. समाजातील माणसे आणि हे भौतिक जग यातला विरोध हाच मार्क्सच्या सिद्धान्ताचा मुख्य मुद्दा आहे.

त्यामुळे मार्क्सने आपल्या पहिल्या प्रसिद्ध पुस्तकात "People turned Hegal on the head" असा दावा केला आहे की मानव हा समाजाचे उत्पादन आहे न की याच्या विरुद्ध आहे. म्हणजे समाज हा मानवाचे उत्पादन नाही तर मानव हा समाजाचे उत्पादन आहे. ही हेगलची साधी अदलाबदल म्हणजे मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाची सुरुवात आहे. मार्क्सच्या म्हणण्यानुसार द्वद्वात्मक भौतिकवादामुळे समाजाचा कल्पनाधिष्ठित किंवा आधिभौतिक अनुमानावर अवलंबून न राहता अनुभवाधिष्ठित आणि शास्त्रीय दृष्ट्या होऊ शकतो.

मार्क्स पुढे हे दाखवून देतो की भौतिकवाद हा कल्पना किंवा विचारांपेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. मानवी अस्तित्वासाठी उपजीविकेची साधने निर्माण करणे हा मानवी जीवनाचा मूलभूत दृष्टिकोन आहे. उपजीविकेची साधने निर्माण करणे हे मानवाच्या दुसऱ्या कुठल्याही कृतीपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. जेव्हा मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादनाच्या साधनांची व्यवस्था केली तरच समाज कार्य करु शकेल. त्यामुळे मार्क्सचे मानवी इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे एतिहासिक भौतिकवाद झाला आहे.

मानव म्हणजे समाजाचा निर्माताही आहे आणि समाजाचं उत्पादनही आहे असं मार्क्स समजतो. मानव आपल्या कार्याने समाज बनवतो. म्हणून इतिहास म्हणजे मानवाची स्वयंनिर्मितीची प्रक्रिया आहे. तरीही मानव म्हणजे समाजाचं उत्पादनही आहे. सामाजिक संबंध आणि विचारांच्या ज्या पद्धती तो निर्माण करतो त्याच साच्यातून तो बनवला जातो. त्यामुळे समाजाचे ज्ञान ऐतिहासिक परिप्रेश्यात गुंतलेले असते आणि माणूस सामाजिक वास्तव बनवत असतो आणि त्यातूनच तो स्वतःही बनत असतो ही जी प्रक्रिया आहे याची तपासणी हा ऐतिहासिक परिप्रेक्षक करत असतो. समाज असे एक पूर्णत्व (totality) बनवतो ज्यातले निरनिराळे भाग एकमेकांशी जुडलेले आणि एकमेकांमुळे प्रभावित झालेले असतात. अशाप्रकारे आर्थिक, राजकीय, कायदेसंबंधित आणि धार्मिक संस्था त्यांच्या एकमेकावर असलेल्या प्रभावानेच समजून घेतल्या जाऊ शकतात. तरीही आर्थिक पैलूचा मुक्य प्रभाव असतो आणि इतर बराचश्या पैलूंना हाच आकार देत असतो. आर्थिक वस्तूंच्या उत्पादनाची पद्धत दोन माणसातले संबंध निश्चित करत असते. अशाप्रकारे समाज हा आर्थिक संस्थांच्या नुसार

तयार केला जातो. समाजाचा इतिहास म्हणजे तणाव आणि संघर्षाची प्रक्रिया आहे. समाजात वाढत चाललेल्या संघर्षामुळे सामाजिक परिवर्तन होत असते आणि ते तणावाचे मूळ ठरते आणि अंतिमत: खुल्या संघर्षाचे आणि अमूलाग्र सुधारणेचे कारण बनतात.

नेहमीच असा वाद केला जातो की मार्क्सचा इतिहासाबद्दलचा दृष्टिकोण हा द्वंद्वात्मक विचारधारेवर आधारित आहे. अशा दृष्टिकोणामुळे विसंगत अश्या दोन प्रभावशाली वस्तू मधला तणाव कुठल्याही परिवर्तनाच्या प्रक्रियेत अंतर्निहित असतो. त्यामुळे द्वंद्वात्मक चळवळ विरोधकांच्या संघर्षांचे आणि विसंगतीतल्या अंतर्विरोधाचे प्रतिनिधित्व करत असतो. संघर्ष हा शक्तिशाली सिद्धांत असतो आणि तो बदलाचे मूळ असतो. विसंगत अशा दोन प्रभावशाली बाजू मधला संघर्ष इतका प्रखर होती की मग शेवटची जबरदस्त टक्कर होते. त्याचा परिणाम असा होतो की पटकन एक पुढचे पाऊल पडते जे सुधारणांच्या नव्या स्तरावरचा एक शक्तीशाली नवा संच तयार करतो. नव्या प्रभावशाली बाजूंमध्ये पुन्हा अंतर्विरोधाची द्वंद्वात्मक प्रक्रिया सुरु होते आणि परस्परांवर प्रक्रिया करत, संघर्ष करत परिवर्तनाची प्रक्रिया पुढे चालवते.

जर्मन तत्त्ववेत्ता हेगल याने द्वंद्वात्मक परिवर्तन या कल्पनेचा विकास केला. त्याने हा सिद्धांत मानवी समाजाच्या इतिहासाला लागू केला विशेषत: विचारांना किंवा कल्पनांना लागू केला समाज म्हणजे मानवाच्या विचारांचे आणि कल्पनांचे प्रकटीकरण आहे. असा हेगलला पक्का विश्वास वाटत होता. हेगलने विचार आणि कल्पनांना दिलेले महत्त्व मार्क्सने नाकारले. हेगल हा आदर्शवादी होता म्हणून त्याने बुद्धीला महत्त्व दिले आणि मार्क्स भौतिकवादी होता म्हणून त्याने भौतिक गोष्टींना महत्त्व दिले. त्याच्या मते भौतिक पदार्थ हे आदर्शांना आणि कल्पनांना जन्म देतात. त्याचा असा दावा आहे की विशेषत: आर्थिक पद्धतीच्या अंतर्विरोधामध्ये आणि सामान्यत: समाजातल्या अंतर्विरोधामध्ये परिवर्तनाचे मुळ आहे. त्याने आर्थिक बाजूला आणि भौतिकजीवनाला महत्त्व दिले, त्याचा परिणाम म्हणून त्याच्या ऐतिहासिक दृष्टिकोणाला द्वंद्वात्मक भौतिकवाद असे म्हटले गेले. त्याच्या दृष्टीने आदर्शाला महत्त्व नव्हते. भौतिकता माणसाच्या मेंदूत प्रतिबिंबित होते आणि त्याचे विचारांमध्ये रुपांतर होते म्हणून मार्क्स म्हणू इच्छितो की विचार हे भौतिक जगातून निर्माण होतात.

द्वंद्वात्मकता म्हणजे दुहेरी अस्तित्व होय असे मार्क्स म्हणतो. प्रत्येक पद्धतीला आणि वास्तवाला विरोधी किंवा विसंगत अशी उल्लेखनीय अशी बाजू असते. उदाहरणार्थ जिथे श्रीमंत आहेत. गरीब आहेत. जिथे जमीनदार आहेत तिचे जमीन नसलेले आहेत. वरच्या दर्जाच्या लोकांची तुलना खालच्या दर्जाशी होते. अशाप्रकारे समाजवास्तवाचे मूलभूत असे प्रखर विरोधी घटक स्वभावत:च असलेल्या अंतर्विरोधाला बढावा देतात. उदा. मालक - नोकर, सत्ताधारी - सत्ताहीन, , आनंदी - रागीट, मार्क्ससाठी प्रत्येक गोष्टीला जुळणारी विरोधी बाजू असते. काही असते (haves) असतात तर काही नसते (have-nots) असतात त्यामुळे असल्या आणि नसत्या लोकात संघर्ष होतो. मार्क्सने आदर्शवादाला भौतिकवादात बदलवले आणि द्वंद्वात्मकता या संकल्पनेचा यशस्वी उपयोग केला जो पुढे द्वंद्वात्मक भौतिकवाद या नावाने ओळखला गेला किंवा त्याला ऐतिहासिक भौतिकवाद या नावानेही ओळखला गेला. या पद्धतीचा वापर करुन त्याने इतिहासाचे विश्लेषण केले.

हेगलच्या आदर्शवादाला ऐतिहासिक भौतिकवादाची जोड देऊन मार्क्सने हे तत्त्वज्ञान स्वीकरल त्याचबरोबर त्याने ब्रिटीश अर्थव्यवस्थेचे जे सिद्धांत आहेत त्याचाही स्वीकार केला त्यामुळे मार्क्सला असा विश्वास वाटला की मानवी अस्तित्वाला प्रेरित करणारे मुख्य सुत्र हे धर्म किंवा समाज नाही तर मानवी अस्तित्व टिकून राहायला मदत करणारा भौतिकवादी वास्तववादच मुख्य सूत्र आहे. प्रत्येक माणूस जगण्याची धडपड करतो आणि जगण्यासाठी उत्पादन करतो. ही उपजीविकेची

साधने निर्माण करण्याची गरज हेच समाजाचे, समुदायातल्या मानवी आयुष्याचे आणि मानवी कृतीचे मूळ आहे. मानवाचे परस्परांवर क्रिया प्रतिक्रिया करण्यामागचे हे मूलभत असे सत्य आहे.

मार्क्स लिहतो, ''भौतिक जीवनाचं उत्पादन करणे हे पहिले ऐतिहासिक कार्य आहे. ही मूलभूत अशी इतिहासाची अट आहे. १९ व्या शतकातले युरोपियन विचारधारेत लोकप्रिय असलेले मानवी विकासाबद्दलचे क्रांतिकारी परिप्रेक्ष्य मार्क्सने स्वीकारले. मार्क्स समाजाला असे क्षेत्र समजतो. जिथे गटागटातले संघर्ष आणि भांडण, जगण्यासाठी आवश्यक असलेल्या स्पर्धात्मक शक्ती आणि सुधारित उपजीविका या तीन गोष्टीमुळे सामाजिक परिवर्तन होत जाते. संघर्ष, भांडण आणि स्पर्धा म्हणजे समुदायातल्या सामाजिक प्रगतीसाठीची एक यंत्रणा आहे.

हेगल, मार्क्स आणि सगळ्याच युरोपियन विचारवंतांच्या दृष्टीने इतिहास म्हणजे त्यांच्या मानवी अस्तित्वाच्या सिद्धांताचा मुख्य केंद्रबिंदू आहे. त्याच्यासाठी मानवी इतिहास म्हणजे आपापसातल्या संघर्षाचे विवरण आहे आणि सामाजिक आणि सृष्टिविषयक पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्याचे मानवी प्रयत्न आहेत. मार्क्स म्हतो की मानव स्वतःचा इतिहास स्वतःच घडवतो. जेव्हा तो उपजीविकेच्या साधनांचे उत्पादन करतो तेव्हा तो अप्रत्यक्षपणे वास्तव भौतिक जीवन निर्माण करतो. मार्क्ससाठी जेव्हा जेव्हा दोन बलशाली गटात संघर्ष निर्माण होतो. तेव्हा हे परिवर्तन अटळ असते. हे परिवर्तन कदाचित क्रमात असेल, पद्धतीत असेल किंवा उत्पादनाच्या रीतीत असेल, पण हे समाजाच्या प्रगतीसाठी असते. उदा. सत्ताधारी आणि सत्ताहीन यामधला संघर्ष झाला तेव्हा या संघर्षा ने उत्पादनाच्या पद्धतीत बदल केला म्हणजे वेठबिगारीची पद्धत बंद झाली.

ज्या प्रमाणे को ने विचार करण्याच्या पद्धतीनुसार मानवी उत्क्रांतीचे तीन भाग केले त्याचप्रमाणे मार्क्सने उत्पादनानुसार मानवी इतिहासाचे चार टप्पे केले आहेत. १) आदिकालीन साम्यवाद २) प्राचीन गुलामांचे उत्पादन ३) सरंजाम शाही ४) भांडवलशाही

मार्क्ससाठी भौतिकवाद ही जीवनाची नैसर्गिक आणि वास्तववादी खरी बाजू आहे. लोक जगतात ते उत्पादनामुळे, त्यामुळे हे जीवनाचे खरे वास्तव आहे. मानवाचे एकमेकाशी असलेले संबंध उत्पादनाच्या पद्धतीनुसार बदलत जातात. आदिकालीन पद्धतीत सामुदायिक मालकीचे महत्त्व होते. तर प्राचीन काळाच्या उत्पादनाच्या पद्धतीत गुलामगिरी होती. त्यामुळे संबंधांचे स्वरुप मालक आणि गुलामाचे होते. सरंजामशाही उत्पादनाच्या पद्धतीत दास आणि मालक आणि भांडवलशाहीत कामगारांची मध्यमवर्गीय (बूर्ज्वा) लोकांनी ज्यांच्याजवळ शेती किंवा मालमत्ता होती) केलेले शोषण होते. फक्त आदिकालीन साम्यवाद सोडून प्रत्येक टप्प्यात माणसाचे माणसाकडून शोषण झाले आणि शोषितांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, पूर्वी गुलामगिरी पद्धतीत खूप सुधारणा झाली उदा. शेती व्यवसाय खूप सुधारला पण गुलामांची फार पिळवणूक झाली. मग शोषितांनी एकत्र येऊन जबरदस्त विरोध केला त्यामुळे त्यांच्या परिस्थितीत बदल झाला आणि एक नवी पद्धत जन्माला आली.

जेव्हा लोकानी उपजीविकेची साधने निर्माण करायला सुरुवात केली आणि निसर्गावर नियंत्रण ठेवायला सुरुवात केली. तेव्हापासून इतिहासाची सुरुवात होते. कमीत कमी अन्न आणि निवारा निर्माण करणे या गोष्टी यात सामील होत्या. मानवी इतिहासाच्या आदिम काळात म्हणजे जेव्हा लोक आदिकालीन साम्यवादात राहात होते. तेव्हा समाजात हे अंतर्विरोध अस्तित्वात नव्हते. मजुरीने तयार केलेल्या वस्तू यावर सामुदायिकरित्या मालकी होती. कारण समाजाचा प्रत्येक सदस्य स्वतःसाठी आणि समाजासाठी उत्पादन करत होता. त्यामुळे व्यक्ती आणि समुदायाच्या हितसंबंधात संघर्ष

नव्हता. पण उत्पादनाच्या खाजगी मालकीच्या उदयानंतर मानवी समाजात मूलभूत असा अंतर्विरोध निर्माण झाला. या उत्पादनाच्या प्रभावी शक्तीच्या मालकी मुळे एक अल्पसंख्याक गट बहुसंख्य कामगारवर्गाच्या कष्टाच्या फळावर नियंत्रण करू शकला आणि कष्टाच्या फळाचा आनंद लुटू शकला.एक गट दुसऱ्या गटाच्या जोरावर कमावू शकलो म्हणून जो अल्पसंख्यांक गट उत्पादनाच्या प्रभावी शक्तीचा मालक आणि श्रम करणारा बहुसंख्य वर्ग यात हितसंबंधांचा संघर्ष होता. या अंतर्विरोधातून निर्माण होणारा तणाव आणि संघर्ष ही सामाजिक परिवर्तनामागची मुख्य शक्ती होती.

मार्क्सचा पक्का विश्वास होता की उत्पादनाची प्रभावी शक्ती म्हणजे तंत्रज्ञान हे उत्पादनाचा संबंध निश्चित करते, म्हणजे आर्थिक संस्थेचा प्रकार निश्चित करते. ऐतिहासिक सुधारणांच्या प्रत्येक टप्प्यामधे उत्पादनाची विशिष्ट पद्धत माणसांचे परस्परांमधील आणि अनेकांमधील संबंध निश्चित करते, त्यांचे स्वरुप निश्चित करते. दुसऱ्या टप्प्यान मालक आणि बाजारात खरेदी करुन आणलेले गुलाम असे संबंध होते. मालक उत्पादन वाढवण्यासाठी गुलामांच्या शारीरिक आणि बौद्धिक योग्यतेची, शक्तीची पिळवणूक करत होते. तिसऱ्या टप्प्यात जमिनदार लोक जमीन नसलेल्या श्रमिकांवर नियंत्रण ठेवत होते. आणि आयुष्यभर त्यांच्याकडून काम करवून घेत होते. शेवटच्या टप्प्यात म्हणजे भांडवलदार वर्ग उत्पादनाच्या साधनाचे म्हणजे कारखान्याचे मालक त्यात काम करणाऱ्या मजुरांची पिळवणूक करत होते. अशाप्रकारे प्रत्येक टप्प्यात दोन वर्ग होते. एक वर्ग जो उत्पादनांच्या साधनांचा मालक होता तो दुसऱ्या वर्गाचा म्हणजे जीवित राहण्यासाठी काम करणाऱ्या श्रमिकांची पिळवणूक करतो. पहिल्या वर्गाची स्थिती तंत्रज्ञानाच्या स्तरावरुन निश्चित होत होती. तंत्रज्ञान हे सतत बदलत असते आणि सुधारत असते. सध्या अस्तित्वात असलेली आर्थिक परिस्थिती नव्या सुधारित तंत्रज्ञानाच्या स्तराला अयोग्य ठरते, किंबहुना ती नव्या सुधारित तंत्रज्ञानाला अडगळ निर्माण करत असते. तेव्हा मार्क्सच्या मते परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता असते. पिळवणूक होणारा वर्ग एकत्रित येऊन उत्पादनाच्या साधनांचे जे मालक असतात त्यांच्या विरुद्ध लढा देतात कारण कुणीही नेहमीसाठी यातना सहन करु शकत नाही आणि अमानुष अशा परिस्थितीत राहू शकत नाही. श्रमिकांचा किंवा ज्यांच्यावर सत्ता चालवली जाते तो वर्ग नेहमीच बहुसंख्येत असतो. त्यामुळे तो यशस्वी होतो आणि एक नवा टप्पा किंवा उत्पादनाची एक नवी पद्धत तयार होते, आणि ती उत्पादन प्रक्रियेतले संबंध निश्चित करते. समाजातली तंत्रज्ञानाविषयक सुधारणा नव्या उत्पादन पद्धती तयार करते त्यामुळे इतिहास एका नव्या पर्वात प्रवेश करतो. अशा प्रकारे एकानंतर एक बदल झाले. उत्पादनाची गुलाम मालकाच्या पद्धतीपासून सरंजामशाहीतले जमीनदार आणि दास पद्धती आणि नंतर भांडवलशाहीची पद्धत उदयाला आली. हा आर्थिक व्यवस्थेमधला बदल मग सामाजिक संबंधामध्ये बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरला.

मार्क्सचा असा विश्वास आहे की दोन प्रभावी शक्तीमधला संघर्ष किंवा दोन टप्प्यामधला संघर्ष नव्या टप्प्याला मार्ग दाखवतो. नवा टप्पा विकसित होतो तेव्हा जुना टप्पा पूर्णपणे नष्ट होतो. कारण जुनी पद्धती नष्ट झाल्याशिवाय नवी पद्धती विकसित होऊ शकत नाही. मार्क्सला असा विश्वास वाटतो की कुठलाही समाज त्याच्या पद्धतीप्रमाणे कितीही चांगला चालत असला तरीही त्या समाजात दंगल होणे आणि क्रांती होणे अनिवार्य आहे, ही नियतीने योजिलेली योजना आहे. सगळे वर्गविभाग मोडून पडे पर्यंत अशी प्रक्रिया चालूच राहते. समजा एखाद्या समाजाने ऐक्य आणि सहकाराच्या दृष्टीने एक मनुष्य जात जेवढा उत्कृष्ट समाज स्थापित करु शकेल तेवढा स्थापित केला तरीही एक वेळ अशी येतेच की हा उत्कृष्ट समाज नव्या प्रगतीच्या मार्गातला अडथळा बनू शकतो आणि तो अडथळा बाजूला सारून नवा समाज उदयाला येऊ लागतो. तो वर्ग जो जुनी पद्धत अंमलात आणत असतो आणि तो वर्ग जो नवी पद्धत अंमलात आणत असतो त्यात संघर्ष

अटळ असतो. उदयाला येणारा वर्ग हा विजयी असतो. त्याने एका नव्या उत्पादन पद्धतीला निर्माण केलेले असते. जी नव्या आणि जुन्या पद्धतीचा संयोग असते. तरीही या नव्या पद्धतीत अटळ अश्या विध्वंसाची बीजे रुजलेली असतात आणि अशाप्रकारे द्वंद्वात्मक प्रक्रिया चालू राहते.

मार्क्सचा पक्का विश्वास आहे की श्रमजीवी वर्ग आणि भांडवलदारांमधला संघर्ष तेव्हाच थांबेल जेव्हा श्रमजीवी वर्ग बलशाली आणि जागरुक बनेल. भांडवलदारांना उखडून टाकलं जाईल आणि पाचवी आणि शेवटची पद्धत अस्तित्वात येईल. या नव्या पाचव्या पद्धतीत वर्गाविहीन समाज असेल, खाजगी संपत्ती नसेल आणि नियंत्रक आणि नियंत्रितात काही फरक नसेल. युद्ध आणि बंडखोरी नाहीशी होईल. असे म्हटले जाते की मार्क्सच्या विचारधारेत ऐतिहासिक विकासाची कल्पना आणि आदर्शवादाचा विचार उपजतच असतो कारण मानवी इतिहासात निरनिराळ्या टप्प्यांची परंपरा अटळ असते.

## २.७ सारांश

समाजाच्या आणि इतिहासाच्या विश्लेषणात द्वंद्वात्मक पद्धतीचा उपयोग करणे हे मार्क्सवादाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. मार्क्सचा असा विश्वास आहे की सर्वसाधारणपणे भौतिकवाद खऱ्या अस्तित्वाला वस्तुनिष्ठपणे पाहतो म्हणजे भौतिक पदार्थाला जो पदार्थ सद्सदविवेक बुद्धी, जाणीव आणि अनुभव यापासून स्वतंत्र असतो सद्सद्विवेक बुद्धी हे अस्तित्वाचे जास्तीत जास्त खरे प्रतिबिंब असते. मार्क्सहा आदर्शवादाचा विरोधक होता आणि भौतिकवादाचा पुरस्कर्ता होता. मार्क्सवादाला अनुसरणारा स्टॅलिन मार्क्सवादाचे स्पष्टीकरण करतो, ''मार्क्सवादाला अनुसरणारा स्टॅलिन मार्क्सवादाचे स्पष्टीकरण करतो, ''मार्क्सचा तत्त्वज्ञानात्मक भौतिकवाद असे प्रतिवादन करतो की जग हे नैसर्गिक दृष्ट्या भौतिकच आहे. नानाविध प्रकारचा जगाचा जो अपूर्व देखावा आहे त्यात निरनिराळ्या प्रकारचे हलते राहणारे भौतिकपदार्थ आहेत त्यांचे एकमेकाशी जुळलेले असणे किंवा एकमेकावर अवलंबून असणे द्वंद्वात्मक पद्धतीने समजू शकतो. ही पद्धत गतीचा कायदा पाळते आणि त्यानुसार विकसित होत जाते.'' मार्क्ससाठी भौतिक पदार्थच जीवनातले सत्य आहे, आर्थिक कार्याचे प्रमुख लक्षण आहे. मार्क्सला विश्वास वाटतो की बुद्धी भौतिक पदार्थ निर्माण करत नाही तर भौतिक पदार्थच बुद्धी निर्माण करतात.

## २.८ प्रश्न

१) कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाचे विवेचन करा.

२) ऐतिहासिक भौतिकवादाची चर्चा करा.

## २.९ संदर्भ


१) अब्राइम फ्रॅन्सिस १९८२ मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) अब्राइम एफ, १९९१, सोशियालॉजिकल थॉट, मद्रास, मॅकमिल्डन.

३) ॲडम्स, बी. एन. आणि सागरी R.A. 2001 सोशियालॉजिकल थियरी, नवी दिल्ली, विस्तार.

४) ॲरान रेमंड १९६५, मेन करन्टर इन सोशियालॉजिकल थॉट । & ॥ ग्रेट ब्रिटन, वैदनफिन्ड निकोलेसन.

५) कोसर लेवीस १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट, (2nd ed) हरकोर्ट त्रास जोवानोविच इन्क.

६) प्लेचर रोनॉल्ड, २०००, द , मेकिंग ऑफ सोशिऑलॉजी अ स्टडी ऑफ सोशियालॉजिकल थियरी बोगीर्निग ॲंड फौंडेशन, नवी दिल्ली, रावत पब्लिकेशन.

७) रिट्झर जॉर्ज, १९८८, सोशिऑलाजिकल थियरी (nd ed) न्यूयॉर्क, मैक्ग्रा हिल पब्लिकेशन.

८) रिट्झर जार्ज, १९९६, मॉडर्न सोशिऑलाजिकल थियरी ४ th ed) न्यूयॉर्क मॅकग्रा पब्लिकेशन


♦ ♦ ♦

# ३

# उत्पादन पद्धती आणि वर्गसिद्धान्त

**प्रकरणाची रचना**


३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ आर्थिक आंतररचना आणि सामाजिक आर्थिक प्रमुख रचना

३.३ वर्गकलह आणि वर्गसिद्धांत

३.४ वर्ग संघर्षाचा सिद्धान्त

३.५ मार्क्सच्या सिद्धांताची समीक्षा

३.६ सारांश

३.७ स्वाध्यायासाठी प्रश्न

३.८ संदर्भ


## ३.० उद्देश

- विद्यार्थ्यांना मार्क्सच्या आर्थिक आंतररचनेची आणि सामाजिक आर्थिक प्रमुख रचनेची ओळख करुन देणे.
- मार्क्सच्या राज्य या संकल्पनेच्या सिद्धांतात सत्ताधारी वर्गाची भूमिका तपासून पाहणे.
- मार्क्सच्या श्रमजीवी वर्गाचा सिद्धांत समजून घेणे.
- ''राज्य कोमेजून जाणे'' यावरची मार्क्सची जी मते आहेत त्याचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

मार्क्सचा राज्यसंकल्पनेचा सिद्धात सर्व साधारणपणे समाजशास्त्राकडून दुर्लक्षिला जातो. त्याचे कारण म्हणजे मार्क्सने स्वत:कधीही या सिद्धांताची सुसंगत अशी रचना केली नाही. या राज्य संकल्पनेची मूल्य्त्त्वे मार्क्स आणि एंजल्सच्या ग्रंथात सगळीकडे विखुरलेली दिसतात.

या प्रकरणात मार्क्सची राज्य या संकल्पनेबद्दलची मते, सत्ताधारी वर्गाची भूमिका आणि श्रमजीवी वर्गक्रांती याचे महत्त्व या संबंधातील मार्क्सच्या विचारांना प्रस्तुत करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. शेवटी मार्क्सची या विषयावरील मते याबद्दल चर्चा केली आहे.

## ३.२ मार्क्सची आर्थिक आंतररचना आणि सामाजिक आर्थिक प्रमुख रचना

मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद आर्थिक हेतूमूलकतेशिवाय अपूर्ण आहे. जरी मार्क्सने अपरिपक्व आर्थिक हेतूमुलकते बद्दल सतत चर्चा केली नसली तरी अर्थव्यवस्था ही साऱ्या सामाजिक सांस्कृतिक

व्यवस्थेचा पाया आहे याबद्दल त्याच्या मनात शंका नाही. मार्क्स आणि एंजन्सच्या संपूर्ण अभ्यासात मानवी संबंधांमध्ये आर्थिक व्यवस्था ही महत्त्वाची आहे आणि राजकीय व्यवस्थेतही आर्थिक पैलूला मध्यवर्ती स्थान आहे यावर या दोघांनीही भर दिला आहे. मार्क्सवादानुसार साधनांचे वितरण आणि उत्पादन विषयक संबंध उच्च हेच समाजाची मूलभूत रचना करतात आणि त्यावर इतर सामाजिक संस्था मुख्यत: राज्यव्यवस्था आणि न्यायव्यवस्था उभी राहते. एंजेन्सच्या मतानुसार उपजीविकेच्या साधनांचे उत्पादन आणि त्याचा परिणाम म्हणून एका विशिष्ट लोकाकडून एका विशिष्ट काळात होणारा आर्थिक विकासाचा स्तर, मूलभूत बैठय तयार करतात आणि त्यावर राज्य संस्था, न्यायसंकल्पना, कला आणि धर्मासंबंधीचे विचार विकसित केले जातात.

मार्क्सने भौतिक उत्पादन आणि विकासाला महत्त्व दिले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार मानवी समाज हा आदिकालीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत प्रवास करत आला आहे, या प्रवासात उत्पादनाच्या तंत्रज्ञानात सुधारणा झाली परिणामीते चांगले आयुष्य जगले आहेत. उत्पादनाची पद्धती जीवन जगण्याचा स्तर, संबंधाची रीत, सामाजिक पदानुक्रम आणि सांस्कृतिक जीवन निश्चित करीत असते. उदा. समाज जेव्हा शिकारी अवस्थेत होता तेव्हा माणसे गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करीत नव्हती. ती साध्या उपकरणांचा उपयोग करीत असत त्यामुळे त्यांची भौतिक वाढ कमी होती. त्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन साधे होते. नेतृत्त्व हे अनवंशिक असायचे. ज्ञानाचं संप्रेषण साधे आणि अनौपचारिक होते. जीवनाच्या प्रत्येक पैलूवर रक्ताचे नाते अधिकार गाजवायचे. त्यांचे धार्मिक जीवन निसर्गाला अनुसरून असायचे. त्यानंतरच्या टप्प्यातले जीवन म्हणजे शेतीव्यवसाय करणाऱ्या समाजातल्या लोकांचे जीवन थोडे गुंतागुंतीचे होते. वर्ग आणि जाती पदानुक्रम अस्तित्वात आला. जमीनदार लोक भूमीहीनांची पिळवणूक करू लागले, समाज सामुदायिक जीवनापेक्षा वैयक्तिक मालकीकडे वाट चालू लागला. माणसाचे जीवन जमीन आणि प्राण्यांभोवती गुंफले गेले. लोकांची वैयक्तिक मालमत्ता होऊ लागली. अशा प्रकारे आवश्यक वस्तुंच्या उत्पादनाची पद्धत आणि सेवा या गोष्टी इतर सामाजिक रचनेची निश्चिती करू लागले. इतर सामाजिक रचना म्हणजे कौटुंबिक, राज्यकारभार, धार्मिक आणि करमणुकीच्या पद्धती वगैरे. मार्क्सच्या मताप्रमाणे आर्थिक व्यवस्था हीच वर्चस्व गाजवणारी पद्धत झाली. ही व्यवस्था इतर क्षेत्रातल्या जीवनपद्धती निश्चित करु लागली. अशाप्रकारे त्याने आर्थिक हेतुमुलकता प्रस्थापित केली.

मार्क्सच्या मतानुसार दोन आर्थिकदृष्ट्या वेगवेगळे गट म्हणजे भूमीधारक आणि भूमीहीन हे एकमेकासमोर उभे ठाकले की सामाजिक परिवर्तन होते. कारण त्या दोन्ही गटाचे ध्येय आणि रुची वेगवेगळी आहे. शहरी भागात या संघर्षाचा परिणाम म्हणून समाज व्यवस्था गिल्ड पद्धतीत परावर्तीत झाली, आणि नंतर भांडवलशाहीत त्याचे परिवर्त झाले. मार्क्ससाठी उत्पादनाच्या पद्धतीत दोन्ही प्रकार आहेत, एक श्रम करणारा आणि एक पिळवणूक करणारा, असे एकातच दोन्ही प्रकार आहेत.

प्रारंभापासून प्रागौतिहासिक काळात विनियोग म्हणजे (जगण्यासाठी निसर्गाकडून घेणे) फक्त निसर्गाकडून तयार माल घेणे होते. उदा. मासे, फळे वगैरे त्यानंतर, प्रागौतिहासिक काळानंतर ही निसर्गाकडून घेण्याची पद्धत श्रमाच्या प्रक्रियेत बदलली. या पद्धतीत कच्च्या मालाचे रुपांतर माणसाला उपयोगी पडणाऱ्या वस्तूत झाले. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे माणसे जेव्हा पुनरुत्पादन करु लागले तेव्हापासूनच इतिहासाची सुरुवात होते. या उत्पादक विनियोगाच्या पद्धतीत तीन मूलतत्त्वे एकत्र झाली आहेत.

१) माणसाचे स्वत:चे वैयक्तिक कार्य

२) कामाची वस्तू (जमीन)

**कामाचे उपकरण:**

यात उत्पादनाची साधने अंर्तर्विहित आहेत.( रासायनिक, यांत्रिक आणि औद्योगिक साधने जी उत्पादनाला मदत करतात.) उदा. सगळे एकत्र जोडण्याची पद्धत म्हणजे असेंब्ली, मायक्रोचिप्स, वगैरे यात शास्त्र आणि तंत्रज्ञानही सामील आहे आणि उत्पादनाच्या प्रक्रियेत हे दोन्ही एकत्र कसे केले जाते हे ही यात सामील आहे.

उत्पादनाच्या प्रभावी शक्ती खरेच महत्त्वाच्या आहेत. कुठल्या प्रकाराने आपल्या नैसर्गिक प्रयोग शाळेशी म्हणजेच पृथ्वी आणि निसर्ग माणसाने कसे संबंध जोडावे ते या प्रभावी शक्ती सांगतात. ज्याला ज्याची गरज आहे. ते त्याने घ्यावे आणि त्याच्या जगण्यासाठी वस्तुनिर्माण विषयक परिस्थितीचं पुनर्निमाण करावे हे ही या प्रभावी शक्ती सांगतात.

मार्क्स म्हणतो की प्रारंभी या दोन्ही प्रभावी शक्तीमध्ये नैसर्गिक एकी होती. तेव्हा श्रम आणि वस्तू मिळवण्याच्या अटी यात एकी होती. तेव्हा श्रम आणि वस्तू मिळवण्याच्या अटी यात एकी होती. म्हणजे माणूस काम करतो आणि अन्न जमवतो म्हणजेच अन्न जमविण्या साठी काम करायची आवश्यकता आहे. पण माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे त्याला श्रमाची विभागणी करावी लागते. इथेच ही नैसर्गिक एकी तुटते. सामाजिक दृष्ट्या या तीन मूलद्रव्याची एकी तुटायला लागते. त्याचबरोबर त्यांच्या एकत्रित राहण्यातला विरोध वाढत जातो. ते आता जास्तीत जास्त नकारात्मक दृष्टीने संबंधित असतात.

जेव्हा उत्पादनाच्या शक्तींची संकल्पना जमीन, श्रमजीवीवर्ग आणि उत्पादनाची साधने आणि ज्या पद्धतीने तंत्रदृष्ट्या त्यांचे मिश्रण केले जाते त्या सहित, या तीन मूलद्रव्यांचा आणि उत्पादनाचे संबंध ही संकल्पना, अशा प्रकारच्या मिश्रित सामाजिक संस्थांचाही विचार करते. म्हणजे इथे असे म्हणायचे आहे की जिचे उत्पादन जरुरीपेक्षा जास्त असेल आणि ते वाटले गेले तर लोक उत्पादन आणि वितरणाच्या संदर्भात एकमेकाशी संपर्क साधतील आणि एकमेकाच्या कामात साह्य करतील. पूर्वी या जरुरीपेक्षा जास्त श्रमाच्या उद्योगाचा विनियोग राजकीय वर्चस्वाकडून (जसे सरंजामशाहीत आणि गुलामगिरी पद्धतीत केले जाते) केला जायचा किंवा आदर्शवादी (जसे आदिकालिन आणि जाति विषय समाजात केले जाते) नियंत्रणाद्वारे या जरुरीपेक्षा जास्त श्रमाचा किंवा उद्योगाचा विनियोग केला जायचा. अनुरूप वर्गसंबंध मध्यमवर्ग आणि श्रमजीवी, जमीनदार आणि दास्यप्रथा, मुक्त नागरिक आणि गुलाम आणि जमीनदार आणि शेतकरी.

निरनिराळ्या दर्जाचे जे लोक असतात त्यांच्या रुची, त्यांचे उद्देश, त्यांचे रस आणि त्यांची प्रतिष्ठा ही वेगवेगळी असते. त्यामुळे ते नेहमी संघर्षात्मक परिस्थितीत एकमेकाला सामोरे जातात त्यांचे हित, त्यांची रुची किंवा त्यांचा उद्देश विरोधी असल्यामुळे त्याला वर्ग कलह किंवा वर्गसंघर्ष असे म्हटले जाते.

## ३.३ वर्गकलह आणि वर्ग संघर्ष

**१) उत्पादनाची साधने:**

उत्पादनाची उपकरणे (हत्यारे, यंत्र वगैरे) जमीन, कच्चा माल, इमारत वगैरे सारख्या सगळ्या साधनांना सामावून घेणारी उत्पादनाची साधने. ही विस्तारित अशी व्याख्या आहे. मार्क्स म्हणतो की उत्पादनाच्या साधनांची मालकी संपत्तीसंबंधीचे संबंध व प्रकार निश्चित करते. अ) सार्वजनिक

किंवा सामुदायिक स्वामित्व - या प्रकारात उत्पादनाच्या साधनांची मालकी समुदायातल्या सगळ्या लोकांची असते. जसे आदिकालीन सामुदायिक समाजात होते. ब) भांडवल शाहीत जशी उत्पादनांच्या साधनांची मालकी असते तशी मार्क्सच्या सिद्धान्ताप्रमाणे जेव्हा लोकसंख्येचा एक विभाग उत्पादनाच्या साधनावर मालकी मिरवतो आणि दुसरा विभाग या सोयी पासून वंचित राहतो. तेव्हा अशा वस्तूस्थितीतून वर्गसंबंध निर्माण होतात. त्यामुळे जगण्यासाठी दुसऱ्या विभागातील लोकांना पहिल्या विभागातील लोकांसाठी काम करावे लागते. सरंजामशाहीत आणि गुलामगिरीच्या सामाजिक पद्धतीत ही जबरदस्ती आर्थिक स्वरुपाची नसते तर त्यात धमक्यांचा उपयोग, हिंसाचार आणि धार्मिक तत्त्वांची स्वीकार करण्याची जबरदस्ती असते.

**२) पाया आणि प्रमुख रचना: (प्रमुख रचनेचा पाया)**

उत्पादित संबंध हे समाजाच्या आर्थिक रचनेला बनवतात आणि हे प्राथमिक समजले जातात आणि हा मूलभूत पाया असतो. या मूलभूत पायामधून सामाजिक संस्था उदयाला येतात आणि धर्माची कल्पना आविचारधारा आणि सामाजिक घटना उदयाला येतात. या अपूर्व घटना प्रमुख रचना म्हणून ओळखल्या जातात.

**३) उत्पादन पद्धती:**

यात उत्पादनाच्या शक्ती आणि उत्पादनाच्या संबंधांची विशेष लक्षणे याचा समावेश असतो.

**४) सामाजिक आर्थिक रचना:**

मार्क्स आणि अेजलच्या मते मुलद्रव्याचा संपूर्ण बाह्य आकार हा उत्पादन पद्धतीचा पया आहे. पाया आणि प्रमुख रचना म्हणजे सामाजिक आर्थिक रचना किंवा आकार असे समजले जाते. उदा. आदिकालीन किंवा सामुदायिक, प्राचीन किंवा गुलाम, सरंजामशाही आणि भांडवलशाही.

भौतिक उत्पादनाच्या कुठल्याही टप्प्यात जेव्हा अस्तित्व असलेली संबंधांची पद्धत जरी मानवी गरजा पूर्ण करण्यात निकामी झाली किंवा लुप्त झाली की त्याच्या बदल्यात एक नवी उत्पादन पद्धती किंवा नव्यासंबंधांचा संच तयार होतो. हे तत्त्व म्हणजे वर्ग संघर्षाच्या संकल्पनेचा मुख्य अर्थ किंवा अर्क होय. त्याचा परिणाम म्हणून उत्पादनाच्या प्रभावी शक्तीमधे संख्यादर्शक वाढ आणि गुणात्मकदृष्ट्या बदल होतो. प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यात असते (haves) आणि नसते (havenots) शोषक आणि शोषित हे दोन्ही गट एकमेकांशी लढत असतात कारण उत्पादन व्यवस्थेमधले त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. अशा प्रकारे जरुरीपेक्षा जास्त उत्पादनाने (Surplus) आदिकालीन समुदाय व्यवस्था कोलमडली. जरुरीपेक्षा जास्त उत्पादनाचा उपयोगकर्ता हा शेतकऱ्यांच्या जगण्याच्या धडपडीपेक्षा प्रबळ झाला. खाजगी मालमत्तेच्या मालकीच्या सिद्धांतामुळे दोन गट निर्माण झाले. जमीनदार, सरंजामशाहीतले सरदार आणि गुलाम. त्या माणसांचा गट जे उपकरणे वापरण्यात कुशल होते किंवा जरुरीपेक्षा जास्त उत्पादन स्वतःच्या उन्नतीसाठी वापरण्यात वाकबगार होते, त्या माणसांनी दुसऱ्या गटाला आपल्या वर अवलंबून राहायला भाग पाडले. मालक आणि गुलामांची एक नवी व्यवस्था विकसित झाली. या गुलामगिरी पद्धतीमुळे मोठ मोठी बांधकामे बांधली गेली आणि शेतीव्यवसायाचा विकास झाला. हे खरे असले तरी एक फार मोठा गट (गुलामांचा) मानवी अधिकारापासून वंचित राहिला. शेवटी ज्यांच्यावर जास्त जुलुम झाला असे वर्ग - गुलाम आणि गरीब लोकांनी वर्गसंघर्ष सुरु केला. गुलामगिरीची चळवळ मग सरंजामशाही उदयाला आली ज्यात

जमीन ही जहागिरदारांच्या मालकीची होती. त्यांच्याकडून ती नियंत्रित केली जात होती. या अशा लोकांनी शेतकऱ्यांना आपल्यासाठी काम करायला भाग पाडले. शेती करणाऱ्या या दासांवर उत्पादनाची बंधने होती. शहरी गिल्ड पद्धत विकसित झाली ज्यात लायक कामगारांना उत्पादन करणाच्या त्यांच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवण्यात आले. मालकाबरोबरच्या संघर्षामुळे हे लायक कामगार उत्पादनाच्या दुसऱ्या पद्धतीकडे म्हणजे भांडवलशाही कडे ओढले गेले.

शेवटी भांडवलशाही पद्धतीत श्रमांची चांगली विभागणी आणि उत्पादनासाठी मशीन्सचा उपयोग सुरु झाला आणि यातून दोन वेगवेगळे प्रमुख गट उदयाला आले. मध्यम वर्ग - साधनांचा मालक आणि कामगार वर्ग म्हणजे मध्यमवर्गासाठी काम करणारा श्रमजीवी वर्ग. कामगारांना त्यांचे वेतन वाढवण्यात त्यांचे जीवनमान सुधारण्यात रूची असते. आणि अंतिमतः त्यांना या दोघांमधले अंतर संपवायचे असते. पण भांडवलशहाला फक्त नफा कमविण्यात रस असतो. त्यामुळे दोघांमधले अंतर वाढत जाते. कामगार वर्गाने कष्ट करून मिळवलेले जरुरीपेक्षा जास्त उत्पादन किंवा निर्माण केलेल्या जास्त वस्तूंचा उपयोग मालक करतात. अशाप्रकारे कामगारांची पिळवणूक करतात.

जरी भांडवलशाहीमुळे विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती झाली तरी कामगारांची पिळवणूक करणारीवृत्ती तशीच राहिली. त्यामुळे मध्यमवर्गीय आणि श्रमजीवी वर्गात संघर्ष सुरू झाला, मार्क्सने यावर जोर दिला आहे की कामगारांनी संघटित होऊन अन्यायाच्या विरुद्ध लढा देऊन हे दोघांमधले अंतर मिटवले पाहिजे.

## ३.४ वर्ग संघर्षाचा सिद्धान्त

मार्क्सच्या तात्त्विक रचनेचे मुख्य सूत्र या तीन तर्कावर आधारित आहे.

१) आतापर्यंत अस्तित्वात असलेला समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. मुक्त मानव आणि गुलाम, धनी आणि रास, गिल्ड मालक आणि लायक कामगार म्हणजेच दुसऱ्या शब्दात शोषक आणि शोषित हे सतत एकमेकांच्या विरोधात उभ राहतात. आणि विना अडथळा ही लढाई चालू राहते. ती कधी खुल्या स्वरुपात तर कधी छुप्या स्वरुपात असते. एकंदरीत पाहता प्रत्येक वेळी या संघर्षाचा शेवट समाजाच्या क्रांतिकारी पुनर्रचनेत होतो.

२)‘‘माणसाची सद्सद्विवेक बुद्धी ही माणसाचे अस्तित्व सिद्ध करत नाही तर उलट त्यांचे सामाजिक अस्तित्व त्यांची सद्सद्विवेक बुद्धी निश्चित करत असते.’’याचा अर्थ असा की माणसाची सामाजिक योग्यता त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव माहिती करुन देते.

३) प्रत्येक युगात सत्ताधारी वर्गाचे विचार सत्ता गाजवणारे विचारच असतात. म्हणजे समाजातला प्रबळ भौतिक शक्ती असलेल्या वर्गाजवळ प्रबळ बौद्धिक शक्ती सुद्धा असते. याचा अर्थ असा की शक्तीशाली वर्ग कायदा बनवतो आणि तो पाळला जातो की नाही हे ही पाहतो.

मार्क्स म्हणतो की संरजामशाहीने भांडवलशाहीच्या उदयाची वाट मोकळी करुन दिली प्रत्येक टप्पा, तो पूर्ण झाल्यावर दुसऱ्या टप्प्याला मार्ग दाखवतो आणि तो मार्ग मानवी जीवनाचा एक वेगळा प्रकार निश्चित करतो.

भांडवलशाहीच्या विश्लेषणातून आणि टीकेतून मार्क्सने स्वतःचा सिद्धान्त विकसित केला. या

सिद्धांताच्या मुख्य घटकांचा सारांश पुढील प्रमाणे आहे.

१) **श्रमजीवी वर्गाचा विकास** - भांडवलशाही आर्थिक पद्धतीने बहुजनसमाजाचे दोन गट बनवले. पहिला वर्ग मध्यमवर्ग - भांडवलशाह आणि इतर कामगार किंवा श्रमजीवी वर्ग श्रमजीवी वर्गाने स्वत:साठी एक समान परिस्थिती निर्माण केली आणि समान हिताची जागृती त्यांच्या मनावर बिंबवली. या वर्गजाणिवेच्या विकासाद्वारे, भांडवलशाहीतल्या विषम आर्थिक परिस्थितीने, कामगारांना एकत्र केले आणि त्यांचा एक श्रमजीवी नावाचा स्वतंत्र वर्ग निर्माण झाला.

२) **मालमत्तेचे महत्त्व** - मार्क्सच्या मते त्या समाजातली संपत्तीची रचना हे त्या समाजाचे महत्त्वाचे लक्षण आहे. व्यक्तीचे मालमत्तेशी असलेले संबंध हेच व्यक्तीच्या वर्तनाचे निर्णायक लक्षण आहे. व्यक्तीचे उत्पादनाच्या साधनांशी जसे संबंध असतील त्यावरु त्याचा वर्ग निश्चित केला जातो. व्यक्तीचे कार्य नव्हे तर उत्पादनाच्या साधनाचाही संबंधीचे त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान हे समाजतल्या व्यक्तीचा दर्जा निश्चित करतात. उदा. जर तो उत्पादनाच्या साधनांचा मालक असेल तर तो मध्यमवर्गीय म्हणजे वरच्या दर्जाचा आणि जर तो मालक नसेल तर तो नुसता काम करणारा कामगार  श्रमजीवी वर्गाचा असेल. एक वर्ग म्हणजे उत्पादन संस्थेत व्यक्तीचा एक गट एक सारखेच कार्य करत असतो तो एक गट होतो. एक दुसऱ्या व्याख्येप्रमाणे व्यक्तीचा एक गट जो व्यवसाय, वेतन, सत्ता, दर्जा आणि उत्पादनाशी संबंध या संबधी त्यांची लक्षणे आणि गुण एकसारखेच असतात. संपत्ती लोकांना निरनिराळ्या गटात विभागते. विकसित होत जाणारी स्व-जाणीव आणि आर्थिक मोबदल्याचे विभाजन हे वर्गविभाजन वर्गाच्या भिंती जास्त बळकट करते. काम हे माणसाच्या स्व-जाणीवेचे मूळ रुप आहे. विशिष्ट ऐतिहासिक युगात त्या काळातील आर्थिक परिस्थिती आपली सामाजिक, राजकीय आणि न्यायव्यवस्था निश्चित करते आणि उत्क्रांतीची आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया चालू ठेवते.

३) **आर्थिक हेतूमुलकता** - मार्क्सने आर्थिक स्थितीला जास्त महत्त्व दिले आहे. मार्क्ससाठी आर्थिक स्थिती समाजाचे इतर विभाग निश्चित करते. उदा. राजकीय, सामाजिक कायदेविषयक आणि सांस्कृतिक विभाग. शेती व्यवसायाची पद्धती राजकीय व्यवस्था सामाजिक दर्जा, न्यायव्यवस्था आणि करमणुकीच्या पद्धती निश्चित करत असते. याचे उदाहरण म्हणजे नृत्य किंवा धार्मिक उत्सव पिकाच्या मोसमाभोवती गुंफलेले असतात. मात्र औद्योगिक पद्धतीने जिथे  उत्पादन होते. तिथे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय पद्धती वेगळ्या असतात. लोक जास्त फिरतात.त्यांच्या सणांचे प्रकार बदलतात. या व्यवस्थेतील लोक त्यांच्या राजकीय व्यवस्थेबद्दल आणि सार्वजनिक माध्यमांप्रती जास्त जागरुक होतात.

मार्क्सच्या मते उत्पादनांच्या साधनांवर आणि वितरणावर काही लोकांची मक्तेदारी असते. अशा प्रकारे ते व्यापार यंत्रणेवर नियंत्रण ठेवतात.हे आर्थिक दृष्ट्या प्रबळ असलेले लोक राजकीय आणि आदर्शवादाच्या कार्यक्षेत्रावर नियंत्रण ठेवतात. ज्या लोकांची उत्पादनांच्या साधनांवर मालकी नसते त्यांच्यावरही ते नियंत्रण ठेवतात. आणि त्यांच्या बाबतीतले निर्णयही तेच घेतात. मार्क्सच्या मतानुसार हा मध्यमवर्ग म्हणजे भांडवलदार आहेत. त्यांची सगळ्यावर मालकी असते आणि श्रमजीवी वर्गाची कशावरही मालकी नसते. हा जो बूर्ज्वा म्हणजे मध्यमवर्ग असतो तो आपल्या आर्थिक शक्तीचे रुपांतर राजकीय शक्तीत करतो आणि प्रशासनावर म्हणजे न्यायालयांवर पोलिसांवर आणि सैन्यावरही नियंत्रण ठेवतो. अशाप्रकारे प्रशासनातले सुस्थापित उत्तम लोकही भांडवलदारांचे हित सांभाळतात.

**४) वर्गाचे धुव्रीकरण** - भांडवलशाहीत उग्र ध्रुवीकरण होण्याची प्रवृत्ती असते. संपूर्ण समाज दोन मोठ्या गटात विभागला जातो. या दोन्ही गटात शत्रुत्व असते. मध्यमवर्ग आणि श्रमजीवी वर्ग असे विरोधी गट तयार होतात. उत्पादनाच्या साधनावर मालकी असलेला आणि वितरणावरही मालकी असलेला भांडवशहा आणि कशावरही मालकी नसलेला फक्त कष्ट विकणारा कामगार असे दोन वर्ग तयार होतात. एका गटात असणाऱ्या लोकांत एकीची भावना वाढत जाते. ते सगळे सारखाच विचार करतात. त्यांची भावना एकसारखीच असते आणि त्यांची कृतीही सारखीच असते. ते आपल्या हितसंबंधांना जपत असतात. त्यांचे जीवनमान आणि खर्च करण्याची पद्धतही सारखी असते. अशाप्रकारे त्यांची वर्गजाणीव दृढ होत जाते. एक गट आपली परिस्थिती आनंदाने उपभोगतो तर दुसऱ्या गटाला कामाच्या ठिकाणी सारख्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. श्रमजीवी वर्गाला सारखे असे वाटत असते की त्यांची मध्यम वर्गाकडून पिळवणूक होते आहे. याचे कारण हे की मध्यमवर्गाला नफा कमवायचा असतो तो नफा त्यांना कामगाराचा पगार कापून किंवा त्यांचे फायदे कमी करुनच मिळू शकतो. त्यामुळे कामगारांच्या मनात त्यांच्याबद्दलची द्वेषभावना वाढते. मार्क्सच्या मते फक्त दोन वर्ग आहेत आणि समाजातला प्रत्येक सदस्य या ना त्या गटात असतो.

**५) अधिकांश (आर्थिक) मूल्यांचा सिद्धांत** - भांडवलदार कामगारांचे शोषण करुन नफा कमवतात आणि साठवतात. कुठलीही वस्तू तयार करण्याला जितके श्रम लागतात त्यावरुनच त्याचे मूल्य ठरवले जाते. कामगाराला एक वस्तू किंवा एक मूल्य तयार करायला जेवढा वेळ आणि जेवढे श्रम लागतात, त्याच प्रमाणात तितकंच मूल्य त्याला वेतनाच्या स्वरुपात मिळते. पण तो जितका वेळ काम करतो त्याच्यापेक्षआ ते मूल्य कमी मिळते. असे समजा की एका कामगाराला एक वस्तू तयार करण्यास पाच तास लागतात. त्याचे त्याला तेवढेच मूल्य मिळते पण प्रत्यक्षात मात्र त्याच्याकडून आठ तास काम करुन घेतले जाते. अशा प्रकारे कामगार अर्धावेळ स्वतः साठी आणि अर्धावेळ मालकासाठी काम करतो. मूल्याचे परिमाण म्हणजे कामगाराकडून उत्पादित वस्तूच्या निर्माणाला जेवढा वेळ लागेल त्यापेक्षा जास्त वेळ आणि त्या जास्त वेळेचे वेतन न मिळणे, फक्त जेवढा वेळ लागेल तेवढेच मूल्य देणे म्हणजेच जास्ती वेळेचे मूल्य न चुकविणे याला अधिकांश मूल्य अशी संज्ञा वापरली जाते. ५ तासाच्या कामासाठी ८ तास घेतले तर त्या तीन तासाचे मूल्य म्हणजे अधिकांश मूल्य नियोक्ता उत्पादनाच्या साधनांचा मालक असल्यामुळे ते कामगारांना जास्त काम करण्याची जबरदस्ती करु शकतात आणि या जास्तीच्या शोषणाने जास्ती नफा कमावू शकतात. अशा प्रकारे नियोक्ताच्या नफ्यासाठी कामगारांना जास्त काम करण्यास भाग पाडले जाते.

**६) दरिद्रीकरण** - श्रमजीवी वर्गाची गरीबी श्रमाच्या पिळवणूकीबरोबर वाढत जाते. एक भांडवलदार अनेकांना गरीब करतो. मध्यमवर्गाची किंवा भांडवलदाराची संपत्ती जास्त नफ्यामुळे वाढत जाते आणि त्याचबरोबर श्रमजीवी वर्गाची गरीबी, दबाव, गुलामगिरी आणि पिळवणूकही वाढत जाते. कुठल्याही उत्पादनाच्या प्रकारात ज्यात माणसाचे माणसाकडून शोषण केले जाते तिथे निर्माण झालेल्या संपत्तीचे अशाप्रकारे वितरण केले जाते की बहुजन समाजाला किंवा कामगारवर्गाला त्यांच्या मुलभूत गरजा पुरवण्याइतकाही पैसा मिळत नाही. उलट जास्तीत जास्त काम करण्याची शिक्षा फर्मावली जाते. त्याच्या बदल्यात अल्पसंख्य मालक मात्र चैनीचा आणि करमणूकीचा उपभोग आनंदाने घेत जातात. समाज गरीब आणि श्रीमंत असा विभागला जातो. अशाप्रकारे गरीबी हा अभावाचा परिणाम नाही तर शोषणाचा परिणाम आहे. मार्क्सला पक्का विश्वास वाटते की कामगारांचा बळी घेऊन नफा कमावण्याची ही जी वृत्ती आहे ती कामगारांना गरीब करते, गरीबी वाढवत राहते.

**७. अलगीकरण** - भांडवलशाही पद्धत कामगारांमध्ये अलगीकरण निर्माण करते असे

कार्लमार्क्स आग्रहाचे प्रतिपादन करतो. तो म्हणतो कामगारांना अमानवी स्थितीत काम करावे लागते. उत्पादनाच्या दुसऱ्या भागाशी म्हणजे नफा वगैरेशी त्याचा काही संबंध नसतो. त्याला कसलेही अधिकार नसतात. तो ज्या उपकरणांनी काम करतो त्याच्यावरही त्याचा अधिकार नसतो. त्यांना प्रगती करण्याचे स्वातंत्र्यही नसते. त्यांना नफ्यातही वाटा नसतो म्हणून कामाची मुख्य प्रेरणा हरवून जाते. आपल्याला वेगळ केल्याची, अलग केल्याची भावना निर्माण होते. त्याला कामाबद्दल आत्मीयता राहत नाही. कामगारांना असे वाटायला लागते की ते जो काम करतो ते त्याचे नाही. लोकांनी ते त्याच्यावर थोपविलेले आहे. कामच आपले नाही म्हणाल्यावर तो स्वत:पासून दूर जायला लागतो. त्याचे स्वत्व त्याला अनोळखी वाटायला गालते. कारण ते जे काम करतात त्याला काहीच अर्थ नाही असे त्याला  वाटू लागते.

८) **वर्ग ऐक्य आणि विरोध :** वर्गजाणीव वाढायला लागल्यावर दोन गटांमधल्या सामाजिक संबंधांचे स्फटिकीकरण व्हायला लागते. म्हणजे ते संबंध घट्ट आणि स्थिर होत जातात. वर्गांची अंतर्रचना जास्त एकाजिनसी होते. वर्ग संघर्ष जास्त तीव्र आणि हिंसक होतो. कामगार एकमेकांच्या जास्त जवळ येतात आणि त्यांची शक्ती जास्त विकसित होते. दुसऱ्या वर्गाशी वागताना ते जास्त आक्रमक होतात आणि द्वेषपूर्ण व्यवहार करू लागतात. दुसऱ्या गटाबरोबर एकत्र यायला त्यांना आवडेनासे होते कारण या दुसऱ्या वर्णाने आपले शोषण केले याची त्यांना खात्री वाटते.

९) **क्रांती :** हे वर्गयुद्ध किंवा हा वर्गसंघर्ष टोकाला पोचतो तेव्हा हिंसक क्रांती होते.आर्थिक आणिबाणीच्या प्रसंगी, जेव्हा भांडवलशाहीची लक्षणे  म्हणजे तेजी किंवा मंदी येते तेव्हा क्रांती होण्याची शक्यता असते. हिंसक क्रांतीमुळे भांडवलशाहीची रचना उध्वस्त होते. मार्क्सच्या मते जेव्हा कामगार पुरेशा प्रमाणात एकत्र येतात तेव्हा उत्पादनाची साधने आपल्या हाती घेऊ शकतात. मग मध्यमवर्गाला त्याच्या स्थानापासून दूर करू शकतात. अर्थात् या सगळ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत हिंसक रक्तपात होऊ शकतो. पण निदान शेवटी एकच श्रमजीवी वर्ग उरतो. मध्यम वर्ग नाहिसा होतो. मग श्रमजीवी वर्ग राज्य करु शकेल असा मार्क्सला विश्वास वाटतो.

१०) **श्रमजीवी वर्गाची हुकमशाही :** अशा प्रकारच्या क्रांतीनंतर भांडवलशाही संपते आणि श्रमजीवी वर्ग वाढतो. आणि त्यांना उत्पादनाच्या साधनांची मालकी मिळते. मग समाजाच्या आर्थिक व्यवस्थेवर ते राज्य करु शकतात.

११) **समाजवादी रचनेचे उद्घाटन :** खाजगी मालमत्तेचा नाश झाल्यावर वर्ग व्यवस्था नाहीशी झाली त्यामुळे वर्ग संघर्ष ही संपला. सगळ्या सदस्यांनी एकत्रितपणे संपत्तीचा ताबा घेतला आणि होणारा नफा सगळ्यात समान वाटला.

## ३.५ मार्क्सच्या सिद्धांताची समीक्षा

१) उत्पादनाच्या प्रबळ शक्तीमधल्या तंत्रज्ञानात्मक सुधारणांना स्वीकारण्यात भांडवलशाहीला अपयश येईल त्यामुळे श्रमजीवी वर्गाची क्रांती होईल या सिद्धांताचे मार्क्सने समर्थन केले. पण हे असे होणार नव्हते. औद्योगिक दृष्ट्या सुधारलेल्या समाजाची भरभराट होत आहे. तिथे क्रांती झाली नाही. रशिया आणि चायना या देशात समाजवादी क्रांती झाली तेव्हा ते औद्योगिकदृष्ट्या समृद्ध नव्हते. उलट खरे तर ही दोन्ही राष्ट्रे त्यावेळी शेतीव्यवसाय प्रधान होती.

२) भांडवलशाहीत कामगार चळवळीचा फार मोठ्या प्रमाणात विकास होईल असे भविष्य

मार्क्सने पाहिले नव्हते. कामगारांमध्ये वेतनासाठी सततची स्पर्धा राहिल आणि त्यामुळे कामगार असमाधानी राहतील हा त्याचा सिद्धांत पूर्णत्वाला येऊ शकला नाही.

३) औद्योगिक भांडवलशाही समाजात दारिद्र्य वाढत जाईल असे मार्क्सने म्हटले होते. पण त्या उलट या भांडवलशाही देशात पैशाची आणि प्रगतीची जलद वाढ झाली हे पाण पाहतो आहोत. तिथे आपल्याला गरीब दिसत नाही.

४) स्वयंचलित उत्पादनाकडे सगळे ओढले जातील आणि काही थोड्या मोठ्या संस्थांच्या हातात भांडवलशाही नियंत्रण एकवटले जाईल अशा प्रकारची मार्क्सची भविष्यवाणी खरी झालेली दिसते.

५) मार्क्ससाठी भांडवलदार आणि श्रमजीवी वर्ग असे दोन टोकाचे वर्ग होते. या दोन मधे वेगळ्या मध्यमवर्गाचा उदय होईल असे मार्क्सला वाटले नव्हते. हा त्याचा सिद्धांत खोटा ठरला.

६) सर्वसामान्य कामगारामधील अलगीकरणाची सीमा याबद्दलची मार्क्सची समजूत चुकीची ठरली. त्याच्या काळातल्या कामगारात अलगीकरणाची आणि नैराश्याची परिसीमा ही काही प्रतिनिधिक स्वरुपाची नव्हती. आजचे भांडवलशाहीतले कामगार निरनिराळ्या अर्थपूर्ण अश्या धार्मिक, जातीय, व्यावसायिक व स्थानिक गटांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करतात. हे असे म्हणणे म्हणजे अलगीकरण नाकारण्यासाठी नाही तर हे दाखवून देण्यासाठी आहे की अलगीकरणाची भावना फक्त शोषणातूनच येते असे नाही तर नोकरशाहीची रचना आणि बहुजन समाजातून निर्माण होते.

७) मार्क्सने राजकीय सत्तेच्या आर्थिकपायावर जास्त जोर दिला आणि इतर महत्त्वाच्या सत्तास्त्रोताकडे दुर्लक्ष केले.

८) वर्गहीन आणि प्रतिष्ठाहीन समाज ही मार्क्सची आदर्श अशी एक कल्पनाच होती. कारण कुठलाही समाज अधिकार रचना आणि नियमबद्ध यंत्रणेशिवाय राहू शकत नाही. सत्ताधारी आणि सत्ताहीत यांच्यामदील संबंध कायम स्फटिकीकरणाकडे ओढले जातात कारण त्यांच्यात मूळातूनच आंतरिक अशा आंतरविरोझातच्या आणि संघर्षाच्या शक्यता बसलेल्या असतात.

९) मार्क्सची भांडवलशाहीचे पतन होईल ही भविष्यवाणी खरी ठरली नाही. त्याच्या उलट समाजवाद हा शेतीव्यवसायात प्रामुख्याने प्रचलित झाला आणि भांडवलशाहीत विनाशक अश्या वर्गयुद्धाची चिन्हे दिसली नाहीत.

१०) वर्गसंघर्ष हा मूलतः क्रांतीकारी लक्षणाचा आहे आणि रचनात्मक बदल हे नेहमीच हिंसक उत्क्रांतीचे फळ आहे.असा मार्क्सचा सिद्धांत होता पण आजची भांडवलशाही या त्याच्या सिद्धांताचे समर्थन करत नाही. उलट संघटित कामगारांनी सत्तेचा समतोल साधला आहे आणि हिंसक क्रांतीशिवाय गंभीर आणि कळकळीचे रचनात्मक बदल घडवून आणले आहेत.

११) आधुनिक भांडवलशाहीचे निराळे असे प्रमुख लक्षण म्हणजे समाधानी आणि रुढीमार्गवादी मध्यमवर्गाचा उदय होय जो वर्ग व्यवस्थापकीय, व्यावसायिक, पर्यवेक्षकीय आणि औद्योगिक पदावर काम करत आहे.

१२) मार्क्सने भविष्य वर्तवल्याप्रमाणे श्रमजीवी वर्गाच्या वाढत्या पिळवणूकीमुळे बहुजनसमाज गरीब झाला नाही.

अधिकांश श्रमांचे मूल्य हेच नफा मिळवण्याचे मुख्य कारण किंवा पाया असेल तर शोषण आणि नफा संचयाला पूर्ण दूर करता येणार नाही. खरे तर भांडवलशाही देशापेक्षा समाजवादी देशात नफा संचय जास्त होतो.

## ३.६ सारांश

मार्क्सचा वर्गसिद्धान्त म्हणजे स्तरांच्या रचनेचा सिद्धान्त नाही, तर हा एक सर्वसमावेशक असा सिद्धांत आहे, हा समाजपरिवर्तनाचा सिद्धांत आहे. सगळ्या समाजात होणाऱ्या परिवर्तनाच्या स्पष्टीकरणाचे ते एक साधन आहे. समाजवादाचे मुख्य अभ्यासक टी.बी. बीट्टोमोर म्हणतात की समाजशास्त्रीय विश्लेषणाला मार्क्सचा हा सिद्धांत म्हणजे फार मोठे योगदान आहे.

मार्क्सचा संघर्षाचा सिद्धांत सध्या पुनर्जीवित झाला आहे. गेल्या वीस तीस वर्षात समाजशास्त्रावर आणि मानववंशशास्त्रावर प्रभाव टाकणाऱ्या कार्यक्षमतेच्या सिद्धांताला मार्क्सचा सिद्धांत तीव्र विरोध करतो. कार्यक्षमतेचा सिद्धांत सामाजिक सुसंवादावर भर देतो तर मार्क्सवाद सामाजिक संघर्षावर जोर देतो. कार्यक्षम सिद्धांत सामाजिक प्रकारामध्ये स्थैर्य आणि सातत्याला महत्त्व देतो तर मार्क्सवादाचा दृष्टीकोण उग्र ऐतिहासिक असल्यामुळे तो समाजाच्या बदलत्या अवस्थांवर भर देतो. कार्यक्षम सिद्धांत सामाजिक जीवनाला मूल्य आणि मानंदडानी नियंत्रित करण्यावर लक्ष केंद्रित करतो तर मार्क्सवाद, प्रत्येक समाजातल्या हित आणि मूल्यांमध्ये भेद असतो काही वेळा साठी दिलेल्या समाज पद्धतीप्रमाणे सक्तीची भूमिका चालू राहील यावर भर देतो.

१९५० मध्ये डेरेन्हडर्फ याने प्रभावीपणे सांगितले होते त्याप्रमाणे समतोल समाज आणि संघर्षयुक्त समाज यातला विरोध सर्वसाधारण होऊ शकला नाही, सामान्य होऊ शकला नाही.

मार्क्सचा जो वाद होता कि मानवाचे आदर्शवादी आणि इतर विचार एका विशिष्ट वेळेत आणि एका विशिष्ट जागेत आहेत ते समाजाच्या रचनेवर आणि निर्मितीवर अवलंबून असतात. या मार्क्सच्या सिद्धांतामुळे ज्ञानाचं समाजशास्त्र एक अभ्यासाचे क्षेत्र म्हणून विकास पावले.

**अलगीकरणाचे विश्लेषण** - मार्क्सने पाहिले की हे आर्थिक अलगीकरण हे म्हणजे सर्वसाधारण अलगीकरणाचे स्त्रोत आहे. हे अलगीकरण म्हणजे व्यक्तीचे समाजापासून आणि त्याहून जास्त व्यक्तीचे स्वतःपासून वेगळे होणे होय. ही अलगीकरणाची संकल्पना समकालीन बुद्धिवादी लेखकानी आणि नवमार्क्सवादी लेखकांनी मोठ्या प्रमाणात विकसित केली आहे.

मार्क्सने आर्थिक रचनेचे महत्त्व ओळखले.. जरी त्याने त्यावर वाजवीपेक्षा जास्त भर दिला असला तरी आजपर्यंत समाज शास्त्राच्या अभ्यासात ज्या आर्थिक रचनेकडे दुर्लक्ष झाले होते त्यावर त्याने आपले लक्ष केंद्रित केले.

कार्ल मार्क्सवर जरी खूप टीका झाली असली तरी त्याने अनेक सामाजिक विचारांना प्रवाहित केले.

## ३.७ स्वाध्यायासाठी प्रश्न

१) मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिद्धांताचे टीकात्मक मूल्यांकन करा.

२) मार्क्सच्या वर्ग-कलहाच्या सिद्धांताची सविस्तर चर्चा करा.

## ३.८ संदर्भ


१) ॲब्राहिम फॅन्सिस, १९८२, माडर्न सोशियालाजिकल थॉट, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) ॲब्राहिम फॅन्सिस, १९९१, सोशियालॉजिकल थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) ॲडम्स. बी. एन. ॲड सैदी आर.एक., २००१. सोशियालॉजिकल थिअरी, न्यू डेली, विस्तार.

४) ॲरोन रेमंड, १९६५, मेन करटस् इन सोशियालोजिकल थॉट । & ॥ ग्रेट ब्रिटन, वेडनफेल्ड ने निकोलसन.

५) फ्लेचर रोनोल्ड, २०००, द मेकिंग ऑफ सोशियालॉजी अ स्टडी ऑफ सोशियालॉजिकल थिअरी बिगीनिंग ॲंड फौंडेशन, न्यू डेली, रावत पब्लीकेशन्स.

६) कोसर लेविस २००० मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट (2nd ed) हरकोर्ट ब्रास जोवानोविच, ईक.

७) रिटझर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थिअरी (दुसरे प्रकाशन) न्यूयॉर्क, मॅक्ग्रा हील प्रकाशन

८) रिट्झर जॉर्ज, १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी (चौथे प्रकाशन) न्यू यॉर्क, मॅक्ग्रा हिल पब्लिकेशन.


♦ ♦ ♦

# ४

# मार्क्सचा अलगीकरणाचा सिद्धांत

**प्रकरणाची रचना**

४.० उद्देश

४.१ प्रस्तावना

४.२ अलगीकरणाचा सिद्धांत

४.३ अलगीकरणाची मुख्य कारणे

४.४ सारांश

४.५ प्रश्न

४.६ संदर्भ

## ४.० उद्देश

- अलगीकरणाच्या सिद्धांताची तपासणी
- अलगीकरणाच्या मुख्य कारणांचा अभ्यास
- भांडवलशाहीत मार्क्सच्या अलगीकरणाच्या सिद्धांताचे विश्लेषण अभ्यास

## ४.१ प्रस्तावना

पॅकेट ऑक्सफर्ड शब्दकोशात अलगीकरणाचा ज्याला परात्मता असाही शब्द वापरला आहे. अर्थ संबंध तोडणे, अनोळखी असा दिला आहे. मार्क्सच्या पहिल्या लिखाणात अलगीकरण ही मुख्य संकल्पना होती. मार्क्सच्या मते सरकारमधील माणसाची कृती, संपत्ती आणि संस्कृती ही त्याच्या स्वत:साठी परकी बनते तो त्याच्यावर राज्य करण्यापेक्षा हा परकेपणा त्याच्यावर राज्य करु लागतो. अशाप्रकारे त्याचे विभाजन होते. त्यामुळे त्याला कधीच घरच्यासारखा मोकळेपणा वाटत नाही. आणि समाजामध्ये एक पूर्ण व्यक्ती म्हणून तो वावरु शकत नाही.

मार्क्सने अलगीकरणा सिद्धांत हेगलकडून घेतला. बेगलने हे अलगीकरण मालमत्ता आणि राज्यसत्तेच्या संदर्भात पाहिले. तश्या सगळ्याच वस्तू माणसाच्या नैसर्गिक स्वभावाला अनोळखी असतात. पण हेगलने अलगीकरणाचा वापर फक्त विचारांच्या पातळीवर केला.

मार्क्सच्या मतानुसार अलगीकरण हे जीवनाच्या भौतिक परिस्थितीतून निर्माण होते. आर्थिक राजकीय धार्मिक संस्था अलगीकरणाची परिस्थिती निर्माण करतात. मार्क्ससाठी धार्मिक आणि आर्थिक कृती अलगीकरणाची स्थिती निर्माण करतात. मार्क्सचा मुख्य रोख भांडवलशाहीतल्या आर्थिक अलगीकरणावर होता कारण मानवी जीवनाच्या प्रत्येक बाजूवर त्याचा परिणाम होतो.

## ४.२ अलगीकरणाचा सिद्धांत

मार्क्ससाठी काम वस्तूचे उत्पादन आणि सेवा करणे हीच माणसाच्या आनंदाची आणि परिपूर्तीची गुरुकिल्ली आहे. काम हे सगळ्यात महत्त्वाचे आहे. ही माणसाची प्राथमिक कृती आहे. काम माणसाच्या विकासाच्या संभावना पूर्ण करते किंवा त्याचा स्वभाव बिघडवते आणि इतरांशी असलेले त्यांचे संबंधही बिघडवते. अलगीकरणाचा साधा अर्थ म्हणजे माणूस त्यांच्या कामापासून म्हणजे तयार झालेल्या उत्पादनापासून म्हणजेच त्याच्या श्रमापासून तो दूर होतो किंवा वेगळा होतो. मार्क्सच्या पहिल्या लिखाणातून त्याने श्रमाच्या अलगीकरणाची कल्पना विकसित केली. श्रमापासून ती दूर झाल्यामुळे श्रमापासून मिळणारे समाधान किंवा परिपूर्णता त्याला मिळत नाही. कामातून आपला खरा स्वभाव व्यक्त करणे त्याला जमत नाही कारण तिथे तो स्वतःलाच स्वतः अनोळखी बनतो म्हणजे त्याचा आत्मा त्याला अनोळखी वाटतो. कारण काम ही एक सामाजिक कृती असल्यामुळे कामापासून अलग होतो आणि इतरांपासून अलग होतो. व्यक्ती त्यांच्या सहकाऱ्यापासून तुटली जाते.

मार्क्सचा विश्वास होता की काम हे त्याच्या मूलभूत गरजा, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि माणूसकी जपण्यासाठी आवश्यक ती साधने पुरवते. आपले व्यक्तित्व आपल्या कामातून व्यक्त झाले तर त्याला गहिरे समाधान मिळते. त्याचे उत्पादन लोकांनी वापरल्यामुळे आणि ते उत्पादन त्यांना आवडल्यामुळे तो त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा अधिक प्रयत्न करतो. इतरांबद्दल त्याला वाटणारी काळजी आणि माणुसकी तो व्यक्त करतो. एका समदायात जिथे प्रत्येक जण स्वतःसाठी आणि त्याचबरोबर इतरांसाठी ही काम करतो तेव्हा ते काम त्याला समाधान आणि पूर्णता देणारे असते . पण मार्क्ससाठी माणसाचा त्याच्या कामाशी असलेले संबंध मानवी आत्म्यासाठी आणि मानवी संबंधासाठी विनाशकारी असतात.

मार्क्ससाठी श्रमामुळे निर्माण झालेलं एक वस्तू झाली. दुसऱ्या वस्तूच्या बदलीत वापरला जाणारा एक जिन्नस असे त्याला रुप आले. अदलाबदलीचे साधन म्हणून जेव्हापासून पैशाचा उपयोग सुरू झाला तेव्हापासून सगळीच उत्पादने खरेदीविक्रीचे एक वस्तू बनली त्यातूनच अलगीकरणाचा जन्म झाला. ही व्यक्तीच्या आणि समुदायाच्या गरजा पूर्ण करणारी उत्पादने न राहता बाजारात विकली जाणारी एक वस्तू झाली. ती उत्पादने आता स्वतःच एक उद्दिष्ट न राहता उद्दिष्ट पूर्तीची साधने झाली. ही उत्पादने म्हणजे आपले अस्तित्व टिकवण्यासाठी आणि सेवा मिळवणाऱ्या वस्तू झाल्या. ही उत्पादने म्हणजे निर्माण करणाऱ्या माणसाचा एक भाग झाली नाहीत अशाप्रकारे ते उत्पादन म्हणजे एक वस्तू झाले. अशा प्रकारे ती वस्तू परकी झाली.

हे जे अलगीकरण आहे ते वस्तूची पैशाच्या बदल्यात अदलाबदली करण्याची बाजारातली पद्धत आहे. त्यामुळे निर्माण झाले आहे. यातूनच खाजगी मालमत्तेची कल्पना उदयाला आली. उत्पादनाच्या प्रभावी शक्तीच्या वैयक्तिक मालकीची कल्पना पुढे आली आणि ती राबवायलाही सुरुवात झाली. मार्क्स असा तर्क प्रस्तु करतो की जरी खाजगी मालमत्तेमुळे परकेपणा किंवा अलगीकरण आले तरी ती नंतरची गोष्ट आहे. कारण एकदा का श्रमाच्या उत्पादनाला वस्तू समजायला सुरुवात झाली की खाजगी मालमत्तेची कल्पना काही दूर नसते. भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेत उत्पादनाच्या प्रभावी शक्तीची मालकी काही अल्पसंख्य लोकांच्या हाती राहते. कामगारांनी निर्माण केलेल्या वस्तूचे ते कधीच मालक नसतात. याच सत्यातून अलगीकरण वाढत जाते.

कामगार त्यांच्या श्रमाच्या उत्पादनापासून दूर राहतो किंवा त्याचे अलगीकरण होते या कल्पनेचे अनेक परिणाम दिसून येतात.

१) कामगार हा उत्पादन क्रियेपासून वेगळा झाल्यामुळे आणि काम हे माणसाची प्राथमिक कार्यशीलता असल्यामुळे तो स्वतः पासूनच वेगळा झाला.

२) जेव्हा कामगार आपल्या स्वत्त्वापासून अलग होतो आणि कामात परिपूर्णता अनुभवत नाही आणि स्वत्त्वालाच नाकारतो तेव्हा आपल्या कल्याणाच्या ऐवजी दुःखाची भावना अनुभवतो. त्याच्या शारारिक आणि बौद्धिक उर्जेचा योग्य तो विकास होत नाही उलट तो शरीराने थकतो आणि बौद्धिक दृष्ट्या कमकुवत होतो.

३) म्हणून जेव्हा तो काम करत नसतो तेव्हा तो स्वस्थ असतो, त्याला बरे वाटते. पण जेव्हा तो काम करतो तेव्हा तो अस्वस्थ होतो.

४) माणसांच्या गरजांचे, समाधानाचे आणि पुर्णत्वाचे उद्दिष्ट असे जे कामाचे स्वरुप होते ते आता तसे राहिले नाही. कामगारासाठी काम म्हणजे फक्त उपजीविकेचे साधन झाले आणि शेवटी काम कंटाळवाणे झाले. रोजच्या दैनंदिनीचा तो एक कंटाळवाणा भाग झाला. काम हे पूर्णत्वाची भावना निर्माण करणारे राहिले नाही.

५) उत्पादनापासून अलग झाल्यामुळे, कृतीपासून वेगळा झाल्यामुळे त्याच्या स्वतःपासूनही तो दूर झाल्यामुळे तो त्याच्या सहकाऱ्यापासूनही दूर झाला आणि त्यांच्या प्रश्नात रस घेईनासा झाला. आता तो फक्त स्वतःसाठी आणि स्वतःच्या कुटुंबासाठी काम करु लागला.

## ४.३ अलगीकरणाची मुख्य कारणे-

आंतररचना - मार्क्सने आर्थिक व्यवस्थेवर जास्त भर दिला आहे. आर्थिक व्यवस्था ही समाजाच्या आंतररचनेचा मुख्य पाया आहे आणि हीच गोष्ट सामाजिक जीवनाच्या इतर पैलूनाही आकार देते. मार्क्सच्या दृष्टीने आंतररचना ही दोन भागात विभागली जाते. ते दोन भाग म्हणजे उत्पादनाच्या प्रबळ शक्ती आणि उत्पादनाशी असलेले संबंध मार्क्सच्या मतानुसार या दोन्ही मधले संबंध बदलू शकतात म्हणजे जे वस्तू तयार करण्याच्या साधनांचे (यंत्र, जमीन वगैरे ) मालक असतात आणि जे नुसते वस्तू बनवत असतात.या दोघांमधले संबंध बदलू शकतात. सरंजाम शाहीत शेती अर्थ व्यवस्था ही उत्पादनाची मुख्य शक्ती होती. भूमीधारक आणि भूमीहीन असे दोन गट होते. भांडवलशाहीत कच्चा माल आणि निर्मीतीसाठी उपयोगात येणारी यंत्रे ही दोन महत्त्वाची उत्पादनाची साधने होती. ज्यांच्या हातात भांडवल होते आणि ज्यांच्या हातात भांडवल नव्हते यांच्यात संबंधांची स्थापना झाली. भांडवलदारांच्या मालकीची होती. उत्पादनाची तर कामगारांकडे फक्त श्रम त्यांच्या मालकीचे होते आणि ते श्रम कामगार वेतन घेऊन किंवा भाड्याने भांडवलदारांना विकत होते.

मार्क्सचा दावा आहे की भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेत एक अल्पसंख्य गर उत्पादनाच्या प्रभावी शक्तीचा मालक असतो. कामगार जो वस्तू निर्माण करतो त्या वस्तूवर ना त्याची मालकी असते ना त्याचे काही नियंत्रण असते. त्याच्या श्रमाचे मोल पैशात केले जाते. जशी कच्च्या मालाची आणि यंत्राची किंमत ठरवली जाते. तशीच त्याच्या श्रमाचीही किंमत ठरवली जाते. तो जी वस्तू निर्माण करतो त्याची किंमत बाजारातल्या मागणी तसा पुरवठा या कायद्याप्रमाणे ठरवली जाते तसेच त्यांच्या श्रमाच्याही किंमती ठरवल्या जातात. म्हणूनच आर्थिक मंदी असते तेव्हा खूप कामगारांची नोकरी जाते किंवा त्यांना कमी वेतन दिले जाते. फक्त श्रमच संपत्ती निर्माण करु शकतात पण त्यांना फक्त काही पैसेच वेतन म्हणून मिळते. जी संपत्ती ते निर्माण करतात त्यातला थोडाच भाग

त्यांना मिळतो. बाकीची सगळी संपत्ती भांडवलदारांच्या खिशात जाते. हे कामगारांचे शोषण आहे. भांडवलदारांच्या जास्तीत जास्त नफ्याच्या हव्यासापोटी कामगारांचे शोषण होते. भांडवलशाही ही स्वहितावर आधारित आहे. कामगार आणि भांडवलदार स्वतःच्या फायद्यासाठी काम करत असतात.

मार्क्सने अलगीकरणाची पाच लक्षणे सांगितली आहेत. सत्ताहिनता, अलगीकरणाची भावना, अर्थदीनता आदर्शहीनता आणि स्वत्त्वापासून असलेला परकेपणा.

**१) सत्ताहीनता:**

भांडवलशाहीच्या उत्पादन व्यवस्थेत पूर्वीच्या व्यवस्थेत जे मालक होते ते आता कामगार झाले. काही मौलिक असे बनविण्याची त्याना परवानगी नव्हती. त्यांच्या सृजनशीलतेने काही तयार करण्याची त्यांना परवानदी नव्हती. कामगारांना असे वाटत होते की ते जे काही उत्पादन करत आहेत ते लोकांसाठी करत आहेत. कामगारांना सविस्तरपणे सूचना दिल्या जातात मग त्यांची स्वतःची कारागिरी किंवा कसब हरवून जाते. कामगाराला असे वाटते की त्याची शक्ती आणि त्याचे स्वातंत्र्य हरवून गेले आहे. जास्त यांत्रिकीकरणाने त्यांची उर्जा आणि त्यांचा ताजेपणा संपून गेला. यंत्रानी जेवढी जागा दिली आहे तेवढ्या जागेतच त्याला त्याचे काम बसवावे लागले. त्याच्या स्वतःच्या कामावर त्याचे नियंत्रण राहिले नाही, त्याचे स्वातंत्र्य हरवून गेले. कामाच्या विशेष प्राविण्याने कामामध्ये तोच तो पणा आला पण कामाचाच कंटाळा आला. त्यामुळे कामगार दुःखी झाले त्याची सत्तेची भावना हरवून बसले, त्यांना सत्ताहीन वाटू लागले. ते ज्या समाजव्यवस्थेत राहात आहेत त्यात राहून ते आपल्या नियतीवर प्रभाव टाकू शकत नाहीत. त्यांना असे वाटू लागले की ते दुसऱ्याच्या दयेवर अवलंबून आहेत आणि त्यांनी काय करावं आणि काय नाही हे दुसरे निश्चित करतात.

**२) अलगीकरणाची भावना:**

टोकाच्या श्रमविभागणीत कामगार निरनिराळ्या शाखांमध्ये विभागले गेले. प्रत्येक शाखा विशेष होती आणि विशेषज्ञ ती चालवत होते. ते एका विशेष गटात काम करत असल्यामुळे दुसऱ्या गटाची किंवा शाखेची त्यांना काहीच माहिती नसायची. कामाच्या यंत्रणेबद्दल त्यांना अधिक माहिती दिली जायची नाही. त्यामुळे त्यांना असे वाटायचे की आपण वेगळे पाडले जात आहोत. कामाचा एकच विभाग ओळखीचा बाकीचे सगळे भाग अनोळखी असायचे म्हणून त्यांना कामाबद्दल आपलेपणाची भावना वाटत नसे, आपलेपणाची भावना कमी होत असे.

**३) अर्थहीनता:**

भांडवलशाही रचनेत उद्योजक श्रम भाड्याने विकत घेतात. तेच सगळ्याचे मालक असतात. उदा. यंत्र, उपकरण, कच्चा माल, इमारती इत्यादि अशा प्रकारे कामगारांनी निर्माण केलेल्या तयार उत्पादनावर त्यांचा संपूर्ण हक्क असतो. ज्या कामगारांनी कठीण श्रम केलेले असतात त्याना वेतनाशिवाय दुसरे काही जास्त मिळत नाही. त्यामुळे श्रम बाहेरचे होतात. म्हणजे त्याच्या स्वतःचे नाहीत म्हणून त्या कामामुळे स्वतःबद्दल खात्री निर्माण न होता तो स्वतःला नाकारत जातो. व तो समाधानी राहात नाही. तो दुःखी होतो. त्याला त्याच्या कामात काही अर्थ आहे असे वाटत नाही. त्या कामाचा त्याला जास्त फायदा होत नाही तेव्हा तो कामाचा उद्देश आणि आनंद हरवून बसतो. त्याला अर्थहीनता भासू लागते. त्यामुळे तो कामाबाहेरचा आहे आणि काम त्याच्या बाहेरचे आहे असे त्याला वाटू लागते. त्याला कळत नाही की तो कशासाठी काम करतो आहे. त्यानेच निर्माण केलेल्या वस्तूवर तो मालकी प्रस्थापित करुन शकत नाही. तो त्या वस्तूपासून आणि वस्तू बनविण्याच्या

प्रक्रियेपासून वेगळा होतो. त्या वस्तूशी आपला काही संबंध आहे असे त्याला वाटत नाही. त्याच्या बाहेरच्या गरजा पुरे करणारे काम हे एक साधन आहे कामगाराला असे वाटू लागते की त्याचे श्रम हे दुसऱ्याच्या उपयोगाला येतात.

कामामधून जीवनाचे लक्ष्य आणि जीवनाचा अर्थ हरवून बसणे याला अर्थहीनता म्हणतात.

**४) आदर्शहीनता:**

जीवनातली अर्थहीनता पुढे जीवनातल्या आदर्श हीनतेकडे किंवा मूल्यहीनतेकडे घेऊन जाते. कामगाराला असे वाटते की समाजाने मानलेले उच्च प्रतीचे आदर्श हे त्याच्यापासून दूर आहेत. तो गोंधळून जातो. त्यांच्या ध्येयप्राप्तीची भावना आणि दिशा तो हरवून बसतो. त्याने स्वीकारावी अशी कुठलीही पद्धती त्याच्यासमोर नसते. त्याची नाकारला गेल्याची भावना बळावते. तो स्वतःला आदर्शहीन समजायला लागतो. त्याला असे वाटू लागते की इतर लोक त्यांची योग्यता जाणून घेत नाहीत. समाजाचे जे आदर्श आहेत त्यावर त्याचा विश्वास राहत नाही, सामाजिकदृष्ट्या जे आदर्श आहेत ते तो मिळवू शकणार नाही आणि त्याहून पुढची पायरी म्हणजे 'काम' हे त्याचे ध्येय आहे याची जाणीव त्याला राहात नाही.

**५) स्वत्त्वाची ओळख नसणे:**

कामगार स्वतःच आपल्या स्वत्वापासून वेगळा होतो. त्याला कामात रस वाटत नाही हे आपलं काम म्हणजे आपलं ध्येय आहे असे त्याला वाटत नाही. हे फक्त आवश्यक अशा गोष्टी मिळवण्यासाठी हे सोसणं आहे. अशी त्याची भावना होते. असे वाटणे म्हणजे आपले व्यक्तिमत्त्व हरवणे होय कारण जे तो मनापासून करु इच्छितो तो ते करु शकत नाही. तो काय करतो याबद्दल त्याच्या मनात गोधळ सुरु होतो. तो स्वतःसाठी स्वतःच अनोळखा होतो. जितका स्वतःचा उपयोग केला जाईल तितका तो स्वतःचा नाही असे त्याला वाटते.

मार्क्सच्या दृष्टीने या अलगीकरणावर उपाय म्हणजे समाजवादी समाजाची रचना या नव्या पद्धतीत उत्पादनाच्या प्रभावी शक्ती या समुदायाच्या मालकीची असतील आणि श्रमाची विशेष विभागणी नष्ट केली जाईल. मार्क्सला असे वाटते की भांडवलशाहीच्या मधेच भांडवलशाहीची मुळे रुजलेली आहेत. अलगीकरणाच्या भावना तीव्र झालेल्या कामगारांची संख्या औद्योगिक क्षेत्रात जास्त झाली तर शोषणाबद्दलची त्यांची जागरुकता वाढेल. त्यांचे हितसंबंध सारखे होतील. आणि एकत्र येऊन कामगार संस्थाना भांडवलदार वर्गाला झुगारुन देणे सोपे होईल.

## ४.४ सारांश

जर्मनीच्या कार्ल मार्क्सने भांडवल शाहीचा तीव्र विरोध केला आणि त्यातल्या उणीवा लोकांच्या नजरेसमोर आणून दिल्या. मुख्यतः कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे आणि कामगार म्हणजे मालकांना नफा मिळवून देणारे एक साधन झाले आहे.

कामगारांची त्यांच्या मूलभूत हक्कापासून डावलले गेल्याची भावना तीव्र होते आणि ते सगळे एकत्र होऊन भांडवलशाहीशी लढा देतात. हा लढा कारखाने हातात घेणे आणि स्वतःच मालक होणे या गोष्टी घडवून आणतो. कार्ल मार्क्सच्या मतानुसार अलगीकरण ही भांडवलशाही उत्पादन पद्धतीतला एक महत्त्वाचा भाग आहे.

## ४.५ प्रश्न

१) अलगीकरणाच्या संकल्पनेची चर्चा करा. ही संकल्पना आणि भांडवलशाहीतल्या कार्यपद्धती याचा संबंध कार्ल मार्क्सने कसा लावला आहे ?

२) ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे काय ? मार्क्सच्या द्वद्वात्मक भौतिकवादाच्या सिद्धांताची सविस्तर चर्चा करा.

३) संघर्ष म्हणजे काय ? मार्क्सच्या वर्गसंघर्षाची, वर्ग कलहाच्या सिद्धांताची सविस्तर चर्चा करा.

## ४.६ संदर्भ


१) ॲब्राहम फ्रॅन्सिस, १९८२, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस

२) ॲब्राहम एफ., १९९१, सोशियालॉजिकल थॉट, मद्रास, मॅकमिलन.

३) ॲडम्स् बी. एन. आणि सायरी आर ए. २००१, सोशियालॉजिकल थियरी, नवी दिल्ली, विस्तार

४) ॲरोन रेमंड, १९६५, मेन करंटस् इन सोशियालॉजिकल थॉट । & ॥ ग्रेटब्रिटन, वेडेनफेल्ड निकोलसन

५) कोसर लेविस, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट (दुसरी आवृत्ती) हरकोर्ट ब्रास, जोवनादिच, इंक.


♦ ♦ ♦

# ५

# इमाईल डरखीम (एमील डरखाईम)
# सामाजिक तथ्ये (Facts)

**प्रकरणाची रचना**

५.० उद्देश
५.१ प्रस्तावना - डरखीमचे जीवन आणि परिस्थिती
५.२ सामाजिक पद्धतींच्या नियमांचा विषय
५.३ सामाजिक तथ्यांची संकल्पना
५.४ सामाजिक तथ्यांची लक्षणे
५.५ सामाजिक तथ्यांचा अभ्यास करण्याचे नियम
५.६ सारांश
५.७ प्रश्न
५.८ संदर्भ

## ५.० उद्देश

- सामाजिक तथ्यांची संकल्पना, त्याची प्रकृती आणि लक्षणे समजून घेणे.
- सामाजिक तथ्यांचा अभ्यास करण्याचे नियम समजून घेणे.

## ५.१ प्रस्तावना - डरखीमचे जीवन आणि परिस्थिती

इमाईल डरखीम यांनी त्यांच्या मुख्य ग्रंथातून समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या एका विशेष क्षेत्राला आकार दिला. एक पक्की अनुभवाधिष्ठित पद्धती प्रस्थापित केली आणि रचनात्मक कार्यवाही पद्धतीचा पाया रचला. आज  ही पद्धती म्हणजे सामाजिक सिद्धांताचे महत्त्वाचे अध्ययन केंद्र आहे. सामाजिक पद्धतीचे नियम हे समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी उपयोगात आणणाऱ्या पद्धतीचे वर्णन करते. सर्व प्रथम डरखीम यांनी या अपूर्व सिद्धांताची व्याख्या केली नंतर पूर्वी प्रसिद्ध अशी स्पष्टीकरणे दिली आणि शेवटी या अपूर्व सिद्धांताचे सामाजिक स्पष्टीकरण दिले.

डरखीम हे पहिले फ्रेंच समाजशास्त्रज्ञ होते की ज्यांनी, एकोणिसाव्या शतकातल्या शेवटच्या पंचवीस वर्षात उदयाला येणाऱ्या नव्या समाजशास्त्राची, खऱ्या अर्थाने वकीली केली. ते जरी फ्रेंच समाजाच्या कार्यकलापात गुंतलेले असले तरी त्यांच्या आयुष्यात त्यांची शैक्षणिक कारकीर्द जास्त महत्त्वाची होती.

फ्रान्सच्या पूर्व भागातल्या लोरेन या प्रांतातल्या एपीनाल या गावी १५ एप्रील १८५८ मध्ये डरखीम यांचा जन्म झाला. ज्यू धर्मगुरुंचा मुलगा असल्यामुळे लहानपणी, घरची परंपरा सांभाळत ते स्वतः

धर्मगुरु झाले. त्यामुळे नियमित अशा शाळेच्या अभ्यासाबरोबर त्यांनी हिब्रू, ओल्ड टेस्टामेंट आणि तालमुडचा अभ्यास केला. तरी पण किशोर वयात मात्र त्यांनी धार्मिक गुंतवणुकीतून स्वत:ची सुटका करुन घेतली पण तरीही धार्मिक अपूर्वतेत त्यांची रुची तशीच राहिली.

१८८२ पासून १८८७ पर्यंत पॅरिसच्या आजूबाजूच्या परिसरातील प्रादेशिक हास्कूलमध्ये ते शिकत होते. जर्मन शैक्षणिक आयुष्याबद्दलचे त्यांचे वृत्तांत पसिद्ध झाल्यावर पुढील शिक्षणासाठी ते जर्मनीलाही गेले. वयाच्या २१ व्या वर्षी समाजशास्त्रातले आणि समाजशास्त्रीय तत्त्वज्ञानातले होतकरु व्यक्ती म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांच्या नावावर अजून काही जाहिर प्रकाशने होती. ज्यात त्यांनी जर्मन समाजशास्त्रज्ञ गुम्लोविचच्या शोधावरची परीक्षणे होती. या सगळ्या उपलब्धी असल्यामुळे त्यांना बारेदो विश्वविद्यालात एक प्रोफेसर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्या विश्वविद्यालयात साहित्याच्या विद्याविभागात त्यांच्यासाठी म्हणून समाजशास्त्राचा कोर्स सुरु केला. ही अशी पहिली वेळ होती की एका विश्वविद्यालयाने समाजशास्त्र या विषयासाठी आपली द्वारे खुली केली. या पदावर स्थिर झाल्यावर त्यांनी लुई ड्रेफ्युसशी विवाह केला. त्यांना दोन मुले होती आणि त्यांच्या पत्नीने त्यांच्या कामासाठी स्वत:ला वाहून घेतले. या त्यांच्या आयुष्यातल्या प्रमुख वळणाने त्यांनी आपली सगळी उर्जा या आपल्या विद्वतापूर्ण अभ्यासाला अर्पण केली.

या बोरदो मधल्या वर्षानी डरखीमना फार उपयुक्त काम करताना पाहिले आणि १८९३ मध्ये बरीच महत्त्वाची विश्लेषक प्रसिद्ध केली. त्यांनी आपल्या प्रबंधाचे समर्थन केले. त्यांचे श्रमविभागणी आणि नंतर त्यांचा मॉन्तेस्क्वीन वरचा लॅटिन प्रबंध प्रसिद्ध झाला. दोन वर्षानंतर सामाजिक पद्धतीचे नियम आणि १८९७ ला 'ल सुईसाईड' ही पुस्तके प्रसिद्ध झाली. या तीन मुख्य कृतीमुळे डरखीम शैक्षणिक जगतामध्ये प्रसिद्ध झाले.

समाजशास्त्र म्हणजे आपल्या आवडीचे एक नवे क्षेत्र आहे हे लोकांसमोर प्रथापित केल्यावर डरखीम या नव्या शिक्षण विभागाला वाहिलेले एक विद्वत्तापूर्ण नियतकालिक काढू इच्छित होते. त्यानुसार त्यांनी 'ल ऑनी सोशालॉजिक, १८९८ मध्ये काढले आणि त्यात आत्ताच्या समाजशास्त्राबद्दलचं नवे संशोधन किंवा नवे साहित्य प्रसिद्ध केले. यांचे फ्रॉन्समध्ये आणि इतर ठिकाणीही विश्लेषण केले गेले. हे नियतकालिक पहिल्यापासून प्रसिद्ध झाले आणि समाजशास्त्राची, त्या ज्ञानाची रुंदी आणि खोली लोकांना समजली.

१८९८ मध्ये डरखीम यांचा ''व्यक्ती आणि सामूहिक प्रतिनिधित्व'' हा शोधनिबंध प्रसिद्ध झाला. त्यात द डिटरमिनेशन ऑफ मॉरल फॅक्टस म्हणजे नैतिक मूल्यांची निश्चिती, (Value Judgments) म्हणजे मूल्य निर्णयन, आदिम वर्गीकरण (प्रिमिरिग्द क्लासिफिकेशन) आणि शेवटचं द डिफिनेशन ऑफ रिलिजस फिनामिना म्हणजे धार्मिक अपूर्वतेची व्याख्या हे चार महत्त्वाचे निबंध प्रसिद्ध झाले.

बोरदो विश्वविद्यालयात कामाला लागल्यानंतर नऊ वर्षांनी त्यांना समाजशास्त्र विभागातला म्हणून बढती मिळाली. फ्रॉन्समध्ये ही अशी पहिलीच बढती होती.१९०६ मध्ये सारबोन विश्वविद्यालयातून सायन्स ऑफ एज्युकेशनचा प्रोफेसर म्हणून त्यांना बोलावणे आले. १९१३ मध्ये समाजशास्त्रातील सायन्स ऑफ एज्युकेशन म्हणून त्यांना नेमण्यात आले. याबरोबर ऑगस्ट कॉम्ट यांचा बुद्धिमत्तेचा वारसदार (brain child) पॅरिस विश्वविद्यालयात त्यांचा प्रवेश झाला.

बोरदो मधल्या वास्तव्यातल्या शेवटच्या काही वर्षात डरखीमला धार्मिक अपूर्वतेत जास्त रस वाटू लागला. रॉबर्टसन् स्मिथ आणि मानववंशशास्त्राच्या ब्रिटीश विश्वविभागाच्या प्रभावामुळे डरखीमनी आदिम

धर्माचा अभ्यास केला. प्राथमिक स्वरुपाचे बरेचसे शोधनिबंध प्रसिद्ध केल्यावर शेवटी त्यांनी १९१२ मध्ये ''द एलिमेंटरी फॉम्स ऑफ रिलिजियस लाईफ'' म्हणजे धार्मिक जीवनाची मुळ रूपे'' हा शोध प्रबंध लिहिला आणि तो १९१२ मध्ये प्रसिद्ध झाला.

समाजशास्त्रीय सिद्धांताची आधुनिक बाजू प्रस्थापित करण्याचे श्रेय मॅक्स वेबरच्या बरोबरीने डरखीमना मिळते. सामाजिक पद्धतीच्या विश्लेषणाची एक मोठी रूपरेषा प्रस्थापित करण्यात, सामाजिक पद्धतीचे रुप आणि सामाजिक पद्धतीचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी असलेला संबंध सिद्ध करण्याच डरखीमना यश मिळाले.

डरखीमना वाचनाचे वेड होते त्यामुळे अनेक विचारवंताचा त्यांनी अभ्यास केला. त्या विचारवंताचा त्याच्यावर प्रभाव पडला. त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाचे आपण तीन भागात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करु शकतो.

**१) पुनर्जागरणाच्या फ्रेच विचारवंताचा प्रभाव:**

रुसोच्या ''सर्वसाधारण इच्छा ज्या समाज हा सामाजिक ऐक्याची अभिव्यक्ती आहे'' या संकल्पनेचा डरखीमवर प्रभाव पडला. त्याहून पुढे रुसोने सामाजिक आणि मानसशास्त्रीय अपूर्व संकल्पनेला जो फरक सांगितला त्याचाही डरखीमवर प्रभाव पडला. या प्रभावाचा त्याने सामाजिक आणि वैयक्तिक तथ्यांच्या संकल्पनेसाठी उपयोग केला.

सगळे सामाजिक आणि सास्कृतीक अपूर्व संकल्पना या एकमेकाशी संबंधित आहेत ही कल्पना डरखीमनी मॉनेस्क्यूकडून शिकले. सगळी मूलतत्त्वे मिळून एक 'पूर्ण' तयार करतात म्हणून ही मूलतत्त्वे वेगळी काढली आणि एकमेकाचा संदर्भ दिला नाही तर त्याचा अर्थ समजून शकणार नाही कारण ते एकमेकात गुंतले आहेत. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की डरखीमचा जो समाजाच्या पूर्णत्वाचा दृष्टिकोण आहे त्यासाठी ते मॉनेस्क्यूचे ऋणी आहेत.

कॉम्ट आणि सेंट सायमन यांचा रुसो आणि मॉनेस्क्यूपेक्षा जास्त प्रभाव डरखीम यांच्या वर पडला आहे. खरे तर डरखीम स्वत:ला कॉम्ट आणि सेंट सायमनच्या विचारांशी साखळी पुढे एक अभ्यासक समजतात. (कॉम्ट आणि सेंट सायमनचा डरखीम वरचा प्रभाव याची सविस्तर चर्चा आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

**२) इतर फ्रेंच विचारवंताचा प्रभाव:**

पुनर्जागरण काळातल्या विचारवंताशिवाय डरखीम वर त्यांच्या दोन इतिहासतज्ज्ञ गुरुंचाही प्रभाव होता संशोधनाच्या ऐतिहासिक पद्धतीबद्दल डे कोलांज या शिक्षकापासून डरखीम बरेच काही शिकले. श्रमविभागणी या त्यांच्या सिद्धान्तावर ही प्रभाव स्पष्ट दिसतो. आयुष्याच्या शेवटी जेव्हा ते धार्मिक अपूर्वतेने भारुन गेले होते तेव्हा परत एकदा डे कोलांज यांच्या 'द ॲनशंट सिटी' या पुस्तकाने भारावून गेले.

डरखीम यांच्यावर त्यांचे गुरु इनमाईट बोरद्स यांचा आणि त्यांच्या संक्षिप्ततेच्या तत्त्वाचा फार प्रभाव पडला. ही संक्षिप्ततेची कल्पना अशी होती की समाज हे एक अद्वितीय असे वास्तव आहे की ते संक्षिप्ततेच्या वादविवादाने त्यांचे स्पष्टीकरण दिले जाऊ शकत नाही. दुसरा विचारवंत जो नव कांरवादी होता म्हणजे शास्त्रज्ञकारांचा शिष्य होता, त्याचे नाव चार्लस् रेनोवेचर होते, त्यांचाही डरखीम् यांच्यावर

प्रभाव पडला. त्यांना हा शास्त्रज्ञ आवडत होता. त्यांच्याप्रमाणे डरखीमला ही असा विश्वास वाटत होता की तत्त्वज्ञानाचे मध्यवर्ती सूत्र हे सदाचारी आणि नैतिक विचारावर आधारित आहे. आता नैतिक शास्त्राची आवश्यकता आहे आणि हे तत्त्वज्ञान समाजाला मार्गदर्शन करणारे असावे.

**३) ब्रिटीश आणि जर्मनी विचारवंतांचा प्रभाव:**

फ्रेंच विचारवंताशिवाय डरखीम यांच्यावर ब्रिटीश आणि जर्मन विचारवंताचाही प्रभाव होता. त्यामध्ये हरबर्ट स्पेन्सर हा फर महत्त्वाचा शास्त्रज्ञ होता आणि बरीच उत्क्रांतीवादी मते डरखीमने स्पेन्सर यांच्या कडून घेतली आहे.

रॉबर्टसन स्मिथ या ब्रिटीश विज्ञान आणि मानववंशशास्त्रज्ञाने डरखीमवर प्रभाव पाडला. डरखीमच्या सिद्धांतामधली मुख्य धार्मिक कल्पना स्मिथच्या या कल्पनांवर आधारित होती.

जर्मन विचारवंतात इमॅन्युअल कांट या विचारवंताच्या नैतिक कर्तव्याच्या तत्त्वज्ञानाशी डरखीम यांचा जवळचा संबंध होता.

डरखीमने यांत्रिक आणि संघटनात्मक ऐक्य यात जो भेद केला तो फडिनाँड जेनिस यांच्या जर्मनशाफ्ट अॅड गेसेलशॉफ्ट या पुस्तकातल्या भेदासारखाच होता. तरीही त्या दोघांच्या कामातला अंतर्सूर मात्र वेगळा होता. जेनिस यांना जुनी समाज संघटना जर्मनशाकर (समूदाय) जास्त सुसंघटित, आकर्षक आणि नैसर्गिक वाटत होती. तर डरखीमला ऐक्याचे आधुनिक स्वरुप जास्त संघटित, सुधारणावादी आणि चांगला वाटत होता. हा फरक कदाचित या कारणामुळे असेल की जर्मन विचार हा भूतकाळातल्या सुवर्णयुगाच्या बाजूने होता तर फ्रेंच विचार भविष्यातल्या सुवर्णयुगाच्या बाजूने होता.

शेवटी असा विश्वास केला जातो कीं ल्हू च्या सामुदायिक आत्म्याची कल्पना याचा डरखीमच्या सद्सद्विवेक बुद्धीच्या सिद्धांतावर प्रभाव पडला असेल. च्या शास्त्रीय कार्य करण्याच्या पद्धतीने आणि शैलीने एकूणच समाजशास्त्राच्या दुसऱ्या क्षेत्रातही संशोधन कसे असावे ते दाखवून दिले आहे.

डरखीम यांच्यावर सेंट सायमन आणि कॉम्ट या दोघांचा सखोल प्रभाव पडला आहे. या दोघांच्या विचारधारेला पुढे चालणारा मी एक संशोधक आहे असे ते स्वत:ला समजतात. निरनिराळ्या प्रकारांनी या दोघांचा डरखीमवर आणि समाजशास्त्रीय विचारांवर त्यांचा प्रभाव पडला आहे. कालक्रमानुसार आणि आदर्शवादानुसार सेंट सायमन यांच्या प्रभावाचे दोन युग तयार होतात. पैकी क्रांतिकारी विचारांचा किंवा प्रतिक्रियांचा मार्क्सने विकास केला आणि परंपरावादी विचारांचा किंवा प्रतिक्रियांचा डरखीमनी विकास केला.

सायमन यांच्या म्हणण्यानुसार वर्गकलहाने पूर्वीपासून ते मध्यमवर्गाच्या परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पण एकदा का नवी शास्त्रीय औद्योगिक पद्धत सुरु झाली की या सगळ्यांचे महत्त्व संपले. सायमन यांनी नव्या समाजातले वर्गाचे अस्तित्व आणि स्तर ओळखले पण त्यांचा असाही विश्वास होता की नवी परिस्थिती सामाजिक शांती आणि स्थैर्य यांना पदक्रम पद्धतीचा मार्ग दाखवेल. प्रथम योग्य त्या नैतिक कल्पनांचा अवलंब केल्यास एकात्मता मिळेल. जेव्हा त्यांनी हे सांगितले की नवी श्रम विभागणी सामाजिक शांती आणि स्थैर्याला पदक्रम पद्धतीकडे नेइल अशी आवश्यकता नाही. प्रथम योग्य त्या नैतिक कल्पना सुरु करुन एकात्मता मिळू शकेल. डरखीम यांनी ही याच मताचा पुरस्कार केला जेव्हा ते म्हणाले की नवी श्रम विभागणी संघटित व्यवस्था बिघडवेल किंवा अराजकता आणेल असे नाही.

सायमन प्रमाणेच डरखीम यांनाही असा विश्वास होता की नैतिक कल्पनाच समाजाला एकत्र बांधू शकेल.

## ५.२ सामाजिक पद्धतींच्या नियमांचा विषय

डरखीम यांनी आपल्या लिखाणातून यावर जास्त भर दिला की समाजशास्त्र म्हणजे तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे ज्यात सर्वसामानत्वाला महत्त्व आहे. हे सर्वसामानत्व अनुभवाधिष्ठित ज्ञानापेक्षा पूर्वज्ञानातल्या तार्किक निष्कर्षावर जास्त अवलंबून आहे. अशाप्रकारे डरखीम यांनी सामाजिक पद्धतीचे नियम यात समाजशास्त्राच्या विषयवस्तूला स्पष्ट केले आणि यात समाज शास्त्राच्या विषय वस्तूला स्पष्ट केले आणि या क्षेत्राच्या तपासाच्या मर्यादाही स्पष्ट केल्या.

डरखीमने मानवी समाजाच्या अभ्यासाच्या कार्यप्रणालीचा संच तयार केला. कारण तोपर्यंत कुणीही या पद्धतीच्या अधिकृत सूचना इतक्या स्पष्टपणे आणि इतक्या विस्ताराने दिल्या नव्हत्या. त्यांचा मुख्य उद्देश असा होता की सामाजिक संशोधन हे जितके होईल तितके वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय पद्धतीने व्हावे. यासाठी संशोधकाने आपल्या पूर्वग्रहनिर्मित संकल्पनांना नष्ट करावेत. अभ्यासांतर्गत असलेली ती अपूर्ण घटना शुद्ध शास्त्रीय पद्धतीने आणि खुल्या मनाने त्या घटनेचा वेध घेतला.

## ५.३ सामाजिक तथ्यांची संकल्पना

डरखीमला असा विश्वास होता की समाजशास्त्रज्ञ ज्या अपूर्व घटनेचा अभ्यास करत असतील त्याची विषयवस्त्र म्हणजे सामाजिक तथ्य होय जे दुसऱ्या सत्यापासून किंवा तथ्यांपासून वेगळे असते. ती समाजाची वीण आहे जी मानवी संबंधातून आणि मानवी सहचर्यातून निर्माण होते.

डरखीमच्या मतानुसार ‘‘सामाजिक तथ्ये ‘‘ही कृतीची, विचाराची आणि भावनांची सामुदायिक पद्धत आहे. ती वैयक्तिक जाणिवेच्या बाहेर असलेली संपत्ती दाखवते. त्यांचे म्हणणे असे की सामाजिक तथ्ये म्हणजे आर्थिक किंवा मानसिक वास्तवाचे नुसते प्रकटीकरण नाहीत तर त्या सर्वप्रथम अश्या गोष्टी आहेत की ज्या स्वाभाविकरित्या सामाजिक आहेत. त्यांचा असा विश्वास आहे की सामाजिक तथ्ये आत्मनिरीक्षणाची पद्धत लावून अभ्यासली जाऊ शकत नाही. ती तथ्ये वस्तुनिष्ठतेनेच तपासली गेली पाहिजेत.

## ५.४ सामाजिक तथ्यांची लक्षणे

डरखीमच्या मते सामाजिक तथ्यांची विशिष्ट वेगीळी आणि निर्णायक असी सामाजिक लक्षणे आहेत जी जीवशास्त्र किंवा मानसशास्त्राच्या पातळीवर तपासली जाऊ शकत नाही. ही तथ्ये खूप सोसून दुसऱ्या कुठल्याही संचाला किंवा व्यक्तीच्या गटाला बाजूला  सारून टिकून राहिली आहेत. याशिवाय ही सामाजिक तथ्ये दोन दुसऱ्या गुणविशेषावरुन ओळखू येतात.

१) ही तथ्ये व्यक्तीसाठी बाह्यस्वरुपाची आहेत.

२) व्यक्तींच्या वर्तनावर ते दडपण आणू शकतात.

ही सामाजिक तथ्ये दोन अर्थाने व्यक्तीच्या बाहेरची असतात. हे आपल्याला माहित आहे की पहिल्यापासून विशिष्ट रचना असलेल्या समाजात माणसाचा जन्म होतो. या परिस्थितीमुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व घडते, म्हणजे  व्यक्ती त्याच्या मते, विश्वास आणि पद्धती घेत असतो. सामाजिक तथ्यांचे

अस्तित्व त्याच्या बाहेरचे असते. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे संबंधाची पूर्णता जी समाजाला बनवते त्यातली व्यक्ती हे एक मूलद्रव्य असते. हे संबंध म्हणजे कुणा एका व्यक्तीची निर्मिती नसते तर अनेक व्यक्तीच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले असतात. उदा. समाजातली शिक्षण पद्धती किंवा व्यक्तींचे व्यवसायातले आचरण वगैरे हे सगळे घटक स्वतंत्रपणे कार्यरत असतात किंवा व्यक्ती स्वतःच्या पद्धतीप्रमाणे त्याचा उपयोग करत असते.

सामाजिक तथ्ये फक्त बाहेरची नाहीत तर ती दडपणेही आणू शकतात म्हणजे दुसऱ्या शब्दात ते जुलमी आहेत. हे अनेक प्रकाराने स्पष्ट केले जाऊ शकते. उदा. फॅशन हे एक सामाजिक तथ्य आहे. एखाद्याने समाजातल्या फॅशनप्रमाणे न वागता आपल्या मनाप्रमाणे वागला किंवा त्याच्या क्षेत्रात प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणे न वागला तर लोकांच्या निंदेस पात्र होऊ शकतो. किंवा व्यवसायातल्या रुढ पद्धतीप्रमाणे वागण्याचे त्याने नाकारले तर त्याचे यश धोक्यात येऊ शकते. कधी कधी समाजाचे अधिकार अप्रत्यक्षपणे लागू पडतात. म्हणजे व्यवसायातल्या कालबाह्य झालेल्या पद्धती कुणी एखादा वापरत असेल तर त्याला सहकार्य दिले जाते पण लवकर नाहीतर उशिरा त्याला त्याचे वेगळे परिणाम दिसू लागतात. मग त्या व्यक्तीला नेहमीच्या पद्धतीचा उपयोग करावा लागतो.

अशाप्रकारे सामाजिक तथ्ये ही फार वेगळी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती व्यक्तीच्या शरीरातही राहात नाहीत आणि व्यक्तीच्या जाणिवेतही राहात नाहीत. त्यांचे स्थान समाजामधे आहे. ते समाजशास्त्राचं विचारक्षेत्र बनवतात आणि त्यामुळे एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राला अद्वितीय असे व्यक्तिमत्त्व प्राप्त होते.

सामाजिक तथ्यांच्या या लक्षणापेक्षा अजून दोन प्रकारची लक्षणे आहेत ज्याकडे आपण दुर्लक्ष करु शकत नाहीत. हे दोन प्रकार म्हणजे सामान्य आणि रोगनिदानशास्त्र विष्यक (Pathology). जेव्हा ही सामाजिक तथ्ये सगळीकडे पसरलेली असतात किंवा समाजात सर्वसाधारण असतात. तेव्हा त्याला सामान्य म्हणतात. याचा अर्थ असा की अश्या अपूर्व घटना एका स्वस्थ आणि सुव्यवस्थित समाजासाठी आवश्यक असतात. या अर्थाने गुन्हा सगळ्या समाजात दिसून येतात आणि त्यात वेगळे असे काही नाही ते सामान्य आहे. म्हणजे गुन्हा ही स्वस्थ समाजाचा एक भाग आहे तो आवश्यक ही आहे कारण जिथे चांगले असते तिथे वाईटही असते. आता, तुम्ही या सामाजिक तथ्यांचा कसा अभ्यास करु शकता ? त्याचे उत्तर असे की सामाजिक तथ्यांचा अभ्यास करण्यासाठी काही नियम आहेत त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ५.५ सामाजिक तथ्यांचा अभ्यास करण्याचे नियम

पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे डरखीमचा आग्रह होता की समाजशास्त्रज्ञांनी वस्तुनिष्ठतेची कास धरावी. त्यासाठी खालिल प्रमाणे नियम आहेत.

१) पहिला नियम असा की सामाजिक तथ्यांचा तुम्ही एक 'वस्तू' म्हणून विचार केला पाहिजे. दुर्दैवाने समाजशास्त्र हे कल्पनांचा विचार करत असते. ते बदलले पाहिजे. कॉम्ट यांनी अपूर्व घटनांना नैसर्गिक वस्तू म्हणून पाहण्याचा प्रयत्न केला पण लवकरच ते वस्तूनिष्ठते पासून दूर गेले. स्पेन्सरनी पण कल्पनांचा आधार घेतला आणि वस्तुनिष्ठतेला दूर केले. डरखीम यांना हे मान्य आहे की सामाजिक संशोधनात भावभावना आणि मनोविकारांना दूर सारणे सोपे नाही. समाजाचे सदस्य दुसऱ्यांच्या मताला स्वीकारणारे असतात.

तरीही याचा अर्थ असा नाही की अभ्यासाच्या विषयाचा तुम्ही पुर्ण खुल्या मनाने विचार करावा. उलट तुम्ही ज्याचा शोध घेत आहात त्याबद्दल तुम्ही भावनिक दृष्ट्या तटस्थ असले पाहिजे. त्या बदल्यात हे अचूक अशा प्रस्थापित तयार असलेल्या संकल्पनांवर अवलंबून असेल.

२) शास्त्रीय पद्धतीचा दुसरा नियम म्हणजे बाह्य लक्षणामुळे अगोदरच ज्याची व्याख्या केली गेली आहे अशा अपूर्व घटनांचा एक गट आपल्या अभ्यासात असावा आणि सारख्याच व्याख्या असलेले सगळे प्रकार अपूर्व घटना एकाच गटात असावेत. हा व्याख्या करण्याचा नियम समाजशास्त्रात खास महत्त्वाचा आहे. कारण बरेचदा कुटुंब, गुन्हेगारी, संपत्ती वगैरे शब्दांचा आपण सामान्य व्यवहारात आणि सर्वसामान्य बोलण्यातही करतो म्हणजे तो एका विशिष्ट अर्थानेच आपण वापरतो असे नाही. त्यामुळे हे सैलसर अर्थ अचूक शास्त्रीय संप्रेषणात ढवळाढवळ करु शकतात. म्हणून पक्क्या व्याख्या करणे महत्त्वाचे आहे.

३) समाजशास्त्रज्ञांनी पाळायचा तिसरा नियम - समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक तथ्यांचा शोध घेताना त्यांच्या वैयक्तिक प्रकटीकरणापासून स्वतःला दूर ठेवून अचूक आणि स्वतंत्र वेध घेतला पाहिजे. उदा. या नियमामुळे आपल्याला अशी परवानगी मिळेल की इतिहासकालीन प्रवाश्यांनी, धर्मप्रचारकांनी आणि संशोधकांनी कुटुंब व्यवस्थेची जी माहिती दिली आहे. वास्तवातल्या कुटुंबव्यवस्थेपासून त्यातली वैशिष्ट्ये आपण वेगळी करु शकू.

शेवटचे पण महत्त्वाचे, डरखीमना तीव्रतेने वाटत होते की सामाजिक सिद्धांताची परीक्षा घेतली गेली पाहिजे. हा प्रयोग सगळ्याच समाजात करता येण्याजोगा नसेल तर निदान तुलनात्मक पद्धतीचा तरी वापर करावा असे त्यांना वाटत होते. यामुळे समाजशास्त्रज्ञ वरील नियमांनुसार एका समाजाची तुलना दुसऱ्या समाजाशी करु शकेल.

## ५.६ सारांश

थोडक्यात या प्रकरणाच्या आढावा घेताना असे म्हणता येईल की डरखीमच्या मतानुसार समाजशास्त्राचा जन्म थोर अश्या तत्त्वज्ञानात्मक पद्धतीतून झाला आहे. त्यामुळे त्यांचे ओझे जास्त झाले आहे. डरखीम पहिले तत्त्व हे आहे की सामाजिक तथ्यांना वस्तू म्हणून बघा म्हणजे कडकपणे वस्तू किंवा निसर्गातील एक घटना म्हणून समाजजीवनाचे विश्लेषण करता येईल. समाज घटनांना कारणमीमांसेचे तत्त्व लागू करणे आवश्यक आहे.

## ५.७ प्रश्न

१) डरखीम यांच्या 'द रुल्स ऑफ सोशियालॉजिकल Methods' या पुस्तकातल्या सिद्धांताची चर्चा करा.

२) समाजशास्त्रीय लिखाणातील डरखीमच्या समजाशास्त्रीय पद्धतीचे नियम या पुस्तकाचे महत्त्व सिद्ध करा.

३) डरखीम यांच्या ''सामाजिक तथ्यांचा सिद्धांत'' यावर चर्चा करा.

## ५.९ संदर्भ

१) अब्राहम फ्रॉन्सिस, १९८२, मॉडर्न सोशियालोजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) अब्राहम एफ., १९९१, सोशियालॉजिकल, थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) अरोन रेमंड, १९६५, मेन करंटस इन सोशियालॉजीकल थॉट I & II, ग्रेट ब्रिटन, वेडनफेल्ड ॲन्ड निकोलसन.

४) ॲडम्स बी. एन. ॲड सौदि आर. ए. २००१, सोशियालीजिकल थियरी, न्यू दिल्ली, विस्तार.

५) कोसर लेविस, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट (२nd आवृत्ती) हरकोर्ट ब्रास जोनाविच इंक,

६) फ्लेचर रोनॉल्ड, २०००, द मेकिंग ऑफ सोशियालोजी, अ स्टडी ऑफ सोशियालॉजिकल थियरी बिगनिंग ॲड फौंडेशन, न्यू दिल्ली, रावत पब्लीकेशन.

७) रिट्झेर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थियरी (२nd आवृत्ती),न्यूयॉर्क, मॅकग्रा हिल पब्लिकेशन.

८) रिट्झेर जॉर्ज १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी, (चौथी आवृत्ती) न्यूयॉर्क, मॅक्ग्रा हिल पब्लिकेशन.

♦ ♦ ♦

# ६

# इमाईल डरखीम (एमील डरखाईम)
# श्रम -विभाजन

**प्रकरणाची रचना**

६.० उद्देश
६.१ प्रस्तावना
६.२ श्रम विभाजन
६.३ यांत्रिक ऐक्य
६.४ सेंद्रिय ऐक्य
६.५ समीक्षा
६.६ सारांश
६.७ प्रश्न
६.८ संदर्भ

## ६.० उद्देश

श्रम - विभाजनाच्या सिद्धांतामधील आवश्यक विचारांचे आकलन.

डरखीम यांनी विभागलेल्या दोन प्रकारच्या ऐक्याचे आकलन.

## ६.१ प्रस्तावना

आपण मागील प्रकरणात डरखीम यांच्या दोन संकलपनांचा - सामाजिक ऐक्य आणि आदर्शहीनता यांचा अभ्यास केला. प्रस्तूत प्रकरणात त्यांच्या या दोन वैचारिक सिद्धांतावर भर देऊन लक्ष केंद्रित केलेल्या श्रमविभाजन या सिद्धांताचा अभ्यास करु या.

## ६.२ श्रम विभाजन

१८९३ मध्ये डरखीम यांनी पहिला आणि अति प्रसिद्ध असा श्रम-विभाजनाचा सिद्धांत लिहिला. यातले दोन प्रबंध त्यांनी पॅरिस विश्वविद्यालयात पीच.डी. साठी सादर केले.

आधुनिक विचारांच्या उदयामुळे सतत सांस्कृतिक संघर्ष होत राहिला. आधुनिक विचारांच्या उदयामुळे होत असलेल्या सांस्कृतिक संघर्षाच्या गुंतागुंतीला समजून घेणारे सामाजिक सिद्धांत आकाराला येत गेले. अशाच प्रयत्नांपैकी एक प्रयत्न डरखीम यांच्या श्रम-विभाजन' या पुस्तकात केला आहे. औद्योगिकीकरणामुळे निर्माण झालेल्या (संस्कृती हा डरखीम यांचा शब्द) प्रक्रिया आणि कार्य यातले प्राविण्य आणि त्याचे नैतिक परिणाम याबद्दलचे स्वत:चे मत त्यांनी मांडले आहे. डरखीम यांनी असे

आग्रही मत मांडले की श्रमविभाजनाची संकल्पना ही सामाजिक आयुष्यातील सगळ्या विभागांना लागू पडते. ही संकल्पना आता फक्त शुद्ध आर्थिक प्रक्रीयांनाचलागू पडते असे राहिले नाही.

डरखीम यांनी ठामपणे मांडलेल्या सगळ्या विचारात आणि लिखाणात सामाजिक संबंधांचे नैतिक स्वरुप हा विषय प्रामुख्याने पुढे आला आहे.'श्रम-विभाजन' या पुस्तकातही समाजातील माणसाचे नैतिक जीवन हा शोधप्रक्रियेसाठी एक वैशिष्ट्यपूर्ण विषय आहे असे विचार त्यांनी मांडले आहेत, आणि समाजशास्त्रज्ञांनी हा विषय अभ्यासासाठी घ्यावा असा आग्रह केला आहे. त्यांचा असा दावा आहे की श्रम-विभाजन हा आर्थिक नसन एक नैतिक मुद्दा आहे. समाजाच्या नैतिक, कायदेविषयक आणि राजकीय समस्या या साध्या समाजापासून ते आधुनिक औद्योगिक समाज अश्या या होणाऱ्या प्रक्रियेतून उद्भवतात म्हणून त्यांनी आपले सारे लक्ष या समस्यांवर केंद्रित केले आहे.

प्रथम ऑगस्ट कॉम्ट यांनी असे विचार मांडले की व्यक्ती आणि समूह हे आपापला फायदा जपत असल्यामुळे श्रम-विभाजनाने व्यक्ती आणि समूहातला संघर्ष वाढेल. दुसऱ्या बाजूला स्पेन्सर यांनी असे विचार मांडले की श्रम-विभाजनामुळे एकमेकांवर अवलंबून राहणे वाढेल आणि त्यामुळे आधुनिक औद्योगिक समाज हा साध्या समाजासारखा विघटनाला सामोरा जाणार नाही.

डरखीम या दोन्ही विचारांनी प्रभावित झाले. साध्या किंवा आदिम समाजात श्रम-विभाजन जास्त नव्हते या कॉम्ट यांच्या विचारांशी ते सहमत होते. त्यांनी सुचवले आहे की अशा समाजात निरनिराळ्या विभागांची रचना होती आणि प्रत्येक समूहाला मर्यादित स्वरुपाचे काम करावे लागे. म्हणजे खास असे श्रम-विभाजन नव्हते. परिणामी सर्वसाधारण कामात, व्यवस्थेत आणि विश्वासात ते एकत्र आलेले दिसतात.

जशी समाज रचना बदलत जाते म्हणजे साधारण समाजरचने पासून गुंतागुंतीच्या रचनेत बदलत जाते तसे श्रम-विभाजन वाढत जाते. कारण नवी नवी कामे करावी लागत असल्यामुळे निरनिराळे गट तयार होतात आणि त्यांच्यातले वेगळेपण वाढत जाते. ह्या प्रक्रियेत श्रद्धेची संघटित विचारसरणी आणि नैतिक कल्पना यांचे महत्त्व कमी होत जाते तरीही समाजाचे विघटन होत नाही. याचे कारण असे की सर्वसाधारण मूल्यांचा कमी होणाऱ्या प्रभावाला भरुन काढण्यासाठी एक नवी नैतिक पद्धत तयार होत असते. सारांशाने याचा अर्थ असा की डरखीम असे सुचवतात की सामाजिक ऐक्याचे नवे रुप किंवा नैतिकतेचे नव रुप उदयाला येते आणि समाजाला कोसळून पडण्यापासून वाचवते. याचाच अर्थ असा की नैतिक मतैक्याचे स्वरुप जसे बदलते त्याला अनुसरुनच समाजाच्या रचनेत बदल होत जातो.

समाजातील श्रम-विभाजनाचा तपशील देताना डरखीन कॉम्ट आणि स्पेन्सर ह्यांच्या विचारांशी सहमत होऊन समाजव्यवस्थेत एक तौलनिक समानता दाखवतात. ते म्हणतात की समाज हा स्थिर आणि पद्धतशीर असतो, त्यात बदल होतात आणि त्या बदलांना, त्या बदलत्या परिस्थितीला समाज आपल्यात सामावून घेतो आणि एक नवी पद्धत किंवा तौलनिक संतुलन निर्माण करतो.

संतुलनाच्या सिद्धांत हा समाजाला स्थिरता देण्यासाठी होता त्यामुळे समाजाला खऱ्या वस्तूची लक्षणे प्राप्त झाली. असा समज आहे की समाजाला एक स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व आहे. डरखीम यांचा दावा आहे की समाजाला त्याचे स्वतःचे असे स्वतंत्र, वेगळे असे अस्तित्व आहे.

डरखीम यांना एका वेगळ्या प्रश्नांची उकल करुन दाखवायची होती व ती म्हणजे श्रम-विभाजन हे स्वसमाधानावर आधारलेले आहे. श्रम विभाजनाचा आणि नैतिक जीवनाशी परस्पर संबंध आहे हे त्यांना दाखवून द्याचे होते. नेहमी चर्चेचा विषय आणि प्रश्न असा आहे की समाजातील संबंध अस्तित्वात

ठेवण्यासाठी समानता चालना देते की मतभिन्नता चालना देते ? डरखीम यांच्या मते समाजातील समानता आणि असमानता या दोन्ही गोष्टी नैसर्गिक मित्रत्वाच्या विकासासाठी आवश्यक आहेत. या विचाराचा श्रम-विभाजनावर आणखी एक प्रकाश पडतो तो म्हणजे कर्तव्ये आणि जबाबदारीतला मतभेद, हे माणसाच्या ऐक्यात योगदान देतात. त्या पुढे डरखीम जाणून घेऊ इच्छितात की ऐक्याचे अजून वेगळे प्रकार आहेत का आणि त्याचं होकारार्थी उत्तर ते स्वत:च देतात. या दोघातला मतभेद जाणून घेण्यासाठी दोन प्रकारच्या नियमांची आणि नियमनांची गरज आहे. ते म्हणजे दडपशाही आणि नुकसान भरपाईचे नियमन. आता आपण दोन प्रकारच्या ऐक्याचा आणि त्यांना लागू पडणाऱ्या नियमनांचा विचार करु.

## ६.३ यांत्रिक ऐक्य

यांत्रिक ऐक्यात एकत्रित पणाची भावना असते. जी प्राथमिक आणि आदिम समाजात अस्तित्वात होती. ह्याचे वैशिष्ट्य असे की समानता व सारखेपणा व्यक्तीत असतो आणि नैतिक भावनांचे एकत्रीकरण हाच या व्यक्तींना जुळवणारा दुवा असतो. यांत्रिक व्यक्तीने वैयक्तीक ओळख किंवा आपले वैशिष्ट्य जपावे यासाठी यांत्रिक ऐक्य हे व्यक्तीवर कडक बंधने टाकते. यांत्रिक ऐक्यात सामुदायिक जाणिवेची घनता, आकार आणि ताढरपणा जास्त असतो कारण व्यक्ती ही आपल्या समुदायावर पुर्णपणे अवलंबून असते आणि तिच्या वैयक्तिक अस्तित्वाला जागा नसते.

यांत्रिक ऐक्याच्या समाजात दडपशाहीचे अधिकार कार्यरत असतात आणि त्यामुळे कानूनी दंड किंवा शिक्षा देण्याचे कायदे तयार होतात. त्यांचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे दडपशाहीचा कायदा गुन्हे आणि तत्सम कृतींना लागू पडतात. कारण या कृतींनी त्यांनी सामुदायिक जाणिवेला दुखावलेले असते. अशा प्रकारे त्यांचा गुन्हा हा समुदायाच्या विरोधातला असतो, तो नैतिकदृष्ट्या बळीच्या विरोधात नसतो. एक गुन्हा म्हणजे, समाजाच्या सदस्याकडून सार्वत्रिक दृष्ट्या मान्य असलेल्या भावनांना, दुखावणे असते.

यांत्रिक ऐक्यात सामुदायिक जाणीव प्रामुख्याने धार्मिक असते. ही सगळ्याच जाणिवेवर किंवा विवेकबुद्धीवर सारखाच परिणाम करते. कारण मूल्ये, विश्वास आणि पद्धतींच्या बाबतीत प्रत्येकाची जागा सारखीच होती. शेवटी आपण असे म्हणू शकतो की जेव्हा यांत्रिक ऐक्याचा प्रभाव असतो तेव्हा सामुदायिक जाणीव शक्तीमान असते. त्याचा विकास झाला म्हणजे त्याची चालना सविस्तर होते. ह्या प्रक्रियेत वैयक्तिक सद्सद् विवेकबुद्धी सामुदायिक जाणिवेपासून किंवा सद्सद् विवेक बुद्धी पासून वेगळे काढता येत नाही आणि सामुदायिक अधिकारच सार्वभौम असतात.

## ६.४ सेंद्रिय ऐक्य

सेंद्रीय ऐक्यात आधुनिक समाजातला एकत्रितपणा असतो जो यांत्रिक ऐक्याच्या विरोधातला असतो हे असे असण्याचे कारण हे आहे की यांत्रिक ऐक्यात सगळ्या वक्ती सारख्या असतात. पण सेंद्रिय ऐक्यात आधुनिक समाजातील व्यक्ती वेगवेगळी असते आणि त्यातूनच हे सेंद्रिय ऐक्य विकसित होते. अशाप्रकारचा सामाजिक एकत्रितपणा हा फक्त सर्वसाधारण विश्वास आणि भावना मधून उगम पावत नाही तर श्रम विभाजनातल्या कामासाठी एकमेकावर अवलंबून असण्याच्या प्रक्रियेवर अवलंबून असतो. सेंद्रिय ऐक्य व्यक्तीमधला सारखेपणा नाही तर व्यक्तीमधला त्यांच्या विश्वासातला आणि त्याच्या कृतीमधला वेगळेपणा गृहित धरते. त्यामुळे सेंद्रिय ऐक्याची वाढ आणि श्रम-विभाजनाचा विस्तार यांची सांगड वाढत्या वैयक्तिकतेशी घालता येते.

भरपाई चे अधिकार सेंद्रिय ऐक्याच्या समाजात कार्यरत राहतात. तो अधिकार किंवा तो शिक्षा पक्त गुन्हा करण्याऱ्या वक्तीलाच लागू पडते. संपूर्ण समाजाचा ह्या प्रक्रियेशी काही संबंध नसतो. ते दंडात्मक किंवा शिक्षेचे नियम दिवाणी म्हणजे नागरी आणि घटनात्मक प्रकरणांशी संबंधित असतात. ते शिक्षा म्हणून नसतात तर कायदा मोडल्यामुले तुटलेले संबंध पूर्वीप्रमाणेच पुर्नप्रस्थापित व्हावे म्हणून असतात. अश्याप्रकारे कुणा एकाने दुसऱ्यावर नुकसान भरपाईचा दावा केला तर नुकसान केलेल्या व्यक्तीला तेवढ्या मुल्याची भरपाई करावी लागते.

साधारणतः त्या प्रक्रियेत ज्याला दंड झाला त्याला अपमानित व्हावे लागत नाही.

सेंद्रिय ऐक्यात सामुदायिक जाणिवेला क्षीण करणाऱ्या तीन बाजू आहेत.

१) **परिमाण किंवा विस्तार** - सामुदायिक भावनाचा आणि प्रमाणांचा वैयक्तिक जाणिवेवर कितपत परिणाम झाला आहे.

२) **तीव्रता किंवा घनता** - व्यक्ती सामुदायिक भावनांचे किती प्रामाणिकपणे आणि उत्साहाने निरीक्षण करते.

३) **ताठरता** - सामुदायिक नैतिक विचारात सापेक्ष तीव्रता किंवा अस्पष्टता याचा अंतर्भाव

**हे असे या कारणासाठी.**

अ) व्यक्तीच्या सद्सद्विवेक बुद्धीला, दृष्टिकोनाला आणि कार्य करण्याच्या स्वातंत्र्याला जास्तीत जास्त वाव देण्यात आला आहे.

ब) सामुदायिक भावनांची तीव्रता किंवा उत्कटता हळू हळू कमी होणे.

क) सामुदायिक नैतिकता कल्पना अस्पष्ट भावनांचे केंद्र बनल्या. त्यापूर्वी मात्र कर्तव्याच्या कल्पना कडक होत्या आता मात्र त्याच्या विरोधात सामुदायिक नैतिक कल्पना अस्पष्ट झाल्या आहेत.

अश्या प्रकारे सेंद्रिय ऐक्याच्या प्रगतीतून सामुदायिक जाणीव क्षीण होत जाते. याचा अर्थ असा नाही की संमिश्र किंवा गुंतागुंतीच्या समाजातून सर्वसाधारणपणे जोपासलेले जे विश्वास, समज आणि भावना असतात त्या पूर्णपणे नष्ट होतात. असाही याचा अर्थ नाही की प्रत्येक व्यक्ती आपपल्या हित जपते किंवा आपल्या हिताच्याच मार्गी लागतात. कंत्राटी पद्धतीचे संबंधही नैतिक असतात डरखीम यांच्या मते हे असे होते कारण हे कंत्राटी संबंध जसे विस्तृत आणि व्यापक होतात आणि त्याचबरोबर काही आदर्शांचाही विकास होतो आणि त्यातूनच या कंत्राटीपद्धती येतात. त्यामुळे सर्व कंत्राटी पद्धतीचे नियमन विशिष्ट पद्धतीनेच होते. तरीही, आजच्या जगात व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधातली नैतिक संदिग्धता पाहून डरखीमं व्यथित झाले, अस्वस्थ झाले. दुसऱ्या बाजूने ते हे ही पाहात होते की समाजाची आधुनिकता ही वैयक्तिकतेच्या विस्ताराशी जोडलेली आहे. हा वाढत्या श्रम विभाजनाचा परिणाम आहे. ज्यात व्यावसायिक कार्यातल्या विशेषत्वाला (Specialization) महत्त्व प्राप्त होतो. त्यामुळे विशेष कौशल्य, विशेष योग्यता आणि विशेष दृष्टिकोनाला म्हणजेच विशेषज्ञांच्या (Specialist) निर्मितीला, त्यांच्या विकासाला प्रोत्साहन मिळते. डरखीम यांच्या मते आजच्या जगात नैतिक विचारांच्या काही प्रभावी घटना घडतात त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि विशिष्ट गुणांना प्रोत्साहन मिळते. दुसऱ्या बाजून प्रभावी विरोधाभासी नैतिक विचार वैश्विक दृष्ट्या विकसित झालेल्या व्यक्तींचेही गुणगान करतात.

डरखीम यांचा असा विश्वास होता की स्पष्ट दिसणारे विरोधाभासी नैतिक विचार हे विस्तारित

अशा श्रम विभाजनाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक विश्लेषणाने समजू शकतील. असे दाखवित असतांना त्यांनी या ही गोष्टीकडे लक्ष वेधले की श्रम विभाजनाचा सिद्धान्त हा पूर्णपणे नवा विचार नसून हा विचार आदिम समाजातही अस्तित्वात होता. हा श्रम-विभाजनाचा विचार प्राथमिक स्वरुपात असून त्याचे स्वरूप लिंगभेदावर अवलंबून होते. परंतु जसा समाजाचा विस्तार वाढत गेला, समाजाची दाटी वाढत गेली तशी, समाजात उत्पादनाच्या साधनांची कमतरता असल्यामुळे स्पर्धा व वैमनस्य वाढत गेले, स्पर्धा जशा अटीतटीच्या होत गेल्या तसे सामाजिक मतभेद आणि वेगळेपण वाढत गेले आणि हेच वेगळेपण या समस्यांचा शांतीपूर्ण उतारा ठरला. जेव्हा प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या व्यवसाय तेव्हा त्यांची स्पर्धा त्याच क्षेत्रात काम करण्याऱ्या काही थोड्या लोकांशी होऊ लागली. संघर्षाचे प्रसंग कमी कमी होत गेले. अशाप्रकारे श्रम विभाजन म्हणजे आपले अस्तित्व टिकवण्याचा एक प्रयत्न ठरला.

डरखीम यांनी अश्या काही गोष्टींचा विचार केला की जिथे काही ना काही कारणाने विशेष असे कार्य सुद्धा सेंद्रिय ऐक्य निर्माण करण्यात अपयशी ठरले. ह्याचे दोन अप्राकृतिक भाग आहेत त्यापैकी एक आहेआदर्शहीनता आणि दुसरा भाग आहे बळजबरीने केलेले श्रम विभाजन. आदर्शहीन श्रम विभाजन म्हणजे नियमन नसणे किंवा कसल्याही अटी आणि कायदा नसणे, याचा परिणाम म्हणून समाज पद्धतीत पुरेसे सहकार्य नसते किंवा त्यांच्यात  अनुकुलता नसते. आदर्श हीनता ही सामाजिक संपत्तीच्या बाबतीत असते, ती मानसिक स्थितीच्या बाबतीत नसते. पण अशा परिस्थितीतूनच व्यक्तीसाठी एकाकीपणाची भावना निर्माण होते आणि आयुष्य आणि कामाच्या बाबतीत अर्थहीनतेची भावना निर्माण होते.

दडपशाहीने किंवा बळजबरीने केलेल्या श्रमविभाजनात नियमांच्या अभाव नव्हे तर नियमांच्या अतिरेकीपणा मुळे प्रश्न निर्माण होतात. जेव्हा नियम अतिशय  कडक होतात व्यक्तीच्या मनात विलगतेची आणि द्वेषाची भावना निर्माण होते. कारण त्यांना आपला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नसते तर त्यांच्यावर ते काम अनिष्टरीत्या लादले जाते. मग ते पद्धतीनुसार, नियमानुसार किंवा निव्वळ योगायोगावर अवलंबून असते.

अशा रीतीने श्रम-विभाजनाच्या अंतर्गत येणाऱ्या विचारांचा आपण साधक बाधक असा अभ्यास केला आणि यांत्रिक आणि सेंद्रिय ऐक्यातल्या भिन्नतेचा आढावा घेतला. या विचारांनी डरखीम यांच्या समाजशास्त्राचा आणि त्यांच्या इतर कार्याचा पाया घातला आणि त्यांच्या कार्याचे विषयाचे स्पष्टीकरण केले. या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वी डरखीमच्या श्रम-विभाजनाच्या सिद्धांताबद्दल इतर टीकाकार काय म्हणतात त्याचा अभ्यास करु या.

## ६.५ समीक्षा

१) डरखीम ह्यांचे श्रम-विभाजन हे प्राथमिक स्वरुपाचे आणि पुढे विकसित होणारे त्यांचे विचार पुढे झालेल्या लिखाणातले आणि ग्रंथांचे पायाभूत म्हणून गणले गेले आहेत.

डरखीम यांच्यावर असाही आरोप होतो सामाजिक वर्गीकरण किंवा सामाजिक भिन्नता हे आधुनिक समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. ती व्यक्तिस्वातंत्र्याची प्राथमिक अवस्था आहे. ती अवस्था येऊ शकते जेव्हा सामुदायिक जाणिवेचे महत्त्व आणि त्यांचा कडकपणा कमी होतो तेव्हा व्यक्ती थोड्या प्रमाणात न्यायाचे आणि कार्याचे स्वातंत्र्य उपभोगू लागले. वैयक्तिक समाजात मुख्य समस्या ही आहे की सामुदायिक जाणिवेला कमी करावे लागते नाहीतर सेंद्रिय ऐक्य हे सामाजिक विघटनाला कारणीभूत ठरु शकते. डरखीमनी हे सांगण्याचा प्रयत्न केला की समाज म्हणजे एकमेकांच्यावर होणारे परिणाम ज्याचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडतो. या प्रकरणात सामुदायिक जाणिव ही, हे फक्त नक्की करते की

सामुदायिक जाणिव कितीपर्यंत माणसे आपली व्यक्ती म्हणून असलेली शक्ती विकसित करतील.

## ६.६ सारांश

**सामुदायिक जाणीव :** म्हणजे विश्वास, समज आणि भावनाचे ज्या समाजाच्या सर्वसाधारण सदस्यांना सारखेच आहेत ते त्यांच्या आकारात आणि विषयात, समाज यांत्रिक आहे का सेंद्रिय त्यानुसार वेगवेगळे असतात.

**आपली प्रगती तपासा:**

१) यांत्रिक ऐक्य म्हणजे काय ?

२) सेंद्रिय ऐक्य कशाला म्हणतात ?

## ६.७ प्रश्न

१) डरखीम यांच्या श्रम-विभाजन या ग्रंथातल्या मौलिक योगदानाची चर्चा करा.

२) डरखीम यांच्या श्रम-विभाजनाची सविस्तर चर्चा करा.

## ६.८ संदर्भ


१) फ्रॅन्सिस अब्राइम, १९८२, मॉडर्न सोशियालाजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) अब्राहम फ्रॅन्सिस एफ. १९९१, सोशियालॉजिकल थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) ॲडम्स बी. एन. आणि सैदि आर ए., २००१, सोशियालाजिकल थियरी, नवी दिल्ली, विस्तार

४) ॲरीन रेमंडस १९६५, मेन करंटस इन सोशियालॉजिकल थॉट । & ॥ ग्रेट ब्रिटन वेडेनफेल्ड आणि निकोलसन.

५) कोसर लेक्सि, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट, (दुसरी आवृत्ती) हरकोर्ट ब्रास, जीवानविच, इंक.

६) फ्लेचर रोनॉल्ड, २००० द मेकिंग ऑफ Sociology अस्टडी ऑफ सोशियालॉजिकल थियरी बेगिनिंग अँड़ फौंडेशन, नवी दिल्ली, रावत पब्लिकेशन.

७) रीट्झर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थियरी, (दुसरी आवृत्ती ) न्यू यॉर्क, मॅक्ग्रा हील पब्लिकेशन.

८) रिट्झर जॉर्ज १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी (चौथी आवृत्ती) न्यूयॉर्क मॅक्ग्रा हील पब्लिकेशन.


♦ ♦ ♦

# ७

# इमाईल डरखीम (एमील डरखाईम)

**Theory of Suicide**

**आत्महत्त्येचा सिद्धांत**

**प्रकरणाची रचना**

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ आत्महत्येचा अभ्यास करण्याची कारणे.
७.३ डरखीम यांनी मांडलेला स्पष्टीकरणात्मक सिद्धान्त
७.४ या अध्ययनाचे स्वरुप आणि
७.५ समीक्षा
७.६ सारांश
७.७ प्रश्न
७.८ संदर्भ

## ७.० उद्दिष्टे

डरखीम या आत्महत्येच्या अभ्यासाकडे कसे वळले आणि आत्महत्येचा स्पष्टीकरणात्मक सिद्धान्त त्यांनी कसा मांडला हे समजून घेणे.

डरखीम यांचे स्पष्टीकरण आणि त्याचा अन्वयार्थ समजून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

डरखीम यांचे 'ल सुईसाईड' या नावाचे पुस्तक वेगवेगळ्या प्रकारांनी त्यांच्या श्रम-विभाजन सिद्धांताच्या अभ्यासाशी संबंधित आहे. हे अध्ययन आधुनिक समाजाच्या रोगनिदानक्षम पैलूचा वेध घेते आणि व्यक्तीचा समुदायाशी कसा संबंध आहे यावर प्रखर प्रकाश टाकते. हे अध्ययन घटनेची व्याख्या यापासून सुरु होते, मग पूर्वीच्या स्पष्टीकरणांशी संबंध इथपर्यंत चालू राहते आणि आत्महत्येच्या प्रकारांची व्याख्या करते आत्महत्येबद्दल त्यांनी सर्वसाधारण सिद्धांताचा विकास केला.

## ७.२ आत्महत्येचा अभ्यास करण्याची कारणे

डरखीम अनेक कारणामुळे या अध्ययनाकडे वळले.

अ) त्यांचा जवळचा मित्र व्हिक्टर होमरी यानी आत्महत्या केली त्यामुळे ते फार व्यथित झाले आणि त्यांनी आत्महत्येच्या प्रश्नात लक्ष घातले आणि त्याचे स्पष्टीकरण केले.

ब) दोन शतकापासून या विषयावर सगळीकडून सतत वादविवाद चालला होता. हा प्रश्न नैतिकतेचा समजला जात होता. एकोणिसाव्या शतकात हा प्रश्न सामाजिक समस्येच्या रुपात पहिला गेला. या वाढत्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची आणि स्पष्टीकरण गरज आहे. डरखीमना आत्महत्येचा अभ्यास करावा वाटला कारण हा प्रश्न आजचा आणि तातडीचा आहे.

क) डरखीम या अत्महत्येच्या घटनांना खास आणि निश्चित स्वरुप असलेला प्रश्न समजत होते. संशोधकांना हा विषय सत्य घटनांचा संचय पुरवत होता. या विषयाला निश्चित मर्यादा आहेत आणि याचा अर्थ स्पष्ट करता येण्याजोगा आहे. डरखीम यांना असे वाटले की हे एक असे क्षेत्र आहे जिथे समाजशास्त्र जास्त अभ्यास करुन याचा काही उलगडा करु शकेल.

ड) डरखीम यांनी सामाजिक पद्धतीचे नियम यावर जे काम केले होते ते सिद्ध करुन दाखवण्याची ही एक उत्तम संधी होती. सामाजिक तथ्ये ही व्यक्तीसाठी बाहेरची आहेत आणि तशा पद्धतीने त्याचा अभ्यास केला पाहिजे हे त्यांनी मांडलेले तत्त्व होते.

इ) डरखीम यांचे समाजशास्त्रातले जे काम होते त्यातल्या एका प्रश्नांशी या आत्महत्येच्या अभ्यासाचा प्रत्यक्ष संबंध होता. हे कुठले बंध माणसांना एकत्रित ठेवतात हा त्यांचा प्रश्न होता. 'ल सुईसाईड' हा सिद्धान्त म्हणजे हे बंध विसर्जित झाल्याचे स्वच्छ उदाहरण होते.

## ७.३ डरखीम यांनी मांडलेला स्पष्टीकरणात्मक सिद्धान्त

सुरुवातीलाच डरखीम यांनी आत्महत्येची ही व्याख्या केली आहे की अशा प्रकारच्या मृत्यूने प्रत्येक प्रकरण म्हणजे त्या व्यक्तीने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे केलेली सकारात्मक किंवा नकारात्मक कृती असते.

डरखीम यांच्या मतानुसार स्वतःला पिस्तुलाने मारुन घेणे किंवा फाशी होणे म्हणजे सकारात्मक कृती आहे. नकारात्मक कृती म्हणजे एखाद्या जळत्या इमारतीत मुद्दाम राहणे किंवा जीव जाईपर्यंत अन्न खाण्याचे नाकारुन जीव देणे. डरखीन यांच्या व्याख्येनुसार मरेपर्यंतचा भूक हडताल हा आत्महत्येचाच प्रकार आहे. तशाच प्रकारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष यातला भेद म्हणजे सकारात्मक आणि नकारात्मक यातल्या सारखाच आहे. एक बंदूकीची गोळी मृत्यु प्रत्यक्षपणे आणू शकते. पण एखाद्याने जळती इमारत मुद्दाम सोडली नाही तर मृत्यू अप्रत्यक्षपणे येतो आणि काही दिवसानी येऊ शकतो.

डरखीमच्या व्याख्येनुसार आत्महत्या म्हणजे सर्वसाधारणपणे जी आत्महत्या समजली जाते ती तर असतेच पण ते इच्छामरणाचे जे प्रसंग असतात. ज्याभोवती शौर्याचे आणि गौरवाचे जे वलय असते त्या प्रसंगातला मृत्यूही आत्महत्याच असते. उदा. भारतीयस्त्रियांचे सती जाणे किंवा युद्ध भूमीवर माघार घेण्यापेक्षा किंवा शरण येण्यापेक्षा जीव देणारा सैन्यातला अधिकारी.

अयोग्य गोष्टी काढून टाकणे अशी डरखीम यांची मुद्दा पटवून देण्याची पद्धत आहे. त्यांनी पद्धतशीरपणे विचार केला आहे आणि आत्महत्येसाठी जबाबदार समजल्या जाणाऱ्या बऱ्याच घटकांना नाकारले आहे, मुख्यतः मानसिक रचना किंवा मनाचा कल शाररिक किंवा भौतिक परिस्थिती , वंश किंवा आनुवंशिकता अनुकरण हे कारण त्याकाळी लोकप्रिय होते पण डरखीमनी हे कारण बाजूला काढून टाकले आहे किंवा नाकारले आहे.

डरखीम यांचे स्पष्टीकरण पद्धतशीर होते. त्यांच्या पूर्वीच्या विद्वानांशी त्यांचे मतभेद होते कारण त्यांनी आत्महत्येला कारणीभूत असलेल्या घटकांना वेगवेगळे करुन किंवा एक एक असे हाताळले नव्हते, तर ही सगळी कारणे एकमेकांशी आंतरिक संबंध असलेले असतात आणि ते एकत्रपणे कार्य करतात. त्यांनी हे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला की या सगळ्या प्रकाराला एकात्मता आणि नियमन अश्या दोन बाजू असतात ज्या त्यातला तोल सांभाळत असतात आणि कदाचित हेच काही व्यक्तींना आत्महत्या करण्यास किंवा स्वतःचा जीव घेण्यास भाग पडतात.

'एकात्मता' म्हणजे एखादी व्यक्ती समुदायाला किती हद्दीपर्यंत आपल्या मालकीचा आहे असे समजते म्हणजे समाज आणि व्यक्तीचे ऐक्य किती आहे व्यक्तीच्या कृतीला आणि भावनांना नैतिक मूल्यांनी आपल्या किती नियंत्रणाखाली ठेवले आहे याला नियमन म्हणतात. डरखीम यांच्या म्हणण्यानुसार एखाद्या समाजात एकात्मता आणि नियमन किती जास्त प्रमाणात आहेत किंवा किती कमी प्रमाणात आहेत यावर आत्महत्येचे प्रकार अवलंबून असतात.

एकात्मता ही जी बाजू आहे त्याचे एकमेकाशी जुळणारे आत्महत्येचे दोन प्रकार आहेत.

१) **स्वार्थी आत्महत्या** - अशाप्रकारची आत्महत्या म्हणजडे समाज आणि व्यक्तीमध्ये पुरेसे ऐक्य नसल्याचा परिणाम आहे आणि ही आधुनिक घटना आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. धार्मिकतेशी असणारा संबंध, वैवाहिक स्थिती आणि राजकीय घटना यांच्याप्रमाणे आत्महत्येचे प्रमाण बदलत असते असे स्वार्थी आत्महत्येचे अर्थ लावता येतील. संबधित सामाजिक गटातले एकात्मतेचे प्रमाण हे व्यवस्छेक लक्षण आहे. कारण अनुभवाधिष्ठित भिन्नता किंवा वेगवेगळेपणा समाजात आहे आणि हा आत्महत्येला रोकणारा एक महत्त्वाचा घटक आहे.

त्यामुळे व्यक्तिवाद जिथे जास्त आहे किंवा व्यक्तिवादाला जिथे जास्त सहन केले जाते त्या प्रोटेस्टंट समाजात आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे अविवाहित लोकात आणि वैधण्यात आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. पण कुटुंबाशी चांगल्या प्रकारचे जवळकीचे संबंध असलेल्या विवाहितांमध्ये आत्महत्येचे प्रमाण कमी आहे. तसेच युद्धप्रसंगी सामुदायिक राजकीय भावना जास्त झाल्यामुळे आत्महत्येचे प्रमाण घटते.

२) **निःस्वार्थी आत्महत्या** - ही आत्महत्या म्हणजे जास्त आणि जास्त एकात्मतेचा परिणाम आहे. हे पारंपारिक आणि आदिम समाजात विशेष करुन आढळत असे. तसेच ही निःस्वार्थी आत्महत्या आधुनिक सैनिकी जगातही असते. अशा प्रकारात नेहमीपेक्षा जास्त असलेल्या कर्तव्याच्या जाणिवेतून व्यक्ती स्वतःला मारून घेतात. व्यक्तीचे जीवन रुढी परंपरेने आणि प्रघाताने इतके काही जखडलेले असते की वरच्या आज्ञेप्रमाणे ने स्वतःचा जीव घेतात.

निःस्वार्थी आत्महत्येने बंधनकारक आणि ऐच्छिक असे दोन भाग पडू शकतात. बंधनकारक निःस्वार्थ आत्महत्येचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सतीची चाल होय ज्यात स्त्रिया स्वतःला पतीच्या चितेवर झोकून देतात. पूर्वी डेन्मार्कचे योथ्ये आदर्श आणि प्रशंसनीय कार्य म्हणून युद्धात स्वतःला मारुन घेत असत. दुसरे उदाहरण म्हणजे जपानची हाराकिरी सैनिकी आत्महत्या दलाचे स्वतःला मारुन घेणे.

जसे एकात्मतेचे दोन भाग आहेत. तसेच नियमनाचे देखील दोन भाग आहेत.

१) **नियमन रहित आत्महत्या -** ही आत्महत्या म्हणजे अपूर्ण नियमनाचा परिणाम आहे. आधुनिक समाजात एकात्मतेचा अभाव हे ही कारण आहे. या प्रकाराचे डरखीमने दिलेले उदाहरण म्हणजे आर्थिक आणि व्यापार विषयक बिकट परिस्थिती, यामुळे तत्त्वप्रधान रचनेचे नियमन बिघडते.

सामाजिक परिवर्तनामुळे संपूर्ण समाजात किंवा समाजाच्या काही भागात नियमनरहितता निर्माण होते. अकस्मित परिवर्तनामुळे समाजातच अस्तित्वात असलेले मापदंड बिघडतात आणि इतक्या लवकर नवे मापदंड तयार होऊ शकत नाहीत. सामुदायिक जाणिवेला माणूस आणि वस्तू यातले विभाजन करायला किंवा वर्गीकरण करायला वेळ लागतो. नियमनरहित आत्महत्या कुटुंबाच्या संदर्भातही आढळून येते. संख्याशास्त्र हे दाखवून देते की युरोपमधल्या विविहितांपेक्षा विभक्त आणि घटस्फोटित लोकात आत्महत्येतचे प्रमाण जास्त आहे.

जेव्हा आर्थिक मंदी येते तेव्हा अचानक उतरती गतिशीलता निर्माण होते. (म्हणजे पैशाची कमतरता जाणवते) आणि याचा ज्यांच्यावर परिणाम झाला त्यांच्या जीवनात नियमनरहितता निर्माण होते. इथे नैतिक निश्चितता आणि रुढीच्या अपेक्षा कमी होतात. कारण पूर्वी ते ज्या गटात सामील होते त्या गटात आता ते राहत नाहीत. त्याचप्रमाणे जेव्हा जलद समृद्धता येते ती चटकन गतिशीलता निर्माण करते. (ते अचानक श्रींमंत होतात) आणि ज्यांच्यावर या समृद्धतेचा परिणाम झाला आहे असे लोक नव्या जीवनशैलीत जातात पण त्यातल्या लोकांचे सहाय्य त्यांना मिळत नाही.

२) **चमत्कारिक किंवा विलक्षण आत्महत्या :** डरखीमनी अगदी थोडक्यात एका खालच्या टिपेत याचा उल्लेख केला आहे. ही आत्महत्या म्हणजे अति जास्त नियमनाचा परिणाम असतो. हा प्रकार म्हणजे नि:स्वार्थी आत्महत्येची नक्कल असू शकते.

## ७.४ अध्ययनाचा प्रकार आणि प्रभाव

डरखीमच्या आत्महत्येच्या सिद्धांताचा संबंध त्यांच्या कार्यप्रणालीत्मक जाहीर निवेदनाशी लावण्यासाठी त्यांच्या स्पष्टीकरणाचे स्वरुप समजून घेणे उपयोगाचे होईल.

खऱ्या अस्तित्वात असलेल्या कृतीशील शक्ती आणि आत्महत्येशी संबंधित मानसिक प्रवाह या दोन्ही सामाजिक कारणामुळे आत्महत्या करणाऱ्यांच्या प्रमाणात होणारा फरक डरखीम यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. असे समजले जाते की कुठल्याही लोकसंख्येत अशा काही व्यक्ती असतात ज्यांच्यात आत्महत्येच्या प्रवृत्ती असतात आणि या अश्या आत्महत्येशी संबंधित असलेल्या मानसिक प्रवाहांना ते बळी पडतात. डरखीम यांना असे वाटते की या संदर्भात तीन मतप्रवाह आहेत ते माणसांचे, ज्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, तीन भागात (अगदी विरोधी सुद्धा) विभाजन करतात.

१) प्रत्येक माणसाला स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व असते.

२) जर समुदायाला आवश्यकता असेल तर माणूस ते व्यक्तिमत्त्व सोडायला तयार असतो.

३) प्रत्येक माणूस काही प्रमाणात प्रगतीच्या कल्पनांचे स्वागत करतो.

जेव्हा हे मतांचे प्रवाह मर्यादित प्रमाणात असतात तेव्हा नैतिक प्रतिनिधी समतोल साधन असतात. हा असा समतोल व्यक्तीला आत्महत्येच्या विचारापासून दूर ठेवतात. पण यातला एखाद्या घटकाचा ताण जरा जरी जास्त झाला तर दुसऱ्या दोन्ही घटकांना धोका असतो आणि बाकीच्या दोघात आत्महत्येच्या प्रवृत्ती वाढतात.

डरखीम यानी आत्महत्येला प्रवृत्त करणारे विविध प्रकारचे प्रवाह दाखवून दिले आहेत. संस्कृतीचे स्वरुप कल्पना आणि भावभावना, विश्वास, रुढी आणि कलावंत वगैरे असे डरखीम यांनी वर्णन केले आहे. हे सगळे सामाजिक घटक व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य बिघडवून टाकतात.

शेवटी आपण असा निष्कर्ष काढू शकतो की डरखीमच्या आत्महत्येच्या सिद्धांताचा अर्थ असा की विपरीत परिस्थितीत व्यक्तीचे सामाजिक संबंध त्याला जरुरी असलेली आपुलकी आणि नियमन पुरेशा प्रमाणात देण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे व्यक्तीचे मानसिक स्वास्थ बिघडते आणि अश्याप्रकारे आत्महत्येला प्रवृत्त असलेल्या भेद्य व्यक्ती आत्महत्या करु शकतात.

या अध्ययनाचे इतके महत्त्व आहे की यामुळे आत्महत्येचा कायदा बनवला गेला. हा कायदा असे सांगतो ज्या सामाजिक गटातली ती व्यक्ती आहे त्या समाजातल्या एकात्मतेवर आत्महत्येचे प्रमाण अवलंबून असते. याचा उलटा क्रम असतो म्हणजे एकात्मता जास्त असेल तर आत्महत्या कमी आणि एकात्मता कमी असेल तर आत्महत्या जास्त असतात. तरीही हा आत्महत्येचा कायदा काही विशिष्ट परिस्थितीतच खरा ठरु शकतो. उदा. त्या सामाजिक गटावर परिणाम करणारी नियमनाची पद्धत जर व्यवस्थितपणे कार्य करीत असेल तरच हा कायदा तिचे लागू पडतो. दुसरी गोष्ट अशी की एखाद्या गटाने काही विशिष्ट परिस्थितीत आपल्या सस्थांना आत्महत्या करायला भाग पडेल असे कडक नियमन केले नसेल तरच हा कायदा लागू पडेल.

डरखीम यांच्या या अभ्यासाचे, या अध्ययनाचे महत्त्व वादातीत आहे. डरखीम यांनी हे दाखवून दिले आहे की समाज व्यक्तीवर प्रभाव टाकतो त्यामुळे ती व्यक्ती सध्या जशी आहे तशी बनते. ही सामाजिक तथ्ये आहेत ती व्यक्तीवर बाहेरुन दडपण आणतात आणि तसेच त्यांच्या कृतीसाठी मार्गदर्शक म्हणूनही काम करतात. हे अध्ययन दुसऱ्या एका दृष्टीनेही महत्त्वाचे आहे कारण हे व्यक्ती आणि समाजाच्या स्वभावाबद्दल काही एक सांगत असते. डरखीम यांनी हे दाखवून दिले आहे की आत्महत्या करण्याच्या निर्णयाला आपण फक्त मानसिक दृष्ट्या समजून घेऊ शकत नाही किंवा एकाद्या व्यक्तीचा संदर्भ देऊनही समजणार नाही कारण आत्महत्या ही एक सामाजिक घटना आहे. त्यामुळे सामाजिक दृष्टिकोनातून याला समजून घेतले पाहिजे.

## ७.५ डरखीम यांच्या आत्महत्येच्या अध्ययनावरची समीक्षा

डरखीम यांच्या इतर कार्याप्रमाणे त्यांच्या आत्महत्येच्या सिद्धांतावर, त्यांच्या टीकाकारांनी निरनिराळ्या दृष्टीने टीका केली आहे. त्याच्यावरच्या टीकेचे चार भाग करता येतील.

१) पहिल्या भागातली टीका ही सर्वसाधारणपणे तर्कशास्त्रीय पद्धतीची आहे. त्यांच्या सिद्धांताला लागू पडतील. असे शब्दांचे अर्थ त्यांनी लावले आहेत आणि एकमेकाला विरोधी असलेले निश्चित असे निष्कर्ष काढले आहेत.

२) डरखीमच्या उपयोगत आणलेली जी आकडेवारी आहे त्याबद्दल आणि त्यांनी सिद्धांत आणि पुरावा याचा जो संबंध लावला आहे त्यावर टीका झाली आहे. उदाहरणार्थ त्यांनी गोळा केलेल्या सामग्रीची सखोल तपासणी केली नाही असा आरोप पोपनी केला आणि त्याचा सविस्तर पुरावा दिला. त्यामुळे डरखीमच्या कार्याच्या उपयोगितेबद्दल पोपनी शंका व्यक्त केली आहे.

३) डरखीम यांच्यावर तिसरा आरोप असा आहे की निरनिराळ्या प्रकारच्या आत्महत्येच्या सिद्धांतातल्या

शब्दात अयर्थीपणा आहे आणि विश्लेषणात भिन्न भिन्न प्रकारची असंबंधित विधाने आहेत. त्यामुळे त्याची परीक्षा होऊ शकत नाही. पोप म्हणतात की नि:स्वार्थी आत्महत्या आणि नियमन रहित आत्महत्या यात काही फरक नाही.

४) डरखीमच्या योगदानाच्या अस्सलपणाबद्दल डगलस यांनी प्रश्नचिन्ह उभे केले आहे. त्याचा दावा आहे की या संबंधातल्या समकालीनांच्या संख्याशास्त्रीय आकडेवारीत त्यांचे योगदान दास्त भर घालत नाही. पुढे ते म्हणतात की डरखीम यांची संख्याशास्त्रीय आकडेवारी ही प्रशासनिक विभाजनावर आधारित आहे, ती शास्त्रीय वर्गीकरणावर आणि संकल्पनेवर आधारित नाही. डगल्स यांच्या म्हणण्याप्रमाणे डरखीम यांनी अनियंत्रित पूर्वग्रहाला अध्ययनाच्या पद्धतीत आणले आहे.

## ७.६ सारांश

या आत्महत्येच्या अध्ययनाबद्दल काही जणांनी ज्या उणिवा दाखवल्या आहेत त्याला विरोध न करता ही असे म्हणता येईल की समाजशास्त्र हे विशिष्ट विषयवस्तू आणि विशिष्ट दृष्टिकोण असलेले तात्त्विक शास्त्र आहे हे डरखीम यांनी सिद्ध करुन दाखवले. डरखीम यांची बलशाली परिणाम होतात आणि कशा पद्धतीने ते आपला प्रभाव टाकतात. हे डरखीमच्या अध्ययनाने दाखून दिले आहे. सामाजिक तथ्ये ही व्यक्तीसाठी बाहेरच्या गोष्टी आहेत आणि समाजशास्त्र हे मानसशास्त्रावर च्या पायावर उभे राहात नाही आणि उभे राहू शकत नाही हे डरखीम यांनी वारंवार बजावून सांगितले आहे.

**तुमची प्रगती तपासा**

समाज शास्त्रीय लिखाणातले डरखीमच्या आत्महत्येच्या सिध्दांताचे महत्त्व सिद्ध करा.

नि:स्वार्थी आत्महत्या म्हणजे काय ?

स्वार्थी आत्महत्या म्हणजे काय ?

## ७.७ प्रश्न

१) डरखीमच्या आत्महत्येच्या सिद्धांताचे विवरण करा.

२) नि:स्वार्थी आत्महत्या ही इतर आत्महत्येच्या प्रकारांपेक्षा कशी वेगळी आहे याची चर्चा करा.

## ७.८ संदर्भ

१) आर आरोन, करंटस् इन सोशियालॉजिकल थॉट, व्हॅल्यूम २, हरमोड स्वार्थ, पेंग्विन, १९६८.

२) अे. गिडन्स, कॅपिटॅलिझम अँड मॉर्डन सोशल थियरी अॅन अॅनालिसिस ऑफ मार्क्स, डरखीम, अँड वेबर केंब्रिज युनिव्हरसिटी प्रेस, १९७१.

३) आर, बियर स्टेइट, एमाईल डरखीम, वेल्डनफेल्ड अँड निकोलस, डेल पब्लिकेशन कं., इंक, १९६६

४) पीटर हॅमिल्टन (ed) एमाईल डरखीम, क्रिटिकल अॅसेसमेंट व्हॅल्यून १ टू ४, १९९०, लंडन, रोल्टडेज अँड केगन पॉल.

५) इ. सी. कफ अँड जी.सी. एफ. पायने (ed) परस्पेक्टिव्ह इन सोशियालॉजी, जॉर्ज अटलेन अॅड अन् विन, लंडन.

६) डी. ली. अॅंड एच. न्यूवी, दर प्रॉब्लम ऑफ सोशियालॉजी, हट्चिनसन, १९८४.

७) सेवन ल्युक्स, इमाईल डरखीम.

♦ ♦ ♦

# ८

## डरखीम (डरखाईम)
## धार्मिक जीवनाचे प्राथमिक प्रकार

**प्रकरणाची रचना**

८.० उद्देश
८.१ प्रस्तावना
८.२ पुस्तकातले मुख्य विचार
८.३ धर्माचे कार्य
८.४ नीतीमत्तेवरील डरखीम यांचे विचार
८.५ समीक्षा
८.६ सारांश
८.७ प्रश्न
८.८ संदर्भ

### ८.० उद्देश

धार्मिक जीवनाचे प्राथमिक प्रकार या ग्रंथातील डरखीम यांच्या भावना आणि विचार जाणून घेणे.

धर्म आणि नीतिमत्ता यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणे.

### ८.१ प्रस्तावना

डरखीम यांचे अगोदरचे विचार सामाजिक बंधनातल्या किंवा नियमातल्या बाह्य शक्तीच्या प्रभावावर केंद्रित केले होते. नंतर मात्र त्यांच्या मताप्रमाणे व्यक्तींच्या सद्‌सद्‌विवेक बुद्धीमध्येच ही बंधनाची किंवा नियमांची शक्ती अंतर्भूत असते. त्यांचा विश्वास होता की व्यक्तीमध्येच समाज असावा लागतो. याच ठाम विश्वासाने त्यानी धर्माचा अभ्यास केला. कारण धर्म ही एक अशी शक्ती आहे जी व्यक्तीमध्ये समाजाच्या मागणीप्रमाणे वागण्याची नैतिक जबाबदारी निर्माण करते. आता आपण धर्माच्या मुख्य विचारावर प्रकाश टाकू या.

### ८.२ डरखीम यांच्या धर्मावरील पुस्तकातील महत्त्वाचे विचार

डरखीम यांचा शेवटचा मुख्य ग्रंथ "Elementary forms of relisious life" धार्मिक जीवनाचे प्राथमिक प्रकार'' १९१२ सालात प्रसिद्ध झाला आणि हा ग्रंथ सखोल अभ्यासाचा, व्यासंगाचा आणि मौलिक ग्रंथ म्हणून गौरवला गेला. त्यांनी त्यांच्या अगोदरच्या ग्रंथांनंतर खूप कालावधी गेल्यानंतर हा ग्रंथ लिहिला. हा एक उत्कृष्ट ग्रंथ म्हणून नावाजला गेला. त्याची कारणे दोन आहेत. पहिले म्हणजे धर्माचे समाजशास्त्र या विचारांचा पायंडा पाडणारा ग्रंथ म्हणून ओळखला गेला. दुसरे कारण असे की अनेक

तत्त्वज्ञानी आणि विचारवंतानी ज्या विषयावर, ज्या प्रश्नावर शतकानुशतके वादविवाद केला त्या प्रश्नाचे एक संपूर्ण वेगळे उत्तर या ग्रथाने दिले आहे. या सगळ्या प्रक्रियेमध्ये ज्ञानाचा समाजशास्त्रीय अभ्यास म्हणून मूलभूत अभ्यास सुरु झाला.

डरखीम यांच्या अगोदरच्या अभ्यासात त्यांनी असा निष्कर्ष काढला होता की सामाजिक विभाजन, सेंद्रिय ऐक्य, दाट लोकसंख्या, सामुदायिक जाणिवेचे क्षणिक, संपर्क साधनांची विपुलता आणि जगण्याची धडपड ही अधुनिक समाजाची लक्षणे आहेत. आधुनिक समाजाच्या या रोगांचे त्याला पक्के निदान होते म्हणून अखेर समाजाचे विघटन होईल या विचारांची त्यांना काळजी होती. त्यामुळे व्यक्तीचे सामुदायिकतेशी कसे पुनर्ऐक्य प्रस्थापित करता येईल याचा त्यांना ध्यास होता.

डरखीम यांनी असे सुचित केले आहे की समाजात धार्मिक कार्यकलाप होतात कारण त्यांना सकारात्मक बाजू आहे, त्याचे काम सकारात्मक आहे. त्याचा समाजातील नैतिक ऐक्य प्रबळ होण्यासाठी उपयोग होतो.

डरखीम यांनी धर्माच्या अभ्यासासाठी ऑस्ट्रेलियातील आदिवासी लोकांच्या धर्माची निवड केली कारण ही एक साध्या प्रकारची समाजरचना होती. त्यांना असा विश्वास वाटत होता की या सामाजिक संगठनेमध्ये सर्वसाधारणपणे सगळ्याच संगठनामध्ये जे आवश्यक असेल ते ते सगळे असेल त्यामुळे पारंपारिक समाजरचना आणि आधुनिक समाज रचनेमधला फरक प्रभावीपणे सांगण्यासाठी या समाजाचा उपयोग होईल. असे त्याना वाटले. त्यामुळे आधुनिक औद्योगिक समाजात नैतिक ऐक्यासाठी काय कमी पडते आहे हे समजून घेणे समाजशास्त्रज्ञांना सोपे जाईल.

डरखीम यांनी तोपर्यंत अस्तित्वात असलेल्या धर्माच्या उगमाच्या सिद्धांतांना विरोध केला. त्यांनी टेलरचा ॲनिमिझचा सिद्धांत म्हणजे प्रत्येक नैसर्गिक गोष्टीला आत्मा असतो. याचा विरोध केला कारण धर्माचे जे दोन मुख्य घटक आहेत, जे धर्माचे सार आहे त्या पवित्र आणि अपवित्र यातला फरक ते स्पष्ट करु शकत नाहीत. त्याचा असा ही विश्वास होता की टेलर आणि मॅक्स मीलर ह्यांच्या समजुतीत धर्म हे एक अस्तित्वातील अंग असून होटेमिझम म्हणजे कुलचिन्हवाद (प्रत्येक कुलाचे काही एक धार्मिक चिन्ह असते.) याच धर्माचा उगम होय. सगळ्या धार्मिक विश्वासाचा पाया गूढ अमानवीच शक्तीच्या संकल्पनेवर जी जीवनावर नियंत्रण ठेवते त्यावर आधारलेला आहे. डरखीम यांचे म्हणणे असे की ही शक्ती व्यक्तीवर समूहाचा जो प्रभाव असतो त्यातून निर्माण होते. कुलचिन्ह हे त्या शक्तीचे बाह्य आणि स्पष्ट दिसणारे प्रतीक आहे. त्यांच्यामते वस्तुतः काहीच पवित्र आणि अपवित्र नसते. ते तसे पवित्र आणि अपवित्र बनते. कारण व्यक्तींने त्या वस्तूला ते मूल्य प्रदान केलेले असते. पवित्रतेचे मुख्य लक्षण असे की ते त्या सांस्कृतिक दृष्ट्या नियम आणि निषेध म्हणजेच हे करा किंवा करु नका असे नियम ठरलेले असतात. यात नेमून दिलेले कर्मकांडविषयक पद्धती असतात आणि निश्चित असा संस्थात्मक संघटन त्याप्रमाणे प्रत्येक धर्माला एक तर चर्च असते किंवा एखादे मंदिर असतेत. हे एक नियमित झालेले विधीसोपस्कार असलेले संघटन असते आणि ते एका विशिष्ट अशा पूजा करणाऱ्या व्यक्तींच्या गटाचे असते. डरखीम यांनी धर्माची अशी व्याख्या केली की पवित्र गोष्टीविषयीचे सारखेच एकत्रित आचार विचार असतात. या सारख्या आचारविचारांच्या लोकांचा एक नैतिक समाज बनला जातो ज्याला चर्च म्हणतात, आणि चर्चला सगळेच मानणारे असतात. या पवित्र आणि अपवित्र गोष्टीशिवाय चर्मासंबंधी असलेल्या दुसऱ्या मूलभूत गोष्टींचाही सविस्तर अभ्यास केला त्या गोष्टी म्हणजे सणवार, कर्मकांड आणि रुढीच्या सगळ्याच धर्मात असतात. त्यांनी सकारात्मक, नकारात्मक आणि कर्मकांड किंवा अपेक्षेने केलेले कर्मकांड पापक्षालनार्थ किंवा पुण्यासाठी म्हणून काही विधी करणे असे तीन भाग केले आहेत आणि त्यातला फरक सांगितला आहे.

अ) नकारात्मक किंवा निषेधात्मक विधी, निषिदगोष्टी किंवा खाण्यापिण्याबाबत आणि स्पर्शाबाबत

बंदी यामुळे पवित्र आणि अपवित्र यांच्या संबंधात मर्यादा आणतात.

ब) या उलट सकारात्मक विधी हे धार्मिक समारंभाचा गाभा असतात. ते आवश्यक आहेत कारण धार्मिक समारंभाचा गाभा असतात. ते आवश्यक आहेत कारण धार्मिक आदर्शांशी असलेल्या बांधिलकीचे ते नवनीकरण करतात. अपवित्र अशा जगात व्यक्ती आपले स्वार्थी हित सांभाळत असते त्यामुळे तो नैतिक मूल्यापासून तो दूर जातो. याच नैतिक मूल्यांनी सामाजिक ऐक्य सांभाळलेले असते.

क) विशिष्ट कर्मकांड हे मूत्यूच्या प्रसंगात दिसून येतात. या कर्मकांडातून दु;ख दिसून येते. या विधीमूळे समुदायातले सगळे सदस्य एकत्रित येतात. त्या व्यक्तीच्या जाण्याने त्यांच्या ऐक्याला तडा पडण्याची भीती असते. ते सगळे मिळून रडतात, एकमेकांचा हात धरुन धीर देतात. त्यामुळे त्यांच्यातली एकत्र राहण्याची शक्ती वाढते. या विधी दोन प्रकारच्या धार्मिक शक्तीच्या अस्तित्वाचे प्रमाण देते. त्यापैकी एक चांगली शक्ती असते. दुसरी वाईट शक्ती असते. वाईट शक्ती आजारपण आणते, मूत्यू आणते आणि दुसऱ्यांचा विध्वंस घडवून आणते. या विशिष्ट विधीमुळे सामुदायिक कार्यशीलता चालू होते. आणि ती त्या गटासाठी उपकारक शक्ती ठरु शकते.

या सगळ्या विधी एक महत्त्वाचे कार्य करतात. आपल्या समाजात आपलेपणाची भावना वृद्धिंगत करणे आणि आपले विश्वास आणि आपल्या श्रद्धा बळकट करणे हा त्यांचा उद्देश असतो. त्यांच्या पद्दती आणि त्यांच्या विधी जे त्यांच्या विश्वासाचे आणि त्यांच्या नवनीकरणाचे प्रतीक असतात. त्यामुळे धर्म जीवित राहू शकतो.

इथे वरील विश्लेषण आणि श्रम विभाजनातले दुसरे विश्लेषण यातला संबंध स्पष्ट होतो. डरखीम यांनी अगोदर सांगितले आहे की लहान स्तरावचे पारंपारिक समाज त्यांच्यातल्या ऐक्यासाठी त्यांच्यात असलेल्या प्रबळ सामुदायिक जाणिवेवर अवलंबून असतात. एका समाज घटकांची निर्मिती होते म्हणजे वस्तुतः त्यांचे सगळे सदस्य समान विचार आणि समान भावनांचे पालन करतात. म्हणूनच अशा धार्मिक विश्वासातून जे विचार प्रकट होतात ते नैतिक विचार असतात ज्यांच्यावर समाजातील ऐक्य अवलंबून असते. धार्मिक समारंभात एकत्र आल्यामुळे व्यक्तीचे नैतिक विचार आणि त्यांच्या श्रद्धा दृढ होतात आणि यावर यांत्रिक ऐक्य आधारित असते.

डरखीम यांनी आस्ट्रेलियन आदिवासी यांचे विश्वास, श्रद्धा आणि पद्धती नुसत्याच समजून घेतल्या नाही तर त्या विश्वासामागची त्या श्रद्धांच्या मागची विचार करण्याची पद्धत आणि कारणेही समजून घेतली त्यांच्या आस्ट्रेलियन कुलचिन्हवादाच्या अभ्यासातून ज्ञानाचा सामाजिक सिद्धांत शोधून काढला. त्यांच्या मते धर्मातून नैतिक नियम आणि वैज्ञानिक विचारांचा उदय झाला आहे. या त्यांच्या सिद्धांताला पूरक म्हणून त्यांनी ज्ञानाच्या समाजशास्त्रीय सिद्धांतातल्या तीन सूचना केल्या आहेत.

१) प्रथम डरखीम यांनी दाखवून दिले आहे की प्राथमिक स्वरुपाचे वर्गीकरण हे विश्वाच्या धार्मिक प्रतिमांशी संबंधित किंवा संलग्न आहे. उदाहरणार्थ पेशींचे वर्गीकरण हे त्यांच्या समजातीय लक्षणांवर अवलंबून आहे आणि त्याची मांडणी स्तरीय प्रमाणात केली आहे.

२) दुसरे असे की डरखीम यांनी असे सांगितले की अपघात (Causality) ही कल्पना समाजातून पुढे येते. हे असे होते याचे कारण हे आहे की सामुदायिक जीवन हे शक्तीच्या कल्पनेला निर्माण करते, समाज स्वतःच माणसांना प्रभावी शक्तीची कल्पना देतो जी व्यक्तीपेक्षा जास्त श्रेष्ठ आहे.

३) तिसरी सूचना डरखीम यांनी हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे की अनुभाधिष्ठित संकल्पना

विरुद्ध माणसाच्या डोक्यातून किंवा कल्पनेतून उगम पावलेल्या संकल्पना म्हणजे प्रिओरिझम हा जो विरोधान्वय आहे. ज्ञानाचा समाजशास्त्रीय सिद्धांत त्याला टाळण्याचा मार्ग दाखवतो.

अनुभवाधिष्ठितता म्हणजे अनुभवातून आलेल्या संकल्पना प्रिओरिझम म्हणजे संकल्पना किंवा विभाग ज्या डोक्यातून उगम पावलेल्या असतात. (प्रियोहिझम) ज्यांना अनुभव नसतो.

## ८.३ धर्माचे कार्य

डरखीम यांनी धर्माच्या विविध प्रकारच्या स्वरुपापेक्षा धर्माच्या विशेष कार्यांचे स्पष्टीकरण करण्यावर भर दिला आहे. हॅरी अल्बर्ट, एक सर्वमान्य समीक्षक आणि डरखीमचे अभ्यासक, यांनी डरखीमच्या धर्माच्या कार्याचे चार प्रकार सांगितले आहेत. १) शिस्तशीर, २) संलग्न किंवा समूह संवर्धन ३) चेतनायुक्त ४) प्रसन्नतायुक्त किंवा उल्हासयुक्त.

धार्मिक विधी माणसांना सामाजिक जीवन जगण्यासाठी तयार करतात. त्यासाठी त्यांच्यावर ते स्वयंशिक्तीचा दबाव आणतात आणि काही प्रमाणात विरक्त वृत्ती तयार करतात.

धार्मिक प्रसंग किंवा धार्मिक सणवार लोकांना एकत्र आणतात आणि त्यांच्यातले संबंध दृढ करतात आणि सामाजिक ऐक्याची भावना बळकट करतात.

धार्मिक विचारांचे पालन करणारे लोक आपल्या सामाजिक परंपरेला आणि वंशानुगत प्रथांना चेतना देतात आणि आपल्या परंपरेतील टिकाऊ मूल्यांना पुढील पिढीपर्यंत पोचवतात.

शेवटी धर्म हे उल्हासयुक्त, प्रसन्नतेचे कार्य करत असते. निराशाग्रस्त आणि धर्मावरचा विश्वास उडालेल्या माणसांना ती त्यांची श्रद्धा प्रस्थापित करुन आनंदी जीवनाची आणि स्वकल्याणाची प्रेरणा देते. हे धर्माचे महत्त्वाचे कार्य होय.

## ८.४ नीतीमत्तेवरील डरखीम यांचे विचार

डरखीम यांनी त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच मानवी वागणूकीतल्या नीतिमत्तेच्या पैलूला महत्त्व दिले. त्यांना असे वाटत होते की समकालीन जगावर नीतिमतेचा म्हणजे वागणुकीच्या नियमांची जी पद्धत आहे, फार कमी प्रभाव आहे. व्यक्तींना काम करण्यासाठी निरनिराप्व्यवसाय असतात ते व्यवसाय करण्यासाठी ते स्वहीताने उपयुक्त होत नाहीत आणि ते स्वत:वर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. ज्या कुटुंबाने आपले परंपरागत आचार विचार सोडून दिले आहेत त्या कुटुंबातल्या सदस्यांवर त्यांचे नियंत्रण राहात नाही. स्थानीय गट म्हणजे खेडे किंवा शहर त्यांच्या सदस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा नीट पद्धत लावण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोहचू शकत नाहीत कारण त्यांच्या व्यवसायाचे क्षेत्र दूरपर्यंत पसरलेले असते. राज्यसरकार व्यक्तीपासून दूर राहते आणि सर्व साधने अपुरी असल्यामुळे विशेष व्यावसायिक गटावर ते देखरेख करु शकत नाहीत. त्यामुळे डरखीम यांची खात्री झाली होती की परिणामकारक नैतिक व्यवस्थेसाठी (समाजातली) सुसंघटित अश्या कार्यकुशल व्यवसायी गटाची आवश्यकता आहे. असा गटांना ते कार्पोरेशन्स असे म्हणतात.

डरखीमच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारचे कार्पोरेशन्स मध्ययुगीन युरोपीय देशात आणि रोमन साम्राज्यात अस्तित्वात होते. प्रत्येक गटाचे सदस्य एकाच कुटुंबातील आहोत असे समजत असत आणि

मुख्य म्हणजे त्यांचा देव एकच असे आणि त्यांचा पंथ एकच असे. परंतु शासनाच्या अतिरेकी नियंत्रणामुळे असे कार्पोरेशन्स जास्त काळ टिकू शकले नाहीत.

डरखीम यांना समकालीन समाजातल्या विचारपद्धतीच्या बदलत्या स्वरुपाबद्दल चिंता वाटत होती. आधुनिक जगात बुद्धिवादाचे प्रमाण वाढते आहे आणि बुद्धिवादी नैतिकतेवर जास्त भर दिला जातो आहे याची त्यांना चिंता वाटे. डरखीमना असे वाटते की आता नव्या माणसाला आपण समाजावर अवलंबून आहोत याची जाणीव व्हायला हवी. पूर्वी अशी ही जाणीव धार्मिक प्रतिनिधित्वाच्या माध्यमातून होत असे. आता धार्मिक विचारांसाठी बौद्धिक दृष्टीने काहीतरी पूरक शोधले पाहिजे. म्हणजे धार्मिक विचार समाजात जे काम करीत तसेच बौद्धिक विचारांनी काम केले पाहिजे त्यासाठी काहीतरी पुरक शोधले पाहिजे.

## ८.५ समीक्षा

डरखीम यांच्या कार्याला विरोध झाला आहे. कमीत कमी पाच देशातून त्यांच्यावर प्रखर टीका झाली.

१) ऑस्ट्रेलियन कुलचिन्हवाद हे धार्मिक विचारांचे प्राथमिक रुप आहे या डरखीम यांच्या गृहितकावर फार आक्षेप घेतले गेले. डरखीम यांनी आदिवासी समाजाचे तो समाज एकजिनसी असल्याचे तो समाज घट्ट संघटित असा कुलसमाज असल्याचे जे चित्र काढले होते त्याला विपूल संशोधन केलेल्या मानववंशशास्त्रज्ञांनी विरोध दर्शविला आहे.

२) डरखीम यानी पवित्र व अपवित्र यातला भेद अनुभवावर आधारित आहे आणि तो आदिवासी धार्मिक विचारातला आहे असे जे सांगितले आहे त्याला बऱ्याच टीकाकारांनी आक्षेप घेतला आहे. संकल्पनात्मक पातळीवर ही हे बरोबर नाही अशी त्यांची तक्रार आहे. त्याचे म्हणणे असे की वस्तूंचे दोनच भाग भेद कसे काय होऊ शकतात ? पवित्र आणि अपवित्राशिवाय वस्तू साद्या आणि ऐहिक सुद्धा असू शकतात.ते असेही म्हणतात की पवित्र आणि अपवित्र यांचा संबंध फक्त संपूर्ण विरोधाचे, द्वेषपूर्ण भावनेचे आहेत का दोन पूरक अश्या भिन्न विचारप्रणालीतील भेद असे आहेत.

३) डरखीम यांनी धार्मिक श्रद्धा आणि विधी यांचे जे स्पष्टीकरण केले आहे ते सखोल नाही, साधारण आहे अशी टीका झाली आहे. त्यांचे म्हणणे असे की धार्मिक पद्धतीचा जो गाभा आहे त्याच्या मूळ स्वरुपा बद्दल काही विचार केला गेला नाही. पवित्र वस्तूंची निवड ही महत्त्वाची नाही अश्या प्रकाराने या विषयाचा विचार डरखीम यांनी केला असे टीकाकारांचे म्हणणे होते. टीकाकारांना जास्त खेद होतो कारण आदिवासींचे हे जे विधी असतात त्यात आदिवासी वापरत असलेल्या शेतकी तंत्रज्ञानाच्या दृष्टीने या विधीमध्ये अभ्यास करण्याजोग्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

४) टीकाकारांचा जो चौथा गट आहे त्यांच्या मते समाज आणि धर्म, समाज आणि संकल्पनात्मक पद्धत यातला संबंध जो डरखीम यांनी दाखविला आहे तो फार अस्पष्ट आणि संदिग्ध आहे. डरखीम असे म्हणतात की समाज धार्मिक विचारावर फारसा प्रभाव टाकत नाही म्हणजे फारच थोडा प्रभाव टाकतो. कधी कधी ते असे म्हणतात तरी दुसरीकडे ते असेही म्हणतात की धार्मिक विचार हे निर्णायक असे अंग आहे आणि कधी कधी ते असेही म्हणतात की धर्म आणि समाज सारखेच आहेत.

५) शेवटी वैधता आणि सत्य या दोन्ही विचारांना सामाजिक पद्धतीत बसवण्याचा डरखीम यांचा जो प्रयत्न आहे त्यात बरेच तत्त्वज्ञानात्मक प्रश्न उपस्थित होतात असे काही टीकाकारांचे म्हणणे आहे.

वेगवेगळे टीकाकार डरखीम यांच्या कार्याबद्दल काहीही मत प्रदर्शित करीत असले तरीही डरखीम यांचे कार्य असामान्य आणि अतुलनीय आहे हे सत्य आहे. त्यांचे समाज शास्त्रातले योगदान फार महत्त्वाचे आहे.

## ८.६ सारांश

डरखीम यांच्या मते धर्म ही कल्पना फक्त सामाजिक निर्माण प्रक्रियेची नसून म्हणजे धर्म हा समाजाचे निर्माण नसून ते समाजाचे दैवतीकरणही आहे. ज्या दैवतांची माणसे एकत्रित होऊन पूजा करतात ते समाजाच्या शक्तीचे प्रतिबिंब आहे. जरी धर्माचे अस्तित्व टिकणारे असले तरी विज्ञान म्हणून त्यानी माघार घेतली पाहिजे आणि नैसर्गिक जगाचे स्पष्टीकरण केले पाहिजे.

**तुमची प्रगती तपासा**

१) धर्माचा मुख्य विचार कोणता आहे ?

२) धार्मिक जीवनाचे प्राथमिक प्रकार या संबंधी डरखीम यांचा मुख्य विचार कोणता आहे ?

३) धर्माचे कार्य कुठले आहे ?

## ८.७ प्रश्न

१) डरखीम यांच्या धर्मावरील पुस्तकाची चर्चा करा. त्या पुस्तकातील विचार स्पष्ट करा.

२) डरखीम यांच्या नीतिमत्तेवरील विचारांची चर्चा करा.

## ८.८ संदर्भ सूची

१) ॲब्राहिम फ्रॅन्सिस, १९८२, मॉडर्न सोशियालाजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) ॲब्राहम एफ, १९९१, सोशियालॉजिकल थॉट, मद्रास, मॅकमिलन.

३) ॲडम्स बी. एन. ॲड सैरी आर. अे. २००१, सोशियालॉजिकल थियरी, न्यू डेली, विस्तार

४) ॲरोन रेमंड, १९६५, मेन करंटस इन सोशियालॉजिकल थॉट । & ॥ ग्रेट ब्रिटन, वेल्डनफेल्ड ॲड निकोलसन

५) कोस लेविस, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालौजिकल थॉट (दुसरी आवृत्ती) हरकोर्ट ब्रास, जोवानोविच इंक,

६) फ्लेचर रोनॉल्ड २०००, द मेकिंग ऑफ सोशियॉलाजी, अ स्टडी ऑफ सोशियालाजिकल थियरी बिगनिंग ॲड फौडेशन, न्यू डेली, रावत पब्लिकेशन.

७) रिट्झर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थियरी (दुसरी आवृत्ती) न्यू यॉर्क, मॅकग्रा हिल पब्लिकेशन.

८) रिट्झर जॉर्ज, १९९६, मॉर्डन सोशियालॉजिकल थियरी (चौथी आवृत्ती) न्यू यॉर्क मॅक्ग्रा हिल पब्लिकेशन.

♦ ♦ ♦

# १

# मॅक्स वेबर

**प्रकरणाचे स्वरुप**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ नोकरशाही कायदेशी तर्कशुद्ध क्रिया
१.३ सत्ता आणि अधिकाराची भावना
१.४ तुमची प्रगती तपासून पहा.
१.५ सामाजिक क्रिया
१.६ सामाजिक क्रियांचे प्रकार
१.७ वेबरचा सिद्धान्त
१.८ सारांश
१.९ प्रश्नावली
१.१० संदर्भ सूची

## १.० उद्दिष्ट्ये

समाजातील नोकरशाहीच्या पद्धतीचा अभ्यास

वेबरच्या सत्ता आणि अधिकार त्यांच्या समाजशास्त्राचा अभ्यास

माणसांचे वर्तन आणि त्यांच्या क्रियांचा अभ्यास

## १.१ प्रस्तावना

तर्कशुद्धतेच्या प्रक्रियेतून औद्योगिक समाजाची वाढ झाली. ह्या दृष्टिकोनातून वेबरची अशी समजूत झाली की आधुनिक मोठमोठ्या उद्योग संस्था नोकरशाहीचा प्रशासनाच्या तत्त्वानुसार चालू शकतात. वेबरच्या नोकरशाहीच्या ह्या सिद्धांताबरोबरस त्याच्या सत्ता आणि अधिकार ह्या विभागांचा सुद्धा विचार करता येतो.

मॅक्स वेबरचा जन्म एरफूर्ट, जर्मनी येथे २१ एप्रिल १८६४ साली एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे आई वडील पूर्वापार चालत आलेल्या कॅथालिक छळामुळे प्रोटेस्टेट पंथाचे निर्वासित वंशज होते. वेबरचे वडील आणि आई अगदी भिन्न व्यक्तिमत्त्वाचे आणि नीती मूल्यांच्या विचारांचे होते. त्याची आई धार्मिक विचारांची कर्मठ अध्यात्मिक प्रवृत्ती असणारी ईश्वरांची भक्ती हे कर्तव्य मानणारी होती. तर त्याचे वडील प्रसिद्ध वकील, जर्मन मध्यममार्गी असून कुठलाही राजकीय पक्षाबद्दल किंवा सत्तेबद्दल आदर्श वादी विचारांचे नव्हते आणि अतिशय उथळ, भोगवादी प्रवृत्तीचे होते. आई वडिलांच्या प्रवृत्तीतील ह्या फरकांचा वेबरवर खोलवर परिणाम झाला. त्यामुळे त्याच्या पूर्ण बालपणांत आई वडिलांच्या परस्परांविरोधी

व्यक्तिमत्वामुळे तो सतत चिडलेल्या मन:स्थितीत असायचा.

वेबर लहानपणी लाजाळू आणि दुर्बळ होता. पण त्याला वाचनाची मनस्वी आवड होती. वयाच्या चौदाव्या वर्षी जी पत्रे लिहायचा, त्या होमर, सिसरो आणि इतर वाङ्मयीन विचारवंतांचा संदर्भ असायचा.

त्याच्या घरातील वातावरण असं होतं, त्याचे वडील अगदी कठोर शिस्तीचे होते. त्याची आई सतत त्याला आपल्याकडे ओढून ख्रिश्चन धर्माची मूल्य रुजविण्याचा प्रयत्न करायची. पण तरीही वेबर वर वडिलांचाच प्रभाव पडला. अठराव्या वर्षी वेबर ने हाइडेल बर्ग विद्यापीठात प्रवेश घेतला आणि वडिलांप्रमाणे कायद्याचे क्षेत्र निवडले. त्याने त्यांच्या वडिलांप्रमाणे कायद्याचे क्षेत्र निवडले, त्याने त्यांच्या वडिलाप्रमाणे द्वंद्वयुद्ध संस्थेत शिरून त्यात रस घेतला. तसेच त्याला पिण्याचीही सवय लागली. नंतर मात्र पूर्वीप्रमाणे लाजाळू न राहाता. तो अंगावर द्वंद्वयुद्धाच्या जखमा असलेला तगडा तरुण झाला.

ह्या गोंधळलेल्या अवस्थेत ही त्याने अभ्यासाडे लक्ष घातले. कायद्याखेरीज त्याने मध्ययुगीन इतिहासाचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. इमॅन्यूएल बेकूर कडे त्याने रोमन कायदे आणि रोमन संस्थांचा सखोल अभ्यास करुन हाइडेल बर्ग येथे ३ सत्र पूर्ण झाल्यानंतर तो स्ट्रॉसबर्ग येथील सक्तीच्या सैनिक नोकरीत दाखल झाला.

स्ट्रॉसबर्ग येथे तो त्यांचा मावशीच्या (इडा) आणि काकांच्या संपर्कात आला. ते काका म्हणजे इतिहासकार हर्मन बॉमगार्टनर. तो त्या कुटुंबाला सतत भेटायचा. ते त्याचे जणू दुसरे आईबापच झाले. माक्शी इडा एक जबरदस्त व्यक्तीमत्त्वाची, आणि दैववादातील पावित्र्यावर भक्ती असणारी स्त्री होती. वेबरच्या आईला जे जमले नाही. ते त्यांच्या मावशीने करुन दाखविले आणि वेबरचे मन धार्मिक अभ्यासाकडे वळविण्यात तिला यश आले. त्याच्या मावशीच्या दुराग्रही, कांहीशा हट्टी अशा धार्मिक वर्तणुकीचा, सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव असणाऱ्या स्वभावाचा. तसेच दानशूरतेच्या कामांचा वेबरवर खूप परिणाम झाला. बॉमगार्टनरच्या घरातच त्याने प्रोटेस्टंट पंथाचे सद्‌गुण अंगिकारले पण ख्रिश्चन धर्मावर त्याची श्रद्धा नव्हती.

## १.२ नोकरशाही कायदेशी तर्कशुद्ध क्रिया

वेबरला भांडवलशाही समाजाबद्दल जी आवड निर्माण झाली त्यामुळे मोठमोठ्या राजकीय, प्रशासकीय आणि आर्थिक संस्था ह्या तर्कशुद्ध नोकरशाहीच्या तत्त्वावरच चालू शकतात. ह्या विचारांनी त्याला वेढले. नोकरशाहीतील सुसंघटित कार्य पद्धती विषयी त्याने मांडलेली बाजू आधुनिक काळातील वेगळेपणा दाखविते.

''नोकरशाही'' हा शब्द युरोपमध्ये १८ व्या शतकाच्या मध्यात आला आणि पश्चिम युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे नोकरशाही उदयास आली. अल्ब्रो नोकरशाही ह्या शब्दाबद्दल असे स्पष्टीकरण देतो.

अ) एक सरकारी प्रणाली जिथे सत्ता अधिकाऱ्यांच्या हातात असते.

ब) अशा अधिकाऱ्यांची सामुहिक नेमणूक साधारणपणे नोकरशाहीतील सरकारी प्रशासन चालविते. वेबर नोकरशाही बद्दल सांगताना असे म्हणतो नोकरशाही हा औपचारिकरित्या सर्वोत्कृष्ट अशी तर्कशुद्ध पद्धती आहे. नोकरशाहीचे संयुक्तिक असे वर्णन करतांना त्यातील काळजीपूर्वक योजना आणि तर्कसंगत विचार, प्रशासकीय कर्तव्ये पार पाडतांना लक्षात घेतला जातात. आधुनिक नोकरशाहीच्या कामाच्या

पद्धतीत ही तर्कशुद्धता दिसते आणि अशी नोकरशाही भांडवलशाही समाजात सुसंगत वाटते. कारण त्यांत तर्कशुद्धता आणि कायदेशीर पद्धतीमुळे झालेला दर्जेदार फरक लक्षात येतो. वेबर नुसार नोकरशाहीची मुळे ही तर्कशुद्ध कायदेशीर अधिकारात असतात.

वेबरने तर्कशुद्ध कायदेशीर अधिकार पद्धती विषयी विचार मांडतांना खालील काही विधाने केली आहेत.

१) ह्या संघटनेत सतत चालू असणारी कार्यपद्धती लिखित नियमांनुसार बंधनकारक असते.

२) ही कामे स्वतंत्रपणे निरनिराळ्या क्षेत्रात विभागलेली असतात. ही क्षेत्रे प्रशासकीय अंगे आहेत, आणि प्रत्येक अंगाला आवश्यक असे अधिकार आणि मान्यता असते.

३) कार्यालयांची रचना असते त्यात पदस्तरांची किंवा श्रेणींची तत्त्वे पाडली जातात, म्हणजे खालच्या स्तराचे अधिकारी वरच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रण आणि देखरेखी खाली असतात. त्याचे अधिकार आणि कर्तव्ये स्पष्टपणे नमूद केलेली असतात.

४) ज्या नियमानुसार ही कामे केली जातात ती कामे कौशल्याची / कायदेशीर गोष्टीची असतात आणि ज्या माणसाला ह्या कौशल्याचे योग्य प्रशिक्षण दिले. आहे तोच अशा नेमणुकीसाठी लायक असतो.

५) संस्थांकडे असणारी साधने ही संस्थांमधील काम करणाऱ्या माणसांच्या वैयक्तिक साधनांपेक्षा अगदी वेगळी असतात.

६) प्रशासकीय कार्ये, निर्णय आणि नियम हे तयार करुन लेखित स्वरुपांत ठेवलेली असतात. त्यानुसार आणि कार्यालयांतील सातत्याने चालणारे काम हे आधुनिक कार्यालयांचा कामाचा केंद्रबिंदू आहे.

७) अशा तर्कशुद्ध कायदेशीर अधिकार असणाऱ्या पद्धती वेगवेगळ्या असतील, पण नोकरशाहीचा प्रशासकीय क्षेत्रात ह्या पद्धती पूर्णपणे शुद्ध स्वरुपात दिसतात.

वेबरनुसार नोकरशाही ही सर्वात जास्त तर्कशुद्ध अशी प्रशासकीय यंत्रणा आहे, कारण यांत संस्थांची उद्दिष्टे गाठण्यासाठी विचारपूर्वक रचना करून त्या संस्थांच्या सभासदांना अधिकार दिले असतात.

तर्कशुद्ध नोकरशाहीतील वैशिष्ट्ये सांगतांना वेबर त्यातील ठळक मुद्यांची यादीच पुढे देतो.

१) कार्यालयातील कर्मचारी वैयक्तिक रित्या स्वतंत्र असतात मात्र कर्तव्य पार पाडतात त्यांच्या व्यक्तिगत विचारांचा त्यात संबंध नसावा.

२) कर्मचारीपूर्णपणे निश्चित केलेल्या श्रेणी किंवा पदस्तरा प्रमाणे संघटित असावेत.

३) कार्यालयातील कामांचे स्वरुप सुनिधी केलेले असावे.

४) कार्यालयात व्यक्तीची भरती करताना ती करारांच्या स्वरुपांत केलेली असावी. म्हणजे तत्त्वतः भरतीची निवड मुक्तपणे करता येते.

५) कार्यालयात उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या कार्य कौशल्यावर आधारलेली असावी. बहुतांशी ही नियुक्ती त्या व्यक्तींच्या चाचणी परीक्षा, किंवा तांत्रिक प्रशिक्षणाचे प्रमाण पत्र किंवा दोन्हीवर अवलंबून असावी.

६) उमेदवारांची भरती करतांना त्याचा निश्चित पगार ठरवून नेमणूक करावी आणि त्यांना निवृत्ती

वेतनाचा अधिकार असावा त्यांची पगार श्रेणी ठरलेली असावी. त्यांना राजीनामा देण्याचा अधिकार ही असावा. आणि काही विशिष्ट परिस्थितीत त्यांना नोकरीहून काढता येण्याची मुभा असावी.

७) त्या पदावरचे काम हे त्या व्यक्तीचे एकमेव आणि मुख्य कर्तव्य असावे.

८) नोकरीत स्वतःचे कर्तृत्व दाखविण्याची कर्मचाऱ्याला संधी असावी. इथे ज्येष्ठता आणि कार्यक्षमता किंवा दोन्हीही गोष्टी लक्षात घेऊन बढती देण्याची पद्धत असावी.

९) कर्मचारी प्रशासनिक कर्तव्ये पार पाडतांना मालकी हक्कांची ढवळाढवळ असू नये.

१०) कर्मचाऱ्यावर शिस्तीचे कडक आणि पद्धतशीर बंघन असावे तसेच कार्यालयातल्या व्यक्तिगत वर्तणुकीवर नियंत्रण असावे. कर्तव्य पालन करतांना ते व्यक्ती निरपेक्ष असताने. कर्तव्ये पालन करतांना ते व्यक्ती निरपेक्ष असावे.

वेबरच्या मनातील आदर्श अशा पद्धतीच्या नोकरशाहीत ह्या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. अशा प्रकारची नोकरशाही ही उत्कृष्ट, तर्कशुद्ध पद्धत आहे. त्यामुळे कामाच्या परिणामाबद्दल भाकित करता येते आणि कौशल्यपूर्ण प्रशासनाचा एक परिपाठ तयार होतो. अतिशय मोठ्या भांडवलशाही संस्था ह्या स्वतःच कठोर, नमुनेदार नोकरशाहीची उदाहरणे असतात. कारण अशा उद्योग संस्थांचा कारभार अचूक आदर्श आणि विस्तृत कार्यप्रणालीवर अवलंबून असतो.

**वेबरच्या सिद्धांतावरची टीका :**

वेबरच्या सिद्धांतावर बऱ्याच प्रमाणात टीका झाली. वेबर नोकरशाहीचा खंदा पुरस्कर्ता आहे आणि त्याच्यामते नोकरशाही हीच प्रशासनाची सर्वोत्तम पद्धती आहे. अशी टीका त्याच्यावर झाली. वेबरने नोकरशाहीच्या पद्धतीच्या कार्यक्षमते बद्दल कितीही चांगले लिहिले असले, तरी वैयक्तिकरित्या किंवा वाडवडिलांपासून चालत असलेल्या प्रशासनाच्या तुलनेने ही चांगले आहे, कारण त्यांतील परंपरात्मक अधिकारामुळे प्रशासन गुंतागुंतुचे होते आणि म्हणूनच आधुनिक नोकरशाहीचे बीज त्यातून उदयास आले. त्यांत तर्कशुद्धता आहे.

फ्रॅक पार्किंगच्या म्हणण्यानुसार वेबर ने हे तत्त्व चांगल्या पद्धतीने मांडलेले आहे. म्हणजे वेबरने निवड केलेल्या आणि त्याने भर दिलेल्या नोकरशाहीची तत्त्वे वैशिष्ट्यपूर्ण आहेत असे त्याला वाटते. वेबरने सांगितलेल्या औपचारिक श्रेणींचा दर्जा आणि अधिकाऱ्यांची कार्य पद्धती, नियमांचे अनुसरण आणि योग्यते नुसार बढती ह्यांचा समावेश आहे. वेबर सुचवितो की नोकरशाही ही इतर कार्यपद्धती पेक्षा तांत्रिक दृष्ट्या वरचढ आहे. अशा प्रकारची नमुनेदार आदर्श नोकरशाहीची तो इतर म्हणजे अनुभवावर आधारलेल्या संस्थांमधील नोकरशाहीची तुलना करीत नाही. तांत्रिकदृष्ट्या श्रेष्ठ असलेली ही नोकरशाही, हे सत्य आहे, आणि त्याला कुठल्याही अनुभवसिद्ध साक्षीची जरुर नाही, असे त्याने सांगितले आहे. ही टीका अनुभवावर आधारलेली असून त्यातून औद्योगिक समाजशास्त्रात फार मोठे योगदान झालेले आहे.

## ९.३ सत्ता आणि अधिकाराची भावना

वेबरची सत्तेबदलची कल्पना, जर्मनी झालेल्या औद्योगिक कारणातून समजाऊन घेतली पाहिजे

असे त्याने लिहिले आहे. मार्क्स नुसार भांडवलशाहीचे औद्योगिकरण ब्रिटन मध्ये सुरु झाले. नवीन रचनेचा समाज, सशक्त अशा मध्यमवर्गीय लोकांमध्ये उत्स्फूर्तपणे आला. जर्मनीनधला मध्यवर्गीय समाज तसा लहान आणि प्रभावहीनच राहिला. नवीन जमीदार आणि सरदार ज्यांच्याकडे परंपरागत अधिकार आणि सत्ता होती त्यांनी औद्योगिककरण संपादन केले. जर्मनीत अर्थव्यवस्थेचे भांडवल शाहीत रुपांतर झाले. पण ही भांडवलशाही राज्यांतील योजना आणि प्रशासनामुळे झाली. जर्मनीतील औद्योगिकरण, इंग्लंडप्रमाणे वस्त्रोद्योगामुळे झाले नाही तर ते युद्ध सामुग्रीचा उद्योगामुळे झाले.

म्हणून वेबरने इतिहासाकडे समाज संघर्षाचा वारसा म्हणून पाहिले नाही. त्याच्या मते तो सत्तेचा संघर्ष होता. वेबरने सत्तेची व्याख्या ''क्रिया आणि त्यांचा अर्थ'' अशा शब्दातून केली. एखाद्या नटाने प्रतिकूल परिस्थितीतही आपले कौशल्य दाखून सत्तेचा आदर्श नमूना आणि कायदेशीर वर्चस्व दाखवावे अशी शक्यता अशी व्याख्या केली. ( ? ?)

मार्क्स नुसार सर्व सत्ता आर्थिक साधने ताब्यांत असण्यावर अवलंबून होती आणि सर्व सामाजिक संघर्षाचे रुप घेतात. वेबरचे विश्लेषण मात्र जास्त गुंतागुंतीचे होते. तो सामाजिक वर्ग त्यांचा दर्जा आणि पक्ष ह्यांच्यातील फरक सांगतो. ह्या वर्गीकरणाने सत्तेचे विभागीकरण होते. वेबरनुसार सत्तेचे समाजशास्त्र दोन दृष्टीकोनांतून पाहिले पाहिजे.

अ) सामाजिक वर्ग, दर्जा आणि पक्ष ह्यांचे विभागीकरण.

ब) कायदेशीर प्राबल्य किंवा वर्चस्व.

**सत्तेचे सामाजिक वर्ग आणि दर्जानुसार विभाजन :**

कुठल्याही सत्तेच्या विश्लेषणांत तीन दिशा असतात, त्या म्हणजे सामाजिक वर्ग, दर्जा आणि पक्ष.

सामाजिक वर्ग : वेबरनुसार सामाजिक वर्ग म्हणजे समाजाचा आर्थिक स्तर, जिथे क्रयशक्तीचा संबंध असतो, तो महत्त्वाचा असतो. क्रयशक्तीचा हा संबंध माणसाच्या एखादी वस्तू विकत घेण्याच्या किंवा सेवा घेण्याच्या ऐपतीशी असतो. परिणामतः समान आर्थिक स्तरातील लोक साधारणपणे क्रय शक्तीच्या बाबतीत ही समान स्तरावर असतात. स्पष्टीकरण देताना पुढे जाऊन तो म्हणतो वस्तूंची मालकी आणि कामगारांवर नियंत्रण करण्याची शक्ती ही मार्केटच्या परिस्थितीच्या संदर्भातच असते. समान आर्थिक स्थिती असलेल्या लोकांमध्ये ध्येय प्राप्तीच्या संधीही सारख्याच असतात.

सामाजिक वर्गीकरणाचे उपविभाजन असे करता येतेः

१) घरातल्या साधन संपत्तीचा उपयोग करुन उत्पन्न मिळवणे.

२) गिऱ्हाइकांना माल विकून किंवा त्यांचा जरुर असलेली सेवा देऊन उत्पन्न मिळवणे.

३) सामाजिक परिस्थितीनुसार झालेले वर्ग असतात. त्यातील लोकांना एकमेकांत मिसळणे सोपे जाते.

वेबरची भांडवलशाहीच्या सामाजिक वर्गीकरणाची कल्पना अशी होती :

अ) समाजात वर्चस्व असणारे उद्योजक आणि सपंत्ती जवळ असणारा वर्ग.

ब) मध्यमवर्गीय, संपत्ती असणारे, पण ज्यांच्याकडे कामाला मजूर नाहीत असा वर्ग

क) संपत्ती नसणारे पांढरपेशे आणि बुद्धिमान लोक आणि तंत्रज्ञांचा वर्ग.

इ) मजूरी करुन जगणाऱ्यांचा वर्ग.

हे वर्गीकरण विश्लेषण करुन काढलेले आहे.

**दर्जा :**

''दर्जा'' ह्याचा संबंध आर्थिक परिस्थितीशी नसून त्यांना समजात मिळणाऱ्या संधीशी आहे. वेबर नुसार हा दर्जा त्यांना मिळालेल्या मानावर आणि प्रतिष्ठेवर अवलंबून असतो. समान आर्थिक परिस्थितीत सुद्धा लोकांचा सामाजिक दर्जा भिन्न असू शकतो. कांही जणांना त्यांच्या समाजातील लोकांकडून मान सन्माम मिळत असतो. असा दर्जा मिळालेले लोक त्याची जाणीव ठेऊन असतात. अशा लोकांचे रहाणीमान ही विशिष्ट प्रकारचे होते आणि त्यांचा रहाणीमानानुसार त्यांच्यावर काही बंधने ही येतात. अशा प्रकारचा वर्ग धार्मिक कार्यावर सुद्धा आधारित असतो.

**पक्ष :**

एका विशिष्ट प्रकारचे ध्येय मनात ठेवून तर्कशुद्ध संघटना तयार करतात आणि त्यात मिळेल त्या संधीनुसार काम करतात. आर्थिक वर्गीकरणाप्रमाणे किंवा दर्जानुरूप पक्ष तयार होतात. पक्ष तयार केल्यानंतर, त्यात पद,मान मिळवून समाजाला नियंत्रित आणि सुसंघटित करण्याचा प्रयत्न करतात. आणि अशा तऱ्हेने पक्षांची स्थापना होते.

वेबरच्या म्हणण्यानुसार राजकीय कार्याची वैशिष्ट्ये खाली दिल्या प्रामाणे आहेत :

१) ह्या सगळ्या हालचाली ठराविक भौगोलिक प्रांतात होतात. उदा प्रदेश, राज्य वगैरे.

२) ह्या राजकीय हालचाली आणि त्यांचे वर्तन ह्या गोष्टी त्या प्रदेशातील लोकांपुरत्याच मर्यादित असतात.

३) ह्या राजकीय हालचाली वर्चस्व आणि कायदेशीर हक्कांच्या संघर्षासाठी असतात.

**कायदेशीर वर्चस्व :**

वेबरच्या सिद्धांतानुसार वर्चस्व ही एक विशिष्ट प्रकारची सत्ता असते. वर्चस्व ह्याचा अर्थ असा की त्या पक्षाच्या लोकांच्या समूहाला काही विशिष्ट संदर्भात केलेल्या आज्ञांचे ते लोक पालन करतात. वर्चस्व दोन प्रकारचे असते. एक म्हणजे आर्थिक साधनांमुळे आलेली मक्तेदारी आणि त्यामुळे आलेले वर्चस्व ! वेबरला दुसऱ्या वर्चस्वाबद्दल सांगायचे आहे ते असे की हुकुमशाहीच्या ताकदीने केलेल्या आज्ञा ! ह्या खऱ्या वर्चस्वाने केल्या गेलेल्या आज्ञा नुसत्या दिल्याच जात नाहीत, तर त्या खुशीने पाळल्याही जातात. ह्या वर्चस्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या अधिकारांची ताबेदारी लोक स्वीकारतात. जुलुम जबरदस्तीने नव्हे, तर आपखुशीने आज्ञा पाळणे हा वर्चस्वाचा मूलभूत पाया आहे. थोडक्यात वेबरच्या मते वर्चस्व म्हणजे कायदेशीर पद्धतीने आलेला अधिकार आहे.

वेबर नुसार कायदेशीर वर्चस्वाचे किंवा अधिकाराचे तीन प्रकार आहेत:

१) परंपरागत वर्चस्व, रुढी आणि परंपरांवर अवलंबून असते.

२) वैयक्तिक प्रभाव आणि भारदस्त मोहून टाकणारे व्यक्तिमत्त्व त्यामुळे आलेले वर्चस्व.

३) कायदेशीर तर्कशुद्ध वर्चस्व जे नियम आणि कायद्याचा अभ्यासातून आलेले असते.

परंपरागत आलेले वर्चस्व हे जुन्या चालीरिती आणि रिवाजानुसार आलेले असते.

परंपरागत अधिकारेचे ३ प्रकार आहेतः

१) लहानशा खेड्यातल्या जाती जमातीत किंवा टोळ्यांमध्ये वडीलधाऱ्या व्यक्तीना वय परत्वे आलेल्या अनुभवातून ज्ञान प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांना कायदेशीर अदिकार प्राप्त होतात. हे अधिकार ते स्वतः वापरतात आणि त्यांच्या हाताखाली कुणी ही नेमलेले नसते.

२) पितृसत्ताक पद्धतीने आलेला अधिकार हा घरातल्या कुटुंब प्रमुखाला असतो. हा अधिकार वारसा नियमानुसार नंतरच्या पिढीकडे जातो.

३) पितृकसत्ताक पद्धतीने आलेला अधिकारी (किंवा राजा) प्रशासना करिता इतर अधिकाऱ्यांची नेमणूक करतो. हे अधिकारी मुख्य अधिकाऱ्यांशी वैयक्तिक रित्या एकनिष्ठ असतात. सुलतानशाही मध्ये आणि युरोपमधील राजघराण्यामध्ये ह्याची उत्तम उदाहरणे आहेत. परंपरागत वर्चस्व हे तो राजा आणि त्याच्या अगदी जवळचे अधिकारी ह्यांचेच असायचे.

वैयक्तिक प्रभावाने आलेले वर्चस्व हे व्याख्येनुसार असामान्य असे आहे. वेबरनुसार एखाद्या व्यक्तीजवळ असे कांही गुण असतात, ज्यामुळे त्याला असामान्यत्व प्राप्त होते. आणि त्या व्यक्तीजवळ अलौकिक आणि असाधारण शक्ती असते. त्यामुळे त्याचे समाजात वर्चस्व असते. अशा व्यक्ती कुठल्याही समाजात आणि इतिहासाचा संदर्भात दिसतात. असे अधिकारी धर्मिक, किंवा सामाजिक क्षेत्रात असतात. आणि त्यांचे अधिकार समाजातील त्यांना मानणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या विशेष कार्यासाठी दिलेले असतात.

अशा अधिकाऱ्याजवळ त्यांच्या कामासाठी कुणी प्रशासकीय सहाय्यक किंवा मदतनीस नसतात, किंवा त्यांच्या कामकाजाचे नियमही ठरलेले नसतात. अशी माणसे फक्त आपल्या अलौकिक कर्तृत्वावर अवलंबूनच, त्यांचा अनुयायांना आपली मते पटवून देऊ शकतात.

ह्या अलौकिकत्वामध्ये एक क्रांतिकारक प्रभाव असतो. ह्या प्रभावानेच ते समाजात क्रांतीकारी बदल घडवून आणू शकतात. असे प्रभावी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या माणसांच्या वर्चस्वाची तर्कसंगत अशा पद्धतीत प्रतिक्रिया होऊ शकते.

मात्र, अशा प्रकारच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाने आलेल्या वर्चस्वाचे अधिकार टिकणारे नसतात. कारण त्यांच्या मृत्युनंतर वारसाचे संकट येते. मुलाकडे किंवा मुलीकडे ते अधिकार आले तर ते परंपरागत वर्चस्व होते, आणि त्यासाठी जर एखादी प्रशासकीय कार्यपद्धती अवलंबिली, आणि कार्यालय केले तर त्याला कायदेशीर, संयुक्तिक अधिकार प्राप्त होतात.

**तुमची प्रगती तपासून पहा.**

१. नोकरशाहीबद्दल तुम्हाला काय वाटते ?

२. वेबरच्या नोकरशाहीच्या संबंधातील लिखाणावरच्या टीकांची कारणे द्या.

## ९.५ सामाजिक क्रिया

वेबरच्या अभ्यासात मुख्यत्वे मानवी कार्यकारण भावाचे शास्त्रीय दृष्ट्या विश्लेषण शक्य आहे का हे पाहण्याचा दृष्टीकोन होता. समाजशास्त्राच्या विश्लेषणात क्रिया आणि त्याचा अर्थ हा मध्यवर्ती मुद्दा होता.

वेबरने समाजशास्त्राची व्याख्या अशी केली, समाजशास्त्र हे स्वत:शीच निगडीत अशा स्पष्टीकरणातून सामाजिक कार्यकारण भाव आणि त्याचे परिणाम दाखविणारे शास्त्र आहे. ह्या व्याख्येतून आपल्याला असा अर्थ काढता येईल की वेबर नुसार समाजशास्त्र हे सामाजिक क्रियांबद्दल सर्वकष माहिती देणारे शास्त्र आहे.

वेबरच्या मते मानवी क्रियेला जेव्हा एखादी व्यक्ती त्याच्या किंवा तिच्या वागण्यातून उघडपणे, गुप्तपणे किंवा मुक संमतीने व्यक्तिनिष्ठ अर्थ देते तेव्हा ती सामाजिक क्रिया असते. अशा व्यक्तिनिष्ठ अर्थातून त्या व्यक्तीच्या सामाजिक क्रियेचा अभ्यास करायला हवा.

वेबरच्या म्हणण्यानुसार अ) इतरांशी वागताना ब) किंवा अशा अर्थपूर्ण क्रिया ज्यांना स्पष्टीकरण जरुरी असते असे मानवी वर्तन ही क्रिया होते. वेबरच्या मते समाजशास्त्राच्या स्पष्टीकरणाचे हे मूलभूत तत्त्व आहे.

वेबरच्या दृष्टीने समाजशास्त्र हे फक्त 'सामाजिक क्रिया' आहे . त्याच्या मते इतर प्रकारचे वर्तन उदा. प्रतिक्षिप्त क्रियांचे वर्तन (Reflex behaviour) हे समाज शास्त्रीय विश्लेषणाच्या अभ्यासाचा भाग नाही. त्याच्या म्हणण्यानुसार, मानवी क्रियांचे ४ भागात वर्गीकरण केले आहे.

## ९.६ सामाजिक क्रियांचे प्रकार

वेबरनुसार क्रियांचे चार प्रकार आहेत ते असे :

१) अशी एक तर्कशुद्ध / तर्कसंगत क्रिया, जिथे व्यक्ती फक्त ध्येयाकडे लक्ष ठेवून क्रिया करते, ही क्रिया करतांना त्यात भावनांचा किंवा परिणामांचा विचार करीत नाही. तो त्या क्रियांच्या तर्कशुद्ध परिणामांचाच विचार करतो. त्यामुळे त्याच्या क्रिया भावनेने निश्चित केलेल्या किंवा परंपरात्मक विचारांच्या नसतात. परस्पर विरोधी ध्येयांचा विचार करतांना तो ते ध्येय मिळविताना, फक्त तर्कशुद्धतेचाच विचार करतो. (zweckrational action).

२) दुसऱ्या तऱ्हेची तर्कसंगत पद्धत (werk rational) जिथे ध्येय पूर्तीचा विचार करतांना, नैतिक, अभिरुचीपूर्ण, धर्मिक मूल्यांचा विचार करुन केलेली क्रिया. इथे परिणामांचा विचार केला जात नाही. एखादे उद्दिष्ट लक्षात घेऊन ते गाठतांना सर्व गोष्टींचा विचार करुनच क्रिया केली जाते. क्रिया फक्त परिणामांचा विचार न करता फक्त विशिष्ट ध्येय ठरवूनच केली जाते. ही तर्कशुद्ध क्रिया एखाद्या आवेशाचे पालन करताना त्याचा मूल्ये लक्षात घेऊन केलेली असते. उदाहरण द्यायचे झाले तर आत्मघातकी हत्या होणारी क्रिया ह्यात कांही मूल्ये लक्षात घेऊन अंतिम परिणामांचा विचार न करता केलेली असे.

**३) भावनिक आवेशाने केलेली क्रिया :** क्षणिक भावनेने केलेली ही क्रिया असते, किंवा भावनांचा तो उद्रेक असतो. त्या क्षणी केलेल्या क्रियेने त्या व्यक्तीला लगेच आनंद, सुख किंवा सूड घेतल्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या समाधान मिळते. इथे परिणामांचा विचार न करता त्या क्षणी क्रिया केल्याचे समाधान असते.

४) परंपरागत चालत आलेल्या रिवाजानुसार केलेली क्रिया, ही क्रिया जुन्या लागलेल्या सवयीनुसार किंवा परंपरेनुसार घडत असते. आपल्या रोजच्या व्यवहारांत अशा क्रिया न कळत घडतच असतात.

क्रियांचे हे प्रकार पूर्णपणे अमूर्त स्वरुपाचे आहेत आणि हे प्रकार वेबरच्या सामाजिक विश्लेषणातून आलेले आहेत. वेबरचे हे क्रियांच्या प्रकारांचे वर्गीकरण १) निरनिराळ्या प्रकारच्या क्रियांमध्ये फरक दर्शवितात. २) सामाजिक क्रियेतील ऐतिहासिक सुधारणा कशी झाली ह्याचा शोध घेण्यासाठी त्यांची मदत हे वेबरच्या सामाजिक क्रियांचे वर्गीकरण संपूर्ण समाजालाच लागू होते. एखाद्या व्यक्तीला नाही. अशा रितीने आधुनिक औद्योगिक समाजामध्ये क्रमांक एक मध्ये दिलेल्या (Zweckration action) क्रियेचे उदाहरण पाहण्यास मिळते. वेबर ह्या क्रियांना ''तर्कशुद्धता'' असे म्हणतो. औद्योगिक संस्थांमध्ये ह्या संयुक्तिक / तर्कशुद्ध क्रियांनी मंत्रतंत्र किंवा धार्मिक विश्वासांवर मात केली आहे.

वेबरच्या विश्लेषणाचे एकक पक्क्या विचाराने काम करणारे लोक आहेत. स्पष्टीकरणात्मक समाजशास्त्र हे व्यक्ती आणि त्यांच्या क्रिया हे एकक, हे 'अणू' मध्यवर्ती बिंदू समजते. व्यक्ती हीच फक्त अर्थपूर्ण वर्तनाचे वाहक आहे. 'राज्य' 'संघटना' किंवा 'सरंजामशाही' ह्या संकल्पना माणसामाणसांमधील परस्पर क्रिया दर्शवितात म्हणून समाजाचे हे कर्तव्य आहे की ह्या संकल्पना सोप्या करुन समजू शकतील अशा पद्धतीने माणसांच्या क्रिया दर्शवितील.

वेबरच्या दृष्टीने समाजशास्त्र हे सामाजिक क्रियेतील वर्तनाचे सर्वंकष शास्त्र आहे ज्यांत एखाद्या ध्येया करता तर्कशुद्ध क्रिया आणि मूल्ये एकत्र लक्षात घेऊन त्याचा अभ्यास केला जातो.

आर्थिक बाजू बद्दल विचार मांडताना वेबरने सामाजिक जीवनाचा अनेक पद्धतीने विचार केला आहे आणि त्यात फरक करतांना फक्त 'आर्थिक विचार' (म्हणजे अर्थशास्त्राशी संबंध असलेले) किंवा आर्थिक गोष्टींनाही थोडे बहुत प्राधान्य देऊन केलेल्या गोष्टींचा समावेश आहे.

फक्त 'आर्थिक विचार' म्हणजे आर्थिक गोष्टीसंबंधित अशा संस्था उदा. बँका, शेअर बाजार, कारखाने ह्याच गोष्टींचा प्राधान्याने विचार. इतर काही क्षेत्रात फक्त आर्थिक विचार नसला तरी आर्थिक गोष्टींशी त्या निगडित असतात. उदा. धर्म कारण. ह्यात आर्थिक बाबींचा विचार नाही, पण ह्याचाही आर्थिक गोष्टींशी संबंध आहे. कारण धार्मिक गोष्टींसाठी पैसा हा लागतोच. वेबरने धार्मिक नीतीमत्ता आणि आर्थिक गोष्टींचा संबंध लावण्याचा प्रयत्न केला आहे.

आणि शेवटी (आर्थिक विचारांचा ) कला आणि कलात्मक दृष्टी ह्या गोष्टींचा प्रत्यक्ष आर्थिक संबंध नसला तरीही ह्या गोष्टीसुद्धा आर्थिक बाबीशी निगडित आहेत. कारण कला, संस्कृती, सौंदर्यदृष्टी ह्या सर्व गोष्टींना आर्थिक पाठबळ लागतेच. ह्या मुद्यामधला फरक मुख्य सामाजिक संस्थांचा संबंध दाखविणे जरुर आहे. कारण त्याने सामाजिक संस्थांचे विश्लेषण स्पष्टपणे दिसू शकते. वेबरने (तसेच मार्क्स नेही) फक्त, 'आर्थिक', 'आर्थिक गोष्टीशी निगडित' आणि 'आर्थिक गोष्टीशी संबंधित' अशा सर्व संघटनांच्या अस्तित्वाशी असलेल्या अर्थशास्त्राचा विचार केला आहे. वेबरने आयुष्यभर ह्या गोष्टीचा अभ्यास केला.

## ९.७ वेबरचा सिद्धान्त : प्रोटेस्टंट नीतीमत्ता आणि भांडवलशाहीचा आत्मा

वेबरचा सिद्धांत : वेबर विचारतो, ''समकालीन युरोपमध्ये उद्योगपती, भांडवलदार, किंवा कुशल तंत्रज्ञ आणि व्यापार कुशल लोक बहुतांशी प्रोटेस्टंटस् आहेत, असे का ? त्याचे म्हणणे असे की हे फक्त समकालीन युरोपातच नाही, तर एक ऐतिहासिक सत्य सुद्धा आहे.

एखाद्या विशिष्ट धार्मिक नीतीमत्तेचा आणि आर्थिक संबंधाचा त्याने विचार केला, तेव्हां त्या काळाच्या संबंधांच्या विचाराबद्दल आणि इतर ठिकाणांमध्ये त्यांच्या कारणांबद्दल सांगत असला तरी, त्याचे म्हणणे असे होते की कारणांच्या साखळीचा तो एकाच बाजूने विचार करीत आहे. आणि तो म्हणजे धार्मिक मूल्यांचा आर्थिक धोरणांशी संबंध आहे. वेबरला त्याच्या ह्या प्रयत्नांच्या मर्यादांबद्दल कल्पना आहे, आणि त्याला आशा आहे की धार्मिक शक्तींची विशेषतः आधुनिक युगाचा सांस्कृतीक सुधारणांचे जाळे पसरण्यात जी भूमिका आहे, त्यात निरनिराळ्या ऐतिहासिक गोष्टींच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा भाग आहे हे स्पष्ट होते.

प्रोटेस्टंट पंथाच्या उदयामुळे भांडवलशाही निर्माण झाली असे वेबरचे म्हणणे नाही. हे त्याहीपेक्षा अधिक गुतागुंतीचे आहे हे सांगण्याचा त्याचा प्रयत्न आहे. प्रोटस्टंट पंथ आणि भांडवलशाही संस्कृतीतील जवळीकता त्यांने सांगितली. त्याच्या म्हणण्यानुसार सर्वसंग परित्याग केलेल्या (निरिच्छ) प्रोटेस्टंट पंथाने आधुनिक आर्थिक प्रणालीत एकंदरीत बरेच योगदान केले आहे. ह्याचे परिणाम करणे कठीण असले तरी वेबरच्या सिद्धांताचा अभ्यास करणे जरुरुचे आहे.

**भांडवलशाहीचा आत्मा:**

भांडवलशाहीची व्याख्या करताना वेबर म्हणतो, भांडवलशाही ही एक अपूर्व घटना आहे, ज्यात अनेक गुंतागुंतीच्या संस्था आहेत, ज्यात एक तर्क संगती आहेत, आणि हे वैशिष्ट्य पाश्चिमात्य संस्कृतीत उदयाला आलेल्या सुधारणांचा परिणाम आहे. वेबरच्या मते भांडवलशाही दोन प्रकारांनी अद्वितीय अशी आहे. एक म्हणजे पाश्चिमात्य इतिहासात ही आदी नाही आणि दुसरे, पूर्वेकडे उत्स्फूर्तपणे ही कधीच उदयास आली नाही. वेबर असे ठासून सांगतो की ह्या तर्कशुद्धतेची बीजे युरोप मध्ये होती. तर्कशुद्ध, स्थिर औद्योगिक संस्था, संयुक्तिक हिशेबीपणा त्याच्याशी तर्कसंगत कायदा त्याला पुरक असे तर्कशुद्ध चैतन्य आणि तसेच आर्थिक, नैतिक धोरणे ह्या गोष्टी कारणीभूत होत्या, ज्यामुळे आधुनिक भांडवलशाहीची वाढ झाली. ध्येय पूर्तीकडे जाणारी ही वाढ होती. (zweckrational) तर्कशुद्धता हा भांडवलशाहीचा आत्मा आहे हे त्याचे मूलतत्त्व तत्त्व होते.

वेबरच्या म्हणण्यानुसार भांडवलशाही काय आहे तर ती फक्त संपत्तीची हाव नाही. बऱ्याच परंपरागत

समाजानी हे दाखून दिले आहे. भांडवलशाहीचे वैशिष्टपूर्ण लक्षण असे की ती वैयक्तिक फायद्या करता नाही तर ते शिस्तबद्ध बंधन असल्याचे कर्तव्य समजून केलेले काम आहे. त्यात संपत्ती गोळा करण्याची एक निष्ठता आहेच. पण त्याच बरोबर ही संपत्ती वैयक्तिक सुखासाठी वापरायची नाही हा विचार आहे. भांडवलशाहीचा आत्मा आणि पूर्वीची प्रोटेस्टंट श्रद्धा ह्यात सादृश्य आहे. तर्कशुद्ध चैतन्य आणि प्रोटेस्टंट नैतिकता ह्यांचा शोध वेबर घेतो. तेव्हा त्याला हे कळते की ही नैतिकता म्हणजे एक आवश्यक आणि पूरक बाब आहे.

**प्रोटेस्टंट नीतीशास्त्र:**

वेबर च्या निरक्षणानुसार तो प्रोटेस्टंट्स आणि कॅथॉलिक्स मधील मुख्य फरकांचा विचार करतो. त्यांच्या मते प्रोटेस्टंटचा कल तांत्रिक, औद्योगिक आणि वाणिज्य ह्यांच्या अभ्यासाकडे आणि धंद्याकडे तसेच भांडवल वादाकडे जास्त होता, तर कॅथॉलिक्स परंपरागत कलाशाखांचा अभ्यास करणे किंवा वाङ्मयाचा अभ्यास करणे पसंत करायचे. कामगारात सुद्धा कॅथॉलिकांनी परंपरागत हस्तकलांना जास्त पसंती दिली, तर प्रोटेस्टंटसनी औद्योगिक कौशल्य आत्मसात केले, व त्यानुसार व्यवस्थापनाच्या नोकऱ्या मिळवल्या.

दोन पंथांतील घरी मिळालेल्या धार्मिक शिक्षणातील संस्कारात आणि त्यांच्या मूल्यात असलेला फरक वेबर समजाऊन सांगतो. तो म्हणतो की त्यांचे आधुनिक व्यापार जीवनात कॅथॉलिकांचे प्रतिनिधित्व त्या मानाने कमी होते. तर प्रोटेस्टंटस मग ते समाजातल्या वरच्या स्तरातील असो किंवा खालच्या, बहुसंख्य असो किंवा अल्पसंख्य , सर्वामध्ये आर्थिक तर्कशुद्धतेची भावना जास्त प्रमाणात होती. हा फरक त्यांच्या धार्मिक श्रद्धेतील शाश्वत मूलभूत स्वभावाचा होता आणि अधार्मिक श्रद्धांनी नाही, तर तात्पुरत्या बाहेरुन आलेल्या ऐतिहासिक वस्तुस्थितीचा होता.

वेबरने हे फरक कॅथॉलिकांच्या ऐहिक औदासिन्यातून आणि जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून दाखवून दिले. ह्या उलट प्रोटेस्टंट पंथातील लोक आणि ह्या जगांतील गोष्टीत रस घेणारे असे होते. प्रोटेस्टंट लोकांची ही भावना त्यांच्या आधीच्या निरिच्छ वागण्याच्या पद्धतीतून आली ज्यामुळे भांडवलशाहीला उत्तेजन मिळाले. हेच नीतीशास्त्र प्रोटेस्टंट च्या निरनिराळ्या शाखांतून, विशेषकरून सुधारणा वादी शाखातून (Calvinist) दिसले. प्रोटेस्टंटमध्ये एक नवीन धारणा किंवा कल निर्माण झाला. (CALLING) ह्या Calvinism (कॅलव्हिनीझम) नुसार प्रत्येकाचे नशीब परमेश्वराने आधिच ठरविलेले असते. त्यामुळे मोक्षाकरिता किंवा मुक्ती करिता चांगले काम करण्याची किंवा पुण्य मिळविण्याची गरज नाही. पण परमेश्वराकडून 'निवड' होण्याकरिता हे काम करणे गरजेचे आहे. दैवाप्रमाणेच मुक्ती मिळते. परमेश्वराची कृपा असणाऱ्यांनाच मोक्ष मिळतो. पण कुणाला मोक्ष मिळणार हे कळण्याला मार्ग नाही. परमेश्वराकडून 'निवड' न होण्याची निराशा टाळण्यासाठी लोकांना शुद्ध आणि सफल जीवन जगले पाहिजे. एखाद्याची त्याच्या कामात भरभराट झाली तर ती परमेश्वराच्या अपकाराची खूण आहे. खूप कष्ट केल्याने परमेश्वराकडून धिक्कारल्या जाण्याची भीती निघून जाऊन शांती मिळते. जो कष्ट करुन स्वत:ला मदत करतो त्यालाच परमेश्वरही मदत करतो.

वेबरनुसार प्रत्येकाने नीटनेटक्या पद्धतीने आपआपले उद्योग करणे हे प्रोटेस्टंट पंथाचे नीतिशास्त्र होते. तसेच प्रोटेस्टंच्या नीतीनुसार कर्म आणि दैववाद दोन्ही मधे कठोर परिश्रम आणि पद्धतशीररित्या काम करणे ह्याची निवड केली. तसेच संपत्ती आणि पैसा न मिळविणे हेच अंतिम ध्येय आहे. असा विचार मांडला. मात्र त्या संपत्तीचा उपभोग स्वत:च्या जीवनांतील आनंदासाठी करण्यास प्रोटेस्टंट नीतीशास्त्राचा विरोध होता. त्यामुळे भांडवलशाहीच्या वाढीसाठी आवश्यक अशी संपत्ती गोळा करणे शक्य झाले.

## १.८ सारांश

वेबरने त्याचा सिद्धांत मांडताना आदर्श नमुन्याचे पद्धतीशास्त्र वापरले. त्यात त्याने भांडवलशाहीतील नवीन चैतन्याचे गुण विशेष आणि प्रोटेस्टंट नीतिमत्ता ह्या कल्पनेप्रमाणे आपआपल्या उद्योग धंद्यांचा पाठपुरावा ह्यावर जोर दिला.

भांडवलशी प्रस्थापित झाल्यानंतर ती सुरु ठेवण्यासाठी प्रोटेस्टंट नीतिमत्तेची गरज उरली नाही. भांडवलशाहीचा आत्मा आणि प्रोटेस्टंट पंथात सांगितलेली सर्व संग परित्याग (म्हणजे ममत्वाची भाव वाही अशी) ह्या दोन्ही गोष्टींची स्वायत्त रितीने प्रगती झाली.

ह्या दोन्ही गोष्टी एका ठिकाणी छेदल्या गेल्या त्यातून नविन तर्कशुद्ध पद्धतीचे वातावरण निर्माण झाले. नवीन धार्मिक चळवळ आणि  नवीन  आर्थिक प्रणालीच्या मानसशास्त्रीय गरजा ह्या दोन्ही मध्ये खूप साधर्म होत धर्माबद्दल लिहितांना वेबर नंतर असे म्हणतो की प्रोस्टंटचा सर्वसंगपरित्याग त्यांच्या ऐतिहासिक प्रगतीमधील बऱ्याच कारणांपैकी एक कारण होते ते आधुनिक पाश्चिमात्य समाजाला खास वैशिष्ट्य प्राप्त होण्याला कारणीभूत झाले.

टीका Finch (फिंच) हा टीकाकार वेबरवर टीका करतांना असे म्हणतो की वेबर ने सांगितलेल्या आदर्श नमुन्यांच्या पद्धतीत बरीच विपर्यस्त विधाने आणि पक्षपातीपणा दिसतो. वेबरने उद्योग धंदा (calling) आणि  दैववाद (Predestination) वर अधिक भर दिला आहे, असे त्याला वाटते. वेबर इतक्या गुंतागुंतीच्या घटनांबद्दल सांगत होता की त्याने गृहीत धरलेल्या गोष्टी सिद्ध करण्यासाठी त्याच्या जवळ सबळ आधार नव्हता.

Brentano (ब्रेटॅनो) ने वेबरच्या सिद्धांताला केलेला विरोध हा ऐतिहासिक सत्या विषयी आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रोटेस्टंट मध्ये सर्वसंश परित्यागी (Ascetism) वृत्तीमुळे जी प्रगती झाली ही प्रगती आधीच म्हणजे पुनरुज्जीवनाच्या (Renaissance) ही काळातच दिसली.

वेबरने पडताळणीसाठी आर्थिक सुधारणांचा प्रोटेस्टंट विचारसरणीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्याचे कबूल केले होते, पण ते तो करु शकला नाही. ते वचन त्याने कधीच पाळले नाही. त्याच्या निबंधातून चुकीचा प्रभाव पडतो आणि ते निबंध अपूर्ण आहेत, तसेच त्यांच्या पद्धती शास्त्रानुसार उणीवा आहेत अशी टीका झाली.

ह्या सर्व टीका असूनही कांही लेखकांनी वेबरने दाखविलेल्या प्रोटेस्टंट नीतिमत्ता आणि आधुनिक भांडवलशाहीत आलेले चैतन्य ह्यांचे जे काही थोडे बहुत संबंध आले आहेत ते मान्य केले आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

१. 'सामाजिक क्रिया' वर विचार मांडा.

२. तर्कशुद्ध क्रिया म्हणजे काय ?

३. प्रोटेस्टंट नीतिमत्तेविषयी सविस्तर लिहा.

४. वेबरच्या मतानुसार भांडवलशाही काय आहे ते लिहा.

## ९.९ प्रश्नावली

१) वेबरच्या मताप्रमाणे ''सामाजिक क्रिया आणि आर्थिक क्रिया'' ह्या विषयी विचार थोडक्यांत मांडा.

२) वेबरच्या सिद्धांतात सांगितलेले 'प्रोटेस्टंटचे नीतिशास्त्र आणि पश्चिमात्य देशांत झालेल्या भांडवलशाहीचा उदय' सविस्तर टीकाकार.

## ९.१० संदर्भ सूची


१) Abraham Franeis, १९८२ मॉर्डन सोशियॉलॉजिक थेअरी ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रे,

२) Abrahm इ. १९९१ सोशियॉलॉजिकल थॉट, मद्रास, मॅकमिलन.

३) Adams, B.N. Sydie, R.A. २००१. सोशियॉलॉजिकल थेअरी न्यू दिल्ली, विस्तार.

४) Aron Raymond, १९६५ मेन करन्ट्स इन सोशियॉलिजिकल थॉट १ आणि २. ग्रेट ब्रिटन वाइडेनफल्डे अँड निकोलस

५) Coser Lewis, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियॉलॉजिकल थॉट (२nd एडिशन) धरकोर्ट कोर्य ब्रेस जोव्हानेविच इन्क.

६) Fleteher Ronald २००० मेकिंग ऑफ सोशियॉलॉजी ए स्टडी ऑफ सोशियॉलॉजिकल खेअरी बिगिनिंग्स ऑफ फांउंडेशन्स, न्यू दिल्ली. रावत पब्लिकेशन्स

७) Ritzer George १९८८ सोशियॉलॉजिकल थेअरी (२nd एड.) न्यू यॉर्क मॅक्ग्रॉ हिल पब्लिकेशन.

८) Ritzer George १९९६ मॉडर्न सोशियॉलाजिकल थेअरी ४th एड न्यू यॉर्क मॅक्ग्रॉ हिल पब्लिकेशन.


♦ ♦ ♦

# १०

# पद्धतीशास्त्र, अर्थपूर्ण आकलनाचा दृष्टीकोन आदर्श नमुने

**प्रकरणाचे स्वरुप**

१०.० उद्दिष्ट
१०.१ प्रस्तावना
१०.२ वेबरचा पद्धती शास्त्राचा दृष्टिकोन
१०.३ स्पष्टकरणात्मक समाजशास्त्र : अर्थपूर्ण आकलन (Verstehen)
१०.४ सामाजिक शास्त्रातील मूल्ये
१०.५ आदर्श नमुने
१०.६ सारांश
१०.७ प्रश्नावली
१०.८ संदर्भ सूची

## १०.० उद्दिष्ट्ये

वेबरच्या पद्धतीशास्त्राचा मार्ग समजून घेणे आणि वेबरच्या पद्धतीशास्त्रावर झालेली टीका.

वेबरचा स्पष्टीकरणात्मक समाजशास्त्राचा अर्थ Verstehan

वेबरच्या समाजशास्त्रातल्या मूल्यांची भूमिका.

पद्धतीशास्त्राचे साधन म्हणून आदर्श नमून्याचा अभ्यास

## १०.१ प्रस्तावना

समाजशास्त्रातील अभ्यासात वेबरने परस्पर विरोधी स्पष्टीकरण आणि सिद्धांतांची शक्यता मान्य केली आणि म्हणून त्याने पद्धतीशास्त्रावर जास्त भर दिला. तरीही त्याचे पद्धतीशास्त्र म्हणजे परिक्षण आणि माहितीच्या विश्लेषणाच्या प्रक्रियेचे तंत्र नव्हते. ह्या पद्धतीशास्त्रात, शास्त्रीय ज्ञानातील मूलभूत प्रश्नांचा विचार आहे. वेबरचे पद्धतीशास्त्र समाजशास्त्राच्या विश्लेषणातील प्रत्यक्ष प्रश्नांशीच निगडित आहे. त्यातील तत्त्वज्ञान विषयक गोष्टींशी नाही.

वेबरचा सामाजिक शास्त्राकडे पाहण्याचा सर्वकष दृष्टिकोन महत्त्वपूर्णरितीने वेगळा होता. हे त्याने पद्धतीशास्त्रावर चर्चा करतांना सांगितलेल्या निसर्ग शास्त्र आणि कला वाङ्मय इत्यादींचे शास्त्र ह्यातल्या फरकावरुन कळतो. ह्या प्रकरणात आपण वेबरच्या पद्धतीशास्त्रावर अभ्यास करणार आहोत.

## १०.२ वेबरचा पद्धती शास्त्राचा दृष्टिकोन

वेबरवर ध्येयाला वाहून घेतलेल्या जर्मन परंपरांचा प्रभाव पडला होता. ज्यात माणसांचे जग आणि निसर्गाचे जग ह्या दोन्ही मध्ये मूलभूत फरक केलेला होता. तसाच मानवी किंवा सामाजिक शास्त्र आणि निसर्गशास्त्रातही केला होता. जर्मन ध्येयवादी परंपरेच्या दृष्टीकोनातून समाजातील लोक क्रियाशील, सहेतुक आणि मुक्त प्रतिनिधी होते. म्हणून सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करताना निसर्गशास्त्रातील पद्धती वापरता येत नव्हत्या. माणसांची स्वेच्छावृत्ती अंदाज न बांधता येण्यासारखी आणि अद्वितीय पद्धतीने कार्य करण्याची क्षमता हा एक त्यातला भाग होता. माणसांच्या मनावर नैसर्गिक – अणि सर्वसाधारण आणि विश्लेषणात्मक पद्धती लागू पडत नव्हती, म्हणून निसर्गशास्त्रातील कायदे समाजशास्त्रात लागू पडत नाहीत. आणि सामाजिकशास्त्रे वैशिष्ट्यपूर्ण असायला हवीत. त्यांचे क्षेत्र निसर्गशास्त्राप्रमाणे सर्वसाधारण नसावे. सामाजिक शास्त्रांनी त्यांचा अभ्यास मानवी क्रिया आणि अद्वितीय अशा ऐतिहासिक घटनांपुरता मर्यादित ठेवावा. कारण मानवी वर्तन माणसांच्या आवडीप्रमाणे केलेले असते. त्यामुळे निसर्गाचे कायदे कानून त्याला लागू होत नाहीत. मानवी वर्तन आणि समाज विशिष्ट अशा प्रत्येक ऐतिहासिक घटनेतून समजून घेतला जाऊ शकतो. वेबरचे पद्धती शास्त्र ध्येयप्रेरित जर्मन परंपरांचे वर दिलेले काही मुद्दे लक्षात घेऊन केलेले आहे.

वेबरच्या समाजाच्या अभ्यास करण्याच्या पद्धतीत चार मूलभुत दृष्टिकोन आहेत.

१) वेबरचा प्रधान हेतू, समाजशास्त्र हे वस्तुनिष्ठ असे सामाजिक शास्त्र म्हणून सिद्ध करण्याचा होता.

२) वेबरने समाजशास्त्रीय संशोधनासाठी अनुभवसिद्ध दृष्टिकोनाला पसंती दिली. वेबरने हे मान्य केले होते की एखाद्याचा संशोधनाचा कार्यक्रम मूल्याधिष्ठित असतो. कारण त्यात त्या संशोधकाच्या मूल्यांच्या प्रभाव पडलेला असतो.

३) वेबरने मानवी वर्तनाच्या अभ्यासासाठी खास दृष्टिकोनाची गरज असल्याचे मान्य केले. समाजशास्त्रज्ञाने सत्यापासून मूल्ये वेगळी ठेवली पाहिजेत. ह्याचा अर्थ लोक त्यांची ध्येये निवडतात. आणि सामाजिक शास्त्र ही ध्येये निश्चितपणे सांगू शकत नाहीत. ह्या शास्त्रामधील अद्वितीय वैशिष्ट्ये असे की त्यांचे ध्येय धोरण किंवा ध्येयांची दिशा काय आहे, हे कळल्याशिवाय कारण मीमांसा अपूर्ण राहतील.

४) वेबर म्हणतो मूल्यांविषयी मत बनविणे टाळायला हवे, पण त्याच वेळी सामाजिक शास्त्रांच्या चर्चातून हे मत बनविणे टाळता येत नाही.

वेबरच्या समाजशास्त्राच्या अभ्यासात त्याने सामाजिक क्रियेच्या स्पष्टीकरणात्मक आकलनाचा मूलभूत विचार केला आहे.

## १०.३ स्पष्टकरणात्मक समाजशास्त्र : अर्थपूर्ण आकलन (Verstehen)

वेबरच्या पद्धतीशास्त्राच्या लिखाणाचे ध्येय होते की अर्थपूर्ण आकलनातून (verstehen) समाजाचे शास्त्रीय स्पष्टीकरण आणि वस्तुनिष्ठता साध्य करता येणे शक्य होते. तो असे मानत होता की ह्या आकलनातून होणारे समाजशास्त्र हे रचना आणि आदर्श नमूने ह्यात गुंतलेले आहे. ह्यामुळे ह्या शास्त्रांचे आत्मनिष्ठ आकलन आणि वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण मिळण्यास मदत होते.

वेबरनुसार समाजशास्त्राच्या शास्त्रीय पद्धतीकडे बघण्याचा एकच मार्ग म्हणजे ' अर्थ आणि क्रिया' ह्याचे नाते काय आहे ह्याची स्पष्ट कल्पना असायला हवी. पुढे तो म्हणतो समाजशास्त्रातील प्रत्येक वर्णन स्पष्टीकरणात्मक स्वरुपाचे आहे. समाजशास्त्राच्या ह्या स्वरूपाने समाजशास्त्रातील सर्व गोष्टी आणि कारण मीमांसा कळण्यास मदत होते.

अर्थपूर्ण आकलनाची पद्धत वापल्याने समाज शास्त्रज्ञ माणसांच्या क्रियांचे आणि शब्दांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करु शकतो. ह्या पद्धतीने माणसांच्या क्रियांचा आत्मनिष्ठ अर्थ, त्यांच्या स्वतःच्या आणि इतरांच्या वर्तनाशी आपण लावू शकतो. त्यामुळे मानवी क्रियांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन त्यांचा अर्थ आणि हेतू समजाऊन घेण्याचा मानवी वर्तनाच्या अभ्यासाला फायदा होतो.

व्यक्तिनिष्ठ अर्थ हा सामाजिक प्रश्नांच्या पद्धतीचा सुरुवातीचा बिंदू आहे. ह्या पद्धतीला (Verstehan) अर्थपूर्ण आकलन असे म्हणता येईल. सामाजिक क्रिया ही दुसऱ्यांचे अनुभव अनुभवण्याच्या कुवतीतून कळू शकते. इथे संशोधक, क्रिया करणाऱ्यांच्या हेतूंशी आणि दृष्टीकोनांशी एकरुप होतो. आणि सामाजिक घटनांकडे क्रिया करणाऱ्याच्या नजरेतून बघतो. त्याच्या कामातून त्याने Verstehen ची कल्पना कशी केली. ''सत्यतेचे व्यक्तिनिष्ठ स्वरुप तसेच वस्तुनिष्ठ ज्ञान''. खरे तर समाज शास्त्राची व्याख्या करताना वेबर म्हणतो, समाज शास्त्र हे असे ज्ञान आहे की, ते समाजातील वर्तनाचे स्पष्टीकरणात्मक आकलन करते. ज्या योगे आपल्याला त्या वर्तनाचे कारण, त्याचा मार्ग आणि परिणाम कळू शकतात.

अर्थपूर्ण आकलन आणि कारण मीमांसा ह्या सामाजिक शास्त्रांतील परस्पर संबंध असलेल्या पद्धती आहेत. ह्या कारणमीमांसाच्या अर्थाचे रुपांतर सबळ ज्ञानांत होते.

## १०.४ सामाजिक शास्त्रातील मूल्ये

सामाजिक विश्लेषणात आणि संशोधनात मूल्यांच्या भूमिकेबद्दल बरेच काही सांगितले आहे, पण तेसमकालीन समाजशास्त्राचे वरवरचे वर्णन आहे. बहुतेक ठिकाणी वेबरच्या सिद्धांतातील मूल्यांच्या तटस्थतेविषयी अगदीच कमी उल्लेखिले आहे. त्यात सत्य आणि मुल्ये सामाजिक शास्त्रे आणि नीतितत्त्वांचा संबंध यात फरक करुन समाजशास्त्रातील सत्यातील गुंतागुंतीकडे दुर्लक्ष केले गेले आहे. एखादा मुद्दा निवडताना त्यात मूल्यांचाही भाग असतो. हे वेबर मान्य करतो. पण खरे जिकरीचे काम म्हणजे गृहितांची रचना, तसेच त्यांची परीक्षा आहे. आणि ही प्रक्रिया मूल्यांपासून मुक्त असावी.

वेबर, नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रांमधील फरक समजाऊन सांगतो. हे फरक संशोधनाच्या पद्धतीतच नाहीत तर ते त्यामागील हेतू आणि ध्येयातील आहेत. निसर्ग शास्त्रज्ञाचा हेतू नैसर्गिक घटनांतून अमूर्त नियम तयार करण्याचा असतो. तर सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक माणसांच्या वर्तनावरुन सामान्य विधाने करीत असतात. तसेच ते क्रिया करणाऱ्या माणसांमध्ये आणि ती माणसे त्या क्रियांना काय अर्थ जोडतात हे पाहण्यात त्यांना रस असतो.

वेबर म्हणतो एखादा अवघड प्रश्न आणि त्याचे स्पष्टीकरण हे त्या संशोधकाच्या आणि हेतूंवर अवलंबून असते. एखाद्या प्रश्नांची निवड नेहमी मूल्यांशी निगडित असते. कोणत्याही सांस्कृतिक किंवा सामाजिक घटनांच्या शास्त्रीय विश्लेषणात वस्तुनिष्ठता नसते. संशोधन करणाऱ्याने निवडलेल्या, रचना केलेल्या आणि विश्लेषण केलेल्या घटना ह्या संशोधकाच्या सापेक्ष प्रमाणात असतात. (म्हणजे त्या व्यक्तिनिष्ठ असतात. संशोधकाने कामाची केलेली निवड करताना त्यांत ''मूल्य''हा आवश्यक घटक

असतो). हे काम मूल्यांशी संबंधित असते. तिथे कुठलीही शास्त्रीय कसोटी नसते. त्याने निवड केलेला विषय मूल्यांशी संबंधित असला तरीही त्या घटनेचे स्पष्टीकरण वस्तुनिष्ठ आणि मूल्यांपासून मुक्त असते. सामाजिक शास्त्रात वस्तुनिष्ठतेच्या महत्त्वावर वेबर भर देतो. तो म्हणतो शास्त्रीय चर्चेतून मूल्यांचे निर्णय सर्वसाधारणपणे घ्यावेत असे नाही. कारण ते कांही आदर्शावर आधारित असतात आणि म्हणून त्यांचे मूळ व्यक्तिनिष्ठ असते.

सामाजिक शास्त्रज्ञांनी त्यांच्या मूल्यांशी आणि त्यांचा कामासंबंधाशी स्पष्ट असावे. सामाजिक शास्त्रातील पद्धती शास्त्रात व्यक्तिनिष्ठता टाळण्यासाठी त्यातील शास्त्रीय प्रश्नांच्या मर्यादांची व्याख्या द्यावी.

ह्या मर्यादा मूल्यांची दिशा (Value orientation) ही संज्ञा वापरल्याने कळू शकते. मूल्यांची दिशा त्याचा अर्थ एखादा संशोधक ज्या मुल्यांच्या संचाला एक वादग्रस्त मुद्दा समजतो, तर दुसऱ्या संशोधकाला ह्या मूल्यांचा मुद्दा वाटत नाही. मूल्यांची दिशा ह्या शब्दातील गुंतागुंत अशा रितीने समजू शकते. मूल्यांची दिशा (ती बरोबर आहे की चूक) ही सामाजिक शास्त्राची मर्यादा ही आहे. तसेच मूल्यांचा संबंध त्यांच्या तटस्थतेशी आहे. ह्याचा अर्थ एखाद्या संशोधकाने त्याचा मुद्दा मूल्यांचा संबंधाशी जोडला तर तो मुद्दा वस्तुनिष्ठ असावा. त्या मूल्यामुळे गोळा केलेल्या माहितीस आणि त्या माहितीच्या विश्लेषणात अडथळा येऊ नये. तसेच ह्या मूल्यांनी संशोधनाला कुठल्याही प्रकाराने मार्गदर्शन देऊ नये. त्यामुळे मुल्यांची तटस्थता किंवा मूल्यांबद्दल औदासिन्य दाखवून संशोधकानी त्या शास्त्राच्या गुणांकडे लक्ष द्यावे.

## १०.५ आदर्श नमुने

आदर्श नमुना ही कल्पना म्हणजे शास्त्रीय विश्लेषणाला वेबरने दिलेले मूलभूत आणि प्रारंभिक योगदान आहे. ह्या कल्पनेने समाजशास्त्रातील तर्कशुद्धता समाजाऊन घ्यायला मदत होते.

पूर्वी सांगितल्या प्रमाणे वेबरच्या समाजशास्त्राला 'अर्थ आणि क्रिया' ह्यांच्या संबंधांची स्पष्ट कल्पना हा पद्धती शास्त्राचा भक्कम पाया आहे. ह्याचा अर्थ समाजशास्त्रातील प्रत्येक वर्णन स्पष्टीकरणात्मक आहे. वेबरचे पद्धतीशास्त्र अर्थपूर्ण आकलन (म्हणजे Verstehen) वर आधारित आहे, त्यामुळे व्यक्तिनिष्ठ आकलन आणि वस्तुनिष्ठ स्पष्टीकरण मिळते.

आदर्श नमुने म्हणजे अमूर्त रूपातील कल्पना आहेत. ज्यांचा सामाजिक जीवनातील गुतांगुंतीचा अभ्यास करतांना उपयोग होतो. वर्तनातल्या नमुन्यांचा अभ्यास करुन संपूर्ण सामाजिक घटना समजू शकतात, ज्या एकमेकांशी जोडलेल्या असतात. ह्या पैकी प्रत्येक घटना (उदा. भांडवलशाही किंवा प्रोटेस्टंट पंथ) ही बऱ्याचशा नमुनेदार घटकांशी जोडलेली असते. वेबरच्या पद्धतीशास्त्रानुसार कुठल्याही सामाजिक घटनेचा अभ्यास करताना त्यातील मुख्य स्वरुपाला वेगळे करुन आणि मोठा आकार देऊन पहावे लागते. म्हणजे त्यातील कांही गुणधर्मांना महत्त्व देऊन पहावे लागते. भांडवलशाहीचा आदर्श नमुना हा खऱ्याखुऱ्या सत्याचा नमुना म्हणून दाखविता येत नाही. हा नमुना म्हणजे त्याचे अतिशयोक्तीपूर्ण वर्णन असते. उदा. एखादा व्यंगचित्रकार व्यंगचित्र काढतो, त्यात अतिशयोक्ती असली तरी ते चित्र सहज समजू शकते. ह्याचा अर्थ आदर्श नमुने सामाजिक सत्याच्या जवळचे असतात, पण ते म्हणजे सामाजिक सत्य नसते.

वेबर हे सुचवू पहातो की अनुभव सिद्ध गोष्टींची तुलना आणि मुल्यमापन करण्यासाठी आदर्श

नमुन्याचा मोजमाप म्हणून वापर करावा . सामाजिक घटनांचे खरे स्वरुप आणि आदर्शनमुना ह्यांतील फरक हा समाजशास्त्रज्ञांचा तात्विक कुतुहलाचा भाग आहे.

वेबर ताकीद देतो की हा आदर्श नमुना म्हणजे हुबेहुब आदर्श नाही, तर गुणधर्माचा एक संघ आहे, जो त्या संशोधकाच्या मनात असतो. हे संशोधनातले एक साधन आहे, त्याचा उपयोग मदत म्हणून होतो. म्हणून कोणतीही सामाजिक घटना, सामाजिक वर्तन किंवा सामाजिक संस्था ह्यांचा एक ‘ आदर्श नमुना’ असू शकतो.

वेबर म्हणतो की आदर्श नमुना हा कोणत्याही गुणधर्माच्या संचाचा असू शकतो. त्याचे अनुभव सिद्ध संशोधनात एकच कार्य असते आणि ते म्हणजे ‘‘अनुभवसिद्ध संशोधनात आणि अनुभव सिद्ध सत्यांतील फरक आणि साम्य दाखवून देणे आणि ते समजाऊन घेऊन त्यांचे सकारण स्पष्टीकरण देणे हे होय.

वेबर हे कबूल करतो की ज्यायोगे आदर्श नमुना तयार करता येईल अशी तत्त्वे मन मानेल त्याप्रमाणे तयार केलेली असतात. कुठल्या गुणधर्मांना जास्त महत्त्व घ्यावे आणि कुठल्याला कमी हे प्रश्नाच्या प्रकारावर अवलंबून असते. त्यामुळे एखादा आदर्श नमुना बरोबर किंवा चुक असू शकत नाही. एका प्रकारच्या  संशोधनामध्ये एखादा गुणधर्मांच्या संच योग्य असू शकतो तर दुसऱ्या संशोधनांत दुसरा एखादा संच उचित असतो. थोडक्यात सामाजिक सत्य निरनिराळ्या मार्गाने रचता येते किंवा व्यक्त करता येते.

वेबरने आदर्श नमुन्याची कल्पना प्रोटेस्टंट नैतिकता आणि भांडवलशाहीत वापरली आणि त्याने घटनांची नमुनेदार अतिशयोक्तीपूर्ण प्रतिमा तयार केली आणि त्याची वास्तवाशी तुलना केली. वेबरने प्रोटेस्टंट नैतिकता आणि भांडवलशाहीचा आत्मा ह्यातील कार्यकारण भाव स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे शास्त्रीय स्वरुपाचे साधारण नियम तयार करण्यास मदत झाली.

## १०.६ सारांश

वेबरच्या पद्धतीशास्त्राने सामाजिक वर्तनाच्या अभ्यासाला निराळा दृष्टिकोन मिळतो. मात्र त्याच्या पद्धती शास्त्रात दोष आहेत आणि त्यावर बरीच टीका झाली.

Verstehan (अर्थपूर्ण आकलन) ह्या समाजशास्त्राच्या विश्लेषणाच्या पद्धतीत कांही अडचणी आहेत. एक म्हणजे क्रिया करणाऱ्याचे वर्तन, त्यांच्या भूमिकेतून समजाऊन घेण्यासाठी संशोधकाला त्याच नमुन्याच्या आणि त्याच नैतिक स्तरावर असणे आवश्यक आहे. कारण दुसऱ्या दृष्टिकोनांतून पाहिल्यास वर्तन समजणे कठीण जाते. दुसरे म्हणजे क्रिया करणारा आणि संशोधक निरनिराळ्या संस्कृतीतून आले असतील तर संशोधकाला क्रिया करणाऱ्याच्या भूमिकेतून क्रिया समजाऊन घेणे अवघड जाते.

क्रिया करणारा आणि संशोधक एकाच संस्कृतीतून आलेले असले तरीही verstehen च्या पद्धतीतुन क्रिया समजणे कठीण असते. कारण कधीकधी क्रिया करणाऱ्याच्या व्यक्तिगत किंवा व्यक्तिनिष्ठ भावना कळण्यास मार्ग नसतो. वेबर म्हणतो अशा वेळी संशोधनने बाह्य वर्तनाचा अभ्यास करुन त्या वर्तनाची पडताळणी करावी. फ्रँक पार्किन (Frank Parkin) अशा निर्णयाप्रत पोचतो की क्रिया करणाऱ्याच्या भूमिकेत शिरून त्याच्या खऱ्या खुऱ्या भावना कळणे कठीण आहे. म्हणून अर्थपूर्ण आकलनाची (Verstehen) ची पद्धती अनावश्यक आहे. ह्या पद्धतीला बाह्यवर्तनाचे निरिक्षण करणे गरजेचे असेल तर ती पद्धतच

चुक आहे. कारण समाजशास्त्रज्ञ त्यांच्या अभ्यासात बाह्य वर्तनाचे निरिक्षण करतातच.

सामाजिक शास्त्रज्ञांनी साधारणपणे 'मूल्यापासून मुक्त' अशा सामाजिक सिद्धांताचा पुरस्कार केला आहे. वेबरच्या पद्धतीशास्त्रात मूल्यांची अर्थपूर्ण भूमिका आहे. फ्रॅंक पार्किन म्हणतो ''संशोधकाची स्वत:ची मूल्ये आणि पूर्वग्रह ह्या साधनांतून काम करताना समाजशास्त्राचा तटस्थतेने अभ्यास करणे कसे शक्य आहे ?''

वेबरने आदर्श नमुन्याच्या रचनेच्या हिरिरीने पुरस्कार केला पण त्याचे फायदे त्याने कधीच सांगितले नाहीत. दुसरे आपल्याला त्यातील थोड्याश्या गुणांना निवडून, फुगवून सांगायचे असेल तर अनुभवावर आधारलेल्या आणि आदर्श नमुन्यात फरक दिसणे स्वाभाविक आहे. तिसरे म्हणजे वेबरने त्यातून कारणाचे स्पष्टीकरण कसे होईल हे कधीच सांगितलेले नाही.

वेबरच्या पद्धतीशास्त्रावर टीका झालेली असली तरीही त्याने समाजशास्त्रातील सिद्धांत आणि पद्धतीत केलेले योगदान नाकारला येत नाही.

**तुमची प्रगती तपासून पहा.**

१) वेबरच्या समाजाच्या अभ्यासाच्या पद्धती विषयी चर्चा करा.

२) अर्थ पूर्ण आकलन (Verstehen) म्हणजे काय ?

३) सामाजिक शास्त्रांत मूल्यांचे महत्त्व समजाऊन सांगा.

## १०.८ प्रश्नावली

१. मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रीय पद्धतीशास्त्राचे नि:पक्षपातीपणे मूल्यमापन करा.

२. थोडक्यात टिपणी लिहा.

अ) आदर्श नमुना

ब) Verstehen (अर्थपूर्ण अकलन)

## १०.९ संदर्भ सूची


१) Abraham Francis, १९८२, मॉर्डन सोशियॉलॉजिकल थेअरी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

२) Abraham F. १९९१, सोशियॉलॉजिकल थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) Adams, B.N., and Sydie, R. A. २००१ सोशियॉलॉजिकल थेअरी न्यू दिल्ली विस्तार.

४) Aron Paymond, १९६५ मेन करन्ट्स इन सोशियॉलॉजी थॉट १ अँड २ ग्रेट ब्रिटन, वाइडेन फेल्ड ॲन्ड निकोलसन.

५) coser lewis, १९७१ मास्टर्स ऑफ सोशियॉलॉजिकल (२nd एड.) Harcourt Brace Javanovich inc. हारकोर्ट ब्रेस ग्रोव्हानोविच इन्क.

६) Fletcher, Ronald २००० दे मेकिंग ऑफ सोशियॉलॉजी ए स्टडी ऑफ सोशियॉलॉजिकल थेअरी बिगिनिंगस अँड फाउंडेशन्स न्यू दिल्ली. रावत पब्लिकेशन.

७) Ritzer George १९८८ सोशियॉलॉजीकल थेअरी (२nd एड.) न्युयॉर्क मॅकग्रॉ हिल पब्लिकेशन.

८) Ritzer George १९९६ मॉडर्न सोशियॉलॉजिकल थेअरी (४ th एड.) न्यु यॉर्क मॅकग्रॉ हिल पब्लिकेशन.

♦ ♦ ♦

# ११

प्रकरण ११

## धर्माचे समाज शास्त्र

**प्रकरणाचे स्वरुप**

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ चीन मधील धर्म आणि भांडवलशाहीच्या वाढीचा अभाव
११.३ भारतातील धर्म आणि आधुनिक भांडवलशाही
११.४ प्राचीन चहुरी धर्म आणि भांडवलशहांची वाढ
११.५ सारांश
११.६ प्रश्नावली
११.७ संदर्भ सूची

### ११.० उद्दिष्ट्ये

- विद्यार्थ्यांना चीन, भारतातील आणि यहुदी धर्माच्या नीतीशास्त्राची ओळख करुन देणे.
- चीनमध्ये, भारतात आणि यहुदी धर्मात भांडवलशाही स्वतंत्रपणे का घडू शकली नाही हे तपासून पहाणे.

### ११.१ प्रस्तावना

वेबरने जगातील धर्मांचा सखोल अभ्यास केला, त्यांत ही चीन, भारत आणि नंतर यहुदी धर्म सविस्तरपणे पाहिले. त्याचा विश्वास होता की पाश्चिमात्य भांडवलवाद हा तेथील ऐतिहासिक घटनांतील तर्कशुद्धतेचा एक भाग होता. वेबरने केलेल्या जगातील इतिहासात तो असे दाखवितो की पाश्चिमात्य संस्कृती आणि पौर्वात्य संस्कृती ह्या दोन्हीत एक मूलभूत फरक होता. तो म्हणजे ''तर्कशुद्धता'' तर्कशुद्ध धोरणांमुळे भांडवल शाहीत वाढ झाली तर ह्या धोरणांच्या अभावाने भांडवलशाहीच्या वाढीला खीळ बसली.

### ११.२ चीन मधील धर्म आणि भांडवलशाहीच्या वाढीचा अभाव

वेबर ने तर्कशुद्ध भांडवलशाही चीन मध्ये का वाढू शकली नाही आणि पाश्चिमात्य देशातच ती का वाढीला लागली ते दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तो म्हणतो की पश्चिमेत दोन कारणांनी भांडवलशाही वाढीला लागली. एक म्हणजे तिथे झालेली मौल्यवान धातूंची आयात आणि दुसरे, लोक संख्येतील (कमी प्रमाणात) वाढ 'ह्या दोन्हीही गोष्टी भांडवल शाहीच्या वाढीसाठी कारणीभूत ठरल्या. वेबरनुसार, चीन मधील समाजातल्या बऱ्याच दृष्टीकोनांमुळे भांडवलशाहीच्या वाढीला अडथळे आले.

वेबर चीनमधील आणि पश्चिम राष्ट्रांतील शहरांतील जुन्या चालीरितींची तुलना करतो. मध्ययुगीन शहरे ही आर्थिक तर्कशुद्धता आणि राजकीय भांडवलशाहा ही धोरणांची साधने होती. चीनमध्ये पश्चिमेप्रमाणे फ्लॉरेन्स सारखी शहरे नव्हती. चीन मधील शहरात कर्मचाऱ्यांना पगार चांदीच्या स्वरुपात दिला जायचा. त्यामुळे आर्थिक धोरण पैशाच्या स्वरूपात नव्हते. तिथे चलनाचे केंद्रीकरण नव्हते.

चीन मधील शहरे आर्थिक संबंध आणि भांडवलशाहींची केंद्रे म्हणून कधीच अस्तित्वात आली नाहीत. तिथे राजकीय स्वायत्ततेचा अभाव होता. पश्चिमेतील शहरांप्रमाणे तिथे त्यांची स्वायत्त सैनिकी सत्ता नव्हती. चीन मध्ये हस्त व्यवसायांचे आणि हस्तकलांचे व्यापारी संघ नव्हते. चीनी शहरांमध्ये संघर्ष आणि बंड करून वर येणारा मध्यमवर्गीय समाज नव्हता. तिथे बंड व्हायचे ते एखाद्या अधिकाऱ्याला पदावरुन काढण्यासाठी व्हायचे पण शहरातील स्वातंत्र्याकरिता नाही. वेबर स्पष्ट करतो की चीन मधील शहरात राहणाऱ्या माणसांनी त्याच्या जन्मजात खेड्यांतील नातेवाईकांशी, पूर्वजांच्या जमीनीशी आणि तेथील मंदिराशी कायम संबंध ठेवले. त्यांना ते राहात असलेल्या शहरांबद्दल कधीच आपुलकी वाटली नाही. मात्र पश्चिमेत ख्रिश्चन धर्माने नातलगांशी असणाऱ्या बांधिलकीच्या मर्यादा पार करण्यात महत्त्वाची भूमिका घेतली.

वेबरनुसार, पाश्चिमात्य शहरात आणि पौर्वात्य शहरात हे मूळ फरक होते. पाश्चिमेतील शहरे समुद्रापलिकडच्या व्यापारांची केंद्रे होती, तर चीन मधला व्यापार फक्त अंतर्देशीय होता आणि एखाद्या बंदरातूनच परदेशाशी व्यापार व्हायचा कारण त्यांच्यावर इतर देशांचा प्रभाव अगदी मर्यादित होता. मात्र त्यामुळे चीनी परंपराचे रक्षण होण्यास मदत झाली. दुसरे म्हणजे औद्योगिक सुधारणा किंवा वाढ ही परंपरागत हित संबंधात आणि गटांचा ताब्यात होता. ही सुधारणा शहरात झाली नाही. मात्र पश्चिमेतील शहरे औद्योगिक सुधारणांची केंद्रे बनली. तिथे आर्थिक, राजकीय आणि कायदेशीर पायामुळे उद्योगधंद्यांच्या तर्कशुद्ध संघटना होऊ शकल्या.

चीन केंद्रीभूत प्रशासन जवळ जवळ नव्हतेच. सत्तेची स्वायत्त केंद्रे अस्तित्वात नव्हती. केंद्रीय सरकारी अधिकाऱ्यांच्या तीन वर्षांनी एकदा दुसऱ्या प्रदेशात बदल्या होत असत. पश्चिमेप्रमाणे तिथे सरंजामशाहीची पद्धत नव्हती, कारण तिथे अधिकाऱ्यांची नेमणूक त्यांच्या जन्मावर नव्हती तर शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित होती.

चीन मध्ये भांडवलशाहीची वाढ अंतर्गत रित्या झाली नाही. खरं तर चीनी लोकात संपादन कला, कष्ट करण्याची ताकद होती आणि ते मेहनती होते. अठराव्या शतकात चीनमधील लोकसंख्येत भरमसाठ वाढ झाली आणि मौल्यवान धातूंची वाढ स्थिर राहिली.

चीन मधील भांडवलशाहीचा अभाव वेबर स्पष्ट करुन सांगतो. त्याच्या मते 'नाते' ही कल्पना अतिशय जबरदस्त होती. त्यामुळे जमीनीची मालकी नात्यातच असायची, आणि म्हणून परक्याला जमीनीचा ताबा देणे शक्य नव्हते. पाश्चिमात्य समाजात मात्र असे होत होते.

भांडवलशाहीच्या स्थापनेत योगदान असलेली दुसरी एक प्रगती म्हणजे पाश्चिमात्य राष्ट्रात झालेली तर्कशुद्धतेची लढाई, जी चीन मध्ये झाली नाही. तसेच परकीय वसाहतींच्या अभावामुळे चीन मध्ये झालेली सुधारणा पश्चिमेपेक्षा वेगळी होती. नोकरशाही भांडवलवादातून निष्पन्न झाली. चीन मधील नोकरशाही ''साक्षर'' लोकांची आणि वाङ्मयीन अभिरुची असणाऱ्या लोकांची होती. पश्चिमेतील लोकांप्रमाणे तांत्रिक कौशल्याची माहिती असलेल्या लोकांची नव्हती. त्यामुळे चीन मधील अधिकारी पश्चिमी राष्ट्राप्रमाणे

''नोकरशहा'' नव्हते तर ते सुसंस्कृत आणि सभ्य गृहस्थ होते. त्यांच्या सहाय्यकांना प्रशासकीय कौशल्य होते. सुशिक्षित चीनी हे काही अंशी निधर्मी असले तरी जादूटोणा आणि मंत्रतंत्रावर त्यांचा विश्वास होता. जादू, भुताखेतांवर विश्वास आणि धार्मिक विधींचे स्तोम ह्या गोष्टींचा लोकांवर खूप पगडा होता. पश्चिमेतही जादूवर आणि मंत्रतंत्रांवर लोकांचा विश्वास होता, पण सर्व साधारणपणे लोक त्याचा धिक्कार करीत असत. म्हणून बुद्धीप्रामाण्य वाद ही धर्मातून जादू आणि ईश्वराचा संबंध तोडू शकला आणि जगात नीतीमत्तेची नवी मूल्ये स्थापन करु शकला असे वेबरचे मत होते. भांडवलशाहीसाठी अनुकूल असणाऱ्या आणि अनुकूल नसणाऱ्या गोष्टींचा विचार करुन वेबर समतोल राखण्याचा प्रयत्न करतो. बदल घडवून आणणाऱ्या इतक्या गोष्टी होत्या की त्यामुळे अनेक गुंतागुंती निर्माण झाल्या. आणि त्याचे साधे स्पष्टीकरण वेबरजवळ नव्हते. मात्र वेबर ह्या निर्णयाप्रत येऊन पोचतो की पाश्चिमात्य देशांत भांडवलशाहीचा उदय झाला त्याच्या तुलनेत चीन मध्ये निरनिराळ्या कारणामुळे हे घडू शकले नाही. धार्मिक गोष्टींचा चीन मध्ये जास्त पगडा असल्यामुळे तिथे भांडवलशाहीची वाढ स्वाभाविकपणे होऊ शकली नाही.

## ११.३ भारतातील धर्म आणि आधुनिक भांडवलशाही

वेबरने केलेल्या भारताच्या तपशीलवार अभ्यासात त्याला असे आढळून आले की संपत्ती, युद्ध आणि राजकारणांत तर्कशुद्ध धोरण असते तर इथली सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती आधुनिक भांडवलशाहीच्या वाढीला अनुकूल होती. तो म्हणतो भारतात सांस्कृतिक धोरणात खूपच तर्कशुद्धता होती. उदा. तर्कशुद्ध संख्याशास्त्र, अंकगणित, बीजगणित, विज्ञान आणि एकंदरीने तर्कशुद्ध सातत्य आणि धार्मिक तत्त्वांविषयीची सहिष्णुता इत्यादि. ह्या शिवाय व्यापारांची स्वायत्तता हस्तकला उद्योग धंद्यातील प्रगत वैशिष्ट्ये आणि पैसा कमावण्याची जिद्द ह्या सर्व गोष्टी भांडवलशाही साठी फार अनुकूल होत्या. पण तरी ही ब्रिटिश सत्तेच्या आधी किंवा त्यांच्या सत्तेच्या काळात भांडवल शाही भारतात स्वतंत्रपणे मूळ धरु शकली नाही.

भारतातील धर्म हे एक कारण होऊ शकते ज्यामुळे पश्चिमी राष्ट्राप्रमाणे इथे भांडवल शाही वाढू शकली नाही. जर भारतात पश्चिमेसारखी ''निरिच्छ'' प्रोटेस्टंट प्रणाली असती आणि आधुनिक तर्कशुद्ध वैज्ञानिक धोरण असते. तर आर्थिक प्रगतीला ते उपयुक्त ठरले असते.

पूर्वेतील संस्कृतीकडे सर्वच दृष्टीकोनांतून पाहिले तर सर्वजण ''जादूई बगीचा'' त राहात होते. पश्चिमात्य देशांत धर्मग्रंथांना तर्कशुद्ध विचारांची जोड दिल्याने तेथील लोकांचा बऱ्यापैकी भ्रमनिरास झाला.

वेबरच्या जगातील धर्मांच्या अभ्यासात त्याने फक्त धार्मिक घटना आणि धार्मिक संस्थांचा अभ्यास केला नाही तर संपूर्ण सामाजिक रचनेचे विश्लेषण केले. भारताचा अभ्यास करताना जाती व्यवस्थेचे मूलभूत महत्त्व तो ध्यानात घेतो. भारतातील सर्व शास्त्रांचा संदर्भ धरुन नवीन जाती कशा तयार होतात त्याची रुपरेषा त्याने तयार केली. तो म्हणतो कांही जाती श्रीमंत होतात. तेव्हा ते लोक खालच्या दर्जाचे काम हीन लेखून ते काम करायला नकार देतात. परिणामतः दुसरीकडचे लोक येतात आणि ते काम करु लागतात. आणि श्रीमंत झालेले लोक ह्या लोकांवर वचक ठेवतात आणि नंतर उच्च प्रतीचे काम करण्याची इच्छा धरतात. त्यांना विशेष अधिकार नसले तरी जाती अवस्थेमध्ये त्यांनी कायदेशीर स्थान मिळवणे पसंत केले.

भारतीय समाज व्यवस्थेमुळे आर्थिक सुधारणांमध्ये कसे निर्बंध आले ते वेबर स्पष्ट करतो. एकतर जातीय व्यवस्थमुळे आर्थिक सुधारणांवर विपरीत परिणाम झाले. जाती व्यवस्था पूर्णपणे परंपरागत

होती आणि त्याचे परिणाम तर्क विसंगत होते. खेड्यातील एखाद्या कारागिराचीच नाही तर त्या संपूर्ण जातीचीच पहाणी करणे स्थैर्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. संपूर्ण समाज व्यवस्थेची परंपरागत, तर्क विसंगत अशी भूमिकाच भांडवलशाहीच्या वाढीला अडथळा ठरली. वेबर म्हणतो की ब्राह्मणामुळेच फोफावलेली मंत्रतंत्र पद्धती सर्वच क्षेत्रात तर्कविसंगत झालेली स्पष्टपणे दिसली.

दुसरे ही की भारतामधील मध्यमवर्ग दुबळा होता. वेबर नुसार त्याची दोन कारणे होती. एक म्हणजे मुक्ती मिळविण्याचे शांतता वादी दोन धर्म, बुद्ध आणि जैन धर्म आणि दुसरे कारण नागरिकांतील जाती व्यवस्था सैनिकी शक्तीच्या वाढीला मारक ठरली. त्यामुळे युरोपप्रमाणे नागरी (polis) संस्था तयार होऊ शकली नाही. भारतीय गावांना स्वायत्तता कधीच नव्हती.

तिसरा मुद्दा असा की भारतीय समाज रचनेत पवित्रतेच्या भावनेतून निर्माण झालेल्या धार्मिक, मंत्रतंत्र जादूटोण्याच्या आणि हत्याऱ्यांची आणि साधनांची पूजा करणे ह्या कल्पनेमुळे तांत्रिक आणि औद्योगिक वाढ झाली नाही. साचेबंद आणि ठराविक साधने सुद्धा तांत्रिक सुधारणेला मोठीच अडचण ठरली.

आणि शेवटची महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय धर्मानी कुणालाही कर्मामुळे वर येण्याला संधी मिळू दिली नाही. त्यांच्या दृष्टीने सर्वसंग परित्याग केल्याने उत्तम फळ (मोक्ष) मिळते.

भारतीय 'निश्चित' वादाने तर्कशुद्ध पद्धतीच्या जीवनाला परवानगी दिली नाही. उलट त्यामुळे परंपरावादाचाच प्रचार झाला. म्हणून चीन प्रमाणेच भारतही 'जादुई बगीचा'तच राहिला आणि इथे ब्राह्मण पुजाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी जादूटोणा, मंत्र-तंत्र विद्येला मान्यता दिली, ते संयुक्तिक आहे असे मान्य केले आणि त्याला प्रोत्साहनही दिले. ह्या संदर्भात ख्रिश्चन धर्माने जादुटोणा आणि मंत्रतंत्र विद्येचा धिक्कार केला हे सांगावेसे वाटते.

वेबरच्या सांगण्यानुसार सर्वसाधारणपणे आशियातील धर्म अध्यात्मिक गुढ गोष्टींवर विश्वास ठेवणारे होते. म्हणजे अध्यात्मिक ज्ञान गूढ पद्धतीनेच मिळविता येते. हा त्यांचा विश्वास होता. ह्या गोष्टी मन आणि शरीराला ध्यान धारणेनेच मिळविता येतात हे अध्यात्मिक तर्कसंगत आणि शास्त्रसंगत नसल्यामुळे त्यांना निसर्गावर मात करता आली नाही. त्यामुळे लौकिक गोष्टी पेक्षा पारलौकिकतेकडे ते ओढल्या गेले. ते ख्रिश्चन धर्माप्रमाणे आत्माला वाचविण्याच्या तत्त्वासारखे होते.

वेबर म्हणतो की ह्या तर्क विसंगत 'जादुई मंत्र' विद्येचा आर्थिक धोरणे आणि आर्थिक विकासावर फार विपरित परिणाम झाला. अशा मानसिकतेमुळे तर्क शुद्ध भांडवलशाही वाढीला लागू शकली नाही. संपत्तीची लालसा असूनही त्या करिता कष्ट करण्याची तयारी नसल्याने तिथे आधुनिक आर्थिक पद्धतीचा विकास होऊ शकला नाही.

## ११.४ प्राचीन यहुदी धर्म आणि भांडवलशहांची वाढ

प्राचीन यहुदी धर्माबद्दल वेबरने केलेले विश्लेषण त्यातील ऐतिहासिक सुधारणांचा विचार मांडते. तसेच त्यात ख्रिश्चन आणि इस्लामधर्माच्या उगमा बद्दल यहुदी धर्माचे महत्त्व ही सांगते. यहुदी धर्माचा विकास, त्याच्या पाश्चिमात्य संस्कृतीवर झालेल्या खोल परिणामांचा दृष्टीने महत्त्वाचा आहे.

ज्यू धर्मानुसार परमेश्वरने ही सृष्टी निर्माण केली. जगातील असलेली दु:खे आणि पीडा ह्या तात्पुरत्या आहेत. आणि त्या परमेश्वराचा इच्छेनुसार आहेत. आणि तशाच जातील. म्हणून ह्या जगातील ज्यूं ची परमेश्वराच्या (याहवे) आज्ञेनुसार झाली पाहिजेत. यहुदी धर्माचे ऐतिहासिक महत्त्व त्यांच्या तर्कशुद्ध नैतिक गुणांतून बघायला हवे. वेबरने केलेल्या लक्षणीय अभ्यासातून त्याने ज्यू धर्माच्या इतिहासाचा मागोवा घेतला आहे.

ज्यू लोकांची व्याख्या करतांना वेबर त्यांची स्थिती 'वाळीत टाकलेले लोक'' अशी करतो. ह्या व्याख्येचा अर्थ असा की धर्मातील कर्मकांडाचा गरजा आणि आज्ञा ह्यामुळे त्यांना समाजापासून दूर ठेवण्यात आले. वेबरने धर्माचा सामाजिक जीवनावर राजकीय रचनेवर आणि आर्थिक सुधारणांवर झालेल्या प्रभावाबद्दल लिहिले आहे.

समाजात निर्माण झालेले निरनिराळे स्तर होते. ज्यात एका बाजूला श्रीमंत लोक आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक दृष्ट्याअगदी भिन्न (गरीब) लोक होते. शहरातील श्रीमंत लोक आणि कर्जबाजारी शेतकरी ह्यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. हे वितुष्ट वाढल्यामुळे राज्यसत्ताक पद्धती निर्माण झाली. राजसत्तेबरोबरच सामाजिक न्यायाचे प्रेषित ही इस्त्राईल समाजात निर्माण झाले. ह्या प्रेषितांचे काम फक्त धार्मिक संदेश देण्याचे होते. पण त्यांनी मोठ्या कुलातील श्रीमंत, श्रेष्ठ अशा लोकांवर आणि त्यांच्या संपत्तीवर, तसेच राजे रजवाडे आणि त्यांचे रथ ह्यांच्यावर टीका केली, आणि लोकांना असे सांगितले की, परमेश्वराच्या आज्ञांचे पालन केले तर प्रत्यक्ष परमेश्वरच (याहवे) त्यांना विजय मिळवून देईल. परमेश्वराच्या मठांचा आणि आश्रयस्थानांचा त्यांनी त्याग केला तर नाश ओढवेल असे भाकित प्रेषितांनी केले.

वेबरने इस्त्रायली समाजातील धार्मिक कल्पना आणि सामाजिक आर्थिक परिस्थितीचा संबंध दाखवून दिला. प्रेषितांचा दर्जा समाजात तुलनेने तसा स्वायत्त होता. ते धार्मिक गोष्टींचे प्रसारक होते, पण त्यांचे संदेश फक्त धार्मिक बाबतीत नसायचे. वेबरच्या म्हणण्याप्रमाणे मंत्र तंत्र जादूटोणा आणि स्वैराचाराच्या विरुद्ध प्रेषितांनी केलेल्या संदेशांच्या वाढत्या प्रभावामुळे त्याचा परिणाम तर्कशुद्ध विचारसरणीत झाला. प्रेषितांनी परमेश्वराच्या संपूर्ण भक्ति मार्गावरच जास्त भर दिला. इस्त्रायली लोकांचा परमेश्वराशी एकमेव नाते पाहुण्याचा भक्तिमार्ग हा पाया आहे, आणि प्रेषित ज्यू लोकांना इजिप्शियन बंधनांतून अद्‌भूत रितीने मुक्त होण्याचा हाच मार्ग आहे, ह्याची आठवण करुन देत राहिले. परमेश्वराच्या संपूर्ण शक्तीचा आणि त्यावर विसंबून रहाण्याचा हाच पुरावा आहे असे सांगितले. म्हणून ज्यू लोकांनी इतर कुठल्याही देवाची पूजा न करता फक्त त्यांच्याच देवाची (याहवे) आणि त्याच्याच कृपेत राहण्याची बंधने त्यांच्यावर होती. ह्याच भावनेचे त्यांच्यावर नैतिक बंधन होते. ह्या ज्यू परंपरने देवाच्या भक्तिमार्गाचा त्याग करणे ही घातक आणि तिरस्करजीय गोष्ट होती. वेबर नुसार ह्या नात्यातील तर्कशुद्धतेतून परमेश्वराच्या वचनाने त्यांना समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळूसारखे असंख्य वंशज मिळाले असते, शत्रूंवर विजय मिळवता आला असता, धन धान्य विपुल झाले असते आणि त्यांचे आयुष्य सुखाचे झाले असते. देवाला कौल मागणे आणि जादूटोणा ह्या गोष्टींना जास्त महत्त्व नव्हते. लैंगिक स्वैराचार, दारु पिऊन गोधळ घालणे ह्या गोष्टी तिरस्करणीय होत्या. त्यामुळे गुरु, प्रेषित, श्रीमंत समाजातील उच्चभ्रू मंडळी आणि पवित्र आचरणाच्या कुटुंबातील लोकांनी ह्या धर्मपूजेच्या (Yahuistic) परंपरांचे समर्थन केले.

वेबरच्या म्हणण्यानुसार भक्ति करण्याच्या सामर्थ्याला इजिप्त आणि मेसोपोर्टमियाच्या निस्तारवादी धोरणांमुळे महत्त्व आले. ज्यू लोकांना सतत आपण पराजित होऊ, आणि आपले अस्तित्वच नष्ट होईल असे वाटत असे. त्यामुळे आपण धर्मांच्या (yahwe) आज्ञांचे पालन केले नाही तर नाश हा ठरलेलाच.

अशी भीती वाटत असे. वेबरने त्याच्या अभ्यासात यहुदी धर्मातील भाकिताच्या प्रचंड गुंतागुंती दाखविल्या आहेत.

प्रेषित खालच्या वर्गातून किंवा खालच्या दर्जातून आलेले लोक नव्हते तर बहुतांशी श्रीमंत कुटुंबातील असत. त्यांना राजकीय गोष्टीत रस नव्हता. ते देवाचे (Yahwe) प्रवक्ते होते. यहुदी धर्मात तर्कशुद्धता अस्तित्वात होती, तरीही त्यामुळे त्याचा परिणाम भांडवलवादात झाला नाही. वेबरने भर देऊन असे सांगितले की प्रेषित आणि धर्मशिक्षक (Torah) ह्यांचे यहुदी धर्माच्या तर्कशुद्ध धोरणांत बरेच महत्त्व होते. ज्यू लोक हे वाळीत टाकलेल्या लोकांप्रमाणे (Pariah commiunity). ज्यू लोकांवर विजय मिळाल्यानंतर बॉबिलोनियाच्या लोकांनी त्यांना तुरुंगात टाकले. त्यामुळे ज्यू लोकांना शुद्ध आचरण राखून इतर देवदेवतांच्या पूजनापासून स्वतःचे रक्षण करणे आवश्यक होते. हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यांचा तुरुंगवास हा तात्पुरता आहे आणि आपण आपल्या मायदेशी परत जाऊ ही आशा होती. तुरुंगातले ज्यू ही एक विशिष्ट धर्माची (pariah community) जमात राहिली.

वेबरचे मत असे होते की ज्यू लोकांनी तर्कशुद्ध धार्मिक नीतीमत्तेमुळे पश्चिमी संस्कृतीत आणली, पण दैववादी (Calvimist) विचारसरणीतील लोकांप्रमाणे त्यांच्या आर्थिक धोरणांवर परिणाम झाला नाही. वेबर ज्यू लोकांच्या नैतिक दुजाभावाबद्दल असे सांगतो की कांही गोष्टी त्यांच्या आपल्या लोकांनी केल्या तर चालायचे, पण त्याच गोष्टी इतरांनी करायला मज्जाव होता. ज्यू लोकांना नात्यातली आणि जवळची माणसे महत्त्वाची वाटत होती. पण पश्चिमेत असे संबंध दुबळे होते. प्रोटेस्टंट लोकांत नीतीमत्ता सर्वांसाठी समान होती. विशेषकरुन दैववादी लोकांत (calvimist) ज्यांची उच्च प्रकारात ठरविलेली आर्थिक नैतिकता ही नास्तिकांच्या नैतिकतेपेक्षा श्रेष्ठ दर्जाची होती.

वेबरच्या दृष्टीकोनातून पाश्चिमात्य देशांत झालेली भांडवलशाहीची वाढ एक सर्व साधारण ऐतिहासिक प्रक्रिया होती. ह्या प्रक्रियेत ऐतिहासिक घटनांनी बरेच योगदान दिले. त्याच्या मते आधुनिक भांडवलशाही आणि प्रोटेस्टंट विचारसणी तसेच पाश्चिमात्य संस्कृती मधील इतर गोष्टी ह्या एका ऐतिहासिक प्रक्रियांचा संयुक्त परिणाम आहे. ही ऐतिहासिक प्रक्रिया प्राचीन इस्त्रायल मध्येच सुरुवात झालेली होती.

## ११.५ सारांश

**जगातील धर्म आणि भांडवलशाहीच्या वाढीचा अभाव :**

वेबरने जगातील धर्माच्या अभ्यासात, चीन आणि भारतातील धर्म हे भांडवलशाहीच्या विकासात अडथळे कसे ठरले, हे दाखविले आहे. ह्या दोन्ही देशातील समाजात भांडवलशाहीच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या कांही गोष्टी होत्या. पण परंपरा आणि धर्मातील मंत्र तंत्र विद्या ह्या भांडवल शाहीच्या स्वतंत्रपणे विकासाला त्या अडथळा ठरल्या.

तसेच चहुरी धर्मातून ख्रिश्चन धर्म आलेला असला आणि त्याच्या उगमाने पाश्चिमात्य संस्कृतीवर खूप परिणाम झालेला असला तरी ही कर्मकांड तसे ‘आपपर भावा’च्या वागणुकीमुळे भांडवलशाहीच्या वाढीला खीळ बसली.

भांडवलशाहीची वाढ न होण्याला ह्या समाजातील योग्य अशा धार्मिक नीतीमत्तेचा अभाव म्हणजे भांडवलशाहीसाठी योग्य धार्मिक वर्तन नसणे हे होय. पण इथे वेबरने सांगितलेली एक खबरदारी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तो स्वतः कबूल करतो की इतक्या सतत बदलणाऱ्या गोष्टी होत्या की त्यामुळे हे

विषय गुंतागुंतीचे आहेत. आणि त्याबद्दल एक सरळ सोपे स्पष्टीकरण देणे भाबडेपणाचे आणि अपरिपक्व ठरेल.

**तुमची प्रगती तपासून पहाः**

१)चीन मधील धर्माबद्दल चर्चा करा.

२) तुमच्या मते भांडवलशाहीचा अभाव म्हणजे काय ?

३) भारतातील धर्माबद्दल मुख्य मुद्दे लिहा.

४) आधुनिक भांडवलशाही म्हणजे काय ?

५) प्राचीन यहुदी धर्माबद्दल चर्चा करा.

६) भांडवलशाहीच्या वाढीबद्दल स्पष्टिकरण द्या.

## ११.७ प्रश्नावली

१) वेबरची भारत आणि चीनमधील धर्माच्या बद्दलची मते लिहा. धर्मामुळे भांडवलशाहीच्या वाढीला ह्या देशांमध्ये अडथळे कसे आले ह्याचे स्पष्टीकरण करा.

२) भांडवलशाहीची वाढ तसेच भांडवलशाहीच्या वाढीचा अभाव ह्या दोन्ही गोष्टी यहुदी धर्मातील मुख्य मुद्यातून स्पष्ट करा.

## ११.८ संदर्भ सूची

१) Abraham Francis, 1982, मॉर्डन सोशियॉलॉजिकल थेअरी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी

प्रेस.

२) Abraham F. १९९१, सोशियॉलॉजिकल थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) Adams, B.N., and Sydie, R. A. 2001 सोशियॉलॉजिकल थेअरी न्यू दिल्ली विस्तार.

४) Aron Paymond, १९६५ मेन करन्ट्स इन सोशियॉलॉजी थॉट १ अ‍ॅंड २ ग्रेट ब्रिटन, वाइडेन फेल्ड ॲन्ड निकोलसन.

५) coser lewis, 1971 मास्टर्स ऑफ सोशियॉलॉजिकल (2nd एड.) हारकोर्ट ब्रेस ग्रोव्हानोविच इन्क.

६) Fletcher, Ronald 2000 दे मेकिंग ऑफ सोशियॉलॉजी द स्टडी ऑफ सोशियॉलॉजिकल थेअरी बिगिनिंगस अँड फाउंडेशन्स न्यू दिल्ली. रावत पब्लिकेशन.

७) Ritzer George 1988 सोशियॉलॉजीकल थेअरी (2n एड.) न्युयॉर्क मॅकग्रॉ हिल पब्लिकेशन.

८) Ritzer George 1996 मॉडर्न सोशियॉलॉजिकल थेअरी न्यु यॉर्क मॅकग्रॉ हिल पब्लिकेशन.

♦ ♦ ♦

## प्रकरण - १३
# मर्टन यांचा मध्यमस्तरीय सिद्धांत

**प्रकरणाची रचना**

१३.० उद्देश
१३.१ प्रस्तावना
१३.२ संरचनात्मक कार्यवादी सिद्धांत
१३.३ मध्यमस्तरीय सिद्धांत
१३.४ मध्यमस्तरीय सिद्धांताचे विशेष गुणधर्म
१३.५ संदर्भ गट
१३.६ नियमन रहिततेचा सिद्धांत
१३.७ सारांश
१३.८ तुमची प्रगती तपासा
१३.९ प्रश्न
१३.१०संदर्भ

## १३.० उद्देश

संरचनात्मक कार्यवादाचा परिचय करुन देणे.

नियमन रहितता आणि पथभ्रष्टतेच्या सिद्धांतावर प्रकाश टाकणे.

## १३.१ प्रस्तावना

जरी आर. के मर्टन यांचा कार्यवादी सिद्धांताकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पार्सन्सच्या सिद्धांतापेक्षा बराचसा वेगळा असला तरी समकालीन अमेरिकन समाजशास्त्राला आकार देण्याच्या प्रक्रियेवर मर्टन यांचाही प्रभाव पडला आहे. मर्टन यांचा जन्म फिलाडेलफिया या प्रांतात झाला आणि ते टेंपल युनिवव्हर्सिटीतून ग्रॅज्युअेट झाले. १९३६ मध्ये त्यांनी हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीतून पीच्.डी. मिळवली. ते पार्सन्सच्या हाताखाली शिकत होते. नंतर मर्टन १९४१ पर्यंत हॉर्वर्ड, तुलाने आणि कोलंबिया युनिव्हरसिटीत शिकवत होते. आता सध्या ते ब्युरो ऑफ अप्लाईड सोशल रिसर्च या संस्थेत मोठ्या पदावर कार्यरत आहेत.

## १३.२ संरचनात्मक कार्यवादी सिद्धांत

जरी टी.पारसन्स हे अत्यंत महत्त्वाचे संरचनात्मक कार्यवादी सिद्धांताचे प्रणेते होते तरी त्यांचे शिष्य रॉबर्ट मर्टन यांनी समाजशास्त्रातील संरचनात्मक कार्यवादासंबंधी महत्त्वाची विधाने

केली आहेत. संरचनात्मक कार्यवादातल्या अती टोकाच्या आणि असमर्थनीय अश्या पैलूंवर त्यांनी टीका केली आहे. त्यांच्या नव्या अंतरदृष्टीने त्यांनी ज्या संकल्पना मांडल्या त्यामुळे संरचनात्मक कार्यवादाचा नेहमीसाठी उपयोग व्हायला लागला हे ही तितकेच महत्त्वाचे आहे.

जरी पार्सन्स आणि मर्टन हे दोघेही संरचनात्मक कार्यवादाशी जोडलेले असले तरी त्या दोघांमध्ये महत्त्वाचा फरक आहे. पार्सन्स यांनी भव्य दिव्य अशा उच्च प्रतीच्या सिद्धांताची निर्मिती केली तर मर्टन यांनी मर्यादित अश्या मध्यमस्तरीय सिद्धांताची निर्मिती केली. दुसरी गोष्ट अशी की यांचा पार्सन्सपेक्षा मार्क्सवादी सिद्धांताकडे जास्त कल होता. खरे तर मर्टन आणि त्यांच्या काही शिष्यांनी  विशेषत: गोल्डनेर यांनी संरचनात्मक कार्यवादाला राजकीय दृष्ट्या डाव्या विचारसरणीकडे झुकवले.

संरचनात्मक कार्यवादाचा आदर्श नमुना मेलनोव्हस्की आणि रेडक्लिफ ब्राऊन सारख्या मानववंशशास्त्रज्ञांना विकसित केलेल्या कार्यात्मक विश्लेषणाच्या तीन गृहितकांवर मर्टन यांनी टीका केली आहे. पहिले गृहितक आहे समाजाचे कार्यात्मक ऐक्य.

**१) समाजाच्या कार्यात्मक ऐक्याचे गृहितक:**

हे गृहित असे मानते की सगळे प्रमाणित सामाजिक आणि सांस्कृतिक विश्वास किंवा श्रद्धा आणि पद्धती या संपूर्ण समाजासाठी कार्यशील असतात. तसेच ते व्यक्तीसाठीही कार्यशील असतात. याचा अर्थ असा की हे सगळे घटक एकमेकांशी जुळलेले आहेत. या गृहितकाला असा विश्वास वाटतो की प्रत्येक रुढी, श्रद्धा आणि विधी असे संस्कृतीचे घटक कार्यशील असतात. हे अशा अर्थाने की त्यांचे समाजाच्या निर्वाहासाठी काही ना काही योगदान असते. पण मर्टन यांचे म्हणणे असे की हे कदाचित लहान आदिवासी समाजापुरते खरे असेल पण हे सामान्य विधान  मोठ्या, संमिश्र आणि गुंतागुंतीच्या समाजाला लागू होत नाही. त्यांचा युक्तीवाद असा की सांस्कृतिक घटक हे नेहमीच कार्यशील नसतात. प्रत्येक घटक नेहमीच समाजाच्या जीवितासाठी काही तरी देतात पण सगळे घटक सारखेच देतात असे म्हणता येणार नाही. उदा. भारतातली हुंडा पद्धती, बालविवाह किंवा स्त्रीबालहत्या. मर्टन यानी अजून एक उदाहरण दिले आहे, की समाजाच्या उच्च स्तरातील लोकांचे देणे आणि निम्न स्तरांतील लोकांचे देणे यात फरक असतो आणि कधी कधी त्यात चकमकही होते. आजच्या आधुनिक गुंतागुंतीच्या समाजात जिथे विशेष कार्यशीलता असते तिथे संरचनात्क भेद आणि बौद्धिक नोकरशाहीत यात कार्यात्मक ऐक्य असेल याबद्दल शंका घेता येते. त्यामुळे कार्यात्मक विश्लेषणाने सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम स्पष्ट केले पाहिजेत आणि कुठला घटक काय देतो किती देतो याचे स्पष्टीकरण व्हायला पाहिजे.

**२) सार्वत्रिक कार्यवादाचे गृहितक:**

असा युक्तीवाद केला जातो की सगळे सामाजिक आणि सांस्कृतिक रचनेचे प्रकार हे सकारात्मक कार्य करतात. मर्टन यांचा दावा आहे की खऱ्या जगात जे दिसते ते याच्या विरोधात असते. मेलिनोव्हस्की म्हणतात की प्रत्येक प्रकारची संस्कृती, प्रत्येक रुढी, भौतिक वस्तु, समज आणि कल्पना हे एक भरीव कार्य करते. या विधानावर मर्टन यांनी आक्षेप घेतला आहे. ते उदाहरण देतात की वंशीय श्रेष्ठता ही इतरांच्या प्रगतीसाठी हानिकारक असू शकते. जे व्यक्तीसाठी चांगले असते तर समाजासाठी चांगले असतेच असे नाही. एखादी  रुढी एका विशिष्ट समाजासाठी चांगली असू शकते पण दुसऱ्या समाजासाठी चांगली असू शकत नाही. उदा. मुस्लीम लोकातली बकरी बळी देण्याची पद्धत. अभिजात वर्गासाठी एखाद्या सामाजिक रुढीचे परिणाम सकारात्मक

असू शकतात पण सर्वसाधारण जनतेसाठी नकारात्मक परिणाम असू शकतात. यांत्रिक साक्षरतेमुळे बेकारी वाढली आणि नवी पिढी निराश झाली. म्हणून आत्महत्येची प्रकरणे आता आश्चर्यकारक वाटत नाही. याचप्रमाणे एकत्र कुटुंब पद्धतीत जेष्ठांचा अर्निबंध अधिकार चांगला असू शकतो पण विघटित झालेल्या छोट्या कुटुंबात हे अधिकार चांगले असू शकत नाहीत.

**३) अपरिहार्यतेचे गृहितकः**

मुख्य समजूत अशी की जर एक सामाजिक नमुना उत्तमरित्या प्रस्थापित झाला तो काही मूलभूत गरजा पूर्ण करतो, त्यामुळे तो नमुना अपरिहार्य ठरतो. या समजुतीला मर्टन यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात काही संस्थात्मक कार्य पूर्ण करण्यासाठी कुठलीही एक गोष्ट अपरिहार्य नसते. तिला काही वेगळे पर्याय असू शकतात. उदा. सामाजिक एकात्मता हे जर धर्माचे कार्य असेल तर हे कार्य सबळ केंद्र सरकारही चांगले करु शकतो. असे सरकार जे परंपरेतला राजा, मुक्त लोक नियुक्त प्रतिनिधी किंवा सैनिकी हुकुमशहा स्थापना करु शकतो. मोक्ष मिळवणे हे जर धर्माचे कार्य असेल तर श्रद्धेची साधी पद्धत ही हे कार्य करु शकते आणि गुंतागुंतीचे धर्म टाळले जाऊ शकतात. मर्टन म्हणतात की, ही सगळी गृहितके तुम्हाला एकाच विचाराकडे घेऊन जातात आणि तो विचार म्हणजे सगळ्या रचना आणि संस्था या सामाजिक कार्यासाठी आवश्यक आहेत आणि त्यांना बदलले जाऊ शकत नाही. पण मर्टन यांनी स्पष्ट केले आहे की तेच कार्य निराळ्या पर्यायाकडून चांगल्या प्रकारे घेऊ शकते. ते म्हणतात की, कमीत कमी आपण हे मान्य करावे की निरनिराळ्या प्रस्थापित संस्थांना सुद्धा पर्याय आहेत.

मर्टनचे म्हणणे असे होते की, सगळी कार्यात्मक गृहितके आहेत ती अनुभवावर आधारलेली नाहीत. ती सगळी अमूर्त आणि सैद्धांतिक पद्धतीची आहेत. सगळ्या समाजशास्त्रज्ञांची ही जबाबदारी आहे की सगळ्या गृहितकांची अनुभवावरुन परीक्षा करावी. त्यांचा असा विश्वास आहे की अनुभवाधिष्ठित परीक्षा या सैद्धांतिक विधानांपेक्षा कार्यवादी विश्लेषणासाठी जास्त निर्णायक आहेत. यामुळे मर्टन यांनी कार्यवादी विश्लेषणाचा एक नमूना तयार केला आणि तो सिद्धांत आणि संशोधनाच्या एकीकरणासाठी मार्गदर्शक ठरला.

मर्टन यांनी पहिल्यापासून हे स्पष्ट केले की, संरचनात्मक कार्यवादी विश्लेषण हे गट, संघटना, समाज आणि संस्कृतीवर लक्ष केंद्रित करते. ते म्हणतात की कुठलीही वस्तू किंवा गोष्ट जिचे कार्यवादी विश्लेषण केले जाते ती प्रमाणित असली पाहिजे. त्यांनी सामाजिक भूमिका, संस्थाचे नमूने, सामाजिक प्रक्रिया, सांस्कृतिक शेती, सांस्कृतिक भावभावना, सामाजिक आदर्श, गटांच्या संघटना, सामाजिक संरचना आणि सामाजिक नियंत्रणाच्या योजना या साऱ्यांचा मुख्यतः संदर्भ दिला आहे.

मर्टन म्हणतात की पूर्वीच्या कार्यवादी शास्त्रज्ञांनी घेतलेल्या कार्यवादाच्या संदर्भाला एक सामाजिक हेतू होता. त्यांच्या मते त्या शास्त्रज्ञांनी कार्य म्हणजे व्यक्तीनी सामाजिक कार्य करण्याच्या हेतून केलेले कार्य म्हणजे कार्याचा त्याचा हेतू . मर्टन असे म्हणतात की संरचनात्मक कार्यवादी शास्त्रज्ञांचे लक्ष व्यक्तींच्या हेतूपेक्षा सामाजिक कार्यावर असले पाहिजे. त्यांच्या मताप्रमाणे कार्य म्हणजे निरीक्षित परिणाम (त्या कार्याचे) जे दिलेल्या व्यवस्थेचा स्वीकार आणि तडजोड करते, म्हणजेच सामाजिक संस्थेचे सातत्य टिकवण्याच्या हेतूने केलेल्या कार्याला कार्य अशी संज्ञा दिली आहे.

मर्टन म्हणतात की कुठल्याही संस्थेचे किंवा संरचनेचे जसे सकारात्मक परिणाम असतात तसेच त्याचे नकारात्मक परिणामही असतात. त्यामुळे त्यांनी अशा नकारात्मक परिणामाच्या कार्याला 'अ-कार्य' असे संबोधले आहे. जसे संरचना किंवा मूलद्रव्ये समाज पद्धतीच्या इतर भागांना जपण्यासाठी सकारात्मक परिणाम देऊ शकतात तसेच नकारात्मक आणि विध्वंसक परिणाम ही असू शकतात. उदा. गुलामगिरी एका अर्थाने चांगली होती की त्यामुळे शेतकी व्यवसायाचा विकास झाला पण सगळे लोक त्यांच्यावर इतके अवलंबून होते की ते दुसऱ्या कुठल्याही उत्पादन पद्धतीचा विचारही करु शकले नाहीत. उदा. औद्योगिकरण त्यांच्या अशा लक्ष न देण्यामुळे औद्योगीकरणाचा विकास झाला नाही.

मर्टन यांने ' न-कार्य' याची कल्पनाही मांडली. कार्याचे ते परिणाम जे दिलेल्या व्यवस्थेशी कसल्याच दृष्टीने संबंधित नसतात. पूर्वी काही प्रकारचे कार्य होत असेल पण आता ते अप्रासंगिक आणि निकामी झाले आहेत तरीही परंपरेच्या नावाखाली ते अजूनही चालू आहेत. उदा. उत्तर भारतीयांच्या सामाजिक रुढी जसे नवऱ्याच्या आणि मुलांच्या दीर्घायूसाठी उपवास करणे. या पद्धती आज पूर्णपणे कालबाह्य आणि अप्रासंगिक झाल्या आहेत पण तरीही परंपरेच्या नावाखाली चालू आहेत.

**अ-कार्य:**

अकार्य म्हणजे कार्याचे ते परिणाम जे समाजाच्या अस्तित्त्वासाठी हानिकारक आहेत म्हणजेच सामाजिक सातत्य आणि संतुलन बिघडवणाऱ्या कार्याला अ-कार्य म्हणतात. याचे उदाहरण म्हणजे धार्मिक किंवा जातीय दंगे तसेच स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम प्रतीची वागणूक आणि दुय्यम दर्जा हा समाजाच्या प्रगतीला बिघडविणारा आहे म्हणून मर्टन यांच्या मते ते अकार्य आहे. अ कार्य म्हणजे निरीक्षित परिणाम जे समाजाच्ये कमी अनुकूलन साधतात. असे कार्य समाजाचे सातत्य आणि संतुलन बिघडवते.

एखाद्या घटकाचे कार्यात्मक किंवा अकार्यात्मक परिणाम असतील तर त्या दोघांचा समतोल घडवून समतोल असे परिणाम साधले पाहिजेत.

मर्टन यांनी प्रकट कार्य आणि अप्रकट कार्य अशी संकल्पना निर्माण केली. या दोन्ही संकल्पना कार्यवादी विश्लेषणाला फार महत्त्वाचे योगदान करु शकतात. साध्या शब्दात सांगायचे म्हणजे प्रकट कार्य म्हणजे हेतूपूर्ण कार्य आणि अप्रकट कार्य म्हणजे अहेतूपूर्ण कार्य म्हणजे असेही म्हणता येईल की समाजाने मान्य केलेल्या कृतीला प्रकट कार्य आणि विशिष्ट उद्दिष्टपूर्तीसाठी व्यक्तीने स्वतःहून केलेले कार्य म्हणजे अप्रकट कार्य. प्रकट कार्य म्हणजे व्यवस्थेतील म्हणजेच समाजातील सदस्यांना मान्य असलेले कार्य आणि अप्रकट कार्य म्हणजे जे लपून राहिलेले आहे आणि कुणाकडून प्रत्यक्षपणे आणि ताबडतोब पाहिलेले नाही. उदा. देवळाचे किंवा चर्चचे बांधकाम म्हणजे धार्मिक प्रकट कार्य आणि विज्ञान आणि कलेला धर्मातून दिलेले प्रोत्साहन म्हणजे अप्रकट कार्य. मर्टन यांनी भारतीयांचे उदाहरण दिले आहे. जे प्रकट आणि प्रकट कार्यातला भेद सांगू शकते. अवर्षणाच्या काळात यज्ञासारखे विधी केले जातात ते पाऊस आणू शकतात की नाही तो प्रश्न नाही पण ते एक जादूमय वातावरण तयार करतात. तो विधी एक सामाजिक ऐक्याची भावना तयार करतो आणि सगळ्यांना आराम आणि करमणूक देतो आणि ती पद्धत चालू राहते एखाद्या रुढीचे प्रकट कार्य हे स्पष्टपणे दिसते. पण लपलेला आणि स्पष्ट होत नसलेला अर्थ समजून घेतला पाहिजे. त्यालाच सामाजिक विश्लेषण म्हणतात.

एखाद्या कुटुंबाने धार्मिक कार्याचे आयोजन केले तर त्यातून देवावरचा विश्वास प्रकट होतो. पण आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा आणि आपला उच्च सामाजिक दर्जा इतरांना दाखविणे हा त्यातला अंतस्थ हेतू असतो. त्याचप्रमाणे हुंडा घेण्याच्या पद्धतीत मुलाकडची बाजू रुढीला जागत असली तरी खूप पैसा घेऊन आपला दर्जा वाढवणे हा अप्रकट हेतू असतो. ख्रिश्चन मिशनरीज गरीबांना मदत करुन, आजाऱ्यांची सेवा करुन, गरीब मुलाच्या शिक्षणाला मदत करुन मानवतेची सेवा करतात. हा त्यांचा प्रकट हेतू आहे पण ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा त्यांचा अप्रकट हेतू होय. ते दवाखाने काढतात आणि गरीब आणि गरजूंना मदत करतात पण त्यांचा खरा हेतू हा धर्मप्रचाराचा असतो.

मर्टन यांचे विश्लेषण कार्य आणि अ-कार्य प्रकट कार्य आणि अप्रकट कार्य या संकल्पनांच्या संदर्भात जास्त स्पष्ट, अर्थपूर्ण आणि वैज्ञानिक ठरले.

मर्टन म्हणतात की ही अशीच व्यवस्था सकारात्मक आणि नकारात्मक परिणामांच्या बाबतीतही होऊ शकते. धर्म हा मोक्षप्राप्ती करुन देतो असे धार्मिक लोकांना वाटते. पण मार्क्सवादी लोकांना धर्म म्हणजे गुंगीचे औषध वाटते, जे आळशी लोकांना नशिबावर अवलंबून राहायला लावते. काही जणांसाठी एखादी गोष्ट कार्य असू शकते पण तीच गोष्ट दुसऱ्या लोकांसाठी अकार्य असू शकते. कामगारांचे शोषण ही गोष्ट भांडवलदारांसाठी नफा वाढवण्याच्या दृष्टीने चांगले असू शकते. तर उत्पादनाच्या दृष्टीने आणि कामगारांमध्ये असंतोष निर्माण करण्याच्या दृष्टीने अकार्य असू शकते.

## १३.३ मध्यमस्तरीय सिद्धांत

टी. पार्सन्स यांनी कार्यवादाची संकल्पना विकसित केली तेव्हाच मर्टन यांनी पार्सन्सच्या संकल्पनेवर टीका केली. मर्टनच्या मते पार्सन्सनी सामाजिक सिद्धांताच्या संपूर्ण व्यवस्थेचा शोध सुरु केला ज्यात सामाजिक वर्तनाच्या प्रत्येक पैलूचे, संघटना आणि परिवर्तन याबद्दलचे त्यांचे निरीक्षण आले आहे. पण मर्टन यांचे म्हणणे असे की भव्य अश्या सैद्धांतिक योजना या अपरिपक्व आहेत कारण त्यांच्या पूर्ततेसाठी आवश्यक ते सैद्धांतिक आणि अनुभवाधिष्ठित क्षेत्र कार्य (उेदल्हॅ दद) केले गेले नाही. असे सिद्धांत सर्वसामान्य आकडेवारी , अस्थिर निकष यावरुन गोष्टी समाजशास्त्रज्ञांनी लक्षात घेतल्या आहेत. पण त्याऐवजी त्यांनी आकार घेतलेले निरनिराळ्या विशिष्ट अश्या अस्थिर गोष्टींमधले संबंध सिद्ध करणारी विधाने त्यांनी लक्षात घ्यायला हवी होती. मर्टनच्या मते असे सिद्धांत व्यापक आणि भव्य असतात पण ते खरे सिद्धांत नसतात. तर ते तत्त्वज्ञानात्मक असतात. त्यांच्यात वेगवेगळ्या सूचना, शानदारपणा असतो. आणि त्यांच्यात अर्थहीनता आणि परिणामशून्यता असते.

मर्टनच्या म्हणण्याप्रमाणे मध्यमस्तरीय सिद्धांत जास्त सैद्धांतिक आश्वासन देतात. ते अपूर्व घटनांचा किंवा जो काही विषय संशोधनासाठी घेतला असेल त्याचा मर्यादितपणा समजून सांगतात, आणि त्याचं अमूर्तपण कमी करतात, कमी पृथःक्करण करतात. जरी मध्यमस्तरीय सिद्धांत अमूर्त असले तरी ते अनुभवाशी संबंधित असतात. म्हणून ते अश्याप्रकारच्या संशोधनाला प्रोत्साहित करतात जे संकल्पनांच्या स्पष्टीकरणासाठी आणि सैद्धांतिक सामान्य विधानाच्या रचनेसाठी आवश्यक असतात. मर्टन म्हणतात की सिद्धांत हे संशोधनाशी संबंधित असले पाहिजेत नाहीतर सैद्धांतिक सूचना या संकल्पनेच्या पातळीवरच राहतात त्याचा प्रत्यक्षात काही उपयोग होत नाही. त्याचप्रमाणे संशोधनालाही सिद्धांताची जोड हवी कारण सिद्धांताशिवाय संशोधनाला सलगता येणार नाही, त्यात पद्धतशीरपणा

राहणार नाही आणि विस्तार पावत असलेल्या सामाजिक ज्ञानासाठी त्याचा काही उपयोग होणार नाही. अशाप्रकारे मध्यमस्तरीय धोरणांचा स्वीकार केला तर सामाजिक संकल्पना आणि विधाने ही जास्त सुव्यवस्थित होतील. तात्त्विक संशोदन संकल्पनांच्या आणि विधानांच्या स्पष्टीकरणावर, सुधारणेवर आणि पुनर्रचनेवर जास्त जोर देते.

खरे तर मर्टन यांच्या मताप्रमाणे सुधारणांना प्रोत्साहित करणाऱ्या मर्यादित स्वरुपाच्या संकल्पनांच्या बांधणीसाठी उत्साहाची आणि शक्तीची आवश्यकता असते. तरीही सिद्धांतवादी लोकांनी सुद्धा विशेष सिद्धांताना नैतिक सर्वसामान्य संकल्पना आणि परस्परसंगत विधानांशी संलग्न करणे किंवा एकत्र करणे याबद्दल विचार केला पाहिजे. आणि समाजशास्त्राच्या विशेष सिद्धांताची बांधणीही जास्त सामाजिक सामान्य सिद्धांताच्या हेतूनेच केली पाहिजे. अश्याप्रकारे विचार केल्यामुळे मर्टनसाठी कार्यवाद म्हणजे मध्यमस्तरीय सिद्धांताची नुसती बांधणीच नव्हे तर त्याच्या योगे भव्य दिव्य अशा सैद्धांतिक योजना तयार करणे होय. मध्यमस्तरीय सिद्धांताच्या आधारावर भव्य सिद्धांत बांधले जाऊ शकतात.

जरी संशोधकाचा उद्देश हा विशेष सिद्धांताना सामान्य सिद्धांतात दृढ करणे आणि परस्परसंगत अश्या विधानांनाही एका संचामध्ये दृढ करणे असा असला तरी त्यांनी प्रथमतः मध्यमस्तरीय सिद्धांतावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मर्टनसाठी सिद्धांत हे पुरेशा सत्य विधानावर आधारित असले पाहिजेत. मर्टन म्हणतात की मध्यमस्तरीय सिद्धांताचे मूळ लहान सिद्धांतात असते पण आवश्यक ती कार्यशील गृहितके जी संशोधनाच्या समस्यांसाठी अभ्यासली जातात. त्यातून सर्वसमावेशक प्रयत्नांनी एक भव्य असा एकत्रित सिद्धांत विकसित केला जातो जो सिद्धांत निरीक्षण केलेले सामाजिक व्यवहार, सामाजिक संघटना आणि सामाजिक परिवर्तनाचे स्पष्टीकरण देतो. दुसरे म्हत्त्वाचे लक्षण म्हणजे ते मुख्यतः अनुभवाधिष्ठित संशोधनाला मार्गदर्शन करतात हे सिद्धांत सामाजिक घटनांच्या मर्यादित पैलूंचा अभ्यास करतात. जसे की सामाजिक गतिशीलता, संदर्भ गट, बदलते आदर्श, मूल्ये, धर्म वगैरे. हे स्पष्ट आहे की असे मध्यमस्तरीय सिद्धांत आणि लहान गृहितके एकत्रित आणि सर्वसामान्य ज्ञानबांधणीसाठी मदत करतात. असे सिद्धांत जे असतात त्यांची अनुभवाच्या दृष्टीनेही परीक्षा घेतली जाऊ शकते.

मध्यमस्तरीय सिद्धांताच्या बांधणीसाठी मर्यन कार्यवादी नमुन्याचे समर्थन करतात. त्याच्यामुळे सोपे तपशील आणि संबंधित संकल्पनांचे समर्थन होते, आणि पद्धतशीर तपासणी आणि अनुभवाधिष्ठित शोधांनी ती नियंत्रित केली जाते.

## १३.४ मध्यमस्तरीय सिद्धांताचे प्रमुख आणि विशेष गुणधर्म

१) मध्यमस्तरीय सिद्धांत हे मर्यादित धारणांच्या संचावर अवलंबून असतात. अशा धारणांच्या संचामधून विशेष गृहितके निघतात आणि मग ते अनुभवाधिष्ठित तपासणीने कायम आणि पक्के केले जातात.

२) मध्यमस्तरीय सिद्धांत व्यापक असतात आणि परस्परांशी मिळून काम करणाऱ्या सिद्धांत दृढ होतात.

३) हे सगळे सिद्धांत निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक व्यवहाराच्या वर्तुळाशी, सामाजिक परिवर्तनाशी आणि सामाजिक रचनांशी संबंधित असतात.

४) मध्यमस्तरीय सिद्धांत सूक्ष्म सामाजिक समस्या आणि व्यापक सामाजिक समस्या यातील फरक स्पष्ट करतात.

५) मध्यमस्तरीय सिद्धांत हे सामान्य सामाजिक पूर्वाभिमुखतेपेक्षा विशेष पूर्वाभिमुखतेने बनलेले असतातय

६) अश्या भिन्नतेमुळे खूप मध्यमस्तरीय सिद्धांत हे विस्तारीत सिद्धांतामध्ये विकसित होऊ शकतात.

७) असे सिद्धांत उपलब्ध असलेल्या ज्ञानाच्या द्वारे समजावून घेतल्या जाणाऱ्या प्रश्नांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ भूमिकेच्या संचाचा सिद्धांत. हा सिद्धांत सामाजिक परिस्थितीतल्या व्यक्तीच्या स्थानाचे स्पष्टीकरण करतो म्हणजे एका स्त्रीची पत्नीची, आईची, मैत्रिणीची, शेजाऱ्याची, व्यावसायिक पदावरील अधिकारी, नातलग, सून आणि सासू अश्याप्रकारच्या निरनिराळ्या प्रकारच्या भूमिका एक स्त्री पार पाडत असते. हा भूमिकेचा एकच प्रकार नसतो, त्या सगळ्या भूमिका एकमेकांशी संबंधित असतात, आणि एकमेकांत गुंतलेल्या असतात. तेव्हा हा भूमिकांचा सिद्धांत हा सामाजिक रचनेचा एक घटक अश्या दृष्टीने आपण त्याचा विचार करु शकतो. ही भूमिकांची कल्पना असते, सामाजिक रचना ही अश्या प्रकारच्या भूमिकांनी बनलेली असते आणि त्या त्या प्रमाणे त्या भूमिका एकमेकांशी संबंध ठेवू शकतात. या सगळ्या भूमिका मतभेदांना टाळून यशस्वीरित्या सांभाळले जातात. म्हणजेच ती एकच व्यक्ती असली तरी अनेक प्रकारच्या भूमिकांना ती व्यक्ती सांभाळत असते.

जेवढा पार्सन्सचा सिद्धांत स्वीकारला गेला तितका मर्टनचा कार्यवादाचा सिद्धांत स्वीकारला गेला नाही, तरीही मध्यमस्तरीय सिद्धांताने अनेकांचे लक्ष वेधून घेतले, मर्टनची मध्यमस्तरीय व्यवस्था सिद्धांताची संख्या वाढवण्यासाठी प्रोत्साहन देते. खरे तर हे सिद्धांत पुरेसे अमूर्त नव्हते. पण अनुभवाधिष्ठित होते. मर्टन यांनी मुलांची उपेक्षा, कौटुंबिक झगडे, वंशीय नातेसंबंध, अमेरिकेतली सामाजिक गतिशीलता आणि इतर अनुभवाधिष्ठित घटना याबद्दलच्या सिद्धांतांची रचना केली. खरे तर यापैकी कोणतेही सिद्धांत सामान्य आणि अमूर्त सूचना म्हणून जास्त दृढ होऊ शकल्या नाहीत ते फार अनुभवाधिष्ठित असल्यामुळे ते त्या विशेष वेळेशी, जागेशी आणि संदर्भाशी बांधून होते. जरी मर्टनचा कार्यवादाचा सिद्धांत फारसा उपयोगात आणला गेला नाही तरी त्याचे मध्यमस्तरीय सिद्धांताचे समर्थन मात्र लोकांचे लक्ष वेधून घेण्यात यशस्वी झाले . अनुभवाधिष्ठित संशोधनाला या सिद्धांताचा आधार आहे. टर्नर यांच्या सारख्यांना असे वाटते की हे सिद्धांत अनुभवाच्या नियमिततेच्या विधानापेक्षा जास्त वरचे म्हणजे जास्त चांगले आहेत मात्र त्यांना सूचनांच्या अमूर्त संचाची गरज आहे. या सूचना त्यांचे स्पष्टीकरण देऊ शकतात.

## १३.५ संदर्भ गट

समाज शास्त्रज्ञ, समाज मानस तज्ञ आणि सांस्कृतिक मानवंश शास्त्रज्ञ यांनी मूलभूत अश्या तत्त्वावर काम केले आणि ते तत्त्व म्हणजे व्यक्तीचा कल आणि त्याचे वर्तन हे ते ज्या गटाचे आहेत त्यानुसार आकाराला येते. दुसरे म्हणजे स्व मूल्यमापन आणि परस्परसंबंधित भावना आणि वर्तन हे विशिष्ट गटाच्या व्यक्तीच्या वंशपरंपरागत स्थानावर अवलंबून असते. पण जरी काही लोक चांगल्या स्थितीत असले तरी कधी कधी उच्चवर्णीय लोकांमध्येही सुधारणावादी आणि क्रांतीकारी विचार येतात. उदा. कट्टरवादी कुटुंबातली मुले परंपरावादी आणि सुधारणा वादी निघतात.

आपला कल, आपला विचार आणि आपला दृष्टिकोण बनविण्यासाठी लोक आपल्या गटापेक्षा दुसऱ्या गटातल्या लोकांची मदत घेऊ शकतात. ज्या गटाकडे व्यक्ती वळत असते ते गट अनुभवाने निश्चित केलेले असतात. अशा प्रकारच्या गटाशी तुलना करुन व्यक्ती आपले मूल्यमापन करु शकते आणि स्वतःचे वर्तन सुधारु शकते, किंवा विकसित करु शकते. गटाच्या प्रभावाने मुख्य तत्त्वे जपली जाऊ शकतात. ज्या गटाशी माणसे स्वतःला जोडू इच्छितात ती ही गुंतागुंतीची वाटचाल समजू शकतात आणि स्वतःला विचारांच्या दृष्टीने श्रीमंत करु शकतात.

डब्ल्यु. जी. समनर यांनी अंतर्गत आणि बाह्य गट अशी कल्पना मांडली आहे. सी. एच. कूली यांनी आपल्या वातावरणाशी, आजूबाजूच्या परिसराशी संलग्न असलेल्या गटांना दुसऱ्या गटाबद्दल आपुलकी वाटत असते असे म्हंटले आहे. काल्पनिक सामाजिकते मध्ये विविधता असते आणि निरनिराळे भेद असतात. व्यक्ती असे अनेक गट संदर्भासाठी आणि तुलनेसाठी वापरत असते असा कूली अभिप्राय देतात. १८९० मध्ये ''सामाजिक स्वत्त्व'' ही कल्पना मांडताना डब्ल्यू . जोन्स असे सूचित करतात दूरच्या गटाच्या विचाराने आणि ज्या व्यक्ती आदर्शतत्त्वावर काम करतात अश्या लोकांच्या प्रभावाने आपला संभाव्य स्वत्त्व हा विकसित होतो आणि आंतरिक दृष्ट्या सशक्त होतो.

संदर्भ गटाच्या सिद्धांताला मर्टन यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामध्ये मर्टन अनेक प्रकारचे संदर्भ गट बनवतात. हे असे गट स्व-मूल्यमापनासाठी आणि आपला कल बनविण्यासाठी किंवा आपले वर्तन सुधारण्यासाठी संदर्भाची एक चौकट पुरवितात. १९४२ मध्ये हायमन यांनी सामूहिकरित्या किंवा वैयक्तिकरित्या एखादी व्यक्ती स्वतःचे वर्तन सुधारताना आणि मते बनविताना दुसऱ्या एखाद्या गटाची मदत घेऊ शकते असे म्हटले आहे. आता ती व्यक्ती जी गटाची सदस्य आहे त्यापेक्षा तो वेगळा असू शकतो किंवा तोच असू शकतो.

यात काळाचाही एक पैलू असतो. व्यक्तीच्या संदर्भ गट पुढे नक्की केला जातो पण वर्तमानात मात्र ज्या गटात त्याला सामील व्हायचे आहे तश्याप्रकारची त्याची कृती असू शकते.

मर्टन यांनी संदर्भगटाचे दोन भाग केले आहेत. त्या गटाकडे येणाऱ्या लोकांचे वर्तन आणि व्यवहार ठरविण्याची जी लक्षणे आहेत त्यानुसार मर्टन यांनी संदर्भ गटाचे दोन भाग केले आहेत.

१) **आदर्शवादी गट** - व्यक्तीसाठी म्हणून ते आदर्शवादी प्रमाण बनवितात आणि त्यांचे पालन करतात.

२) **तुलनात्मक गट** - हा गट संदर्भांची एक चौकट पुरवतो आणि त्याप्रमाणे व्यक्ती स्वतःचे आणि इतरांचे मूल्यमापन करु शकतो.

पहिल्या भागातल्या त्या महत्त्वाच्या व्यक्ती ज्यांनी मुल्यांच्या स्त्रोतांना आत्मसात केलेले असते मग त्या व्यक्ती त्या गटाच्या सदस्या असतील किंवा नसतील. दुसरा भाग म्हणजे स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या संबधित स्थानाचे मूल्यमापन करता येते. हे एकतर स्वाभिमानासाठी किंवा दुसऱ्या गटाच्या अनुकरणासाठी असते.

आदर्शवादी गट हे व्यक्तीसाठी आदरणीय आणि आदर्श म्हणून समोर ठेवलेले असतात. उदा. महात्मा गांधी आणि इतर राजकीय नेते. व्यक्ती त्यांच्याकडून स्फूर्ती घेतात. त्याचप्रमाणे आशियाई देश तांत्रिक भौतिक दृष्ट्या सुधारण्यासाठी पाश्चात्य देशाकडून प्रेरणा घेतात. त्याच वेळी

संदर्भगटाशी तुलना ही एकाच पातळीवर असते. मध्यमवर्ग स्वत:ची तुलना उच्च वर्गाशी किंवा निम्न वर्गाशी करतो. चाळीत राहणारे लोक आपली तुलना झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांशी करतात, पण याचा अर्थ असा नाही की तो चाळीतच राहू इच्छितो. आदर्श गट हे अनुकरण करण्यासाठी असतात. पारसी हे गुजराथी लोकांच्या समोरचे आदर्श आहेत तर इंग्लिश लोक हे भारतीयांच्या डोळ्यासमोरचे आदर्श आहेत. अशा प्रकारच्या गोष्टीत व्यक्ती आपली तुलना आदर्शगटाशी करते पण त्याच्यासारखे होणे तिला परवडत नाही.

## १३.६ नियमन रहिततेचा सिद्धांत

१८९३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या डरखाईम यांच्या पहिल्या पुस्तकाचे म्हणजे ''समाजातले श्रमविभाजन'' या पुस्तकात नियमनरहिततेच्या सिद्धांताचा विकास झाला पण त्यांच्या 'ल सुईसाईड'' या पुस्तकात नियमन रहिततेच्या सिद्धांताचा उपयोग झाला.

अमर्यादित महत्त्वाकांक्षा आणि नियंत्रित समाजाचे कोसळणे ही दोन नियमनरहिततेची कारणे आहेत असे डरखाईम यांनी सांगितले आहे. ''कुठलाही प्राणी त्याच्या गरजा आणि गरजा पुरवण्याच्या साधानांमध्ये मेळ असल्याशिवाय आनंदी राहू शकत नाही किंवा अस्तित्त्वातही राहू शकत नाही.'' माणसाची भावना अनुभवण्याची शक्ती अतृप्त आणि अंतहीन असते. डरखाईम यानी हे निश्चित केले की माणसाच्या अमर्याद इच्छांना फक्त नैतिकतेची शक्तीच रोखू शकते किंवा नियंत्रित करु शकते. आणि त्यांच्या मते सामाजिक किंवा सामुदायिक शक्ती सामाजिक आणि नैतिक गरजांवर नियंत्रण ठेवू शकते कारण हीच शक्ती व्यक्तीच्या शक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे हे व्यक्ती मान्य करते आणि सामुदायिक शक्तीच्या अधिकारालाही मान्यता देते.

पण तरीही कधी कधी ही व्यवस्था कोसळते आणि नियमनरहिततेचा प्रवेश होतो. व्यक्तीचा सामाजिक पद्धतीवरचा आणि सामाजिक कायद्यावरचा विश्वास उडतो.

''पण जेव्हा समाज काही दु:खदायक प्रसंगी किंवा आनंदादयी प्रसंगीही अचानक झालेल्या स्थित्यंतराने अस्वस्थ होतो. त्या क्षणी तो प्रभाव ते पेलवू शकत नाहीत. म्हणून आत्महत्येच्या प्रमाणात अचानक वाढ होते. काही लोक अचानक गरीब होतात, त्यांची खालच्या स्थरावर झालेली अवनती त्यांना स्वीकारता येत नाही. आपल्या गरजा कमी करणे किंवा स्व-नियंत्रण करणे त्यांना जमत नाही. त्याऐवजी ते जुन्याच श्रीमंत पद्धतीने राहू इच्छितात. समाजही त्यांना सावरायला वेळ देऊ शकत नाही. अश्यावेळी व्यक्ती आपला विश्वास गमावते आणि आत्महत्या करायला प्रवृत्त होते.

अशा प्रकारे कुठलेही आकास्मिक स्थित्यंतर उदा. आर्थिक संकट, औद्योगिक आणीबाणीचा वेळ किंवा अचानक आलेली समृद्धी आदर्श रचनेला अनियंत्रित करु शकते. अचानक झालेले बदल समाजाचे मापदंड चटकन बिघडवू शकतात पण नवे मापदंड ताबडतोब विकसित होऊ शकत नाहीत. ही अनियंत्रित अवस्था किंवा नियमन रहितता ही अनुशासन नसलेल्या भावनांमुळे वाढत जाते, खरे तर याच वेळी अनुशासनाची जास्त आवश्यकता असते. अचानक समृद्धीकडे नेणारे बदल जीवनशैली बदलू शकतात किंवा एखादा विवाहविच्छेद आयुष्याची घडी विसकटून टाकतो. जे आदर्श पाळायचे असतात ते सगळे आदर्श या आकस्मिक झालेल्या पुरात वाहून जातात.

थोडक्यात डरखाईम यांनी नियमन रहितता म्हणजे अनियंत्रित आणि नियमन नसलेली आदर्श रचनेची सामाजिक परिस्थिती असे मानले आहे सतत वाढत चाललेली महत्त्वाकांक्षा, हांव आणि अमर्याद इच्छा यांना सामुदायिक नीतिमत्ता आवर घालू शकली नाही.

मर्टन यांनी आपल्या सामाजिक रचना आणि नियमनरहितता या प्रसिद्ध निबंधात डरखाईम यांच्या नियमन रहिततेच्या संकल्पनेचा विस्तार केला. त्यांना फक्त आत्महत्याच नाही तर निरनिराळ्या प्रकारचे पथभ्रष्ट व्यवहार आणि क्रांतिकारी बदलांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. डरखाईम यांनी अप्राप्य ध्येयासाठी वाढत चाललेली महत्त्वाकांक्षा यावर जोर दिला तर मर्टन यांनी हे शोधण्याचा प्रयत्न केला की काही समाजरचना समाजातील काही विशिष्ट माणसांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. कारण ते समाजमान्य वर्तनापेक्षा समाजाला अमान्य असलेले वर्तन करतात.

समाजमान्य वर्तनापेक्षा समाजाला अमान्य असलेल्या वर्तनात गुंतलेल्या व्यक्तीवर समाज रचना कसा प्रभाव टाकतात हे शोधण्यावर मर्टन यांनी जोर दिला आहे. फ्राईड यांचे म्हणणे होते की माणसाच्या सहज आणि नैसर्गिक अशा उत्कट भावनांच्या मुक्त अविष्कारावर समाज रचना ताण टाकतात किंवा प्रतिबंध करतात तेव्हा ही माणसे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी समाजाच्या प्रतिबंधाविरुद्ध बंड करतात. याच्या विरुद्ध मर्टन यांचे म्हणणे आहे की प्रतिबंध न करता समाज हा कृतीशील आहे, ताज्या प्रेरणा तयार करणारा आहे आणि वर्तनाच्या पद्धतीही तयार करणारा आहे. अशाप्रकारे मर्टन यांनी व्यक्तीवर जास्त लक्ष देण्यापेक्षा सामाजिक व्यवस्थेवर जास्त भर दिला आहे. व्यक्तीच्या प्रतिसादावर किंवा व्यक्तीच्या वर्तनावर आदर्शवादी समाजरचनेचा किती प्रभाव पडतो आणि त्याचे काय महत्त्व आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला.

समाज आणि सांस्कृतिक रचनांच्या अनेक घटकांचे विश्लेषण करुन त्यातील दोन भाग केले आहेत. सांस्कृतिक ध्येय आणि संस्थात्मक साधने, सामाजिक प्रतिष्ठा, चांगली कमाई, आरामदायक नोकरी, दर्जा, सत्ताकेंद्र ही सगळी सांस्कृतिक ध्येये किंवा उद्दिष्टे आहेत तर कठीण परिश्रम, चांगले शिक्षण, आपला विकास करुन घेण्यासाठी आव्हाने स्वीकारण्याची इच्छा आणि प्रगती ही संस्थात्मक साधने होत.

संस्थात्मक साधने म्हणजे ही सांस्कृतिक उद्दिष्टे प्राप्त करुन घेण्याची स्वीकारमान्य पद्धती होय. ही संस्थात्मक साधने म्हणजे फार योग्य आहेत असे नव्हे तर निदान ती नियंत्रित केलेली आहे समाज पद्धतीने मान्य केलेली आहेत.

मर्टन त्यांच्या या मतावर जोर देतात की जेव्हा व्यक्तीला त्यांचे ध्येय मिळवण्यासाठी समाज मान्य आणि समाजनियंत्रित साधने जेव्हा मदत करत नाहीत तेव्हा ती व्यक्ती समाजाने मान्य न केलेल्या दुसऱ्या साधनांकडे वळते. अशी परिस्थिती म्हणजे नियमनरहितता. याचा अर्थ असा की व्यक्ती ही परिस्थितीशी जुळवून घेण्यास असमर्थ झाल्यामुळे ती नेहमीच्या सर्वसामान्य कृती किंवा वर्तनापासून दूर जातात. त्यामुळे मर्टन यांच्यासाठी नियमनरहितता म्हणजे नेहमीच्या वागण्यापासून दूर जाणे म्हणजेच एका दृष्टीने पथभ्रष्ट होणे होय जिथे व्यक्ती जीवनाच्या सर्वसामान्य रीतीभाती पाळत नाही.

मर्टन यानी नियमनरहिततेच्या सिद्धांतात फेरबदल केला. जेव्हा समाजाने स्वीकारलेल्या मूल्यांचा सामाजिक सत्य परिस्थितीशी जेव्हा संघर्ष होतो तेव्हा व्यक्तीच्या वागण्यावर ताण पडतो. औद्योगिक समाजात सामान्यतः भौतिक यशावर भर दिला जातो. आणि त्यात यश मिळवण्यासाठी कठीण परिश्रम आणि स्वयं अनुशासन ही साधने मानली जातात. पण खूपजणांना भौतिक यश

मिळवण्यासाठी संधी मिळत नाही. अशा परिस्थितीत पुढे जाण्यासाठी (भौतिक यश मिळवण्यासाठी) कायदेशीर किंवा बेकायदेशीर साधने वापरुन पाहण्यासाठी व्यक्तीच्या मनावर दबाव येऊ शकतो. त्यामुळे मर्टन यांच्या साठी आर्थिक असमानता आणि समानसंधी मिळण्याची उणीव त्यामुळे व्यक्ती नेहमीच्या वागण्यापासून दूर जाऊ शकते किंवा पथभ्रष्ट होऊ शकते.

लोक आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी समाजमान्य साधनांचा उपयोग का करतात किंवा का करत नाहीत याचे स्पष्टीकरण देण्यासाठी मर्टन नियमन रहिततेचा उपयोग करतात. मर्टन म्हणतात की एक महत्त्वाचे सांस्कृतिक ध्येय म्हणजे पैसा कमविणे हा होय. लोकांना ध्येय कसे असावे हे सांगताना आपला समाज ते कसे मिळवावे याबद्दलच्याही सूचना करतो उदा. शाळेला जाणे, कठीण परिश्रम, प्रयत्न न सोडणे आणि संधीचा फायदा घेणे वगैरे.

सांस्कृतिक ध्येय (उद्दिष्ट) आणि संस्थात्मक साधने यांच्यात अंतर निर्माण करणाऱ्या पथभ्रष्ट (नेहमीच्या वागण्यापासून दूर जाणे) कृतीची मर्टन यांनी यादी दिली आहे. जेव्हा योग्य त्या मार्गाने यश मळत नाही तेव्हा लोक दुसरे मार्ग स्वीकारतात त्याचा परिणाम म्हणून पथभ्रष्ट व्यवहार केले जातात. याला पथभ्रष्ट नियमन रहिततेचा सिद्धांत असे म्हणतात.

व्यक्ती समाजात आपले अस्तित्त्व टिकावे म्हणून चार अनुकूलनाच्या पद्धतीचा स्वीकार करते

१) नूतन पद्धती, २) विधीवाद, ३) माघार घेणे ४) विद्रोह करणे.

### १) नियमांना चिकटून राहणे:

अनुकूलनाचा हा सर्वसामान्य आणि व्यापक प्रकार होय. हे पथभ्रष्टतेच्या विरुद्ध आहे. यात दोन्ही गोष्टींचा स्वीकार केला जातो. सामाजिक ध्येय (श्रीमंत होणे ) आणि स्वीकारलेले साधन (कठीण परिश्रम) मर्टन यांच्या मते स्वीकारलेले सांस्कृतिक ध्येय आणि ते मिळविण्यासाठीचे कायदेशीर साधन यात काहीतरी एकमत असावे. अशाप्रकारच्या एकमताविना लोक सामुदायिकरित्या राहतील पण त्यात सगळ्यांना जोडणारी एकत्रित संस्कृती राहणार नाही. आणि मग अशा परिस्थितीत सततच्या अव्यवस्थेच्या गदारोळात रहावे लागेल.

### २) नूतन पद्धती:

अशा प्रकारच्या अनुकूलनाच्या तत्त्वात व्यक्ती ध्येयावरच्या सांस्कृतिक प्रभावाला आत्मसात करते. मात्र ते ध्येय मिळवण्यासाठी जे संस्थात्मक सर्वमान्य आदर्श आहेत त्यांना त्या प्रमाणात स्वीकारत नाहीत किंवा अंगात मुरवत नाहीत. ती व्यक्ती यशाचे ध्येय स्वीकारते पण समाजमान्य साधनांना नाकारते. तो समाजाने बंदी घातलेल्या बेकायदेशीर साधनांना म्हणजे दरोडे, चोरी, बनावटी कागद किंवा परीक्षेतील फसवणूक अशा प्रकारच्या गोष्टींना म्हणजे बेकायदेशीर रीतीने जिथे ध्येयप्राप्ती केली जाते अशा साधनांना तो स्वीकारतो. या नूतन पद्धती बाबतीत मर्टन यांनी हे लक्षात घेतले की अशा प्रकारचे पथभ्रष्ट वर्तन निम्न वर्गात विशेषत्वाने होत असते. कारण त्याचे यशासाठीचे प्रयत्न अनेक प्रकारच्या रचनात्मक अडथळ्यांनी प्रतिबंधित केले जातात. एकीकडे तर यशाचे ध्येयाचे महत्त्व खूप आहे आणि दुसरीकडे लोकसंख्येतल्या काही गटांना ध्येयप्राप्तीची संधी नाकारली जाते.

पण ध्येयप्राप्तीची संधी नाकरणे हेच काही मुख्य कारण नाही. यशावर आणि सामाजिक गतिशीलतेवर जोर देणारे जात आणि वर्ग यांचे विलक्षण संमिश्रण निम्न थरातील लोकांना पथभ्रष्टतेकडे घेऊन जाते.

### ३) विधीवाद:

यात अंतीम ध्येय नाकारले गेले तरी नियम मात्र पाळले जातात. असे लोक जरी परीक्षेला बसले तरी फारसे महत्त्वाकांक्षी नसतात. जसे स्वागत कक्षात स्वागत सुंदरी किंवा नोकरशाह लोक. ते फक्त आपल्या कामात रस घेत असतात आणि अत्यंत बारकाईने निरीक्षण करत ते आपले काम करत असतात पण अंतरंगातून मात्र ते ध्येयहीन असतात. विद्यार्थी वर्गात बसतात. पण अभ्यासात त्यांचे लक्ष नसते. त्यांचा उद्देश फक्त परीक्षेला बसण्यापुरती हजेरी मिळवण्याचा असतो. स्पर्धेत राहून कठीण परिश्रम घेण्यापेक्षा ते सुरक्षित अश्या दैनंदिन कार्यक्रमाला आणि संस्थात्मक नियमांना बिलगून असणे पसंत करतात. मर्टन म्हणतात की निम्न मध्यम वर्गीय लोक अश्या प्रकारच्या विधींना स्वीकारतात. मर्टनसाठी असे लोक भौतिक ध्येयाचा त्याग करतात आणि फक्त संस्थात्मक नीतिनियमांना न चुकता पाळत असतात. ते काम करतात पण त्याचे मन त्या कामात ओतलेले नसते. ते लोक कामाला ध्येयसिद्धीचे साधन समजतात पण कामाला आपल्या आयुष्याचे ध्येय मानीत नाहीत. दुसरा काही पर्याय नाही म्हणून ते काम करतात. ते त्यांना करावेच लागते नाहीतर काम सोडावे लागते. त्यामुळे काम हे ध्येयसिद्धीचे साधन राहात नाहीत तर आयुष्य काढण्याची ती एक रीत असते. कधी कधी एखादा समाजसेवक बेघर कुटुंबाला मदत करण्याचे नाकारतात कारण ते दुसऱ्या प्रांतातून आलेले असतात. खुपदा नोकरशाहीतले लोक आंधळेपणाने नियमांचे पालन करतात. त्या कामाचा त्या संस्थेतल्या ध्येयासाठी काय उपयोग आहे हे ते बघत नाहीत. त्यांचे काम त्यांना कसल्याही प्रकारचा मोबदला देत नाहीत. हे माहित असूनही ते त्यांच्या कामाला चिकटून असतात.

### माघार घेणे (ऊर्प ॄॄॄ):

माघार घेणारे लोक जे ध्येय आणि समाजातली साधने या दोन्ही बद्दल उदास असतात. लोकांना मर्टन यानी माघार घेणारे लोक असे म्हटले आहे. या दोन्हीची त्यांना किळस येते. ते भौतिक यशाचे ध्येय स्वीकारत नाहीत किंवा ते मिळवण्यासाठी जी संस्थात्मक साधने आहेत त्यावरही त्यांचा विश्वास नसतो. ते या दोन्ही गोष्टी नाकारून तिसऱ्याच गोष्टीच्या मागे असतात. त्या गोष्टी त्यांच्या आयुष्याला अर्थ देतील असे त्याना वाटते पण ते खोटे असते. मादक द्रव्याचे आणि दारुचे सेवन करणारे लोक स्वतःचे एक जग निर्माण करतात आणि भविष्याची चिंता न करता त्या जगात राहतात. अशा व्यक्तींना आपल्या कुटुंबाप्रती आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीचेही भान नसते. ते एकटेपणाचे आयुष्य जगतात. ते फक्त स्वतःपुरता आणि स्वतःच्या मिळकतीपुरता विचार करतात. समाज त्यांना आवडत नाही. ते समाजाप्रती उदासिन असतात. अशा व्यक्ती महत्त्वाच्या मूल्यांना आणि ते मिळवणाऱ्या स्वीकृत साधनांनाही नाकारतात.

### ५) विद्रोह करणे:

शेवटचे मर्टन यांचे अनुकूलन तत्त्व विद्रोह करणाऱ्या लोकांचे आहे. हे लोक जुनी समाज रचना बदलून टाकून नवीन समाजरचना तयार करण्याचे प्रयत्न करतात. म्हणजे महत्त्वाच्या ध्येयाबद्दल आणि साधनाबद्दल ते उदासीन असतात किंवा त्यांची भावना अलगीकरणाची असते कारण त्यांना

नाट्यमयरित्या वेगळी समाज रचना निर्माण करायची असते. अश्या प्रकारचा विद्रोह ते करु इच्छितात. सगळे क्रांतिकारी सामाजिक चळवळीचे नेते अशा अर्थाने विद्रोही आहेत की त्यांना पुर्णपणे नवी पद्धत, नवी व्यवस्था, नवी रचना हवी असते. उदा नक्सली नेते गरीबांना न्याय मिळावा म्हणून जमीनदारांना विरोध करतात. अतिरेकी जे लोकांच्या मनात भीती निर्माण करावी म्हणून निरपराध लोकांना मारतात ते बंडखोर असतात. बद्धिवादी राजकीय गटसुद्धा या विद्रोही लोकात मोडतात. ते अस्तित्त्वात असलेल्या ध्येयांना आणि साधनांना नाकरतात. पण त्याच्या बदली नवी ध्येये आणि नवी साधने निर्माण करण्यासाठी आणि नवी समाज रचना आणण्यासाठी सक्रीय सहभाग घेतात.

मर्टन यांनी हे स्पष्ट केले आहे की मी पाच प्रकारच्या व्यक्तींचे वर्णन करण्याचा मी प्रयत्न करीत नाही तर ते लोक कश्याप्रकारच्या कृती करतात ते समजून सांगण्याचे शास्त्र मी वापरत आहे. अश्या प्रकारे संघटित गुन्हेगारीचे नेते नूतन पद्धती शोधणाऱ्यांच्या विभागात जाऊ शकतात कारण ते समाजमान्य साधनातून यश मिळवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. तरी हे असे लोक समाजमान्य अशा काही रीती पाळत असतील म्हणजे ते धार्मिक रीतिरिवाजपाळत असतील आणि आपल्या मुलांना शाळेत पाठवत असतील. त्या उलट काही समाज मान्य सन्माननीय लोक कर चुकवत असतील किंवा वाहतुकीचे नियम मोडत असतील. मर्टन यांच्या मतानुसार एकच माणूस जशी त्या विशिष्ट परिस्थितीची मागणी असेल त्याप्रमाणे वर्तनाच्या या चार पाच पद्धती पुढे मागे करीत असतो.

वैयक्तिक अनुकुलनाचे प्रकार मांडल्यानंतर मर्टन नियमनरहिततेची व्याख्या करतात. ''नियमन रहितता म्हणजे सांस्कृतिक रचना विस्कळीत होणे, जेव्हा सांस्कृतिक आदर्श किंवा नियमने आणि ध्येय आणि त्यानुसार वागण्याची व्यक्तीची सामाजिक संरचनेनुसार असणारी क्षमता यामध्ये तीव्र विसंवाद निर्माण होतो. तेव्हा नियमनरहितता निर्माण होते.'' अशा परिस्थितीत सांस्कृतिक मूल्ये महत्त्वाच्या मूल्यांच्या विरोधी असणाऱ्या वर्तनाला मदत करु शकतात.

दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की नियमनरहितता तेव्हा येऊ शकते जेव्हा समाज रचना ही सांस्कृतिक मूल्यांवर ताण आणते, म्हणजे जेव्हा सांस्कृतिक व्यवस्था ही समाजरचना मान्य करीत नसलेल्या वर्तनाची आणि कृतीची मागणी करते. मर्टन तीव्र नियमन रहितता आणि साधी नियमन रहितता यातला फरक सांगतात. साधी नियमन रहितता म्हणजे गटामधील किंवा समाजामधील गोंधळाची अवस्था ज्यामुळे मूल्यांच्या व्यवस्थांमध्ये संघर्ष होतो. त्यामुळे अस्वस्थता निर्माण होते आणि गटापासून अलगतेची भावना निर्माण होते. तीव्र नियमनरहितेत परिस्थिती अतिशय खालावलेली असते आणि मूल्यव्यवस्थेचे टोकाचे विघटन होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर काळजी निर्माण होते. थोडक्यात मर्टनच्या मते सांस्कृतिक ध्येय आणि संस्थात्मक साधने यातला संघर्ष हे नियमन रहिततेचे प्राथमिक कारण आहे. अशाप्रकारे मर्टन यांच्या मते नियमनरहितता म्हणजे संस्कृतीमान्य ध्येय आणि ध्येय मिळवण्यासाठीची साधने यातला विसंवाद होय.

मर्टन यांचे आग्रहाचे म्हणणे आहे की नियमन रहितता ही एक सामाजिक संकल्पना आहे. ही नियमन रहितता ही सामाजिक व्यवस्थेचा परिणाम आहे, त्या समाजरचनेतल्या त्या व्यक्तीमुळे अशी अवस्था येत नाही. ते म्हणतात, ''ही अवस्था म्हणजे समाजाची सभोवतालची स्थिती ही कुणा विशिष्ट व्यक्तीची अवस्था नाही. जेव्हा माणसे कायद्यावर अवलंबून राहू शकत नाहीत किंवा समाजातले इतरांचे वर्तन कायदेशीर आहे अशी शक्यता व्यक्तीला वाटत नाही तेव्हा लोकांना नियमन रहिततेला तोंड द्यावे लागते. उदा. जेव्हा स्त्री पुरुष बागेमध्ये किंवा रस्त्यावर मोकळेपणाने फिरु शकत नाहीत कारण त्यांना कुणीतरी लुटण्याची भीती असते तेव्हा नियमन रहिततेचे प्रमाण कळते.

सरकारच्या कारभाराबद्दल जनतेच्या मनात विश्वास राहात नाही. एकमेकांशी केलेले करार विश्वासाचे वाटत नाहीत, गुन्हेगारीच्या संख्येत वाढ होते किंवा अशाच एखाद्या येणाऱ्या संकटाची भीती वाटते तेव्हा समाजामध्ये नियमन रहितता निर्माण होते.

नियमनरहिततेचा सिद्धांत हा सामाजिक स्थितीला लागू पडतो असे म्हणणे फारसे उचित होणार नाही असे मर्टनच्या टीकाकारांचे म्हणणे आहे. उदा. नुतन पद्धती, विधीवाद, माघार घेणे आणि विद्रोह करणे यामुळे किती प्रमाणात पथभ्रष्टता येते हे ठरविणे अवघड आहे. त्यातूनच मर्टनच्या सिद्धांत विशिष्ट वर्तनामुळे असे होते. स्पष्टीकरण देतो. पण ते किती प्रमाणात होते हे नक्की सांगता येणार नाही. उदा चांगली संधी न मिळणारे लोक बेकायदेशी जुगार खेळतात त्यांना मर्टन नूतन पद्धतीचे लोक म्हणतात. अश्या प्रकारचे स्पष्टीकरण देण्यास हा सिद्धांत चांगला असला तरी प्रमाणातला फरक सांगू शकत नाही. म्हणजे ज्यांना चांगली संधी मिळत नाही असे सगळेच लोक का जुगारी होत नाहीत ? किंवा निरनिराळ्या समाजात गुन्हेगारीचे प्रमाण वेगवेगळे का असते?

## १३.७ सारांश

पथभ्रष्टतेच्या अर्थाला समजून घेण्याच्या सामाजिक ज्ञानामध्ये मर्टन यांनी मोलाची भर घातली यात शंका नाही. समाजमान्य गोष्टींना न मानणारे पथभ्रष्ट जे लोक आहेत उदा. नूतन पद्धती स्वीकारणारे आणि विधीवादाला स्वीकारणारे जे लोक आहेत ते आणि समाज नियमांना चिकटून राहणारे, समाजमान्य गोष्टींशी अनुकूल असणारे जे लोक आहेत या दोघांमध्ये काही गोष्टी समान आहेत. समाज मान्य गोष्टीनां न मानणारे जे लोक आहेत त्यांनाही काही मूल्ये आहेत किंवा त्यांचेही काही नीतिशास्त्र आहे. गुन्हेगार नसलेले आणि समाजमान्य गोष्टीना मानणारे जे लोक आहेत त्यांना जशा महत्त्वाकांक्षा असतात तशाच प्रकारच्या महत्त्वाकांक्षा समाज मान्य गोष्टींना न मानणाऱ्या लोकांमध्येही असतात. त्यामुळे समाजाला मान्य असणारे जे लोक आहेत. त्यांची ही पथभ्रष्टता ही समाजाने निर्माण केलेल्या वर्तनामुळे होते, ती व्यक्तीच्या तात्काळ उर्मीने किंवा अनिवार्यतेमुळे होत नाही.

आ.र.के. मर्टन यांनी कार्यवादाच्या भव्यदिव्य सिद्धांतापेक्षा वेगळे असलेले मध्यमस्तरीय सिद्धांत समाजशास्त्राच्या अभ्यासाला दिले. त्यांनी संदर्भगट, पथभ्रष्ट कार्य याबद्दलही समजून सांगितले. त्यांनी सिद्धांत आणि संशोधन यांच्या मधले संबंध स्पष्ट करुन सांगितले त्यामुळे मर्टन जास्त प्रसिद्ध झाले.

## १३.८ तुमची प्रगती तपासा

१) मर्टन यांच्या संरचनात्मक कार्यवादाच्या मुख्य लक्षणांवर प्रकाश टाका.

२) संदर्भ गट म्हणजे काय ?

३) मध्यमस्तरीय सिद्धांताची चर्चा करा.

४) समाज मान्य गोष्टी न मानणाऱ्या लोकांच्या नियमनरहिततेच्या सिद्धांतावर प्रकाश टाका.

## १३.९ प्रश्न

१) मर्टन यांच्या मध्यमस्तरीय सिद्धांताचे महत्त्व यावर चर्चा करा.

२) मर्टनच्या कार्यात्मक विश्लेषणाचे स्पष्टीकरण करा. आणि कार्य अ-कार्य, प्रकट कार्य, अप्रकट कार्य यातला फरक स्पष्ट करा.

३) संदर्भ गटाच्या संकल्पनेची चर्चा करा.

४) पुढील विषयावर टीपा लिहा

**टीपा लिहा**

१) मर्टन यांच्या कार्यवादी विश्लेषणाची तीन गृहितके.

२) प्रकट आणि अप्रकट कार्य.

३) संदर्भ गट.

४) नूतन पद्धती आणि विधीवाद या दोन अनुकूलनाच्या पद्धती.

५) मर्टन यांच्या नियमन रहिततेच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण.

## १३.१० संदर्भ


१) फ्रॉन्सिस ॲब्राहम, १९८२, मॉडर्न सोशियालोजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) अब्राहम एफ., १९९१, सोशियालॉजिकल, थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) ॲडम्स बी. एन. ॲंड सैदी आर. एस २००१सोशियालॉजिकल थियरी, न्यू डेली, विस्तार.

४) ॲरॉन रेमन्ड, १९६५, मेन करंट्स् इन सोशियालॉजिकल थॉट पहिली आणि दुसरी आवृत्ती, ग्रेट ब्रिटन वेडनफेल्ड निकोल्सन.

५) कोसर लेविस, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट (दुसरी आवृत्ती) हरकोर्ट ब्रास जोवानोविच इंक,

६) फ्लेचर रोनॉल्ड, २०००, द मेकिंग ऑफ सोशियालोजी, अ स्टडी ऑफ सोशियालॉजिकल थियरी बिगनिंग ॲड फौंडेशन, न्यू दिल्ली, रावत पब्लिकेशन.

७) रिट्झर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थियरी (दुसरी आवृत्ती) न्यू यॉर्क, मॅकग्रा हिल पब्लिकेशन.

८) रिट्झर जॉर्ज १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी, (चौथी आवृत्ती) न्यूयॉर्क, मॅक्ग्रा हिल पब्लिकेशन.


♦ ♦ ♦

**प्रकरण १४**

# मानववंशीय शास्त्र (Ethnomethodology)

**प्रकरणाची रचना**

१४.० उद्देश
१४.१ प्रस्तावना
१४.२ आल्फेड सूत्झ यांचे विचार
१४.३ दुसऱ्यांचे विचारज्ञान
१४.४ मतप्रवाहांचे, विचारांचे आदान-प्रदान
१४.५ वस्तुस्थितीतील अनेकता
१४.६ सामान्य ज्ञान आणि वैज्ञानिक संकल्पना
१४.७ सामान्य ज्ञान आणि समाज शास्त्र
१४.८ समाजशास्त्रातली संरचना आणि आदर्श नमूना
१४.९ एर्विंग ग्रॉफमन
१४.१० नाट्यकलात्मक समीक्षण
१४.११ मूल्यामापन
१४.१२ सारांश
१४.१३ तुमची प्रगती तपासा
१४.१४ प्रश्न
१४.१५ संदर्भ

## १४.० उद्देश

मानववंशशास्त्रज्ञ आणि लोकोत्तर पद्धती शास्त्रज्ञ यांच्या लिखाणाचा परिचय करुन देणे.

सामाजिक वास्तवतेवर विसंबून लोक संबंध निर्माण करतात त्याबद्दल चर्चा करणे.

## १४.१ प्रस्तावना

आल्फ्रेड सूत्झ (१८९९-१९५९) १९६० ने १९७० मध्ये वेगवेगळ्या सैद्धांतिक विचार प्रवाहांचा उगम झाला त्यात अनेक प्रकारचे खूप विचार प्रवाह आले. हे सगळे विचारप्रवाह रोजच्या जीवनाचे समाजशास्त्र या विषयाखाली एकत्रित झाले.

## १४.२ आल्फेड सूत्झ यांचे विचार

लोकोत्तर पद्धती शास्त्र (Phenomenologes) या शास्त्राचे तत्त्वज्ञान जाणिवेवर लक्ष केंद्रित

करते. या शास्त्राचा मोठा इतिहास आहे. मात्र लोकोत्तर पद्धती शास्त्राचे पाठभेद विकासित करण्याचा प्रयत्न आल्फ्रेड सूत्झ यांच्या लिखाणात झाले. १९३२ च्या जर्मनीत सामाजिक जीवनाच्या लोकोत्तर पद्धती शास्त्रात आल्फ्रेड शूत्झ यांना, कशा प्रकारे लोक आपल्या जाणिवांचा प्रवाह शाबूत ठेवून दुसऱ्यांच्या जाणिवा कशा समजून घेता येतील. याबद्दल, आस्था होती, अभ्यासाचा तो मुख्य विषय होता. समाज जीवनाबद्दल आस्था वाटत होती म्हणून त्याचा अर्थ समजून घेण्यासाठी अंर्तविषयाच्या प्रवाहाचा, विशेषतः ज्ञानाचे सामाजिक स्वरुप समजून घेण्यासाठी, उपयोग केला.

सुत्क्ष ह्यांचे बहुतांशी विचार लेखन सामाजिक जीवनाच्या एका पैलूशी, ज्याला जीवन विश्व म्हणजे दररोजचे जीवनविश्व, निगडित आहे. हे एक अंतर्विषयाचे जग आहे. ज्यात लोक सामाजिक वास्तवता निर्माण करतात आणि आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक संकेत किंवा रचना याचे त्यांच्यावर बंधने येतात. या दोन्ही गोष्टी होत राहतात. किंबहूना बहुतांशी जीवनविश्व हे विभागले जाते पण त्याचे खाजगी पैलूही असतात. याच जीवनविश्वाचे शूत्झनी दोन विभाग केले आहेत. १) जवळीकेचे, आपुलकीचे, एकमेकांना भेटणारे गाढ संबंध (आम्ही नातलग) २) दूरचे, आपुलकी नसलेले भाव विरहित संबंध (ते- नातलग) जगातल्या या जीवनात जरी आपुलकीच्या 'आम्ही नातलग' संबंधाना फार महत्त्व असले तरी समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने हे दुरस्थ संबंध (ते नातलग) आहेत त्यांचा वैज्ञानिक दृष्ट्या अभ्यास करणे सोपे जाते. जरी शुत्झ यांनी जाणीव आणि अंतर्विषयक जगाचा विचार बदलला असला तरी नंतर जाणीवेतल्या अंतर्दृष्टीने विशेषतः त्यांचे लोकांच्या हेतूबद्दलचे विचार समजून घेतल्यानंतर पुढे त्यांनी हा अभ्यास केला.

सर्वसाधारणपणे सूत्झ यांना या द्वंद्वात्मक नातेसंबंधांची काळजी होती. लोक सामाजिक वास्तवाची निर्मिती करतात आणि त्याचवेळी पूर्वजांनी निर्माण केलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तववाद, जो त्यांच्याकडे वंशपरंपरेने आला आहे, त्याच्या बंधनात असतात.

सूत्झ यांनी त्यांच्या 'द मिनिंगफूल स्ट्रक्चर ऑफ द सोशल वर्ल्ड'' या पुस्तकात समाजशास्त्राचे जे सिद्धांत आहेत त्यात जाणिवेच्या मूलभूत लक्षणाच्या मूळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. त्यातून त्यांनी वेबरच्या वर्स्टेन सामाजिक आणि हसर्ल यांच्या अलौकिक लोकोत्तरवादी पद्धती शास्त्रातला जवळचा संबंध दाखवला. शूत्झ यांच्या या पुस्तकात आणि दुसऱ्या लिखाणातूनही असे दिसून येते की त्यांचे मुख्य विचार हे निसर्गवादाच्या समीक्षणाबद्दल आहेत, जाणीवपूर्वक जीवनाचा टीकात्मक प्रतिसाद खुणा, प्रतीक आणि कल्पना किंवा धारणा याबद्दलचे आहेत. पूर्ण लिखाणात हुसर्ल यांचा प्रभाव दिसून येतो. विशेषतः त्यांच्या थियरी ऑफ इंटेनशनली (हेतूपूर्वकतेचा सिद्धांत आणि त्यांची आंतर्विषयकताची संकल्पना आणि लेबेनस्वेल्ट यावर हसर्ल यांचा प्रभाव दिसून येतो.

दररोजच्या जीवनाचं सामाजिक विश्व हे नेहमीच आंतर्विषयक म्हणजे अनेक विषयाचे असते असे शूत्झ म्हणतात. आपल्या दररोजच्या जीवनाचा अनुभव आपल्याला हे सामान्य ज्ञान देते की आपण हे गृहित धरतो की आपल्याबरोबरीचे लोक अस्तित्वात असतात, त्याचे जाणिवांचे जग असते, आपण त्यांच्या बरोबर संवाद साधतो आणि शेवटी ते आपल्या सारख्याच नैसर्गिक, ऐतिहासिक आणि सामाजिक सांस्कृतिक जगात जगत असतात.

## १४.३ दुसऱ्यांचे ज्ञान

सुत्झ यांनी सामान्यज्ञानाच्या आवश्यक गोष्टी बाबत असे सूचित केले आहे की दररोजचे जग ही संकल्पना हसर्ल लेबेनस्वेल्ट यांनी श्रमपूर्वक तयार केली आहे. सूत्झ हसर्ल यांची प्रस्तुतीकरणाची

कल्पना हे स्पष्ट करण्यासाठी वापरली आहे की आपल्याला इतर लोक कसे माहित होतात आणि आपण त्यांच्याशी कसा संवाद साधतो. हसर्ल प्रस्तुतीकरणाची व्यवस्था सांगतात आणि ते समजतात की यात खुणांची व्यवस्था असते जी शेवटी भाषा होते. उदा. आपण दुसऱ्याबद्दल सहानुभूती दाखवतो म्हणजे हे असेच म्हंटल्यासारखे आहे की आम्ही त्या भावना प्रस्तुतीकरणाने पूर्णपणे जाणून घेतल्या आहेत. कुठल्याही सांस्कृतिक वस्तूचा अर्थ पुस्तकातून, साधनातून, घरातून किंवा आपल्या जवळ जे आहे त्यातून अर्थ शोधून काढण्यासारखी ही प्रक्रिया नाही. आपल्याला जसा अर्थ माहित असतो तशी आपण ती वस्तू बांधतो. तसेच आपुलकीच्या दाट संबंधात (we relations) शब्द हे नुसते आपण ऐकणारे बाह्य आवाज नसतात. जेव्हा आपण लोकांना बोलताना ऐकतो तेव्हा ते नुसते ऐकण्याचे शब्द नसतात तर ते शब्द म्हणजे अर्थाचे वाहन असते जे त्यांना समजून घेण्यासाठी मदत करते.

## १४.४ विचारांचे किंवा दृष्टिकोनांचे आदान-प्रदान

जेव्हा सूत्झ छोट्या जगाबद्दल बोलतात तेव्हा या जगाला **मला कवेत घेता येण्याजोगे जग** असे संबोधनात. हे जग आपुलकीचे एकमेकांना नेहमी भेटणाऱ्या गाढ संबंधांचे असते. त्याच बरोबर दूरचे, आपुलकी नसलेले भावविरहित जे जग आहे त्याला ते **हातचलाखी करता येण्याजोगे जग** असे म्हटले आहे. हेच विचार शब्दश: जरी तसे वापरले नसते. तरी विल्यम जोन्स आणि जॉर्ज हरबर्ट मीड ह्यांनीही मांडले आहेत.

सर्व सामान्य ज्ञान, गृहित धरलेला दृष्टिकोण जो आपण सर्व मानतो, समजा जर आपण जागा बदलली तर, जागेची अदलाबदल करु शकतो आणि तसे जर केले तर पूर्वीच्या लोकांनी हे जग पाहिले असेल तसेच प्रत्येकाला दिसेल.

अर्थात हा विचार फक्त जागेसंबंधीचा नाही तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक बाबीतही असू शकतो. प्रत्येकाची चरित्रात्मक परिस्थिती ही वैशिष्ट्यपूर्ण असते. हाच विचार केला तर आपल्या उद्देशाचे आणि व्यवस्थेचे समर्थन वेगळे वेगळे असते. अशाप्रकारच्या काही खास संरचना ज्या आपण एकत्र अनुभवतो त्या आपल्याला आपल्या खाजगी जगातून बाहेर काढून सर्वसामान्य जगात आणतात. सुत्झ आपल्याला आठवण करुन देतात की ''विचारांच्या आदान प्रदानाचा जो सिद्धांत आहे तो या तुलनेने लहान असलेल्या साध्या जगात आदर्शवत आहे. कारण हे जरी खरे असले की आपण आपल्या दृष्टिकोणाचे आदानप्रदान करु शकतो आणि त्यामुळे निदान प्रत्यक्ष हेतूसाठी असलेला आपला दृष्टिकोण पण अदला बदल करु शकतो. त्यामुळे त्यातून अटळपणे एकमेकांच्या जगा पलिकडे जाणे शक्य होते. अगदी उच्च ठिकाणीही जाऊ शकतो. आणि अजूनही एक पलीकडे जाण्याचा प्रकार असू शकतो तो आपुलकीच्या गाढ संबंधांत जास्त स्पष्ट दिसतो. शूत्झ म्हणतात की ही घटना दररोजच्या जीवनाच्या पलीकडे जाण्याच्या विषयाशी संलग्न आहे आणि ती प्रतीक रुपाने समजली जाऊ शकते किंवा त्याचे आकलन सांकेतिक रुपाने होऊ शकते.

## १४.५ अनेक वास्तवता किंवा अनेक प्रकारची वस्तुस्थिती

इथे सूत्झ यांनी विल्यम जोन्स च्या 'लहान विश्व' या संकल्पनेत फेरफार केले. जेम्स यांनी सूचित केले होते की ती गोष्ट जी उत्साहित करु शकते किंवा उत्तेजित करु शकते ती खरी आहे म्हणून आपण प्रभावित होतो आणि तो प्रभाव त्यावर कोणी टीका नाही केली तर, तसाच राहतो. त्यांची मानसशास्त्रातील त्यांची रुची पाहता, जेम्सनी या वास्तवतेच्या बदलत्या पद्धतीच्या सामाजिक

परिणामांचा मागोवा त्यांनी घेतला नाही. हेच सूत्झ नेमकेपणाने करु इच्छितात. दररोजच्या आयुष्यातील माणसांची रुची हा प्रामुख्याने प्रत्यक्ष काही करण्याची असते. त्यांची रुची कल्पनेतली सैद्धांतिक स्वरुपाची नसते.

त्यांचे 'नैसर्गिक दृष्टिकोण' हे व्यावहारिक आणि यथार्थ हेतूनुसार असतात. त्यांच्या योजना आणि उद्देश जाणून घेण्यासाठी ते जगावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि जगात बदल घडवून आणण्यासाठी ते संघर्ष करतात. सूत्झ यांनी वास्तविक रोजच्या **काम करणाऱ्या जगाला** परमोच्च वास्तविकता असे म्हटले आहे. आणि या समाजजीवनाच्या विभागात माणसे या जगावर सत्ता गाजविण्यासाठी झगडतात आणि त्यांच्या जीवनयोजनेला विरोध करणाऱ्या वस्तुला किंवा दुसऱ्याला नियंत्रित करण्यासाठी निकराचे प्रयत्न करतात. याच वास्तविकतेत आपल्याला रस असतो किवा रुची असते पण त्यांच्या परमोच्च जगाचे सगळेच पैलू आपल्या जीवन योजनांसाठी सारखेच समर्पक असतात असे नाही.

या परमोच्च वास्तविकतेत आपल्या योजना जाणून घेण्यासाठी, त्या पूर्ण करण्यासाठी आपल्या आशा, भीती, आपल्या गरजा कृती करण्यासाठी भाग पाडतात, योजना करण्यासाठी, वाटेतले अडसर दूर करण्यासाठी प्रवृत्त करतात. पण दररोजच्या जीवनातली अनिश्चितता आपल्या मूलभूत अस्तित्वाच्या अनुभवातूनच उगम पावतात ती म्हणजे आपलं मृत्यूबद्दलचं ज्ञान आणि भीती. आपल्या पैकी प्रत्येकाला मरायचे असते हे माहित असते, पण आपण केलेल्या योजना आणि आशा पूर्ण होण्या पूर्वीच आपल्याला मृत्यू गाठेल अशी भीती सुद्धा वाटत असते. सुत्झ म्हणतात की हीच आपली मूलभूत अशी चिंता किंवा अस्वस्थता होय. आपल्या काम करण्याच्या जगात, आपल्या रोजच्या जीवनातल्या सामाजिक अनुभवाचा 'अनिश्चितता'एक आवश्यक असे मूलद्रव्य आहे. हे जग, यातल्या वस्तू आणि याची विशेष पद्धती या सगळ्या गोष्टी आपण गृहित धरतो जोपर्यंत त्यांच्या विरुद्धच्या गोष्टी सिद्ध होत नाहीत. वस्तू जश्या आहेत तश्याच आपण खऱ्या आहेत असे समजतो, असे अनुभवतो जो पर्यंत त्याच्या विरुद्ध विश्वास ठेवायला आपल्या जवळ काही चांगले कारण नाही. माणसाच्या परमोच्च वास्तविकतेत हाच माणसाचा नैसर्गिक दृष्टिकोण असतो.

महत्त्वाच्या वास्तविकते पासून तो अद्‌भूत, दिवास्वप्न, भुतांचे जग, विनोद, नाटक इत्यादिच्या जगाकडे तो वळतो. त्यामुळे त्याची जगावर स्वामित्व गाजवण्याची इच्छा सोडतो, त्याच्या व्यवहारी हेतूना बाजूला ठेवतो आणि तो कल्पनारम्य जगात रमतो, ज्या जगात त्याने निवडलेल्या कुठल्याही जगात कुठलीही भूमिका करु शकतो, कुठलीही योजना करु शकतो. स्वतःच्या मर्जीनुसार निर्णय घेण्याचे त्याला स्वातंत्र्य असते. सूत्झ म्हणतात की हे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्याला महत्त्वाच्या वास्तविकतेत आणि 'स्वप्नांच्या जगात' मिळत नाही नंतर मात्र घटना कठोर बनतात कारण स्वप्न पाहणारा स्वप्नाळू माणूस जे घडत जाते त्यावर प्रभाव टाकण्यात असमर्थ असतो. त्यांच्या योजना आणि उद्देश नसतात कारण त्याचे जीवन आंतरिक अगतिकतेतून जात असते. यावर तो कसल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवू शकत नाही.

शेवटी वैज्ञानिक सिद्धांताचेही एक जग आहे. त्याची सूत्झ थोडक्यात व्याख्या देतात. जगाचे निरीक्षण आणि जगाला समजून घेण्याची कृती याचा अंतर्भाव या वैज्ञानिक सिद्धांताच्या जगात आहे. पण जगावर स्वामित्व गाजवणे याबद्दल यात काही विचार नाहीत. खरे सांगायचे तर व्यवहारी हेतू किंवा काही चांगले करण्याचा हेतू ही काही वैज्ञानिक सिद्धांत बनविण्याच्या प्रक्रियेची मूलद्रव्ये नाहीत.

## १४.६ सामान्य ज्ञान आणि वैज्ञानिक संकल्पना

तत्त्वज्ञानी विचारवंत सर्वसाधारणपणे हे मान्य करतात की सगळ्या जाणिवा अगदी साध्या सुद्धा फक्त शुद्ध इंद्रियजन्य नसतात तर त्यात कल्पनाशक्ती आणि विचारही असतात, पाहणे, ऐकणे, स्पर्श करणे इत्यादि, गोष्टी विचार करणे आणि जाणिवपूर्क कृती करणे याशी जोडलेल्या असतात. हे सामान्य ज्ञानाचे जग आणि दररोजचे जीवन आणि विज्ञान या बाबतीत खरे आहे. तेव्हा हे समजणे आपली चूक आहे की आपण जग तात्काळ आणि प्रत्यक्षपणे बघतो. आपण जे बघतो ते साकार होणारे (घट्ट असे) प्रत्यक्ष जग नसते. प्राथमिक सामान्य ज्ञानासाठी जाणीव म्हणजे फार गुंतागुंतीची अमूर्तता आहे. आपण जी बघतो ती वस्तू आपण जशी बघतो तशी किंवा आहे तशी नसते. ती वस्तू विचाराने तयार केलेली आपल्या जाणिवेने बनवलेली असते. हा विचार मान्य न करणारा ''साकारतेच्या प्रत्यक्षतेच्या भ्रामक कल्पना'' ची चूक करतो.

जसा विज्ञानाचा प्रसार झाला किंवा शास्त्रशुद्ध प्रगती झाली तसा दररोजच्या जीवनातून तर्कशुद्ध वास्तविकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत गेला. विज्ञानाचा इतिहास म्हणजे विचाराने तयार केलेली वस्तू आणि सामान्य ज्ञान यातले सूचीचे अंतर वाढवणारा इतिहास आहे. खरेच नंतरचा विषय हा वैज्ञानिक संकल्पनांनी बाजूला सारला. असा एक विकास झाला. ज्याचा पदार्थविज्ञान शास्त्रावर आणि समाज शास्त्रावर वेगवेगळा परिणाम झाला. आदर्श गोष्ट ही आहे की नैसर्गिक विज्ञानाच्या वैज्ञानिकाने आपली समस्या आपण निवडावी आणि वास्तविकतेच्या कुठल्या पैलूवर अभ्यास करावा हे ठरवावे. त्याच्या अभ्यासाच्या विषयाने त्यातली सत्य विधाने पहिल्यापासून निवडलेली नसतात किंवा पहिल्यापासून त्यांची व्याख्या केलेली नसते कारण अर्थ हा निसर्गाच्या आत नसतो किंवा निसर्गाला त्याचे महत्त्व नसते.

याच्या विरुद्ध समाजशास्त्रीय अभ्यास त्या जगाचा अभ्यास करतो जे जग पूर्वीपासून निवडलेले असते आणि पूर्वीपासून त्याची व्याख्या केलेली असते, तो त्यातच असलेल्या जिवंत विचारप्रक्रिया आणि कृतीने हे केलेले असते. माणसे स्वतःला सामान्य ज्ञान, संरचना आणि वैचारिक वस्तूतून स्वतःला दररोजच्या जीवनाशी जुळवून घेतात. सूज्ञ यांच्यासाठी नैसर्गिक जग आणि सामाजिक जग वेगवेगळ्या प्रकाराने आपले काम करत असतात.

## १४.७ सामान्य ज्ञान आणि समाज शास्त्र

सर्व विज्ञान शाखा, पदार्थ विज्ञान आणि समाजशास्त्र हे अमूर्त कल्पना घेऊन त्याचा अभ्यास करतात, खास पद्धतीने करतात यात विलक्षण अशी घटना नसते. समाजशास्त्रज्ञ आपल्या अश्या करण्याचे समर्थन करतात कारण दररोजच्या जीवनात प्रत्येक माणूस अशाच अमूर्त कल्पना राबवतो आणि विशिष्ट अशी सत्य विधाने, घटना आणि अनुभवांना पूर्वाभिमूख होतो. सुत्झ यांच्यासाठी समाजशास्त्राची समस्या आणि समाजशास्त्राचे हे कर्तव्य आहे की ''रचनेचा अर्थ समजून घेणारी आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ ज्ञान शाबित करणारी एक समर्पक पद्धत विकसित करावी.

दररोजच्या जीवनात प्रत्येक माणूस दुसऱ्यांच्या आंतरक्रियेचे निरीक्षण करीत असतो, पण तो त्यांच्या एकमेकांशी होत असलेल्या क्रियेचा म्हणजे त्यांच्या आंतरक्रियेचा भाग होत नाही आणि त्यांच्या हेतूशीही त्यांचा संबंध येत नाही. अशा प्रसंगात निरीक्षण करणारा माणूस त्यांच्या आंतरक्रियेत किंवा त्याच्या परिणामात काही रस घेत नाही. अशा अर्थाने तो अलिप्त आणि त्याच्या आंतरक्रियेत

रस नसणारा माणूस असतो. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ अशा खास प्रसंगात रसहीन निरीक्षण करतो. पण खूप प्रमाणात वर्ग, स्तर, गट आणि मंडळी असतात. अश्या समाजात तो शास्त्रज्ञ अटळपणे कोणाच्या तरी मूल्यांना आणि हेतूना पाठिंबा देतो आणि त्याच्या विरुद्धच्या लोकांना पाठिंबा देत नाही याबद्दल शंका नाही. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ कधीच पूर्णपणे अलिप्त राहू शकत नाही असे सूत्झ यांना वाटते.

## १४.८ समाजशास्त्राच्या संकल्पना आणि आदर्श नमूना

सूत्झ यांनी समाज शास्त्रज्ञाच्या एका विशिष्ट पद्धतीचे अवलोकन केले. त्यांनी काही निरीक्षित कृतीचे स्पष्टीकरण केले. त्यांनी विशिष्ट अशा कृतीच्या अभ्यासाची रचना केली. त्यांनी नटांना एक गृहितक दिले त्याचबरोबर त्यांच्यासारखेच एक जाणिवेचे गृहितक पण दिले. त्यांच्या विशेष वैज्ञानिक समस्यांशी संबंधित होते म्हणून त्यांनी ते केले. बनावटी हेतू त्यांनी बनावटी नटांना दिले आणि त्यांना बनावटी प्रसंगात गुंतवले.

सूत्झ यांचा मुख्य उद्देश हा आहे की आपल्याला आठवण करुन देणे की वरस्टेहेन ही दररोजच्या जीवनाची सामान्यज्ञानाची पद्धत आहे. जी माणसांना नियंत्रित करते आणि सत्य तपासून घेते. ही एक अशी पद्धती आहे की माणसे अनेक भविष्यवाणी करतात, जी भविष्यवाणी समन्वय साधून, शक्यता बघून करतात. उदा. जेव्हा ते पत्र लिहितात तेव्हा त्याच्यावर तिकीट लावतात आणि बरोबर पत्ता लिहितात आणि त्यांना हे माहित असते की हे कदाचित त्या माणसाला पोहचेल. लोक सामाजिक जगाचे त्यांच्या रोजच्या जीवनातल्या अनुभवांना समजून घेतात आणि त्यांची मांडणी करतात. आणि जर समाजशास्त्रज्ञ लोक कुठल्या सर्वसामान्य तत्त्वामुळे असे करतात हे समजून घेण्यात नापास झाले तर त्यांच्या महत्त्वाच्या कामात ते नापास झाले असे म्हणायला हरकत नाही.

सूत्झ यांचे मुख्यतः जे कार्य आहे ते संरचित करणे आणि विचार सारांशरुपाने मांडणे हे आहे. त्यांनी समर्थन केलेली ही जी पद्धती आहे त्याचा फार थोडा विकास झाला आणि फार थोड्या प्रमाणात उपयोगात आणला गेला. त्यांच्या प्रयत्नांबद्दल आपण काही टीकात्मक गोष्टी उपस्थित करु शकतो.

सूत्झ यांचे लोकोत्तर पद्धती शास्त्रीय समाजशास्त्र हे विस्ताराने आंतरविषयांवर लक्ष केंद्रित करते. जेव्हा लोकोत्तर पद्धती शास्त्राचे विचारवंत मुख्यतः जाणिवेवर लक्ष केंद्रित करत होते तेव्हा सूत्झ यांनी लोकोत्तर पद्धती शास्त्राला बाहेर आंतरविषयावाद समाजजगाकडे लक्ष द्यायला लावले. लोक सामाजिक जगात नमूनेदार पद्धतीचा किंवा नमूनाकरणाचा उपयोग करतात आणि त्याचा विकास करतात. दिलेल्या कुठल्याही परिस्थितीत दररोजच्या जीवनात कृती ही पूर्वीच्या अनुभवावरुन नमुना बांधून त्याप्रमाणे निश्चित केली जाते.

नमूनाकरण हे वेगवेगळ्या प्रकारचे आकार घेते म्हणजे एक माणूस, एक कुत्रा, आपण नमूनाकरणात गुंग असतो. जेव्हा आपण भाषेचा उपयोग करतो तेव्हा आपण भाषेचे नमुनाकरण करत असतो. ही अशी भाषा नमुन्यांच्या विचारांचा खजिना समजला जाऊ शकतो जो आपण सामाजिक जगाचा अर्थ लावायला उपयोगात आणतो.

समाजशास्त्रज्ञांना अनेक सिद्धांत उपलब्ध असतांना त्यांनी सूत्झ यांच्या 'हेतू' याबद्दलचा जास्त अभ्यास केला. मात्र सूत्झ यांचा विश्वास होता की सगळ्या सामाजिक आंतरक्रिया या आदानप्रदानाच्या हेतूने केलेल्या असतात.

## १४.९ एर्विंग ग्रॉफमन

ग्राफमन यांचा जन्म कॅनडात झाला. त्यांनी शिकागो मध्ये शिकागोस्कूलच्या हुशार विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण घेतले. आणि मग खूप वर्षे प्रोफेसर म्हणून यूएस मध्ये काम केले. त्यांचे कार्य हे संशोधकांसाठी महत्त्वाचे आहे आणि अनेक विषयांशी निगडीत आहे. ते विषय आहेत, मानव जातीय शास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र समाजशास्त्र आणि सांस्कृतिक अभ्यास. याचे आश्चर्य वाटत नाही की ने खूप वाचत होते निरनिराळ्या प्रकारच्या साहित्यात ते बुडून जात होते कारण त्यांना मानवी व्यवहाराचा किंवा मानवी वर्तनाचा अभ्यास करायचा होता आणि अश्या कल्पनांच्या शोधात ते असायचे. 'प्रेझेंटेशन ऑफ सेल्फ इन एव्हरीडे लाईफ' या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर त्यांचे महत्त्व खूप वाढले. ते पुस्तक त्यांच्या स्कॉटलंडच्या आर्कनी बेटातल्या फिल्डवर्कवर आधारित होते. या पुस्तकात त्यांनी सविस्तरपणे जवळचे संबंध असलेल्यांचे वर्तन पाहिले आणि त्यांचे आपल्या स्वत्त्वाशी असलेले संबंध तपासले. त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात त्यांनी स्वत्व वर लक्ष केंद्रित केले आणि वेड्याच्या इस्पितळापासून ते जाहिरात जग ते नेत्रसंबंध ते लिफ्ट मधले वागणे इथपर्यंत सगळ्या ठिकाणच्या वर्तनाचा वेध घेतला. ग्राफमन हे एक विद्वान लेखक होते आणि त्यांच्या सौंदर्यपूर्ण रचना केलेल्या आणि लोकांना सहज उपलब्ध होऊ शकणाऱ्या निबंधामुळे लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले.

सूक्ष्म दृष्टिकोन हे वेगवेगळे असतात आणि कधी कधी त्यांच्यात स्पर्धा असते. तरीही या वेगवेगळ्या परंपरेत काही अनेक प्रकारचे कौटुंबिक साम्य असते. ते पुढीलप्रमाणे आहे.

१) नट समोरासमोर अचानक भेटून वाद करतात त्याला समाजजीवनात मध्यवर्ती स्थान आहे.

२) लोक निर्मितीशील, बुद्धिमान आणि ज्ञानी असतात.

३) नट एकमेकात वाद घालतात आणि ते वाद भविष्य सांगणारे, यशस्वी आणि समजून घेण्यासारखे असतात. अशाप्रकारच्या उपलब्धीतून समाज व्यवस्था निर्माण होते.

४) नटाच्या परिस्थितीची व्याख्या पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्पष्टीकरणात्मक पद्धती समाजाचा अभ्यास करण्यासाठी तयार कराव्या लागतात.

एर्विंग हाफमन हे अद्वितीय असे बुद्धिमान असे समाजाचे निरीक्षक आहेत. विसाव्या शतकातील २० अत्यंत प्रभावी प्रतिकात्मक आंतरक्रियावादी शास्त्रज्ञामधले ते एक आहेत. ग्राफमन यांच्या समाज जीवनावरील लिखाणाचा परिचय करुन घ्यायचा असेल तर त्यांच्या मुख्य पुस्तकाचे वाचन केलेले बरे. एर्विंग हाफमन अतिशय प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ आहेत.

## १४.१० नाट्यकलात्मक विश्लेषण - एर्विंग ग्राफमन यांचे कार्य

ग्राफमन यांनी त्यांच्या अत्यंत प्रभावशाली वादातीत कार्यात असे सूचित केले आहे की सामाजिक कृतीचा अभ्यास विस्तृत अश्या नाट्यकलात्मक रुपकाद्वारे केला जाऊ शकतो. याचा मुख्य उद्देश असा आहे की सर्वसाधारण कामाच्या परिस्थितीत व्यक्ती लोकांसमोर स्वतःला आणि स्वतःच्या कृतीला अशी सादर करते हे पाहाणे हा उद्देश आहे. स्वतःला सादर करताना लोकांनी आपली प्रतिमा कशी बनवावी याबद्दल तो जागरुक राहतो आणि तशाप्रकारे तो स्वतःला मार्गदर्शन करतो आणि स्वतःला नियंत्रित करतो म्हणजे स्वतःची आपल्या मनासारखी प्रतिमा लोकांनी तयार करावी म्हणून त्याप्रमाणे तो आपले वागणे ठरवित असतो, आपला प्रयोग तो नियंत्रित करत असतो. ''त्यामुळे

पार्सन्स यानी नटानी आंतरिक भूमिका तयार करताना पहिली तर ग्राफमन यानी भूमिका वठविताना पाहिली आणि भूमिकेतल्या अंतरावर त्यांनी भर दिला. हा भेद महत्त्वाचा आहे. कारण तो समाजातल्या परावर्तीततेवर आणि अभिनयकले वर प्रकाश टाकतो. ग्राफन आग्रहाने म्हणतात की लोकांना ते जे काही करु इच्छितात त्याचा एक लोकांनी स्वीकारावा, म्हणजे दुसऱ्यांनी स्वीकारावा असा प्रयोग करावा लागतो. याला ग्राफमन अत्यंत प्रभावित करणारे किंवा खास छाप पाडणारे प्रभाव व्यवस्थापन असे म्हणतात. त्यांची भूमिका अभिनित करताना ते वस्तूंचा साधन म्हणून उपयोग करु शकतात. तिथे त्यांना पाहणारा प्रेक्षक वर्ग असतो आणि कदाचित त्यांना साथ देणारा त्यांचा संघही असू शकतो. जेव्हा माणसे आंतरक्रियेत असतात तेव्हा ते स्वतःच प्रेक्षक असतात तेच नट ही असतात. गॉफमन् असे सूचित करतात की आंतरक्रियेवर स्थानाचाही परिणाम होऊ शकतो. तिथे नेहमी रंगमंचाच्या पाठीमागचा भाग असतो ते तिथे काम करत असतात पण ते प्रेक्षकांना दिसत नाही मात्र ते काम रंगमंचावरील कामाला सोपे करते. ग्राफमन आपले म्हणणे किंवा आपली कल्पना सिद्ध करण्यासाठी खूप उदाहरणे देतात. त्यात हॉटेलचे उदाहरण महत्त्वाचे आहे, त्यांचे म्हणणे सिद्ध करणारे आहे. एक हुशार वेटर आपल्या गिऱ्हाईकासमोर (म्हणजे आपल्या प्रेक्षकांसमोर) आपली भूमिका पार पाडत असतो. तेव्हा त्याला हॉटेलच्या स्वयंपाक घरातल्या, लोकांची मदत असते, त्यांची साथ असते म्हणूनच तो लोकांना सेव पुरवू शकतो. म्हणजे ते स्वयंपाकघर म्हणजे रंगमंचामागचा भाग असतो. लोकांच्या समोर तो वेटर मात्र जेवणाचा मेनू देतो, जेवण वाढतो आणि लोकांवर असा प्रभाव पडतो की तो एकटा व्यावसाईक त्यांच्यासमोर उभा आहे.

रंगमंचावरील नाटके पहिल्यांदा लिहिली जातात. पटकथा असते मग त्यांची प्रॅक्टीस करुन त्याला चांगले केले जाते. रंगीत तालमीही घेतल्या जातात. मात्र समाज जीवन मात्र अकस्मात येणाऱ्या संधीवर अवलंबून असते. लोकांना ज्या पद्धतीने आपला विश्वास टिकवून ठेवावा लागतो, चुका करण्याचा धोका आणि ते जेव्हा प्रयोग करत असतात तेव्हा येणारे अडथळे या सगळ्यांची ग्राफमन चर्चा करतात. लोक जेव्हा रोजच्या जीवनात स्वत्वाचे प्रस्तुतीकरण करतात तेव्हा लोक कल्पक, चतुर आणि बुद्धिमान असतात. याचा आपल्याला प्रत्यय येतो कारण ते तसा ठसा आपल्या मनावर उमटवतात. ते सतत एकमेकांना संकेत देत असतात. ही गोष्ट असे सांगते की ते कोण आहेत आणि ते काय करीत आहेत आणि परिस्थितीची मिळून केलेली व्याख्या तयार करण्यात ते नटांना मदत करतात. मात्र अश्याप्रकारच्या दृष्टिकोनामुळे एक धोका संभवतो व जो धोका असा आहे की या नाट्यकलात्मक रुपकाच्या तर्कामुळे, लोक हे खोटे व घोटाळे करणारे आणि संयोजित करामती किंवा अभिनय करुन प्रभाव पाडतात आणि त्या द्वारे लोकांवर नियंत्रण ठेवू पाहतात, अशाप्रकारचा लोकांचा सहज समज होऊ शकतो. अश्यामुळे कृतीला समजून घेताना लोक संस्कृतीच्या बाहेर आहेत आणि संस्कृतीचा वापर करताहेत असे वाटते पण संस्कृतीला पूर्णपणे आत्मसात करुन, आपल्या स्वत्त्वात मुरवून कृतीसाठी चालना देणारी शक्ती अशाप्रकारचे या नाट्यकलात्मक रुपकाचे स्वरुप असले पाहिजे.

## १४.११ ग्रॉफमन - एक मूल्यमापन

सांस्कृतिक अभ्यासाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास ग्रॉफमन यांच्या विचारांचे मौलिक दर्शन होते.

सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांचे कार्य परिस्थितीची सामान्य व्याख्या करण्यासाठी लोक सांस्कृतिक साधनांचा उपयोग करतात आणि परिस्थितीला अनुकूल असे वर्तन करतात. अशा प्रकारांकडे ग्राफमन यांनी सगळ्यांचे लक्ष वेधले आहे.

कृती, उद्देश किंवा कृतीचा अर्थ आणि स्वत्त्व यांच्या कडीवर त्यांचे लक्ष असते. काही प्रकारात नव्या सांस्कृतिक अभ्यासातील व्यक्तिमत्त्व या तत्त्वाकडे मात्र काहिसे दुर्लक्ष होते.

संस्थामधला आणि आमोरासमोरच्या भेटीमधला जो विधीचा पैलू असतो त्याकडे ते लक्ष देतात. हे डरखाईम यांच्या परंपरेतले महत्त्वाचे विस्तृतीकरण आहे.

अनेक प्रकारचे टीका करणारे मुद्दे लक्षात घेतलेले आहेत.

१९५० च्या अमेरीकेच्या सभ्य मध्यम वर्गीयांच्या दृष्टिकोनाचे खोटे वैश्विकीकरण केले गेले आणि हे ग्राफमन यांच्या दृष्टिकोनामुळे झाले. खरा प्रश्न तर हा आहे की त्यांची ही निरीक्षणे दुसऱ्या लोकांना किती लागू पडतात? हे दुसरे लोक म्हणजे मुख्यतः स्त्रियांचे अनुभव, अल्पसंख्याक वगैरे.

रुग्णालयांचे संस्थात्मक स्तरावरचे विश्लेषण आणि लैंगिक जाहिरातीचा प्रसारमाध्यमांचा अभ्यास यावरुन ग्राफमन यांच्या संस्कृतीच्या मोठ्या प्रश्नांकडे त्यांचा अभ्यास कसा बघेल अशा प्रकारचे प्रश्नचिन्ह ऊभे राहते.

त्यांच्या काही कार्यातून म्हणजे रुग्णालय ज्यात या प्रश्नाला ते भिडले आहेत तिथे सत्तेच्या बाबी दुर्लक्षित राहिल्या. सर्वसामान्यपणे जवळची आमोरासमोरची जी आंतरक्रिया आहे त्यावर सत्तेचा प्रभाव पडू शकेल याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे एका दिलेल्या आंतरक्रियेमध्ये जी परिस्थितीची व्याख्या केली जाते तिथे सत्तेच्या बाह्य रचनेचा किंवा संस्कृतीचा प्रभाव पडू शकतो. याकडे त्यांनी जास्त लक्ष द्यायला हवे होते.

## १४.१२ सारांश

अव्यक्त असलेल्या विषयामध्ये ग्राफमन पार्सन्स पेक्षा काही दृष्टीने पुढे गेलेले दिसतात पण त्यांच्या संस्कृतीबद्दलच्या दृष्टिकोनात ते फरसे पुढे गेले नाहीत असे दिसते.

## १४.१३ तुमची प्रगती तपासा

१) आल्फ्रेड सूत्झ यांचे योगदान

२) एर्विंग ग्राफमन यांच्या कार्याचे मूल्यमापन करा.

३) आल्फ्रेड सूत्झ यांच्या वास्तविकते बद्दलचे विचार.

## १४.१४ प्रश्न

१) सूत्झ यांनी सामान्य-ज्ञान आणि वैज्ञानिक संकल्पना यात कसा फरक केला ?

२) मानववंशीय शास्त्रातले ग्राफमन यांचे योगदान यावर टीप लिहा.

३) एर्विंग ग्राफमन यांच्या नाट्यकलात्मक विश्लेषणाची चर्चा करा

## १४.१५ संदर्भ


१) ॲब्राहम फ्रॉन्सिस, १९८२, मॉडर्न सोशियालोजिकल थियरी, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस.

२) अब्राहम एफ., १९९१, सोशियालॉजिकल, थॉट, मद्रास मॅकमिलन.

३) ॲडम्स बी. एन. अँड सैदी आर. ए. २००१, सोशियालॉजिकल थियरी, न्यू डेली, विस्तार.

४) ॲरॉन रेमन्ड, १९६५, मेन करंट्स् इन सोशियालॉजिकल थॉट I & II, ग्रेट ब्रिटन वेडनफेल्ड निकोल्सन.

५) कोसर लेविस, १९७१, मास्टर्स ऑफ सोशियालॉजिकल थॉट (दुसरी आवृत्ती) हरकोर्ट ब्रास जोवानोविच इंक,

६) फ्लेचर रोनॉल्ड, २०००, द मेकिंग ऑफ सोशियालॉजी, अ स्टडी ऑफ सोशियालॉजिकल थियरी बिगनिंग ॲड फौंडेशन, न्यू दिल्ली, रावत पब्लिकेशन.

७) रिट्झर जॉर्ज, १९८८, सोशियालॉजिकल थियरी (दुसरी आवृत्ती) न्यू यॉर्क, मॅकग्रा हिल पब्लिकेशन.

८) रिट्झर जॉर्ज १९९६, मॉडर्न सोशियालॉजिकल थियरी, (चौथी आवृत्ती) न्यूयॉर्क, मॅक्ग्रा हिल पब्लिकेशन.


♦ ♦ ♦